मराठी संशोधन

१९६७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. २०३६

– ३ –

(संशोधनपत्रिकेतील, आक्टोबर १९६५ ते
१९६७ या कालावधीतील विविध विषय)

संपादक
स. गं. मालशे
संचालक,
मराठी संशोधनमंडळ



REFBK-0015203

मराठी संशोधनमंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४
१९६७
मूल्य ५

वि. ५
७५९४८
22/3/67
2936

मराठी संशोधन

- ३ -

(मराठी संशोधनपत्रिकेतील, आक्टोबर १९६५ ते
जुलै १९६७ या कालावधीतील विविध विषय)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
क्रमांक ७५९४८ दिः .....
दान २९३६ दोः दिः 22/3/67

संपादक

स. गं. मालशे
संचालक,
मराठी संशोधनमंडळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

REFBK-0015203

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 94203

मराठी संशोधनमंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४
१९६७
मूल्य ५ रुपये

विषयानुक्रमणिका

		पृ.
१. लीळाचरित्र–एक अभ्यास (पूर्वार्ध)	व. दि. कुलकर्णी	१
२. ,, ,, (उत्तरार्ध)	,,	१७
३. गुजराती कवींचीं मराठी पद्यें	ना. ग. जोशी	३३
४. नामा पाठकांचा अश्वमेध	ज. शा. देशपांडे	४२
५. जुन्या मराठी भाषेचें व्याकरण	अ. का. प्रियोळकर	४९
६. ज्ञानदेवांच्या नांवावरील आणखी कांहीं ग्रंथ	म. प. पेठे	५७
७. ज्ञानदेवाचें शंकास्पद वाङ्मय : कृत्या	शं. रा. बडवे	५९
८. ताडपत्रावरील ज्ञात एकच ग्रंथ : कलानिधि	श्री. शं. खानवेलकर	६१
९. कृष्णदास नामाकृत सुदामचरित्र	ज. शा. देशपांडे	६५
१०. एक अज्ञात कवि : हरदास	ना. ब. जोशी	७१
११. श्रीकृष्णचरित्रांतील कांहीं शब्द	देवीसिंग व्यं. चौहान	७५
१२. नवरा-मराठी भाषेंतील एक आप्तसंबंध	कानडे व कुळकर्णी	८९
१३. 'फार' शब्दान्वी थोडी चर्चा	स. गं. मालशे	९५
१४. विष्णुदासकृत शिबिकथा	ज. शा. देशपांडे	९७
१५. लावणीकार ज्योतिराम	गं. ना. मोरजे	१०३
१६. परभी बोली	व. दि. राव	१२०
१७. तीर्थमालिका–स्तोत्र	कांचनमाला हरमलकर	१३२
१८. वटेश्वर–एक अध्ययन	वा. दा. मुंडी	१४९
१९. सरकारास विनंति	वि. बा. प्रभुदेसाई	१६६
२०. भाषेचें स्वरूपः कांहीं नवे दृष्टिकोन	दि. द. माहुलकर	१६८
२१. उखाहरनाचा काळ	देवीसिंग व्यं. चौहान	१७५
२२. 'शेतकऱ्याच्या असूडा'चा शोध	स. गं. मालशे	१८३
२३. 'कल्याणकीर्ती'चें नामरहस्य	रा. चिं. ढेरे	१८७
२४. जोतीराव फुले यांचें पहिल्या ग्रंथकारसभेस पत्र	धनंजय कीर	१९४
२५. माणकोजी बोधले यांचा निर्याणकाल	गं. ना. मोरजे	१९५
२६. ज्ञानदेवांच्या योगदुर्गातील 'कटक'	रा. चिं. ढेरे	१९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
क्रम..... वि: .....
..... बो: वि:

लीळाचरित्र

(एक अभ्यास)

ले. प्रा. व. दि. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 94203

– १ –

'स्मरणभक्ती'चा एक 'आदर्श'

'लीळाचरित्र' हा ग्रंथ कोणत्या निमित्तानें लिहिला गेला, तो लिहितांना म्हाईंभटाची भूमिका कोणती होती, त्या भूमिकेनुसार लीळाचरित्र कसकसें सिद्ध होत गेलें, त्यांत येणारा तपशील कोणास व कां महत्त्वाचा वाटला, सत्यान्वेषणाची नको– इतकी बारीक दृष्टि लीळाचरित्र–लेखनांत कां ठेविली गेली, या आणि यांसारख्या कांहीं प्रश्नांचीं कारणें शोधण्याचा प्रयत्न या लेखांत केला आहे.

'लीळाचरित्र' हा मराठींतील पहिला चरित्रग्रंथ होय. या चरित्रग्रंथाचें स्वरूप नेमकें काय आहे, हें पाहणें मोठें उद्‌बोधक ठरेल. त्यासाठीं ह्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रयोजन कोणतीं आहेत तें समजून घेणें आवश्यक आहे. लीळाचरित्र म्हणजे महानुभाव पंथाचे आद्यप्रवर्तक श्रीचक्रधर यांचें जीवनचित्र होय. श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या अध्ययनाची, गुरुपरंपरेची, पंथस्थापनेची, शिष्यपरिवाराची, तत्त्वज्ञानाची किंवा एकूण जीवनकार्याची अभ्यासपूर्वक, विषयवार, प्रकरणशः, सुव्यवस्थित रचना करून ग्रांथिक पद्धतीनें लिहिलेलें असें हें चरित्र नाहीं; तसेंच श्रीचक्रधरांचें माहात्म्य सिद्ध करून दाखविणें हाही या चरित्रलेखनाचा हेतू नाहीं; काव्यं यशसे.....' मध्येंही हें प्रयोजन सांपडणारें नाही. एखाद्या प्रिय व्यक्तीचा कायमचा वियोग व्हावा आणि तें दुःख असह्य व्हावें, अशा वेळीं त्या प्रिय व्यक्तीच्या आठवणींनींच मनाला थोडासा कां होईना पण विरंगुळा लाभावा, तसेंच येथें घडलें आहे. श्रीचक्रधरांचें 'उत्तरापंथें गमन' झाल्यावर श्रीचक्रधरांच्याच आदेशाप्रमाणें, नागदेवाचार्य शिष्यपरिवारासह ऋद्धिपूर येथें श्रीगोविंदप्रभू यांच्याकडे आले. पण येथें येण्याआधीं व आल्यावरही, श्रीगोविंदप्रभूंच्या सान्निध्यांत असूनसुद्धां, नागदेवाचार्यांना श्रीचक्रधरांच्या वियोगाचें दुःख विसरतां येईना. 'स्मृतिस्थळां'तील प्रारंभींच्या सहा-सात लीळा ह्या वियोगदुःखावेगाचें परिणामकारक चित्र उभें करतात. भक्तीच्या लक्षणांत 'तन्विस्मरणे परमव्याकुलता' हें एक महत्त्वाचें लक्षण सांगितलेलें आहे. ज्याला हें अनिर्वचनीय असें परमेश्वराचें प्रेम लाभलें त्याची 'तदेवावलोकयति, तदेव श्रुणोति, तदेव चिन्तयति' अशी अवस्था होते. 'लीळाचरित्र' म्हणजे नवविधा भक्तींतील ही 'स्मरणभक्ति' होय. या स्मरणभक्तीच्या पोटींच श्रीचक्रधरांच्या लीळ गोळा करण्याची कल्पना जन्माला आली.

लीळाचरित्राच्या 'पूर्वार्धा'मध्यें चांगदेवभटासंबंधीं एक हकिकत आहे. हा चांगदेवभट घर सोडून श्रीचक्रधरांबरोबर राहिला. पुष्कळ दिवस झाले, तरी तो घरीं गेला नाहीं. त्याची 'माता खंती करीत' होती. तेव्हां गांवीचे महाजन आले व श्रीचक्रधरांच्या सम्मतीनें चांगदेवभटाला गावीं घेऊन गेले. तो निघाला तेव्हां श्रीचक्रधरांनीं त्याला सांगितले कीं, "बटिका : दीसामध्यें हें वेळा : दहावीस :

आठवीजे : वेळा दहावीस नाही : तरि : वेळा सात पांच
आठवीजे : सात पांच नाही तरि दोन च्यारि वेळां
आठवीजे : दोन च्यारि वेळ नाही तरि एकु तरि वेळ
आठवीजे : एक दोन वेळ तरि दोनि एकु वेळ
आठवीजे : परि दिवसू वंध्यू जावों नेदीजे :"

या लीळेवरून हें दिसून येतें कीं, श्रीचक्रधरांच्या वियोगांत दुःखपरिहारार्थ त्यांच्या लीळांचें स्मरण करण्याचा आदेश स्वतः श्रीचक्रधरांनींच त्यांच्या शिष्यांना दिलेला आहे. पुढें भटोबासांनींही आपल्या शिष्यांना 'लीळास्मरणानुवाद' उपदेशिल्याचें पाहावयास मिळते. (स्मृतिस्थळ–३९)

'दृष्टान्तपाठां'त, म्हणजे पर्यायानें लीळाचरित्रांतच विरहिणीचे तीन दृष्टान्त आले आहेत. परमेश्वराच्या विरहाचें दुःख करणाऱ्या भक्तांचे 'साधन विरही,' 'कोमळ विरही' आणि 'जरठ विरही' असे तीन प्रकार त्यांत वर्णिले आहेत. त्यांपैकीं नागदेवाचार्यांची अवस्था पुष्कळशी 'साधनविरही'ची होती, असें म्हणता येईल. 'परमेश्वरु वियोगें विरहिया पुरुषासि आणिकें काइसेनही सुखासि न ए : प्रसाद : वासनिक : भीक्षु : शास्त्र तेंगें सुखासि ए : आणिकें काइसेनही न ए ॥' 'साधनविरहिणीच्या दृष्टान्ताचें हें दर्ष्टांतिक पाहातां 'स्थान' 'प्रसाद,' 'वासनिक,' 'भिक्षु,' 'शास्त्र' हे परमेश्वराचे संबंधी पदार्थ आहेत, त्यांच्या दर्शनानें किंवा आठवणीनें ईश्वरविरही व्यक्तीस सुख प्राप्त होतें, हें स्पष्ट होतें. 'श्रीचक्रधरु' अशा केवळ नामस्मरणानेंही महदाइसास थोर सुख झाल्याचें स्मृतिस्थळांत पहावयास मिळतें.

श्रीचक्रधरांना महानुभावीय हे 'द्वारावतीचे चांगदेव राऊळ' यांचे अवतार म्हणजे श्रीकृष्णाचे प्रत्यक्षावतार असें मानतात; 'गर्भ,' 'पतित' आणि 'दवडणे' या तीन अवतारप्रकारांपैकीं श्रीचक्रधर हे 'पतितावतार' होत; कारण भरवसच्या प्रधानपुत्रांच्या–हरपाळदेवाच्या–मृत म्हणजे 'पतित' शरीरांत द्वारावतीच्या चांगदेव राऊळानीं प्रवेश केल्यानें हा अवतार झाला आहे.

परमेश्वरावतारानें चेतनाचरोबर ज्या सहेतुक क्रीडा केल्या, त्यांना 'लीळा' असें म्हणतात; तर त्यानें जडाचरोबर केलेल्या सहेतुक क्रीडांना 'चेष्टा' असें म्हणतात.

'लीळाचरित्रा' मधील 'लीळा' ह्या शब्दाच्या अर्थांत 'चेष्टा' या शब्दाचाही अर्थ समाविष्ट झालेला आहे. परमेश्वरावतारानें केलेली क्रीडा म्हणजे 'लीळा' असा येथें एकंदरीनें अर्थ घेतल्यास चालेल. किंबहुना 'लीळा' म्हणजे या क्रीडेच्या 'आठवणी' असाही लक्षणेनें अर्थ घेतां येईल. 'लीळाचरित्र' म्हणजे श्रीचक्रधरांचें 'लीळारूप' (= लीळास्मरणरूप) असें चरित्र होय.

'स्मरण' म्हणजे काय, हें स्पष्ट करणारी एक स्मृति या संदर्भांत मोठी अभ्यासनीय आहे. "एक वेळ पंडीतबासी : केसीबासीं मुख सीर्क्षीं प्रस्नु केला : हो भटो तुम्ही काइ स्मरा : भटोबासीं म्हणितलें : मी गोसावीयांचा त्रीकाळ पूजा-अवस्वर आठवी :" त्यावर केसोबांनीं भटोबासांना स्मरणाचें वचन विचारलें, तें त्यांना आठवेना. तेव्हां महदाइसानें तें 'स्मरणाचें वचन' म्हटलें 'नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : स्मरण : आनुस्मरण : सकृत् स्मरण' हें तें वचन होय.

यापैकीं 'नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा' या चतुर्विध स्मरणाला महत्त्व आहे. श्रीचक्रधरस्वामींना 'देखिले तैसे आठविणे' म्हणजे 'दृष्ट' स्मरणविधि होय; आणि 'सन्निधानपर' ज्ञानिया-भक्तांनी श्रीमूर्तीचें लिहून ठेवलेलें वर्णन वाचून किंवा ऐकून त्या मूर्तीचें तसें स्मरण करणें म्हणजे 'श्रुत' स्मरणविधि होय. महानुभावीय 'असतीपरीं'त, म्हणजे आचारधर्मांत 'विकारविकल्पशून्य' होऊन, 'स्वभावांना' मात्रा देऊन, व 'निरालंबी' म्हणजे 'अनासक्त' बनून अनुसरलेल्या पुरुषानें देवता (= परमेश्वर) स्मरण करीत जन्म क्षेपावा, असें म्हटलें आहे. मूर्तिस्मरण, नामस्मरण, लीळा-चेष्टा-स्मरण, फार काय, स्थान प्रसाद-भिक्षु व वासनिक यांचें सेवादास्यरूप स्मरण अष्टौप्रहर करावें, निदान चार प्रहराचें 'अनुस्मरण' करावें, तेंही शक्य नसेल तर दोन प्रहरांचें 'सकृत् स्मरण' तरी करावें, असा आदेश आहे. तेव्हां 'लीळाचरित्र' म्हणजे वरील 'स्मरणाच्या वचनानुसार श्रीचक्रधरांच्या सांगतां येतील तितक्या क्षणांच्या लीळांचें स्मरण होय.

'लीळाचरित्रां'त परमेश्वराच्या सर्व संबंधी पदार्थांचें म्हणजेच प्रसादांचेंही स्मरण येतें. नख-दाढ-केशादि मूर्तिनिष्ठ पदार्थ, आंगी-टोपरे आदि कार्पासवस्त्रें, चरण गादी आदि चर्मवस्तु, वाकी-सांखळी आदि धातुवस्तु, फणी-करंडादि हस्तिदंती वस्तु, पाट-उंबरवटादि काष्ठवस्तु, जाळी-सोपानादि षाषाणवस्तु, ओटे-गोटे. स्थानें, अन्न-उपाहार इत्यादि साऱ्यांचा, या प्रसादपदार्थांत समावेश होतो. या प्रसाद-पदार्थांचे स्मरणानें तत्संबद्ध परमेश्वरलीळा आठवून सुख होतें. लीळाचरित्रांत, पंथीयेतरांना जो अनावश्यक तपशील वाटतो, तो पंथीयांना आवश्यक तर वाटतोच; पण परमवंदनीय वाटतो तो यामुळेंच.

स्थानप्रसादादि जड संबंधी पदार्थांहून संबंधी चेतनपदार्थ अधिक वंदनीय होत.

वासनिक, भिक्षु, ज्ञानिये, बोधवंत, वेधवंत यांचा या संबंधी चेतनपदार्थांत समावेश होतो. यांचें स्मरण म्हणजे श्रीचक्रधरांचें शास्त्रस्मरणच होय. 'लीळाचरित्र' हा स्मरणभक्तीचा आदर्श ग्रंथावतार होय, तो यामुळेंच. 'श्रीगुरुचरित्र' हा ग्रंथ साधा मानला न जातां तो दैवीशक्तीनें भारलेला, सिद्धमंत्ररूप व महाप्रासादिक असा वरद ग्रंथ जसा दत्तोपासकांना वाटतो, तसा 'लीळाचरित्र' हा ग्रंथही महानुभावीयांना आपला वरद ग्रंथ वाटतो. या स्मरणभक्तीची फलश्रुति 'जाणीव : सीहाणीव : चातुर्यं : कुसळता सांति : क्षमा' यांचा लाभ, ही आहे.

परमेश्वराच्या चतुर्विध स्मरणांपैकीं 'दृष्ट' आणि 'श्रुत' स्मरणांना लीळाचरित्रांत प्रधान्य लाभलें आहे; आणि तें स्वाभाविक आहे. परमेश्वराच्या नख-केशादि देहावयवांच्या, किंवा वस्त्रालंकारादि संबंधी वस्तूंच्या श्रद्धापूर्वक जपणुकीनें होणाऱ्या सौख्याहून ह्या वस्तूंचे स्वामी-साक्षात्श्रीचक्रधर-हे बसतात कसे, उभे राहतात कसे, अंगणीं वेढे घेतात कसे, बोलतात कसे, हसतात कसे, खेळतात कसे, खातात कसे, विहरतात कसे, ही त्यांची क्षणाक्षणाची लीलाप्रवृत्ति मनश्चक्षूंनीं न्याहाळीत राहाण्याचें सौख्य अधिक श्रेष्ठ नाहीं का? लीळाचरित्र-लेखन हें यामुळेंच ईश्वरदास्याचें एक श्रेष्ठ साधन होय. लीळाचरित्र म्हणजे परमेश्वराच्या 'संबंधी' अशा चराचर वस्तुजाताच्या स्मरणपुष्पांनीं केलेली परमेश्वराची मानसपूजा होय. "रत्नमाळास्तोत्र' वाचून होतांच नागदेवाचार्य केसोबासांना म्हणाले, "भलें केलें केसवदेया : गोसावियांचीया अमोघ लीळा बांधलीया : तुवां वाक् पुश्पीं ईश्वरार्चन केलें : (स्मृति. १४) लीळाचरित्रकारांनीं मानसपूजेचें सुख स्वतः अनुभविलें आणि 'मार्गियां'ना ते अनुभविण्याची उत्तम सोय करून ठेविली. म्हाईंभटाची ही 'स्मरणभक्ति' इतरांना 'श्रवणभक्ति' आणि 'कीर्तनभक्ति' यांचें सुख देण्याचें साधन ठरली.

संबंधित व्यक्तींना भेटून लीळा गोळा करण्याची पराकाष्ठा माहींभटांनीं केली. ह्या आठवणी गोळा करणें म्हणजे म्हाईंभटांनीं स्वतः ईश्वरदास्याचा आनंद भोगणेंच होय. ह्या ईश्वरदास्यापुढें त्यांना शरीरकष्टाची तमा नव्हती. 'म्हाइंभट अटनवीशेषें खेइभटांचेंया गावां गेले :..... खेइंभट कृषीकर्म करीति : आणि म्हाइंभट तयां मागां मागां गोसावियांचीया लीळा पुसति : खेइंभट सांघतिः त्या म्हाइंभट नमस्करूनि घेति :' पण नमस्करून घेतल्या म्हणून ह्या लीळा, जशाच्या तशाच स्वीकारण्यांत मात्र आलेल्या नाहींत.

'मग म्हाइंभटीं भटोबासांपुढां अवघें सांघीतलें : गोसावीयांचीया लीळा शोधूनि आणिलीया : तिया संवादिलिया : होये तें भटोबास मानिति : नव्हे तेथ म्हणति : हे श्रीमुखींचे शब्द नव्हेति : हे होती :' मराठींतल्या पहिल्याच चरित्रग्रंथनिर्मितींत, सत्यान्वेषक दृष्टीला इतकें महत्त्व दिलेंले पाहून, खरोखरच आश्चर्य

वाटतें. पण ही सत्याची इतकी पराकाष्ठेची जपणूक जी केली जाते, तिच्यामागेंही परमेश्वर-पूजनाचाच विधि-नियम आहे. पूजाद्रव्य निर्मळ असावें, मंत्रोच्चार शुद्ध असावेत ; मंत्रोच्चार दोष घडला तर पाप लागतें; हें जसें, तसेंच 'माझ्या परमेश्वराचे, हे जे मी मनोमन ध्यान करतों आहे; स्मरण-पूजन करीत आहे, त्यांत अणुमात्रही विकृती किंवा अशुद्धि नसावी : माझ्या परमेश्वराचें, असत्य चित्रण 'किंवा स्मरण' हें पाप आहे;' हीच या मागील भूमिका आहे; आणि यामुळें लीळांच्या बाबत 'ज्याचीये अनुभवीचीया त्या त्यातेचि पुसावीया' असें नागदेवाचार्यांनीं म्हाईंभटांना सांगितलें, व तें म्हाईंभटांनीं प्रत्यक्षांत आणलें. कठोर धार्मिक व्रताप्रमाणें ही सत्यनिष्ठा पाळली गेली आहे. म्हणून या परमेश्वराच्या लीळाचित्रणांत असत्य रेखा किंवा रंग कोठेंही उमटलेला नाही.

श्रीमुखींच्या शब्दांचें रक्षण किती पराकोटीला जाऊन करण्यांत येई, त्याचें एक उदाहरण-'सर्वज्ञें म्हणीतलें : ' हें कोणे गा : केलें : ' हा एक पाठ; तर 'हें कोणें केलें : देमती : ऐसें : ' हा दुसरा. अर्थदृष्ट्या किंवा भावार्थदृष्ट्याही ज्यांत कांहींही फरक पडत नाही असे वरीलप्रमाणें भिन्न पाठ 'एकी वासना' 'दुसरी वासना' 'वासना' 'शोधू' असे स्पष्टोल्लेख करून 'लीळाचरित्रा'च्या संहितेंत नोंदविले गेले आहेत. यांत लीळा कथन करणाऱ्या व्यक्तीशीं म्हाईंभट प्रामाणिक राहिले आहेत आणि परमेश्वराच्या श्वास-निःश्वासाचीही नोंद करण्यांत, पर्यायानेंहि त्यांच्या हातून प्रतारणा होऊं शकली नाहीं. भिक्षान्न मागून आणल्यावर ती झोळी श्रीचक्रधर 'दृष्टपूत' करीत असत व मग तो 'प्रसाद' सर्वजण घेत; तसेंच म्हाईंभटानें आणलेले 'आठवणों'चें हें भिक्षान्न नागदेवाचार्यांनीं 'दृष्टपूत' करून मग पंथीयांना 'प्रसाद' म्हणून दिलें आहे. ही 'scrupulous authenticity' विस्मयकारक आहे.

परमेश्वराचें, म्हणजे श्रीचक्रधराचें, जें जें लीळास्वरूप समजेल, तें तें नमस्करून घ्यावयाचें, अशी ठाम श्रद्धा असल्यानंतर मग लीळांची निवड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; भक्ताच्या मनांत लीळांच्याबाबत सामान्य-असामान्य असा भेदच संभवत नाहीं. हा भेद त्रयस्थ वाचकाच्या मनांत निश्चितच निर्माण होणारा आहे. त्याला या पाठभेदाचें मोठें महत्त्व आणि विशेष औचित्य न वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. अतिसामान्य तपशीलाची नोंद वगळली असती, तर त्याला हवें होतें. पण म्हाईंभट आणि नागदेवाचार्य यांची भूमिका ध्यानीं घेतां, लीळाचरित्राचें आजचें स्वरूप जें आहे, तें तसेंच होणें अपरिहार्य होतें, हें आपोआपच कळून येईल. डॉ. जॉन्सनचें चरित्र लिहिणाऱ्या बॉस्वेलनें 'Even an idle talk of a good man ought to be regarded. The most superfluous things he

saith are always of some value' असा एका जुन्या वचनाचा आधार आपल्या डॉ. जॉन्सनच्या चरित्रग्रंथाच्या प्रस्तावनेंत आत्मसमर्थनार्थ नमूद केलेला आहे. डॉ. जॉन्सनकडे आणि त्याच्या हकीकतीकडे पाहतांना बॉस्वेलच्या दृष्टींत इतका Superstitious reverence येऊं शकतो, तर म्हाईंभट आणि नागदेवाचार्य ह्या केवळ ईश्वरदासांच्या दृष्टींत भक्तीची एकांतिकता आली, तर त्यांत नवल तें कोणतें ? 'श्रीचक्रधरांचें आठवावें रूप' किंवा 'श्रीचक्रधरांचें कैसें चालणे,' 'श्रीचक्रधरांचें कैसें बोलणें' हें मनांतल्या मनांत आठवावें आणि सुखरूप व्हावें, हीच म्हाईंभटाची व नागदेवाचार्यांची वृत्ति होती. 'लीळाचरित्र' म्हणजे केवळ परमेश्वराची नामस्मरण-भक्ति नाही, तर तें परमेश्वराच्या मानवी अवतारांतील प्रत्येक क्षणाच्या लीळेचें भक्तिभावानें केलेलें स्मरण आहे.

श्री. स. वि. बापट यांनी संपादित केलेल्या 'लोकमान्यांच्या आठवणी व आख्यायिका' यांच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत तात्यासाहेब केळकरांनीं म्हटलें आहे कीं, 'मोठ्यांच्या लहानसहान गोष्टीही आदरणीय ठरतात. कारण त्यांच्यामुळें थोर विभूतींचे स्मरणप्रसंग वाढतात. हें स्मरण नित्य, निदान जितका अधिक वेळ घडेल तितकें घडावें, असें वाटणें स्वाभाविक आहे...यामुळें या हकिकती किंवा हीं वाक्यें विशिष्ट विभूतिपूजनाला स्मृतीचें अधिक सगुण अधिष्ठान मिळवून देतात;... आपणांस कोणाचेंही स्मरण होतें, तें तत्संबंधी सगुण रूपाच्या कोणत्यातरी एक किंवा अनेक अंगांनींच होते. निर्गुण अशी आठवण होऊंच शकत नाही." यामुळें आठवणींच्या ग्रंथांच्या मुळाशीं 'सगुणपूजेचें तत्त्वच' असल्याचें तात्यासाहेबांना दिसून येतें. ते म्हणतात, "देवपूजेंतील सामग्री सामान्य किंमतीचीच असते; परंतु देवपूजेची भावना उत्पन्न करून देणारें अभिषेकपात्र चार आण्यांचें असलें तरी आंघोळीचें पाणी तापविण्याच्या पन्नास रुपये किंमतीच्या बंबापेक्षां तें अधिक पवित्र व जपून ठेवावेसें वाटतें.....खऱ्या संस्मरणीय आणि तेजस्वी अशा दहा-पांच हकिकती इतर सामान्य अशा शेंकडों हकिकतींना आपणांबरोबर तारून नेतात." तात्यासाहेबांची ही मीमांसा अग्राह्य होण्यासारखी नाहीं. लीळाचरित्ररचनेच्या बाबत तर ही मीमांसा पूर्णपणें लागू पडतेच ! म्हणून लीळाचरित्रांत आढळून येणारा प्रमाणाबाहेरील तपशील कां आला त्याचें आता वेगळें स्पष्टीकरण करावयास नको.

म्हाईंभटांनीं या लीळा अनेक व्यक्तींकडून जमा केल्या व त्यांचें लेखन केलें. कोणी कोणत्या लीळा सांगितल्या, तें स्वतंत्रपणें नमूद केलेलें नाहीं; तशी आवश्यकता नव्हती. अर्वाचीन आठवणीसंग्रहाकडे पाहातां आठवणींतून चरित्रव्यक्तीचें नुसतें चित्र न दिसतां, त्याबरोबर चित्र काढणाराचेंहीं मनःस्वरूप दृग्गोचर होतें. याचें कारण 'आठवणी' सांगणारे कोणीतरी मित्र, आप्त, सहाध्यायी, सहकारी, परिचित, अनुयायी

इत्यादिपैकीं असतात. त्यांत चरित्रव्यक्ति आणि आठवणीकार यांच्यांतील नात्याची विविधता, कमीअधिक जवळीक पाहाणेंही मनोरंजक असतें, बोधप्रद असतें. 'आठवणी' कथन करणारी व्यक्ति ही मोठी प्रतिष्ठित आणि सुप्रसिद्ध असली तर तिच्या मतांना वेगळें महत्त्व आपोआपच प्राप्त होतें; यामुळें अर्वाचीन आठवणीबाबतं 'काय' म्हटलें आहे, याच्याबरोबर 'कोणी' म्हटलें आहे, यालाही तितकेंच महत्त्व येतें. शिवाय एकाच प्रसंगाचें किंवा घटनेचें चित्रण वेगवेगळ्या व्यक्तींनीं आपापल्या आठवणींतून केलें असेल आणि त्यांत त्यांच्या दृष्टिकोणांत भेद पडत असेल, तर मूळ सत्य पारखून पाहाण्यासहि त्यामुळें मदत होते, आणि आठवणीकारांच्या मनोवृत्तीवरही प्रकाश पडवो. अर्वाचीन आठवणी या एकाच रंगानें रंगलेल्या नसतात. व्यक्तिपरत्वें त्यांना स्वतंत्र रंगच्छटा प्राप्त होतात. लीळाचरित्रांत चरित्रविषय–व्यक्तीशीं आठवणीकारांचें नातें असें बरोबरीचें, मोकळेपणाचें नाहीं; तें अनेकविधही नाहीं, 'परमेश्वर आणि भक्त' हें नातें, आणि त्याच्याच कांहीं ठळक, कांहीं सूक्ष्म, अशा भावच्छटा लीळाचरित्रांत उमटलेल्या आहेत. परमेश्वराची पूजा बांधताना स्वतःच्या नामाची उपाधि किंवा स्वतःचा अहंकार लुप्त होणेंच इष्ट आहे. यामुळें एकेका आठवणीकाराच्या आठवणींचा एकेक गट, असे गट पाडून आठवणी देणें, ही कल्पनाच येथें अप्रस्तुत होय.

ह्या आठवणी–म्हणजे लीळा–चरित्रलेखनाचें साधन म्हणून किंवा मुळांत लिहिलेल्या एखाद्या चरित्राला पूरक म्हणूनही संग्रहित केलेल्या नाहींत. ह्या लीळा म्हणजेच चरित्र! 'लीळा' हेंच साध्य होय. यामुळें जणूं वेगवेगळ्या मुलाखती घेऊन, त्यांतील सत्यासत्य पारखून त्यांचें स्वतः पुनर्लेखन करून, कालक्रमानुसार त्या लावून, त्यांतून सलगपणें चरित्र–चित्रपट उलगडत जावा, असें या लीळाचरित्राचें स्वरूप झालेलें आहे. ह्या केवळ आठवणी नाहींत, तर त्यांनीं मिळून झालेलें आठवणीरूप सलग चरित्र होय.

श्रीचक्रधरस्वामी हा लीळाचरित्राचा विषय आहे. जीवांचें उद्धरण करण्याच्या हेतूनें त्यांनीं अवतार घेतल्यानें त्यांना 'जीवोद्धारव्यसनी अवतार' असेंच म्हणतात. श्रीचक्रधर हे 'पर' आणि 'अवर' या दोन्ही विद्या जाणणारे असे 'उभयदृश्यावतारी' होते. अधिकारी व्यक्तींना शोधणें, योग्यतेनुसार त्यांना ज्ञान किंवा प्रेम देणें : जे अनधिकारी असतील त्यांच्याकडून पुण्यकृत्यें करवून, त्यांचा पापमळ धुऊन काढून त्यांना अधिकारी बनविणें : अन्य देवतांच्या कचाट्यांतून त्यांना सोडविणें हेंच या अवतारांचें जीवितकार्य होतें. स्वतः चक्रधर हे श्रीगोविंदप्रभूचे आदर्श भक्त होते. 'श्रीप्रभु : साक्षात करचरणवंत ब्रह्म : श्रीप्रभूची सेवा ते अदृष्टसेवा' असें श्रीचक्रधरांनीं आपल्या गुरूसंबंधीं उद्‌गार काढले आहेत. 'श्रीप्रभूचे रज कैसे : हे ब्रह्मादीका दुर्लभ

की : ' अशी त्यांची श्रीप्रभूंवरील भक्ति होती. श्रीप्रभू जेथें राज्य करीत, तेथें श्रीचक्रधर स्वतःची पूजा करून घेत नसत; उलट स्वतःच श्रीप्रभूंची पूजा करीत असत. परमेश्वरपुराला (ऋद्धिपुराला) जातांना दुरून ' शाळेचा कळस ' देखतांना ते जयजयकार करीत. आपल्या आचरणानें भक्तीचा उत्तम आदर्श स्वती श्रीचक्रधरांनींच आपल्या शिष्यांना जणूं घालून दिला होता. श्रीचक्रधरांचा गुरुनिष्ठा, त्यांचें ईश्वरावतारित्व, त्यांची उद्धरणप्रवृत्ति आणि कृति, त्यांची रहस्य-विनोद-क्रीडा, स्वच्छंदपणें होणारी भ्रमंती, शिष्यजनपरिवार आणि चमत्कार, त्यांनीं केलेलें स्वतंत्र शास्त्रनिर्वचन, त्यांची मुक्तमनस्कता यांचींच प्रसंगचित्रें लीळाचरित्रांतून जागोजाग विखुरलेलीं आहेत; म्हणजेच असें कीं, या लीळांतून केवळ अवतारी पुरुषाची अवतारचित्रें नाहींत, तर त्याच्या अवतारकृत्यांचीं निदर्शक अशीं हीं चित्रें आहेत. यामुळेंच ' लीळाचरित्र ' हें महानुभावीयांची ' श्रुति ' म्हणून सन्मानिलें जातें. यांतूनच श्रीचक्रधरांचीं ' सिद्धान्तसूत्रें ' प्रकट झालीं, जीवोद्धरणाचें ज्ञान ' दृष्टान्त 'रूपानें व्यक्त झालें.

' लीळाचरित्र ' हें तत्कालीन म्हणजे यादवकालीन महाराष्ट्राचें धार्मिक किंवा राजकीय चरित्र नव्हे, कारण श्रीचक्रधर हे स्वकालीन राजकारण किंवा धर्मकारण यांच्याशीं एकजीव झालेले नव्हते. ते कोणत्याच राजकीय किंवा धार्मिक चौकटींत न बसणारे, स्वतःच्याच पंथानें जाणारे एक स्वतंत्र, स्वयंप्रकाशी, सर्वज्ञ ' गोसावी ' होते. जनलीळा कौतुकानें पाहात आणि कांही स्वतःच्या अवतार लीळा करीत विहरण करणाऱ्या एका ईश्वरावतारी पुरुषाच्या, लौकिकांतील अलौकिक आयुष्याचें, प्रामाणिक- व सत्यरूप असें चित्रण म्हणजे हें लीळाचरित्र होय. श्रीचक्रधारांची ती वाङ्मयी मूर्ति आहे. म्हाईंभट व नागदेवाचार्य यांच्या स्मरणभक्तीची कधींही न आटणारी ही गंगा आहे. या ' स्मृति-श्रुति-गंगें 'त स्नान केल्यानें पंथीय पुरुष धन्य होतात !

लीळाचरित्र म्हणजे शब्दरूप ' आदर्शा 'त क्षणोक्षणीं प्रतिबिंबित झालेली, महानुभावीयांची, श्रीचक्रधरांसंबंधींची, ' स्मरणभक्ति ' होय !

— २ —

त्रिखंडात्मक लीळाचरित्राचें त्रिविध स्वरूप

श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे पांच कालखंड डॉ. कोलते मानतात. (१) अवतार-स्वीकार (२) शक्तिस्वीकार (३) नागांबिकेला प्रेमदान (४) नागदेवाचार्यांचें अनुसरण आणि (५) प्रयाण. श्री. य. खु. देशपांडे यांनीं ' अवतार-स्वीकार ' आणि ' शक्तिस्वीकार ' या दोन्हींचा मिळून एकच ' कालखंड ' मानला

आहे व त्यास ते 'राजधर्म काळ' असें नांव देतात. श्री. य. खु. देशपांडे यांच्या मतें मग श्रीचक्रधरांच्या आयुष्याचे चारच कालखंड होतात. स्वतः 'लीळाचरित्र' कारांनीं चार किंवा पांच असे भाग न करतां, 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' असे दोनच भाग प्रारंभीं कल्पून त्याप्रमाणें श्रीचक्रधरांच्या लीळांचें संकलन-संपादन केलें. पैठण येथें संन्यास स्वीकार करून जीवोद्धरणासाठीं ते भ्रमणास निघाले, तेथपासून ते खडकुली येथें श्रीनागदेवाचार्य यांना दीक्षा देईपर्यंतचा कालखंड म्हणजे 'पूर्वार्ध' होय; आणि येथून पुढें श्रीचक्रधरांचें उत्तरापंथें गमन होईपर्यंतचा काल म्हणजे 'उत्तरार्ध' होय. 'पूर्वार्धकाळ अवघा वर्षें ४ आन मास दीढ' आणि 'उत्तरार्ध अवघा वर्षें ४'; मिळून आठ वर्षें आणि दीड महिना एवढ्याच कालावधींत श्रीचक्रधरांनीं जीवोद्धरणाचें कार्य केलें, 'लीळाचरित्र' म्हणजे या शेवटच्या आठ वर्षांतील श्रीचक्रधरांच्या आयुष्यक्रमाची नोंद होय. श्रीचक्रधरांचें आयुष्य शंभराहून अधिक वर्षांचें आहे; तेव्हां 'पूर्वार्ध' जेथून सुरू होतो, त्या आधींच्या सुमारे ९०-१०० वर्षांच्या आयुष्याचा तपशील म्हाईंभटांना मिळू शकला नाहीं. या काळांत चक्रधरांची 'एकाकी' भ्रमंति चालू होती. शिष्यपरिवार जमल्यानंतर प्रसंगपरत्वें, प्रवृत्ति झाली, तर स्वतः श्रीचक्रधरांनीं पूर्वायुष्यासंबंधी पुढें कधीं क्वचित् जे कांहीं उद्‌गार काढले व ज्यांचा 'पूर्वार्ध' व 'उत्तरार्ध' यांमध्यें आधींच समावेश करण्यांत आला होता; ते प्रसंग आणि ते उद्‌गार वेगळे काढून त्यांचा 'एकांक' या नावानें वेगळा "खंड" करण्यांत आला असावा आणि मग रीतसर 'एकांक' 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' असें कालक्रमानुसार त्रिखंडात्मक असें आजचें लीळाचरित्र सिद्ध झालें असावें. म्हणजे श.१०७५ ते ११८५ हा कालखंड 'एकांका'चा; श. ११८५ ते ११८९ हा 'पूर्वार्धा'चा आणि श. ११८९ ते ११९४ हा 'उत्तरार्धा'चा (श्री. य. खु. देशपांडे यांनी मानलेल्या जन्म-निर्याणशकान्वयें).

या त्रिखंडात्मक 'लीळाचरित्रां'त मिळून पंधराशेंच्या वर लीळांचा समावेश झालेला आहे. यांपैकीं 'एकांका'मध्यें केवळ पंचाहत्तर-शहात्तर लीळा आहेत; कारण या काळांतील श्रीचक्रधरांचा आयुष्यक्रम न्याहाळण्यास कोणीच शिष्य त्यांच्याबरोबर नव्हता; 'पूर्वार्धा'मध्यें भरपूर तपशील येतो; श्री चक्रधरांची भ्रमंति शिष्यपरिवारासह झालेली, त्यामुळें त्यांच्या आठवणी सांगणाऱ्या या कालखंडांतील व्यक्ति किंवा शिष्य म्हाईंभटांना उपलब्ध होते. स्वतः म्हाईंभट किंवा नागदेवाचार्य यांना, या कालखंडांत, श्रीचक्रधरांचें सन्निधान अत्यल्प लाभलेलें आहे; भटोबास सहा-सात वेळांच श्रीचक्रधरांना भेटल्याचें दिसतें. 'उत्तरार्धा'मध्यें मात्र, नागदेवाचार्य (मधला ऋद्धिपूर येथील सहा महिन्यांचा वास्तव्याचा काळ वगळला तर) श्रीचक्रधरांच्या निर्याणापर्यंत सतत त्यांच्या सान्निध्यांत होते, यामुळें 'उत्तरार्धा'मध्यें अगदीं बारीकसारीक तपशीलही विस्तारानें आलेला

आहे. 'एकांक' म्हणजे स्वतः श्रीचक्रधरांनीं सांगितलेल्या स्वतःच्या कांहीं आठवणींचें 'संकलन' आहे; 'पूर्वार्ध' म्हणजे अनेकांच्या आठवणींचें म्हाईंभटांनीं केलेलें 'संकलन–संपादन' आहे, तर 'उत्तरार्ध' म्हणजे स्वतः नागदेवाचार्यांनीं केलेलें 'निवेदन' आहे. त्रिखंडात्मक लीळाचरित्राच्या रचनेचें अशा तऱ्हेनें 'संकलन–संपादन निवेदनात्मक' असें त्रिविध स्वरूप आहे. मात्र या एकूण निर्मितीचें श्रेय म्हाईंभटाकडेच जातें. म्हाईंभटांनीं परिश्रमपूर्वक या श्रीचक्रधरांच्या आत्मकथनाला नागदेवाचार्यांच्या निवेदनाला[१] आणि इतरेजनांच्या कथनाला जर 'ग्रंथ' रूप दिलें नसतें, तर हें सारें हवेंत विरून गेलें असतें. आठवणी ह्या अगदीं 'volatile' आणि 'evanescent' असतात; त्या त्या पिढीकडून त्या जर काढून घेतल्या नाहींत आणि 'सुरक्षित'ठेवल्या नाहींत,तर त्या कालोदधींत कायमच्या गडप होऊन जातात. तात्यासाहेब केळकरांच्या भाषेंत बोलायचे तर 'आठवणी' ह्या छायाचित्रासारख्या असतात; जनते-जवळ negatives असतात; संपादकानें त्यांचीं 'prints' काढून घ्यावयाचीं असतात. म्हाईंभटांनीं हें कार्य अत्यंत सचोटीनें, दक्षतेनें, साक्षेपानें, निरलसतेनें, केवळ भक्तिप्रेमापोटीं केलें.[२]

'लीळाचरित्रा' च्या तीन खंडांपैकीं 'एकांक' हा सर्वांत अधिक आस्वाद्य वाटतो. येथें जणूं आपोआपच, अपरिहार्यपणें लीळांची निवड झाल्यासारखेंच झालें आहे. कारण शिष्यांनीं पृच्छा केल्यावरून, औत्सुक्य दाखविल्यावरून किंवा जुनी एखादी समान घटना घडल्याची आठवण होऊन श्रीचक्रधरांनीं आपल्या पूर्वायुष्यांतील कांहीं महत्त्वाच्या व ठळक प्रसंगांच्या सांगितलेल्या आठवणीच फक्त 'एकांका' मध्यें आलेल्या आहेत, हें मागें सांगितलेंच. शिवाय 'एकांका' मध्यें आलेलें श्रीचक्रधरांचें आयुष्य हें मोठें वैचित्र्यपूर्ण आणि विविधतेनें नटलेलें आहे. श्रीचक्रधरांच्या येथील आयुष्यांत एकसारखीं, अचानकपणें, मोठीं विलक्षण अशीं स्थित्यंतरें घडत गेलीं आहेत. त्यांच्या अवतारस्वीकाराच्या प्रसंगापासूनच त्यांच्या अलौकिकत्वाला प्रारंभ होतो; पण त्या आधींची पूर्वपीठिकाहि आवश्यक तेवढ्या तपशीलानें 'एकांका' मध्यें आलेली आहे.

---

१. मात्र प्रत्यक्ष लीळाचरित्रांत हें निवेदन नागदेवाचार्यांच्या तोंडीं प्रथमपुरुषीं असें आलेलें नाहीं.

२. म्हाईंभटानंतर, इतक्या मोठ्या प्रमाणावर, इतकें मोलाचें आणि इतक्या उत्कट भावनेनें कार्य करणारे, म्हणजे 'लोकमान्यांच्या आठवणी व आख्यायिका' यांचे संपादन करणारे श्री. स. वि. बापट हेच होत. त्यांना 'अर्वाचीन माहींभट' म्हणावयास हरकत नाहीं. मराठी वाङ्मयांत 'आठवणीकार' म्हणून 'म्हाईंभट आणि बापट' हींच दोन नावें सतत डोळ्यासमोर राहतील. रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्या ग्रंथांचें स्वरूप आत्मचरित्रात्मकच पुष्कळसें आहे.

श्रीचांगदेव राऊळांना व्याघ्रवेषानें श्रीदत्तात्रेयांनीं केलेला अनुग्रह, व श्रीगोविंदप्रभूंना श्रीचांगदेवांकडून मिळालेला अनुग्रह ह्या प्रसंगनिवेदनानें श्रीचक्रधरांची गुरुपरंपरा स्पष्ट होते. प्रारंभींच या लीळा आल्यानें, श्रीचक्रधरांचा गृहस्थाश्रम पाहातांना एक वेगळी मौज वाटते. त्यांचें तें 'जूं, हारविणे, कमळाइसानें 'अपंकारु' न देणें, मग रूसून 'उपरीयेवरि पहुडु स्वीकरणे' आणि अखेर वडिलांनीं त्यांना 'उपंगळि'ए घेउनि उठविणें—या लहानशा प्रसंगचित्रणाची गोडी अवीट वाटते. श्रीचक्रधरांची ही कृति मानवी वाटते, यांत आपल्या भावनांच्या समस्पंदनाला वाव आहे. अवतारी पुरुषाच्या सामान्य गृहस्थसदृश लीळा पाहण्यांत जो एक मजेदार आनंद वाटतो, तो 'एकांका'मध्यें सतत अनुभवास येतो. आईवडिलांना रामयात्रेचें निमित्त सांगून, फसवून दर मुक्कामीं एकेक नोकरास रजा देत देत श्रीचक्रधरांनीं रिधपूर गांठल्याची हकिकत; मध्यैंच बारा वर्षें विंध्यपर्वतीं विरक्तस्थितींत केलेली भ्रमंति आणि पुन्हा हंसाबाशीं केलेला विवाह; अवधूतदर्शन होतांच 'आतां एथौनि ऐसीयां होइजैल' म्हणून प्रपंचाचा केलेला त्याग, गोवाऱ्यांच्या मुलांसह रानभेरीचा खेळ, ब्राह्मणाच्या गायी राखणे, चोर म्हणून त्यांना कैद होणे, बिगारीसाठीं त्यांना पकडून नेणें, लग्नघरीं उभय पक्षांचे वऱ्हाडी म्हणून सन्मान लाभणें, उकिरड्यांतच झोपणें, गोपाळांचा दहीभात वाटून खाणें; या लीळांतून दिसून येणारे चक्रधर आपल्यांतील आहेत, असें वाटतां वाटतां, एकदम आपणांपेक्षां कितीतरी वेगळे वाटूं लागतात. गोसावीयांची महात्मता आणि वेधशक्ति यांचाहि प्रत्यय लीळांतून येतोच. त्यांच्या ठिकाणची काळवंचना करण्याची किंवा मृतास सजीव करण्याची शक्ति, उन्मत्त रानमहीष, व्याघ्रपिले किंवा झुंजणारे सर्प यांना लीलया दूर सारण्याचें त्यांचें सामर्थ्य, शरण आलेल्या सशास 'महात्मा' म्हणून गौरविणें यांत दिसून येणारे श्रीचक्रधर सामान्य मानवी पातळीवरील नाहींत. 'एकांका' मधील श्रीचक्रधरांचें चरित्र सामान्यांतून असामान्यांत, मानवत्वांतून देवत्वांत, आणि पुन्हां देवत्वांतून मानवत्वांत केव्हां आणि कसें बदलतें, तें आधीं ध्यानींच येत नाहीं. हा फेरबदल मोठा लक्षणीय आहे, चित्तवेधक आहे; प्रत्येक लीळेंत श्रीचक्रधरांच्या महानुभावित्वाचा कोणता ना कोणता तरी पैलू चमकतांना आढळतो. 'एकांक' हा खंड यामुळेंच मोठा वाचनीय झाला आहे.

'एकांका' मध्यें श्रीचक्रधर कोणाचे तरी पुत्र, कोणाचे पति, कोणाचे मित्र, कोणाचे खेळगडी, कोणाचे सेवक, कोणाचे कैदी, कोणाचे विमोचक, अशा वेगवेगळ्या नात्यांनीं आपल्या डोळ्यांसमोर उभे राहातात. ह्या अवतारी पुरुषांतला 'माणूस' आपण पाहातों, आणि या माणसांतला 'अवतारी पुरुष' हीं आपणांस दिसूं शकतो. 'भरवस' चा प्रधानपुत्र हरपाळदेव कसकसा बदलत गेला आणि अखेरीस संन्यासी महात्मा झाला,—'हरपाळदेवाचे प्रतिष्ठानींचे चांगदेव राऊळ' कसे झाले, याचा

निवडक लीळांच्या आधारें अगदीं नेमका, अतिशय चित्तवेधक आणि गतिमान असा चित्रपट 'एकांका' च्या रूपानें आपण पाहत असतों. यामुळें 'एकांक' अगदीं चटकदार आणि परिणामकारक झाला आहे.

'पूर्वार्धां'मध्यें श्रीचक्रधर जे दिसतात, ते एकदम पूर्णतः 'परमेश्वरावतार' म्हणूनच. त्यांत साध्या माणसाचे रुसवे फुगवे, हर्ष-खेद नाहींतच. एक 'सिद्ध पुरुष' म्हणूनच लोक त्यांच्याकडे पाहातात., स्वतः श्रीचक्रधरांच्या उक्तींतूनहि तें प्रकट होतें. यामुळें 'एकांका'मधील श्रीचक्रधरांच्या आचरणांतील मानववंश, मानव आणि देव या दोन कोटींमध्यें त्यांची होणारी येरझार, 'अंध्रदेशीं एकी गावीं आंगणीं बाजसूपवतीए वरि निजैली तेलीणि तिएसवे पहुड स्वीकरणे' असला गजबजून सोडणारा लोकविलक्षण आचार यांचा आढळ 'पूर्वार्ध' मध्यें घडत नाहीं; शंभर वर्षांतील आयुष्यांची हकिकत सत्तर-पंचाहत्तर लीळांतून प्रकट झाल्यानें 'एकांका' मधील लीळा कसदार आणि गतिशील झाल्या आहेत; शिवाय त्यांना कालदृष्ट्या एक प्रकारचें दूरतेचें सौंदर्यही लाभलें आहे. वर्तमानांतल्या निकटवर्ती तपशिलानें 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' यांतील कितीतरी जागा अडविली आहे. त्यामुळें एकाहून एक सरस अशा लीळांची ती रत्नमाला होऊं शकत नाहीं; 'एकांका'ला मात्र ह्या 'रत्नमाले'चा दर्जा प्राप्त झाला आहे.

'एकांक' आणि 'एकांकेतर लीळाचरित्र' यांत आणखी एक भेद आस्वाद-दृष्ट्या जाणवतो. 'एकांका' मध्यें प्रत्यक्षपणें आणि पूर्णपणें केवळ श्रीचक्रधरांच्या बदलत्या-वाढत्या व्यक्तित्वाचा, त्यांच्या मनोभावांचा त्यांतील लौकिकालौकिक रंगच्छटांचा मनोरम विलास पाहावयास मिळतो. 'पूर्वार्ध' 'उत्तरार्ध' मध्यें श्रीचक्रधरांच्या भेटीस आलेल्या, त्यांना अनुसरलेल्या त्यांच्या शिष्यांचे मनोभाव, त्यांच्यांतील वैचित्र्य आणि विविधता यांनाच प्राधान्य आलें आहे. 'पूर्वार्ध-उत्तरार्ध' मधील आठवणी शिष्यांच्या श्रीचक्रधरविषयक आठवणी आहेत; त्यामुळें नाहीं म्हटलें तरी शिष्यांच्या किंवा संबंधित व्यक्तींच्या व्यक्तित्वाच्या मर्यादा त्यावर पडल्या आहेत आणि मूळ कथाविषयभूत व्यक्तीचें म्हणजे श्रीचक्रधरांचें दर्शन जें घडतें तें थोडेफार 'अप्रत्यक्ष' असेंच घडतें. 'एकांका' मधील आठवणी स्वतः श्रीचक्रधरांनीं स्वतःसंबंधींच सांगितल्या आहेत; त्यामुळें त्यांना कसलीच बाहेरून मर्यादा पडलेली नाहीं. एकांक वाचीत असतांना आपण 'श्रीचक्रधर' या व्यक्तीमध्यें, त्यांच्या चमकदार विविधरंगी (Colourful) व्यक्तित्वामध्यें रंगून जातों. 'पूर्वार्ध-उत्तरार्ध' मध्यें मात्र त्यांच्या जीवोद्धरणकार्याकडे, पर्यायानें त्यांच्या शिष्य-जनांच्या आचार-विचाराकडे, मनोदर्शनाकडे आपलें लक्ष अधिक जातें. 'एकांका' नंतर श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्वांत आतां कसलाच फेरबदल व्हावयाचा नसतो. त्याला स्थिरता लाभलेली आहे, त्यांच्या जीवनहेतूही निश्चित झालेला असतो. यामुळें

'पूर्वार्ध–उत्तरार्ध' मधील श्रीचक्रधरांचें आयुष्य एका सरळ रेषेंत गेल्यासारखें दिसतें. 'एकांक' आणि 'एकांकेतर लीळाचरित्र' यांतील श्रीचक्रधर जीवनदर्शनांतील हा भेद आस्वादकाला जाणवतो. महानुभाव पंथीयांच्या दृष्टीनें ह्या भेदाला अस्तित्वच नाहीं हें वेगळें.

एकांकांला एक कथानक आहे, आणि या कथानकाची गोडी हेंच 'एकांका'चें खरें आकर्षण आहे. नव्वद शंभर वर्षांची ती 'कहाणी' आहे; तर 'पूर्वार्ध–उत्तरार्ध' ही सात–आठ वर्षांची 'दैनंदिनी' आहे. या दैनंदिनींत अगदीं न चुकतां श्रीचक्रधरांच्या प्रत्येक दिवसाची नोंद आलेली नाहीं. (तशी प्रतिदिनीची लीळा मिळाली असती तर म्हाईंभटाकडून तिचा भक्तिभावानें स्वीकार झालाच असता.) या काळांत श्रीचक्रधर एकटे कधींच राहिलेले दिसत नाहींत. या स्थळाहून त्या स्थळीं त्यांचें विहरण चालू असे; कधीं 'चरणचारी उभे,' तर कधीं 'आसन,' 'वसती' किंवा 'अवस्थान' होत असे. आसन कधीं 'वृक्षातळीं, कांटेविवरि', 'पटिसाळेवरि,' 'देऊळीच्या सोंडियेवारि' किंवा 'ओटियेवरि' होई; 'मठ, गुंफा, देऊळीं' 'जैनमंदिरीं,' वसती होई. कधीं 'गगनाची वास पाहात' असलेले, तर कधीं अगणीं वेढे करणारे' तर कधीं शिष्यांच्या 'खांदियावरि श्रीकरू' ठेवून 'बीजे करीत असलेले' श्रीचक्रधर या लीळांतून दृग्गोचर होतात...गावीचे महाजन–भक्तजन–भेटतात, दरिसन घेतात, चरणां लागतात, दंडवत घालतात, 'नगर–श्रींगार' करतात, रंगमालिका काढतात, उपाहारा बोलावितात...प्रवृत्ति असेल तर श्रीचक्रधर जातात, नाहींतर पुढच्या मुक्कामीं उपाहार घेऊन येण्यास सांगतात. कधीं शिष्यांना भिक्षान्न आणावयास लावतात, व ते दृष्टपूत करून प्रसाददान म्हणून देतात. 'दधीभातू पाणीभातु–आलें, तूप–ढिढेरे, गुळभेली,' हें विशेषतः नित्याचें अन्न. 'आरोगण' होतांच, 'गुळळा' करून वीडा ओळगविला जाई; प्रसाद म्हणून 'तांबूल' घेण्यासाठीं शिष्य उत्कंठित होत अशी दिनचर्या चाले. 'पस्यात् पाहारी' किंवा 'उदियेवरी' उठून, परिश्रय सारून, दंतधावन होई; 'प्रातःपूजा' होई. मग थोडें विहरण; नंतर चरणक्षाळण; प्रवृत्तिविशेषें मर्दना–मादन होत असे. पुडु–वाटु–व्यातून फोडी काढून ओळगविणे तर नित्याचेंच असे. 'पूर्वार्धा' मध्यें ही दिनचर्या सारखी पहावयास मिळते.

पहांटे, संध्याकाळीं किंवा चांदण्यांत, प्रवृत्ति होईल तसे श्रीचक्रधर ग्रामांतरास निघत; हास्यविनोद करीत, गप्पा मारीत 'अटन' चालू असे. जातां जातां कोठें जमीन साफ करणें, खड्डा भरून काढणें, गुंफा उभी करणें, सांडोवा टाकणें हीं कामेंही शिष्याकडून ते करवून घेत. एरंडाचे रानाला 'आंबेवन' म्हण, 'गाढव भुंकितले तो पंचमवेद' असें संबोध, झाडावरील आंबट आंब्याना 'संसारमोचकू' असें मिस्किल-विशेषण लाव, जोग्याचा वेष घेऊन 'मन भुली' हें गाणेंच गा, गुराख्याची नक्कलच कर, सारंगपंडिताची मुलगी धानाइसा हिला साळेची गोष्टच सांग, कुणाचा ग्रह फेड, ज्वर उतर,

ह्याला स्थित्यानंद दे, त्याला विद्यानंद दे, जागोजाग पूजा–मंगलार्तीचा स्वीकार कर अशी ही भ्रमंति चालू असे. आकाशांत शुक्राची चांदणी उगवली, बाइसानें 'हें नक्षत्र कोणतें?' म्हणून विचारतांच शुक्रकथाच सांग, मंदिरांतील 'पेखणें' पहा, त्यांत चुकी काढ, वेरूळच्या लेण्यांतील 'छायापुरुखु' ची माहितीच दे, 'त्रिंबकेश्वर–विज्ञानेश्वर' यांना बीडा दे, परपंथीय महात्म्याचा मान ठेव, अनंतव्रत–उपवास यांतील मूळ धर्मतत्त्वच विशद कर, उंबराचें फळ सहज हातीं घेऊन 'ब्रह्मगोळकु ऐसा असे' असा प्रत्यक्ष दृष्टान्तपाठ दे, शिमगा आला शिमगा कर, दिवाळी आली दिवाळी कर–असें हें भ्रमण होत होतें. लहान–मोठा, राव-रंक, शत्रु-मित्र, भुतें–खेतें, पशु–पक्षी, जें कोणी येईल, त्याशीं क्रीडा करीत हा स्वैरविहार घडत होता.

शिष्यांसमवेत श्रीचक्रधरांनीं केलेली ही 'पदयात्रा' काव्य–शास्त्र–विनोदानें एक आनंदयात्राच जणूं झाली होती. हें भ्रमणमंडळ महाराष्ट्र–भूमंडळींच वावरत होतें. प्रतिष्ठान, एळापूर (वेरुळ), श्रीनगर (सिन्नर), त्र्यंबक, पुणतांबें, भडगांव, ऋद्धिपूर, हिरवळी (जालना) डोंबेग्राम (बीड जिल्हा) खडकुली असें 'ग्रामात् ग्राम' हें अटनविशेष चालू होतें. शिष्य मिळत होते; कांहीं अनुसरत होते, कांहीं, कांहीं काल राहून परत जात होते. श्रीचक्रधरांनीं कोणाला 'या' म्हटलें नाहीं, कोणाला 'जा' म्हटलें नाहीं, अडविलें नाहीं. मत्सरी महंतांनीं विषप्रयोग केला, त्याचा दोष मानला नाहीं, स्वानंदसाम्राज्यांत गुंग होऊन श्रीचक्रधरांचा स्वच्छंदविहार चालू होता. त्यांना देवगिरीच्या राज्यक्रांतीचे भान होतें पण तिच्याशीं कसलेंच कर्तव्य नव्हतें. त्यांच्या शिष्यां–शिष्यांत थोडा हेवामत्सर होता, स्पर्धा होती; पण श्रीचक्रधरांनीं त्याला कसलेंच महत्त्व दिलें नाहीं, उलट 'साधे' सारख्या (म्हणजे एल्हाइसेसारख्या) भोळ्या भाबड्या शिष्येनें केलेल्या वेड्यावांकुड्या पूजेनें–त्या मागील तिच्या अपूर्व भावभक्तीनें—त्यांना अनुपम आनंदच होई. कोणाचा काय अधिकार आहे, हें जाणून त्यांना तीं तीं कामें ते सांगत; बाइसाकडे मठाची–गुंफेची सारी व्यवस्था पहाण्याचें काम असे; श्रीचक्रधरांची ही पहिली शिष्या. सहज जातां जातां त भक्ताची कसोटी पहात, त्यांचीं कर्में क्षळून त्यांना थोडेफार 'अधिकारी' बनवीत; त्यांचीं मनोगतें आधींच ओळखून त्यांना सुख देत, प्रसंगविशेषीं निर्वचन करीत.

संन्यासदीक्षा घेऊन, दीनोद्धरणाच्या हेतूनें लोकांत आलेल्या श्रीचक्रधरांचा प्रारंभींचा काळ म्हणजे 'पूर्वार्ध–काळ' होय. या काळांत महाराष्ट्रमंडळांत एक 'शिष्यांची मांदी' त्यांना लाभलेली दिसते. गांवीचे काहीं विद्यावंत महाजन आणि सामान्यजन यांना त्यांच्या वेधशक्तीचा अनुभव आलेला दिसतो; त्यामुळें श्रीचक्रधराचे अनुयायी वाढत चाललेले दिसतात. यांत कांहींनीं आपलीं पूर्वीचीं धर्मतत्त्वें किंवा पंथ बदललेले

दिसतात. कोठें जुन्या गुरूंची प्रतिष्ठा ढासळलेलीही आढळते. दादोस यांनीं स्वतः श्रीचक्रधरांचें शिष्यत्व पत्करलें, तरी आपली शिष्यमालिका–नागदेवाचार्य, व त्यांचीं भावंडें–यांना ते श्रीचक्रधरांची पूजा करण्याची मनाई करूं लागले. तत्कालीन हटयोगी किमयागार यांचाही श्रीचक्रधरांशीं संबंध आलेला दिसतो. श्रीचक्रधर यांनीं कोणालाही विरोध केल्याचें, किंवा कोणाशीं मुद्दाम स्वतः होऊन वाग्युद्ध केल्याचें आढळून येत नाहीं. तरीपण चक्रधरांचा हा जो संचार गोदातटाकीं झाला, त्यानें त्या त्या क्षेत्रीं एक नवा धर्मप्रवाह सुरू केला; त्याला होणारा विरोधही त्यांच्यावर झालेल्या विषप्रयोगांतून उघडकीस आला. 'पूर्वार्धा' मधील 'लीळां'तून हा जो विरोध दिसून येतो, तो धर्माच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या तात्त्विक भूमिकेंतून निर्माण झालेला दिसत नाहीं. तो वैयक्तिक असूयेंतून जन्माला आल्याचें जाणवतें. या विरोधाचें सातत्य किंवा संघटित असेंही रूप पाहावयास मिळत नाहीं. 'पूर्वार्धा' मध्यें श्रीचक्रधरांचा अद्याप वेगळा विशिष्ट असा पंथ झालेला, आणि त्या पंथाचें एक स्वतंत्र तत्त्वज्ञान सिद्ध झालेलें प्रत्ययास येत नाहीं. हें मात्र प्रभावानें जाणवतें कीं, श्रीचक्रधर क्षेत्रोक्षेत्रीं बहुजनांच्या आदराचा, भक्तीचा विषय होत आहेत, आणि त्यांना श्रीचक्रधरांचा वेध लागत आहे; श्रीचक्रधरांच्या वेधशक्तीपुढें तत्कालीन अन्यपंथीय मठाधिपती योगी-जोगी हे निष्प्रभ ठरत आहेत. महानुभाव पंथ सिद्ध झाला नसला तरी श्रीचक्रधरांचें विभूतिमत्त्व सिद्ध झालें होतें. 'ऋद्धिपूर' आणि 'प्रतिष्ठान' या दोन केंद्राच्या ठिकाणींच केवळ ही विभूति स्थिरपणें कार्य करीत होती, असें नाहीं; तर या दोन केंद्रांतील महाराष्ट्रभूमींत पदसंचार करून, महाराष्ट्रांतील धर्मभावनेला व धर्मबुद्धीला एक वेगळें अधिष्ठान देऊं पहात होती. 'पूर्वार्धा' च्या अगदीं अखेरीस नागदेवाचार्यांची जी हकिकत आली आहे, ती या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे.

आपले गुरु दादोस आणि ऋद्धिपुरचे श्रीगोविंदप्रभु यांच्या ठायीं नागदेवांना मुळांत सारखीच प्रतीति येत होती; पण हें माहित असूनहि त्यावर न रागावतां श्रीचक्रधरानीं शांतपणें 'श्रीप्रभु तें निर्मूक्तवस्तुः श्रीप्रभु तें निर्गुणब्रह्मः श्रीप्रभु ते आत्माराम' असें नागदेवांना सांगून श्रीप्रभु हे 'जीवमोकलिते' आहेत हें विवरून दाखविलें. यावर एक रात्र नागदेवांना विचार करूं दिला; पुन्हा दुसरे दिवशीं सकाळीं बोलावून, 'कांहीं आवांकीया (विचार) मीळत असे ?' असा प्रश्न केला, आदल्या रात्रीं केलेले 'ईश्वर विभागु निरुपण' पुन्हा केलें. 'तेणे भटोबासि बोधु जाला.' हें धर्मपरिवर्तन असें शांतपणें, पण निश्चयेंकरून चाललें होतें. 'पूर्वार्धा' मध्यें या धर्मपरिवर्तनाची बैठक पक्की झाली, तिचें बळ गव्हागव्हानें वाढत चाललें, एक अनुयायीमंडळ स्थिरावलें, शिष्याच्या शोधांत हिंडणाऱ्या गुरूला आपला शिष्य सांपडला–नागदेवाचार्य यांनीं केलेल्या श्रीचकधरांच्या अनुसरणानें एक नवें पर्व सुरू झालें; आणि श्रीचक्रधरांच्या आयुष्याच्या उत्तरार्धाला खऱ्या अर्थानें येथून पुढें प्रारंभ झाला.

[अपूर्ण]

पीएच्. डी. मराठीचें संशोधन

[आपल्या निरनिराळ्या विद्यापीठांतून 'मराठी' विषयामध्यें पीएच्. डी. पदवीसाठीं जे प्रबंध सादर झालेले आहेत, त्यांची यादी म. सं. पत्रिका व० ११ (२, ३), व १२ (१) या अंकांमधून प्रसिद्ध करण्यांत आली. होती. पुणें विद्यापीठाच्या जयकरग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. हिंगवे यांनीं 'Catalogue of Theses and Dissertations' नांवाची प्रबंधनामावलि नुकतीच तयार केली आहे. भाषाशास्त्रीय प्रबंधांची माहितीहि, मराठीच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरणारी असल्यानें प्रस्तुत नामावलींतील 'Linguistics' या सदरांतील निवडक प्रबंधांची यादी पुढें देण्यांत येत आहे. ही यादी दि. ३० जून १९६५ पर्यंत जयकरग्रंथालयाला उपलब्ध झालेल्या प्रबंधांची आहे.]

1. Bhagwat, Shriram Vasudeo :—Phonetic frequencies in Marathi and their relation to devising a speed script. (वारंवार वापरांत येणारे मराठी शब्द व ध्वनी आणि त्यांचा जलद लेखनाशीं संबंध)—Dr. S. M. Katre.

2. Chitnis, Vijaya Shridhar :—Khandeshi dialect (as spoken by farmers in the village of Mohadi in the Dhulia Taluka.)—Dr. N. G. Kalelkar.

3. Gokhale, V. D. :—Sanskrit Loan words in Marathi.—Dr. E. D. Kulkarni.

4. Joshi, Laxman Gundo :—Descriptive Grammar of the Khatri-dialect.—Dr. S. M. Katre.

5. Laddu, Suhasini Sureshchandra :—Linguistic analysis of Koli (a dialect of Marathi.)—Dr. M. A. Mehendale.

6. Maurya, Raj Narayan :—Descriptive analysis of Hindi Language of Namdeva :—Dr. A. M. Ghatge.

7. Valimbe, Shankar Govind :—Descriptive analysis of Māngi Marathi in Mālvā—Dr. E. D. Kulkarni.

लीळाचरित्र : एक अभ्यास

(उत्तरार्ध)

ले. प्रा. व. दि. कुळकर्णी

श्रीचक्रधरांचा उत्तरार्ध–काळ हा अवघ्या चार वर्षांचा आहे. ह्या कालावधींत खडकाळी, पैठण, छिन्नपापी, ढोरेश्वर, डोमेग्राम, भिंगार, प्रवरासंगम, नेऊरगांव, बेलापूर अशा गांवीं (दक्षिण गोदातटकीं) त्यांची भ्रमंति झाली, येरझारा झाल्या. यावेळीं ही भ्रमंति पुष्कळच मर्यादित झालेली दिसते. महिना–दोन महिने, तर कधीं सबंध उन्हाळा–हिंवाळा–पावसाळाभर त्यांचें एकेका क्षेत्रीं अवस्थान होत होतें. त्यांचें ईश्वरावतारित्व सिद्ध झालें होतें, शिष्यमंडळांत स्थिरता आली होती; आणि आतां श्रीचक्रधरांना निरुपणाची प्रवृत्ति अनावर होत होती; इतकी कीं, अशी प्रवृत्ति झाली आणि भटोबास कोठें बाहेर गेले असले तर ते बेचैन होत; मठांत आंतबाहेर येरझारा घालीत, उंचमढीं जाऊन एक पाय 'उंबरेयावरि एक उंबरेयातु' असे ते भटोबासाची वाट पाहात उभे राहात; 'वानराः आझुईं काइ पां नैएः,' असे सारखे पुटपुटत, आणि पुन्हा त्यांच्या येरझारा, थांबणें, वाट पाहाणें सुरू होई. श्रीरामकृष्ण परमहंसांचें विवेकानंदाच्या ठायीं असेंच होत असे. 'बाइः एथ प्रवृत्ति जालीः तरिः स्तंभाएकातें नीमीत्य करूनि नीरूपीजैलः' असे उद्‌गार त्यांनीं बाईसापुढें काढले आहेत. 'लीळाचरित्रा' चा 'उत्तरार्ध' अशा निरूपणानें भरून गेलेला आहे. अर्जुन–गीता किंवा उद्धव–गीता जशी, तशी 'उत्तरार्ध' ही 'भटोबास–गीता' होय–म्हणजे श्रीचक्रधरांनीं भटोबासांना सांगितलेल्या धर्मसूत्रांचा संग्रह होय. सबंधच्या सबंध 'लीळाचरित्रा'ला महानुभवीयांचा 'श्रुति' ग्रंथ म्हणण्यापेक्षां 'उत्तरार्धा'ला श्रुतिग्रंथ म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. 'एकांक' आणि 'पूर्वार्ध' यांचें स्वरूप केवळ आठवणी या अर्थानें, 'स्मृतीं'चें आहे.

'उत्तरार्धा'त श्रीचक्रधरांची 'नित्यदीनी लीळा,' पूजाविहरणादि किंवा चमत्कार–स्थित्यानंददानादि साऱ्या 'पूर्वार्धा'तील गोष्टी यथाक्रम चालू आहेत; पण त्यांना आतां महत्त्व किंवा स्वतंत्र असें वैशिष्ट्य उरलेलें नाहीं. त्यांचा सारा भर धर्मनिरूपणावर आहे, हेंच प्रकर्षानें जाणवतें. हें धर्मनिरूपण कधीं अचानक प्रवृत्ति झाली म्हणून आपण होऊन केलेलें असतें. उदा०–"बाइ, देवो कैसा" असा स्वतःच प्रश्न करून "देवो पाखाणाचा नव्हे : देवो काष्टाचा नव्हे : देवो मातीएचा चीत्रीचा नव्हे : देवो पटीचा नव्हे : वासना भेदें देवो धातुचां नव्हे :" असे ते अनावर बोलत सुटतात व पुढें आणखीं स्पष्टीकरण करतात. हें पहिल्याचें उदाहरण.

तर कधीं एखाद्या प्रसंगांतून धर्मनिरूपण झटकन् उद्‌भवलेलें असतें. महदाइसा मठ सारवीत होती, तों चक्रधरांच्या हातची सुपारी गडगडत गेली, ती महदाइसेनें तेथूनच

श्रीचक्रधरांकडे फेंकली आणि मग 'आपण उठून ती त्यांच्या हातीं द्यावयास हवी होती' या विचारानें एकदम तिला ग्रासलें. ती दुःख करूं लागली. त्यावर 'सर्वज्ञें म्हणीतलें: बाइ : केलिए क्रीएसि अनुताप पुरश्चरण.'

कधीं कधीं विशेष कांहीं घडलें नसतांना, कांहीं थोडा आधार घेऊन श्रीचक्रधरांना निरूपणाची प्रवृत्ति झाल्याचींहि उदाहरणें 'उत्तरार्धा' मध्यें मिळतात. मातीकाम चालू होतें; लखुबाइसा मातीचे गोळे करून देत होती व भटोबास ते वाहून नेत होते. त्यांतला एक पिंड घेऊन सर्वज्ञ म्हणाले, "वानरेया, हा पेंडु वीकारें घेतला गा : ऐसेही एकु सूक्ष्म वीकार असेत गा :.....जे आपुले आपुलेया उपलक्षेति ना :"

सबंध 'उत्तरार्ध' च जणूं एक 'बृहद्-दृष्टान्त' पाठ वाटतो. केसोबासांनीं संकलित केलेल्या 'दृष्टान्तपाठांत' एकशें चौदाच दृष्टान्त आलेले आहेत; त्यांतील सुमारें ३०-३५ 'दृष्टान्तां'चा 'लीळासंबंध' सांपडतो आणि त्यांतील पंचवीस-पर्यंत लीळा एकट्या 'उत्तरार्धा'तील आहेत. पण ज्यांचें स्वरूप दृष्टान्तासारखें आहे, अशा कितीतरी आणखी लीळा आपणांस 'उत्तरार्धा' मध्यें मिळूं शकतात; त्यामध्यें येणारीं सूत्रें सूत्रपाठांत घेतलीं असतील किंवा नसतील. श्रीचक्रधर जें धर्मनिरूपण करीत गेले, तें कोणत्याहि एखाद्या जुन्या धर्मग्रंथाच्या आधारें, भाष्यरूपानें नव्हे; तर त्यांच्या चालत्या धर्मपीठांत किंवा जंगम विद्यापीठांत प्रसंगपरत्वें, कांहीं निमित्तानें जो शास्त्रविनोद त्यांनीं केला, त्यांतूनच त्यांचें तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचीं सूत्रें उत्स्फूर्तपणें प्रकट झालीं. त्यामुळें त्यामागें जिवंतपणा, उत्स्फूर्तता आणि प्रत्ययकारिता आहे; तें रूढ स्वरूपाचें तांत्रिक किंवा सांकेतिक नाहीं. दैनंदिन अनुभवांतून तें स्फुरलेलें असल्यामुळें तें प्रत्यक्षपणें (directly) मनावर ठसतें. याचें वानगीदाखल एक उदाहरण पुढीलप्रमाणें : 'श्रीचक्रधर भटोबासास निरूपण करीत होते. त्याच वेळीं बाईसानें भटोबासास लोणारतीर्थाहून घागर भरून पाणी आणावयास सांगितलें. भटोबास गेले खरे, पण 'हेंच काम आणखी थोड्या वेळानें, (निरूपण संपल्यावर) सांगितलें असतें तर काय बिघडलें असतें ?' असें 'पोटीं' म्हणत गेले. त्यांनीं पाणी भरून घेतलें व ते परत निघाले; त्यांना पश्चात्ताप झाला. 'हें पाणी बाईसानें स्वतःच्या आंघोळीसाठीं कांहीं आणावयास लावलें नाहीं. गोसावियांच्यासाठींच तें मी आणीत आहें,' हें त्यांच्या मनांत आलें. ह्या विचारानें ते परत फिरले आणि श्रीचक्रधरांच्या पायां पडले. तेव्हां सर्वज्ञें म्हणीतलें: वानरेया ! तुम्ही जे होऊनि गेलेति तें नव्हे : आलेति तें होए: ' आणि मग त्यांनीं भटोबासास 'दासीचा दृष्टान्त' सांगितला.

उत्तरार्धामध्यें शिष्याशिष्यांतील असूया-स्पर्धा प्रारंभीं थोडी दिसून येते; पण पुढें ती पार संपली आहे. शिष्य आपापसांत थट्टाविनोद करतांना दिसून येतात. त्याचें सुखद सहजीवन चालू होतें, 'साधे' जेवत होती. भटोबास भाजींतील वांग्याचा देठ हातीं घेऊन "एल्हो एल्हो : कैसें ऊंदराचें पूंस : पूरण ऐसें : सीजलें :" असें

म्हणतात. मग वांग्याची फोड हातांत घेऊन 'ऐल्हो, ऐल्हो : कैसी उंदराची डोई : पूरण ऐसी सीजली असे : ' असें पुन्हा साधेला चिडवितात. भटोबासावर श्रीचक्रधरांचें फारफार प्रेम होतें. श्रीचक्रधरांना पूजा करून घेण्याची आणि निरूपणाची प्रवृत्ति 'उत्तरार्धा' मध्यें वारंवार आणि वेळीं-अवेळीं होत असल्याचेंहि दिसतें. अशा या भ्रमंतींत, आपल्या एकनिष्ठ शिष्यांच्या संगतींत, निर्याण करण्यापूर्वी, निमित्तानिमित्तानें श्रीचक्रधर, श्वासोच्छ्वास ज्या स्वाभाविकपणें होतात, त्या स्वाभाविकतेनें जे उद्‌गारले त्याचा पुढें महानुभावीय तत्त्वप्रबंध झाला. 'उत्तरार्धा'तील श्रीचक्रधरांच्या प्रत्यक्ष 'लीळा (= कृति, आचार) ह्याच वास्तव दृष्टान्त होत.

पण याशिवायहि कितीतरी अवांतर कथा, आख्यायिका, संसारचित्रें आणि अनुभव श्रीचक्रधरांनीं कथन केले आहेत, आणि आचारधर्म व तत्त्वज्ञान विशद केलें आहे. अशा लीळांचे स्वतंत्र संकलन करणें मोठें उपयुक्त ठरेल. ज्ञानांकुश नांवाच्या महात्म्याची कथा, (उ०-४८३), लवणरावोचें आख्यान (उ०-४१३), नागदेव 'सीवेचा गुंडा' (उ०-४८९), शूद्रसुरवानुवाद-मोळिकारसुरवानुवाद (उ०-४०४, ४०५), चक्रवाकां अनुवादे गुरूसीख्या अज्ञान, (उ०-४०९) लाडू आणि लाडवाची स्त्री-कथा (उ०-४११) यासारख्या लीळा उघड उघड दृष्टान्तरूप आहेत.

'उत्तरार्धा'च्या शेवटीं शेवटीं म्हणजे 'निर्याणप्रवृत्ति' स्वीकारण्याचा काल जसजसा जवळ येत चालला, तसतशी श्रीचक्रधरांची ही निरूपणप्रवृत्ति फारच वाढलेली दिसते; तिला विलक्षण वेग येतो. (ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय असाच विलक्षण वेगळा, ओघांत, विस्तारानें लिहिलेला दिसतो.) लीळांमागून लीळा हें निरूपणच नौंदविणाऱ्या आढळतात. 'हें: सकळ सीद्धांताचा मतितार्थ जाणे:', 'एथ एकी ब्रह्मविद्या असे: ते पुसिजे: चर्चिजे:' असें म्हणून श्रीचक्रधर शास्त्रसिद्धान्तानुवाद करीत जातात. 'यांतें तुम्ही आठवा : तेहवळि हे तुम्हांपासि असे :' असें आपल्या शिष्यांना आश्वासन देऊन आपलें 'धर्मवाती प्रसंगें सर्वत्र अवस्थान' राहील हेंही श्रीचक्रधरांनीं स्पष्ट केलें आहे. त्यांची मूर्ति निघून गेली तरी शास्त्ररूपानें ते सर्वत्र राहणार होते; 'आम्हीं आपुलेया गोसावीयांसि शास्त्रें वोळखौनि'; अशी भावना भटोबासांनीं श्रीचक्रधरांपुढें व्यक्त केली, आणि त्यावर 'शास्त्र भक्ताचां ठाईं असें कीं: भक्त आपणपें देवो न म्हणवी कीं गा :' या वचनानें तिची सत्यता पटवून दिली.

आपलें शास्त्र सुरक्षितपणें ठेवण्यास श्रीचक्रधरांनीं नागदेवाचार्य ह्या शिष्याची निवड केली; आणि त्याला 'आपणया समान' केला, 'सीवेचा गुंडा' हा दृष्टान्त देऊन नागदेवाचार्यांचा हा विशेष अधिकार श्रीचक्रधरांनीं इतर शिष्यांच्या मनावर ठसविला आहे. 'कव्हणी एकु सीवें गुंडा घाली : तेयासि सेणमाती माखिली असे : तयावरि सुनीं डुकरें मुतीति : तयावरि इळे कुऱ्हाडि लाविति : वरि वाहाणवनीं

उभ ठाकेति : पाए पुसीति : कन्हणीं तथा एकाद्या एकु : तेयासि तेल सेंदुर लावी ' वरि पालापाणी घाली : मग तेयाचेया आंगा : देवतपण ए : मग तो जगाचे चीतिले मनोर्थ पूरवी : तथा लोकांचे चीतिले मनोर्थ पूरवी : मग गाडा घोडेनेसीं तेथ जात्रा ए : तैसा हा एथचिया जवळिका आन जाला असे : ' नागदेव हा आतां पहिला ' पुरकर नागदेवो ' राहिला नसून तो ' आचार्य ' झाला आहे. श्रीचक्रधरांनीं भटोबासांना सांगितलेंच कीं, ' आतां एथौनि तुम्हांसि आचार्यां होआवें लागैल,' आणि त्यांना ' पुढारू ' दिला. नागदेवाचार्यांवर सर्व शिष्यांनीं विशिष्ट बुद्धि सांडून परमप्रीति करावी, आणि त्यांना ' पुसावे ' असा आदेशहि त्यांनीं शिष्यांना दिला आहे. भटोबास श्रीचक्रधरांना अनुसरिले होते. ' अनुसरण ' म्हणजे ' एथिचेया होइजे : एथौनि म्हणीतलें तें कीजे ' . भटोबासांना ' प्राणियांतें अनिष्टापासौनि काढुनि इष्टीं लावण्याचा, अधिकार देऊन मगच श्रीचक्रधर ' उत्तरापंथे गमन ' करते झाले, आणि इकडे ' बापूडें वानरें आतां एणेंवीण एकलें ' झाले व असंन्निधानीं सर्वज्ञें म्हणीतलें तें करीत राहिले. ' षड्विध दुख जो करिल तेयासि गोसावी भेटि देतील : ' या वचनावर विसंबून काळ कंठूं लागले. लीळाचरित्राचें हें शेवटचें वाक्य आहे; त्यांतच ' लीळाचरित्रा 'च्या रचनेमागील प्रेरणा आणि त्याचें प्रयोजन अगदीं स्पष्ट होतें.

' लीळाचरित्रा 'च्या ' एकांक ' ' पूर्वार्ध ' आणि ' उत्तरार्ध ' या तीन खंडांतील श्रीचक्रधरांच्या आयुष्यक्रमाचा, आचारधर्माचा आणि जीवनहेतूचा मागोवा येथवर घेण्यांत आला. ' एकांका 'च्या शेवटीं अवतारांतील जी मानवी छटा होती, तिचा लोप होऊन ईश्वरावतारित्वाचा श्रीचक्रधरांनीं पूर्णतः स्वीकार केला, आणि जीवोद्धरणाच्या कार्यास प्रारंभ केला. ' पूर्वार्धा 'च्या अखेरीस आपलें शास्त्र पूर्णांशानें ग्रहण करण्यास योग्य अशा अधिकारी शिष्याचा शोध श्रीचक्रधरांनीं केला आणि ' उत्तरांर्धा 'मध्यें ह्या शिष्याच्या ठायीं–म्हणजे नागदेवाचार्याच्या ठायीं–आपली ब्रह्मविद्या ठेऊन श्रीचक्रधरांनीं निर्याण केलें. ' संन्निधानीं जीवांचे उद्धरण करून असंन्निधानीं त्यांच्या उद्धरणाची व्यवस्था करणें,' हें श्रीचक्रधर या अवताराचें कार्य होतें. ' लीळाचरित्रा'च्या या त्रिखंडात्मक विभागणीतून या अवताराच्या तीन अवस्था अगदीं रेखीवपणें स्पष्ट झाल्या आहेत. ' लीळाचरित्र ' हा महानुभावीयांचा मूळ आधारग्रंथ आहे त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक–वाङ्मयाची अक्षय्य खाण आहे. साधनग्रंथ म्हणून त्याचें मोल अपरिमित आहे. या लीळांच्या पुष्पराशींतून महानुभावीय तत्त्वज्ञानांतील 'आचारमालिका' विचारमालिका 'दि गुंफण्यासाठीं कितीतरी पुष्पें निवडण्यांत आलीं; हें खरें; पण लीळाचरित्राचें स्वरूप तेवढ्यापुरतें मर्यादित नाहीं, हें स्पष्ट आहे. लीळाचरित्र हें श्रीचक्रधरांच्या, म्हणजे श्रीपरमेश्वरांच्या स्मृतीचीं पुष्पें–पुष्पपूजा–आहे. हीं पूजापुष्पें सदैव टवटवीत राहणारीं आहेत, निर्माल्य होण्याचें त्यांना भय नाहीं.

— ३ —

लीळाचरित्रांतील वाक्यरचना : प्रकार आणि पद्धति

लीळाचरित्र हें मराठींतील आद्य ग्रंथरूप गद्य होय. हें गद्य मूलतः 'शुद्ध' अथवा 'केवल' अशा वाक्यांचें आहे. हीं वाक्यैंही अगदीं आखूड अशीं आहेत. उदा०–'देव म्हो : एथं न वचा : न वचा : एथ वाघु असे' : गोसावी आइकौनि बीजें केलें : तवं तेथ वाघु आला होता : तेणें हाक दीधली : गोसावी सींहनादु केला : मग तो वाघु पळाला : वाघु तेथौनि गेला : गोसावी तेथ पहुडले' (ए. ली. १७) या वाक्यांतून कर्ता आणि क्रियापद, क्वचित् कर्म, तर क्वचित् स्थल वा कालदर्शक क्रियाविशेषण अव्यय अशीं दोन किंवा तीन पदें येतात. अशा वाक्यांच्या मालिकाच्या मालिका लीळाचरित्राच्या गद्यरचनेंत आढळतात. हीं छोटीं घावतीं वाक्यें ही या गद्याची मूळ प्रकृति.

या शुद्ध वाक्यांत मधून मधून दीर्घ वाक्यें येतात. उदा०–'डांकारमीं पाणीपात्र करूनि पहुडावेया भिवेश्वराचेया देउळा बीजें करीत होतें. (ए. ली. १७)

'मग अवघा भक्तजनीं चौरंगावरि बरवें गोसावीयांसि आसन घातलें' (उत्त.ली.३०२)

लोकांसी आश्चर्यें दाखवावें म्हणौनि घुटिका तोंडी घालुनि उत्पवन केलें.' (ए. ली. ४७)

'पुत्राचेया चाडा आपुली वडील स्त्री सेवा करावेया पाठविली' (ठाकुरें) (ए. ली. ४४)

'गोसावी श्रीकरीं गहुवाचिया काडीया दोणि घेउनि निश्चळ बैसले असति :' (ए. ली. ३९)

'भांडारेकारचेया पासि उचें बरवीं पुजाद्रव्यें आणौनि पुजा करूं आदरीली' (ए. ली. ३०)

'तवं अवधूत एकू नगरामध्यें भिक्षेसि रीगाला.' (ए. ली. १६)

'तो वेव्हारा गोसावीयांतें गोत्रां कुटुंबातें दाखवावेया घेउनि गेला.' (ए.ली.१६)

'अंध्रदेशीं एकाकी असतां एकी गावीं तेलीया एकाचेया घरा : पाहानपटीं बीजें केलें.' (ए. ली. ११)

'आपणेया आपण बोलत रांधवणाची घरीं तिहीं पदार्थांसीं खेळ करीत असति :' (ए. ली. ८)

'तिए समई गुजरातेचेया प्रधानाचेया कूमराचें देह गेलें.' (ए. ली. ४)

'फलेठाणी कन्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरीला.' (ए. ली. १)

या वाक्यांतून आपणांस असें दिसून येते कीं, त्यांतील पदयोजनेला कांहीं एक विशिष्ट क्रम आहे. स्थल-काल-दर्शक पदें (म्हणजे सप्तम्यन्त पदें) हीं वाक्यारंभीं येतात; नंतर कर्ता (प्रथमान्त पद), मग असल्यास करणदर्शक पद (तृतीयान्त), पुढें अनुक्रमें गौणकर्म (चतुर्थ्यंत) आणि प्रधानकर्म (द्वितीयान्त) असा पदक्रम दिसतो; वाक्यान्तीं क्रियापद येतें. पंचमीचें रूप क्रियापदाच्या आधीं येतें. [उदा.-साधीतें (एथैनिचि नेहजैल कीं: ए. लि. २९-३०)]. सामान्यतः आजच्या मराठींतील शुद्ध वाक्याची मूळ रचना (Standard construction and syntax) अशीच आहे. प्रसंगपरत्वें या पदक्रमांत थोडाफार फरक पडतो, पण तें आजही होतेंच. संबोधनें प्रायः वाक्यारंभीं आलेलीं दिसतात. कधीं विशेष्याआधीं, तर कधीं विशेष्यानंतर विशेषणपद येतें. पण विशेषणपदसमूह मात्र बव्हंशीं विशेष्याआधीं येतो. उदा. कन्हाडेया ब्राह्मणाचां घरीं; गुजरातेचेया प्रधानाचेया कूमराचें...

पण अशीं हीं दीर्घ शुद्ध वाक्यें लीळाचरित्रामध्यें एखाद्या ओळींत क्वचितच आलेलीं दिसतात. पण दृष्टांतपाठांतील कथारूप दृष्टान्त, तसेंच एकांकामधील कथारूप निवेदन आणि उत्तरार्धामधील कांहीं दीर्घ निवेदनें यांत या अशा दीर्घ केवल वाक्यांचा अधिक आढळ होतो. कारण तेथें संथ कथनाला योग्य असाच मूळ आशय असतो.

लीळाचरित्रांतील गद्याचें स्वरूप बोलीचें असल्यानें त्यांतील वाक्यांतील पदक्रम पुष्कळदा बोली-पद्धतीचे आढळतात. उदा० 'हा घोडा अमुकीये जातीचा : अमूका गुण : अमूकें लक्षण : '-किंवा, 'गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकरीलें गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळण्ही आण : जोआंचें व्यसन : राणियेचा पढीयावो : हरिपाळ नांव : ' म्हणजे मुख्य वाक्य (कर्ता कर्म आणि क्रियापद) आधीं झटकन सांगायचें आणि नंतर कर्मांचा तपशील एकेक एकेक असा देत राहायचें...ह्यानें सुटेपणानें तपशील समजतो व मनांत भरतो.

'तो देसू पारका', 'गावी एकीं वीहीरीसि आसन : ' अशासारखी संक्षिप्त वाक्यें मधून मधून येतात; पण संक्षिप्त वाक्यें खरीं येतात, तीं 'सूत्र' वाङ्मयांत. कारण अल्पाक्षरत्व हेंच त्याचें दृश्य रूप. 'स्वदेश संबंधु त्याज्य : स्वग्राम संबंधु त्याज्य : संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य : ', सूत्रांचें रूप असें संक्षिप्त वाक्यात्मक आहे.

वाक्यरचना आणि वाक्यप्रकार :—

लीळाचरित्रांतील गद्य **मुख्यत्वें** 'शुद्ध' वाक्यात्मक आहे; हीं शुद्ध वाक्यें-ही कर्ता, कर्म आणि क्रियापद या तीन पदांनीं नेहमींच युक्त असतात असेंही नाहीं; तीं संक्षिप्तरूपांतही कधीं आढळतात तें आपण पाहिलेंच. हीं शुद्ध वाक्यें कधीं कधीं 'संकुचित' स्वरूपांतही येतात. उदा० 'नावडतीएचा ठाइं अन्न वस्त्र अलंकार न्हाणें

जेवणें हासणें खेळणें असें : ' येथें अनेक कर्में (वस्तुत : पूरकें) आहेत. याच वाक्यापुढें ' परि आपणपें नेदी ' असें दुसरें वाक्य जोडून येतें, आणि मग हीं दोन्ही वाक्यें मिळून एक ' संयुक्त वाक्य ' होतें. लीळाचरित्रांत संयुक्तवाक्यें येतात, पण तीं अत्यल्पसंख्य आहेत. ' स्त्रीएचेनि दर्शनें स्पर्शनें संभाषणें पोरू धर्मापासौनि गेला ' हें वाक्य ' संकुचित ' असून ' संयुक्त ' ही आहे. ' बाइ ' पाप तरि नव्हे परि अविधी होए; ' किंवा ' साकर होइजे तें नीकें कीं साकर अनुभवीजे ते नीकें ' हें प्रश्नार्थक वाक्य जातीनें ' संयुक्त ' आहे. जीं संयुक्तवाक्यें आढळतात त्यांतील दोन वाक्यांत बहुधा ' विकल्प ' किंवा ' न्यूनाधिक्य ' भाव असतो. क्वचित् ' लोकांसी आश्चर्यें दाखवावें म्हणौनि घुटीका तोंडी घालुनि उत्पवन केलें, ' अशा वाक्यांत उद्देशबोधकता येते.

' मिश्र ' वाक्येंही लीळाचरित्रांतील गद्यलेखनांत आहेत. संयुक्तवाक्यांच्याहून मिश्रवाक्यांची संख्या बरीच अधिक आहे, अर्थात् शुद्ध किंवा केवल वाक्यांच्या मानानें ती कांहीच नाही. मिश्रवाक्यें जीं येतात तीं ' भणीतलें ' ' म्हणितलें ' ' पुसीलें, ' ' सांघीतलें, ' अशा तऱ्हेच्या मुख्यवाक्यांतील क्रियापदाचीं ' कर्में ' म्हणून येणाऱ्या गौणवाक्यांनी सिद्ध झालेलींच बहुशः आढळतात. पण या व्यतिरिक्तही मिश्रवाक्यें पाहावयास मिळतात. ' जवं जवं स्तुति करीति तवं तवं व्यथा काढली. ' ' तो जेयाचिए पाठीवरि बैसे तेयासि सूख होए; ' ' लपवीले होते ते आवघेही निघाले; ' आगा या वाटा जासी तरि चोरीं नागवीजसि : ' विरवो न सेवी तरि जीउ काइ गा मरत असे. ' या मिश्रवाक्यांतून कोठें विशेषणगौणवाक्यें तर कोठें क्रियाविशेषण गौणवाक्यें आलीं आहेत आणि त्यांचीं प्रयोजनेंहीं विविध (संकेतदर्शी, परिणामदर्शी इ०) अशीं आहेत. मिश्रवाक्याचें प्रमाण अगदीं कमी असलें तरी अगदीं पहिल्या लीळालेखनापासून त्यांचा आढळ होतो. ' जवं लोकू द्वारावतीए जाए तवं गोसावी तेथ होते ' (ए. ली० १) ' तुमचे दीधलेया विण : हे आरोगण करी : तरी गोपाळण्ही आन ' (ए. ली० ६)...येथपासून ते अगदीं उपान्त्य आणि अन्त्य ' लीळे ' पर्यंत ' मिश्र ' आणि ' संयुक्त ' वाक्यें पाहावयास मिळतात. ' आइकिलेंतें साच : कीं देखिलें तें साच : ' (उत्तरार्ध–उपान्त्य ली० ५०५) " आतां असंनिधानीं सर्वज्ञें म्हणीतलें तें करावें : आणि षडविध दुख जो करिल तेयासि गोसावी भेटि देतील : " हें लीळाचरित्राचें अगदीं शेवटचें वाक्य आहे, आणि तें तर ' संमिश्र ' (mixed) आहे; कारण यांत दोन प्रधानवाक्यें समुच्चयबोधक ' आणि ' या उभयान्वयी अव्ययानें जोडलीं आहेत, आणि ही दोन प्रधानवाक्यें अलगपणें ' मिश्र ' वाक्यें (प्रत्येकीं एक प्रधान आणि एक विशेषणगौणवाक्ययुक्त) आहेत. अर्थात् या गद्यांतील हीं मिश्र किंवा संयुक्तवाक्यें आजच्यासारखीं दीर्घ, डौलदार, पल्लेदार नाहींत. त्यांचें रूप मुख्यतः छोट्याछोट्या, साध्या वाक्यांचें असेंच जाणवतें.

लीळाचरित्रांतील गद्य ज्या वाक्यांचें मिळून बनलें आहे, त्यांची व्याकरणदृष्ट्या चिकित्सा केली तरी त्यामागील हेतु वाङ्मयीन आहे; आणि तो म्हणजे हा कीं, भाषेचें प्रगल्भ आणि परिणत साधन हाताशीं नसतांनाही, प्राधान्यानें शुद्ध आणि प्राथमिक स्वरूपाच्या वाक्यांच्या साहाय्यानें लेखनाला किती चित्रात्मकता येऊं शकते, तें स्पष्ट व्हावें. मराठींतील उपलब्ध अशा प्रारंभीच्या गद्यग्रंथांतील वाक्यरचना ही प्राथमिक वाटली, तरी ती कच्ची नाहीं. हा हात गद्यलेखनाला 'नवखा' नसून अगदीं 'तयार,' 'कसलेला' असा वाटतो. जें जें तिला सांगावयाचें होतें–मग तो विचार असो, वा विकार असो, व्यक्तिदर्शन असो वा प्रसंगचित्रण असो, केवळ नोंद असो अथवा कथा असो, ही वाक्यरचना कोठेंच अपुरी पडल्याचें दिसत नाहीं; अडखळल्यासारखी किंवा बुजल्यासारखी जाणवत नाहीं. उलट अतिशय सहजपणें ती बोलत जाते आणि इकडे चित्र उमटूं लागतें. साऱ्या रंगानिशीं जिवंत आणि ठसठशीत असें चित्र निर्माण होतें. लीळाचरित्रांत एकामागून एक सारखीं किती शब्दचित्रें, किती स्वभावोक्तीचीं स्थळें येऊन जातात, तें सांगवत नाहीं. 'लीळाचरित्रा'ला 'लीळाचित्रें' म्हणावें, असेंच वाटतें. 'स्वभावोक्ति' अलंकाराचा अर्थ थोडा सैल आणि व्यापक केला तर सर्वच्या सर्व लीळाचरित्र हें त्यांचें एक व्यापक, विस्तृत, सलग, सुंदर उदाहरण ठरेल; आणि त्यांतील छोटीं, धावतीं गद्यवाक्यें (शुद्ध, मिश्र किंवा संयुक्त असलीं तरीही) आपल्या मूळ शुद्ध रूपामुळें (Primitive Purity) आणि अनलंकृततेमुळेंच 'स्वभावोक्ति' अलंकार अधिक आकर्षक आणि परिणामकारक करीत आहेत, असें प्रत्ययास येतें.

शैलींतील 'पुनरावृत्ती'चें स्वरूप :—

प्राथमिक अवस्थेतील गद्यलेखनांत वाक्यांची पुनरावृत्ति–एकेका वाक्याची किंवा वाक्यसमूहांची पुनरावृत्ति–होत असल्याचें नेहमींच पाहावयास मिळतें. बालवाचनाच्या प्राथमिक पुस्तकांतील गद्यांमध्यें अशी वाक्यपुनरुक्ति जी आढळते ती पुनरुच्चारानें (Drilling) ती वाक्यरचना मुलांच्या तोंडीं सहज बसावी, या हेतूनें. लीळाचरित्रांतील या पुनरुक्तीमागें हा हेतु नाहीं, हें उघडच आहे. जें जें घडले तें तें सर्व ओळीनें आहे तसें सांगण्याच्या पद्धतीमुळें ही पुनरुक्ति होते. कोठें कोठें ही पुनरावृत्ति कंटाळवाणीही वाटते. पण 'पराजित–मठ–प्रतिष्ठा' (एकांक–ली. ५२) या लीळेंतील 'मठापत्यें : पूस्तक : भांडार : तयासि जाले : मळा : वाडु : वृत्ति : हे अवघे तेयासि जालें :' वाक्यांची पुनरुक्ति होते ती 'त्याचें सर्वस्वापहरण झालें,' या गोष्टीवर वाचकाचें चित्त वेधून घेते; ध्रुवपदासारखे हें वाक्य जणूं कार्य करतें. याच दृष्टीनें डुळकैलेया बाळकाचा दृष्टान्त (दृष्टांतपाठ–४४) मधील पुनरावृत्त वाक्यांकडे पाहातां येईल. पण हे क्वचितच् बहुधा प्रसंग. व्यक्ति आणि त्यांतील जीवनांश यांच्या वेगळेपणामुळें आणि जिवंतपणामुळें ही पुनरावृत्त वाक्यें त्या त्या कथेंत, लीळेंत अथवा प्रसंगचित्रणांत एक विशिष्ट गति किंवा लय (Periodic rhythm) निर्माण करतात. उपनिषदें

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम्
क्रमांक ७५९४८७ दिः ....१८/१२/८७...
अंक ....२१३६... बोः दिः ...२३/३/८९

किंवा जातककथा यांत अशींच पुनरावृत्त वाक्यें येतात, आणि तीं त्या गद्याचा प्रभाव वाढवितात. ज्या लेखनाला 'वक्तृत्वगुण' आहे, त्या लेखनांत अशीं वाक्यें हटकून येतात. प्रवाहीपणा आणि वक्त्याचा रोख (emphasis) त्यानें दृष्टोत्पत्तीस येतो. 'न वाऽरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति । आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति । इ०.....' यांचा या संदर्भात विचार करून पाहाणें उपकारक ठरेल.

लीळांचरित्रांतील भाषा प्रवाही आहे; कारण तिचें स्वरूप ग्रांथिक नाहीं; बोली आहे. आणि बोलतांना समानार्थी शब्द एकत्र, एकदम येऊन जातात; त्यानें परिणाम साधतो; ओघ येतो. श्रीचक्रधर बोणेबाईना सांगतात की ओझें कांहीं घेऊं नका; कारण 'मार्गीं काइ मिळैल : वाटे मीळैल.' या पुनरावृत्तीनें मनांतील अभिप्रायही दृढपणें व्यक्त होतो. पाईकपरिवार, पालापाणी, हिरडाबेहडा यांसारखे सामासिक शब्द; आंगी–टोपरें, गोरागोमटा, पुडवाटवा यांसारखे जोडशब्द; किंवा खडेखूबटे, वाडोवाडीं यांसारखे द्विरुक्तिवाचक शब्द निवेदनाचें बोलीरूप, म्हणजे बोलीचें प्रवाहित्वच स्पष्ट करतात. अशा शब्दांचा भरपूर वापर 'लीळाचरित्रां'तील गद्यानें केला आहे.

'लीळाचरित्रां'तील गद्याचा, एकदां नाम येऊन गेल्यावर त्याच्या जागीं सर्वनाम वापरण्याकडे नित्य कल दिसत नाहीं; त्यामुळेंही पुनरावृत्ति जाणवते. श्रीचक्रेधरांचा उल्लेख तर चुकूनच क्वचित् सर्वनामानें केला जातो. गोसावी, सर्वज्ञ अशीं नामेंच उपयोगिलीं जातात.....'पिंपळातळिं गोसाविया आसन...येकू ब्राह्मणु... तेणें येतां गोसावीयांतें देखिलेः ...आरोगणे गोसावियांतें वीनवीलेः गोसावी तेयाचेया घरा बीजें केलेः'...मात्र प्रत्येक वाक्यांत येणारी 'गोसावी' या शब्दाची पुनरावृत्ति 'गाईला चार पाय असतात. गाईला दोन डोळे असतात. गाईला दोन कान असतात...' अशा तऱ्हेची लेखनप्रयत्नाची प्रारंभावस्था दाखविणारी नाहीं. श्रीचक्रधरांसंबंधींच्या परमभक्तीच्या पोटीं हें येत असावें. (इंग्रजी लेखनांत God शब्दांतील 'G' कॅपीटल कां या विचारांत याचें उत्तर येऊन जातें.)

लीळाचरित्रांतील वाक्यें रचनादृष्ट्या शुद्ध (Simple) आहेत, हें मागें येऊन गेलेंच आहे ! 'गोविंदस्वामी स्नान, देवपूजा, विष्णुस्वामींस नमस्कार किंवा कोणतेंच असलें कर्म करीत नाहीं' असें प्रदीर्घ, अनेक कर्मयुक्त, शुद्ध वाक्य या गद्यांत येत नाहीं. 'गोविंदस्वामी स्नान न करीतिः देवपुजा न करीतिः विष्णुस्वामीसि नमस्कारू न करीतिः ऐसें कर्म कांहींचि न करीतिः' अशा सुट्या सुट्या शुद्ध वाक्यांच्या स्वरूपांत हें मांडलें जातें; यामुळें 'न करीति' या अकरणात्मक क्रियेवर भर दिला जातो; त्याला महत्त्व मिळतें आणि गोविंदस्वामीचें नैष्कर्म्य वाचकांच्या मनावर ठसतें. क्वचित् एखादे वेळीं, अपवाद म्हणूनच, 'देमाइसीं पानें पोफळें केळें

नारिएलें दर्शन केलीं' असें अनेक कर्मयुक्त साधें वाक्य येऊन जातें. कधीं कर्ते अनेक असतात, पण कर्म आणि 'क्रियापद' एकच असतें; अशावेळीं त्या त्या कर्त्याप्रमाणें एकेक वाक्य, सुटें सुटें केलें जातें. या पुनरुक्तीनें मूळ विषय मनावर ठसविण्याची क्रिया घडूं शकते. अर्थात् या हेतूनें, म्हणजे असा परिणाम साधावा म्हणून जाणीवपूर्वक अशी रचना केली जाते; असें नव्हे. 'शुद्धवाक्यरचना' हीच तत्कालीन गद्याची प्रकृति होती.

'एथचि नीद्रा **कीजे : कीजे** सुखें संतोखें' यासारख्या वाक्यांत क्रियापदाची पुनरुक्ति रमणीय वाटते, तींत जणूं दाम-यमकाचा आनंद लाभतो. आणि 'कीजे सुखें संतोखें' ही मुक्त वाक्यरचना (रूढ Syntax सोडून केलेली) ही 'सुख-संतोष' यांवर भर देणारी, म्हणून साभिप्राय वाटते.

अनेक ठिकाणीं, जिला 'अनुवादात्मक रचना' (Translative Construction) असें म्हटलें गेलें आहे, अशाही रचनेचीं वाक्यें लीळाचरित्र-गद्यांत आढळतात. उदा० **'वायू तथा वारा** म्हणौनि वोखदें करिति' अशा ठिकाणीं प्रायः संस्कृत शब्दांचा 'प्राकृतांत = (मराठींत) अनुवाद केलेला दिसतो. क्वचित् याउलट **'भूक** न वचे : तथा **तृप्ति** नव्हे' असेंही उदाहरण सांपडतें.

एखाद्या गोष्टीचें वैशिष्ट्य किंवा क्रियेचें सातत्य दर्शविण्यासाठीं शब्दांची पुनरावृत्ति करण्यांत येते. हें लक्षण या गद्यांतही पहावयास मिळतें. 'एकी बाइया **कढती कढती** आंबील हातीं घातलीं,' किंवा 'ते चांटसिएनें **व्यापारवीति व्यापारवीति** पाकनिष्पत्ति करी' पण **'वीवरें वीवरें** गोसावी बीजें करिताति' या ठिकाणीं 'प्रत्येक विवरांत' अशा अर्थीं ही द्विरुक्ति झाली आहे.

वर्णन करतांना 'प्रत्यक्षाभिनयपद्धती'चा अवलंब केलेला दिसतो, आणि तेथें शब्दांची पुनरावृत्ति होते. श्रीचक्रधरांच्या छातीवर रात्रीं दोन साप पडले; तेव्हां त्यांनीं **'एणे हातें हा फेडिला : एणें हातें हा फेडीला.'** ही पुनरावृत्ति भिन्नार्थ दर्शविणारी आहे. या एका (समजा, डाव्या) हातानें हा एक साप 'इकडे (डावीकडे) फेकला, आणि या एका (उजव्या) हातानें हा दुसरा साप इकडे (उजवीकडे) फेकला' असा या क्रियेचा अर्थ होतो. झुंजणाऱ्या दोन रेड्यांच्या मध्यें श्रीचक्रधर जाऊन उभे राहातांच 'एकु एसा नीगाला : एकु एसा नीगाला :' याचा अर्थ वरील-प्रमाणेंच घ्यावा लागतो.

श्रीचक्रधरांचें 'लीळाचरित्र' 'म्हणजे अगदीं नित्यदिनी लीळा' नसलें तरी त्यांत त्यांच्या 'नित्यदिनीलीळा' वरचेवर येतातच; त्याचें स्नान, पूजा, आरती, विहरण, जेवण, तांबूलभक्षण, वामकुक्षी इत्यादि गोष्टींची सारखी नोंद या गद्यांत येते. अशा वेळीं माहींभटांनीं दरवेळीं मुद्दाम कांही वेगवेगळे शब्दप्रयोग किंवा आविष्काराचें

नावीन्य स्वीकारलेलें नाहीं; आणि तेंच बरें झालें. कारण तसें धोरण शेवटपर्यंत सांभाळणें सर्वथैव अशक्य होतें, इतक्या ह्या एकच एक नोंदी बहुसंख्य आहेत. उलट या आचारांचा तपशील त्यांतील शब्दांची योजना आणि क्रम इतके ठरीव आहेत कीं, प्रसंग येतांच क्षणार्धांत वाचकांना तो सारा आचार नेत्रगोचर होतो. वाचकांच्या तें संवयीचें होऊन जातें. नित्य येणारा हा वर्णनाचा तपशील आहे तोच, साधा सरळ ठेवणें, यांतही माहींभटाची अकृत्रिम सत्यनिष्ठाच दिसून येते. नित्य येणारी घटना–'तेथ गोसावी बीजें केलें : मर्दना दिघली : मादणें जालें : पुजा झाली : धुपार्ति मंगळार्ति केली : ताट करविलें : आरोगणा जाली : गुळळा जाला : वीडा ओळगविला : मग बीढारा बीजें केलें : कर्धीं विड्याऐवजीं 'पुड वाटुवा' आणि आरोगणेंनंतर 'पहुड'– 'उपहुड' असा प्रकारहि येतो. तसेंच 'स्तीति झाली : भोगीली : भंगली :' हाही नित्याचा प्रकार होय.

येथवर लीळाचरित्राच्या लेखनशैलींतील पुनरावृत्तीचें स्वरूप, तिच्या मागील कारणें आणि तिचे परिणाम याचा विचार केला. या लेखनशैलीचे आणखी कांहीं विशेष नजरेंत भरतात. 'सर्वज्ञें म्हणीतलें : पाहीजे : पुसीजे : चर्चिजेः' किंवा 'जि जि : हारविलें असे तें वेचिजो : दीजो : मग खेळिजो :' अशा प्रकारची 'सार' अलंकारात्मक क्रियापदांची मालिका, चढती श्रेणी या वाक्यरचनेंत पुष्कळदां आढळते; यांतून आचाराचा क्रमच केवळ व्यक्त होतो असें नव्हे, तर त्या सर्वांनीं मिळून होणारा एक पूर्ण–आचार क्षणार्धांत ध्यानीं येतो. हीं क्रियापदें पुनरावृत्त नसलीं तरी त्यांतील उपान्त्य स्वर आणि अन्त्याक्षर समान असल्यानें तीं सयमक आहेत, त्यामुळें त्याला एक वेगळें ध्वनिरूप लाभलें आहे; उच्चारणांतील यतिस्थानामुळें (pauses मुळें) त्याला एक ताल प्राप्त झाला आहे.

अमूर्तीचें मूर्तीकरण, अप्रत्यक्षाचें प्रत्यक्षीकरण करण्याचें सामर्थ्य या गद्यांत आहे. यासाठीं प्रतिमांचा वापर समर्पकतेनें केलेला दिसतो. 'त्याच्या मोठ्या हाडांचे आणि लहान हाडांचे बारीक बारीक तुकडे करा,' हा आशय पुढीलप्रमाणें व्यक्त केला जातो. 'यांचें लांब खांड तें मू हुरी एवढें करावें : तथा लाहान खांड तें मू हुरी एवढें करावें : एका वाक्याची दोन वाक्यें, लांब आणि लहान हीं विरोधदर्शक विशेषणें, मू हुरी'ही प्रतिमा आणि पुनरावृत्त वाक्यें यामुळें आशयाला इंद्रियगोचरता आली आहे. आधीं रोप होतें, तें वाढलें; त्याचा मोठा वृक्ष झाला. तो केवढा ? तर 'थोरला वटु होए : जरठु होए : एकु हस्ती वेंझ दीघलेयाही न वचे :' असें सारें प्रत्यक्षीकरणात्मक वर्णन ! ग्रामीण बोलींत आणि बखरगद्यांत आपणांस वाणीचा हा गुण प्रकर्षानें आढळतो.

वाणीची ही प्रत्यक्षीकरणाची शक्ति ध्वन्यनुसारी शब्दांनीं वाढते. '(गोसावी उकीरडीं) **घरघरा** घोरे :' '(बोणेबाई) **लवलव** करूनि भीक्षा घेउनि आली,'

'तवं (वीवरीं) एके ठाइं **भगकरि** उजेड पडिला,' यांतील जाड ठशांतील शब्दांची अर्थशक्ति स्पष्ट आहे. याच लेखांत अन्यत्र अवतरणें म्हणून घेतलेल्या कित्येक वाक्यांत 'ध्वनिचित्रक शब्द' पाहावयास मिळतील. 'उरलीं वस्त्रें तेहीं (गोसावी) कांटीया सोकरीलिया : 'फु **भोरडीए**' म्हणोनि :' अशा वाक्यांत 'फु : भोरडीए' या उद्‌गारांत अभिनय तर आहेच, पण सुंदर 'रूपक'च नव्हे; रूपकातिशयोक्ति आहे. वस्त्राच्या घांदोट्या फुंकरून उडवितांना जणूं त्या भोरड्याच (चिमणे पक्षी) आहेत, असें श्रीचक्रधरांना वाटतें.

प्रश्नार्थक वाक्यांनीं अभिव्यक्तीमध्यें एक प्रकारचा जोरदारपणा येतो. 'एथ मरण आलेया काइ मरण असे,' 'बाइ, श्रीकृष्ण काइ मानीएचा : देवकी देवी काइ मानीएची :' अशा प्रश्नालंकारांतून मूळ अर्थ व्यंजित होतो, व त्या व्यञ्जनाक्रियेनें तो श्रोत्यांच्या मनावर ठसतो.

संक्षिप्त वाक्यें आपल्या आटोपशीरपणामुळें आणि नेमकेपणामुळें मोठीं प्रभावी ठरतात. श्रीचक्रधरीय सूत्रांपैकीं कितीतरी सूत्रांचें रचनास्वरूप संक्षिप्तवाक्यांचें आहेच. शिवाय 'साळैचें घर मेणाचें : काउळेयाचें घर सेणाचें' अशासारखीं संक्षिप्तवाक्यें कथानिवेदनांतही येतात. 'गदोनायेक चहुं रायाचे भांडारी,' कान्हरदेवो आस्तिक : रामदेवो निरपवस' 'आगा हें अक्षोभ्य उदकः' अशी रचनाही लीळाचरित्रकाराला स्वाभाविक आणि सुंदर वाटत असावी. ती परिणामकारक तर आहेच. 'तुटकी ऐसी बाज : तियेवरी फाटकी ऐसी वाकळ : यांत 'तुटकी' आणि 'फाटकी' या विशेषणपदांवर भर दिलेला आहे, वाक्यारंभींच त्यांची योजना करण्यांत आल्यानें हें स्पष्ट होतें. वाक्याच्या संक्षिप्त स्वरूपामुळें आणि तुटकी-फाटकी यांतील नादसाधर्म्यामुळें आणि वाक्यरचनेतील पदांच्या समानक्रमामुळें ही अशीं वाक्यें, वाचतांक्षणींच त्या ब्राह्मणाचें संसारचित्रच वाचकांच्या पुढें साक्षात् उभीं करतात.

'लीळाचरित्र **लेखन**' असा शब्दप्रयोग आतांपर्यंत करण्यांत आला आहे, पण वस्तुतः तें 'लीळाचरित्र **कथन**' आहे. कहाणीचें स्वारस्य हें ती सांगण्यात जसें आहे, तसेंच ह्या 'लीळा' सांगण्यांतच त्यांची खरी गोडी आहे. छोटी सुटसुटीत वाक्यें, त्यांचें संक्षिप्त रूप, त्यांची तडकगति आणि ठसठशीत रूप; कथनांतील संवादमयता, संवादांतील अभिनयानुकूलता, प्रत्यक्ष अभिनयावलंबित वाक्यरचना, ध्वन्यनुसारी शब्दयोजना; सयमक, तालबद्ध अशी शब्दांची स्थापना, वाक्यांची व वाक्यांशांची पुनरावृत्ती हे रचनेचे गुण, लेखनापेक्षां **कथनाशीं** अधिक स्वाभाविक वाटतात; आवश्यकही असतात. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ **पठणा**साठीं आहे, हें ध्यानीं घेतल्यावर त्यांतील पुनरावृत्ति आणि यमकरचना स्मरणास साहाय्यकच ठरते. लीळाचरित्र हा एक बंदिस्त असा ग्रंथ नाहीं; श्रीचक्रधरांच्या स्वच्छंद जीवनविहाराचीं घेतलेलीं हीं छायाचित्रें आहेत; शब्दमाध्यमांतून उतरलेलीं ताजीं, खरीं आणि धावतीं!

ललितलेखनाची शैली मुख्यतः तीन गोष्टींनीं निश्चित होते. लेखकाचें व्यक्तिमत्त्व, आणि त्याची भूमिका, त्याचे वाचक आणि त्याचा विषय, या वस्तुत्रयीवर शैलीचें अंतिम स्वरूप अवलंबून असतें. 'श्रीचक्रधराची जीवनलीळा' हा लीळाचरित्राचा विषय असला, तरी या लीळांचें स्वरूप विविध प्रकारचें कमें आहे तें आपण पाहिलेंच. पूर्वकथन, वृत्तांतनिवेदन, दैनंदिनीलेखन, कांहीसें टिपण, हकिकती, गोष्टी, दृष्टांत, संवादप्रसंग, सूत्रें, सूत्रांचें स्पष्टीकरण, हास्यविनोद, केवळ वार्तालाप, क्रीडा-कथन, असें लीळाचरित्रलेखनांत वैचित्र्य आहे; आणि तो तो विषय प्रसंग, आणि प्रवृत्ति यांस अनुरूप अशी शैली आकार घेत असलेली आपणांस पाहावयास मिळते. पण त्यांत श्रीचक्रधरांची भाषा एकदम मनांत ठसते; नी वेगळीच वाटते तिचाच थोडा तपशिलानें विचार करूं—

श्रीचक्रधरांचे उद्‌गार त्यांचे संवाद किंवा हास्यविनोद, निरूपण-चर्चा यांतील भाषा जर आपण पाहिली तर त्यास रूपकाचें सौंदर्य पुष्कळसे आढळून येतें. हीं रूपकें कधीं एखाद्याला प्रेमानें दिलेल्या नामाभिधानांतून दिसून येतात, ते नागदेवास **'वानर'** म्हणत, (कारण ते झाडावर सरसर चढले व गुंफेसाठीं त्यानीं फांद्या तोडल्या) मिष्टान्न देणाऱ्या स्त्रीला ते कामधेनु संबोधतात. आंबट आंब्यांना 'संसारमोचकू' हें विशेषण देतात. हीं रूपकें कधीं 'क्रियापदांतून' व्यक्त होतात.-'विष्णुभट **भुंकलेः** तो पंचमवेद' (पूर्वार्ध-खं. २, पृ. २५). एक स्त्री दर्शनाला आली असतां श्रीचक्रधरांच्या डोक्याला 'दारवंठु' लागला, तेव्हा त्या स्त्रीला बाइसा शिव्या देऊं लागली. तेव्हां श्रीचक्रधर म्हणतात, "बाइ: प्राणियें एथ आलेयां जळतां जावें तरि **निवावें** कोठें:" क्रियापदाप्रमाणें नामांनींही रूपकें सिद्ध झालेलीं आढळतात. 'जीवाचा **वागारा** नावेक ढिला करों नये:' एकदा महदाइसाला वाराणशीला जावयाचें होतें. दादोसनीं परवानगी दिली, आणि श्रीचक्रधरांनीं जाऊं नको, म्हणून सांगितलें. असे दोन-तीनदां झालें. शेवटीं तिनें जावयाचें ठरविलें, व ती दर्शनासाठीं श्रीचक्रधरांकडे आली तेव्हां ते 'श्रीकरू ऐसा भंवडीत' होते. महादाइसानें त्यांना विचारलें, 'हें तुम्ही असें काय करतां?' तेव्हां त्यांनीं उत्तर केलें; 'बाइ: **ताकीची माशी ताका वेगळी जाताए:**' (=म्हातारीला ईश्वर संन्निधाना बाहेर घालवीत आहे.) श्रीचक्रधरांच्या तोंडीं क्वचित् म्हणीही येतांना दिसतात. सर्वांचीं जेवणें झालीं होतीं. आणि वाटीभर खीर उरली होती. ती काढून ठेवण्यास भांडें नव्हतें. तेव्हां 'ठेवा: वानरेया (=नागदेवाचार्य) पूढा:' असें श्रीचक्रधर म्हणाले. आतां मला जाणार नाहीं, 'अशा अर्थाचें नागदेवाचार्य म्हणतांच, गमतीनें "सर्वज्ञे म्हणीतले: घेया: **भरलेया गाडया काइ सूप जड:** घासु घेयां:"

उपमेपेक्षां श्रीचक्रधरांना रूपकच अधिक प्रिय आहे. 'जीवु स्फटिकाकारू'! सूत्रें आणि सुभाषितें हीं तर बहुतेक ठिकाणीं रूपकात्मकच आहेत. 'संसारू हा दीर्घस्वप्न गाः,'

'स्त्री भणिजे मत्तद्रव्याचा रावो गा : ' 'कोमळ ज्ञानीं विखो विघ्नः; ' 'भिक्षा म्हणिजे पारधि गाः' कधीं कधीं परंपरित रूपकही येतें ! " अहंतेचें मूळ सकंदी उपडावें नाएकाः एव्हवी अंकुर निगतिः मग शांतीचें रोप लावावेः. पुष्कळदां रूपकातिशयोक्तीही येते. 'गांवाचां कडिसरां खांड देउळी एकी पाहिजेः तेथ **श्वानकुंडली** घालीजेः' किंवा 'हाडांची **रांगवळीं** करावी नाएका : ' किंवा 'मुक्तीची चाड आणि तेवीची **खुंटदावें** सांभाळणेः ' श्रीचक्रधरांची वाणी ही कसलेली अस्सल, वाक्प्रचारसमृद्ध जिवंत वाणी आहे. ते बोलतात म्हणजे साक्षात् चित्रच उभें करतात. 'मुक्तीची चाड तेणें मुंगिये वीरू न चिंतावें॥,' 'पोरु जीवु आपुलें मात्रागमन न देखे ' : परि पुढीलाचें वेश्यागमन देखे ॥;' 'पोळलेया सुनेयांचेया परी असावे॥ ' 'खरूज खाजवीना तो विरक्त' ॥ 'ओठांतरा निगालें तें देशांतरां जाए; ' 'दोहीं ओठां टाळें घालावे. '...इ० इ०...'

यामुळें श्रीचक्रधरांच्या भाषेला एक प्रकारचें दार्ढ्य आहे; कस आहे. श्रीचक्रधरांच्या वाणींत संस्कृत शब्द नेमकेपणानें येतात, पण त्यानें मराठीचें मऱ्हाटपण झाकोळलें जात नाही. श्रीचक्रधरांची वाणी पाहातां 'यादवकालीन मराठी गद्य' वास्तवचित्रणाच्या बाबत 'प्रतिशोत्तर' उघडपणें ऐकवूं शकलें असतें, असें वाटतें.

श्रीचक्रधरांच्या तोंडून मधूनच संस्कृत, हिंदी, गुजराती अशीं वचनें किंवा उद्गार येतात; विशेषतः संस्कृत, 'स्वयं दास्यं तपस्विनाम्' 'स्वस्थे चित्ते बुद्धयः संभवन्ति,' इ० क्वचित् एखादाच नेटका संस्कृत निर्देशही मराठी वाक्यांत येऊन जातो. '**दासोऽहं** न पूरे की नाएका : ' (उत्त० ली० २६) 'स्वयंनामगोपन' नांवाची लीळा :–(पूर्वार्ध खं. १, पृ. ४९) सिन्नर येथें माहादेवो राण्याचा एक माणूस, एका मठामध्यें श्रीचक्रधर आहेत का त्याची विचारपूस करण्यासाठीं आला आणि त्यानें खुद्द श्रीचक्रधरांनाच विचारलें, " श्रीचांगदेवो राउळ : गोसावी : एथ असति कीं : " तेव्हां " सर्वज्ञें म्हणीतलें : मातिः मा इहां कोइ नथी :.....मातारी एकी छे : ते गावमां हें भिक्षामागन गैइ छे : " इ०.....आपली गुजराती मातृभाषा अशी गोपनकार्यासाठीं श्रीचक्रधरांना उपयोगी पडली. 'उत्तरार्धा 'मध्यें ली० ४११, ४१८, ४१९ मध्यें संवादांतून हिंदुस्थानीं भाषा येते. श्रीचक्रधरांनीं ह्या कथा सांगितल्या आहेत.

लीळाचरित्र या गद्यग्रंथांत कांहीं अपवादात्मक पदेंही येतात. पूर्वार्ध, खं. १., ली. १५ मध्यें कांहीं पदांचे प्रथमचरण दिले आहेत, पांच पदें गाइलीं अशी नोंद आहे. हीं पदें अभंगसदृश वाटतात—रचनादृष्ट्या आणि शब्दयोजनेच्या दृष्टीनेंही, दुपारीं कांडण करीत असतां महदाइसेनें गायिलेल्या ओव्या, उत्तरार्ध, ली. २७१ मध्यें येतात.

गोमतीए तीरीं : नीळेया गूढरा : राजेया गुजरा : कृष्णराया : ॥ १ ॥
नीळा गुढरू : राजा गुजरू : माणीकी मंडपीं : श्रीचक्रधरू : ॥ २ ॥
गोमटें मांजीटें : आरव कुंडीचें : राजेया डौंडीचें : चक्रधरा : ॥ ३ ॥
गोरें अंग बाहीया : डवरीया चंदनें : श्रीचक्रधरा झणें : दीठी होए : ॥ ४ ॥
बापु म्हणे कीं भाइया : माझेया साजणी : गोत तो साजणी : चाही याके : ॥५॥
(पूर्वार्ध खं० २, पृ. ७१–७२)

स्वतः श्रीचक्रधरांनीं धनाश्री रागांत गाइलेली एक चौपदी उत्त० ली० ३२१ मध्यें दिलेली आहे. तिच्यांतील आशय पातंजलयोगांतला असून तो नाथसंप्रदायांतून आलेला दिसतो. त्यांत गोरक्षनाथांचा उल्लेख असून अखेर 'अलख निरंजन' हा शब्दप्रयोग येतो. मूलबंध, 'वोडियाणा' बंध, पंचप्राण, उन्मनी स्थिति, चंद्रमंडळ इत्यादि योगांतील पारिभाषिक संज्ञा आल्या आहेत. यांतील मराठी भाषेंत मध्येंच हिंदीची छटा येते. 'मूलस्थानीं भीड ब्रंधो हो जोइ...' किंवा 'अलख नीरंजनीं लोकर हो...इ०

श्रीचक्रधरांचीं सूक्तें आणि त्यांनीं दिलेले दृष्टान्त यांमधील भाषेंत खूप फरक जाणवतो. दृष्टान्तातील भाषा नेहमींची व्यावहारिक अशी देशी–गद्यबोलीं वाटते; तीत संस्कृत शब्द अल्पसंख्येनेंच येतात; संस्कृत सामासिकशब्दतर बहुधा नाहींतच; याउलट सूत्ररचनेंत–म्हणजे आद्याक्षरांच्या साहाय्यानें तत्त्वज्ञान बंदिस्त स्वरूपांत देण्यासाठीं केलेल्या रचनेंत–संस्कृत शब्द, संस्कृत सामासिक शब्द–संस्कृत धर्तीची रचना मुख्यत्वें आढळते.

(१) क्वचित् **संस्कृत सूत्रेंही** येऊन जातात. उदा० 'चातुवर्ण्यं चरेद्धैक्ष्यम्!' किंवा 'समर्थो धर्ममाचरेत्'!

(२) **संस्कृतप्राय रचना**—स्वदेश संबंधु त्याज्य ॥ अटन तें निरूद्देशें करावें ॥ क्रियेसि अनुतापु पुरश्चरण ॥ सामान्य स्त्री-सदनस्थिता पासौनि संदेहच्युटि करावी ॥ इ०.....

(३) **संस्कृत-मराठी सधारण समप्रमाण**—उदा०–जीतेनि मृताचां धर्मीं वर्तावें ॥ परस्परें मथन कीजे मग नूतन होए ॥ अल्पें अनिष्टें बहुत अनिष्ट परिहरे तरि परिहरिजे ॥

(४) **संस्कृत धातूंचीं मराठी क्रियापदरूपें**.....जन्म **क्षेपावें** ॥ धर्मीं **वर्तावे** ।.....परमेश्वरू **आहांसिति** ॥

(५) **संस्कृत विशेषणें, कृदन्तें** इ०.....
अभोक्त्या म्हातारीचेया परी असावें ॥
अल्पें अनिष्टें ॥ तो **सारस्वत** काळु ॥ एथीची सेवा ते भूतां **अविरोधें** करावी कीं गा' ॥.....मनोधर्मु **परित्यजौनि**...रिगावें ॥

'स्त्री भणिजे मत्तद्रव्याचा रावो गा : ' 'कोमळ ज्ञानीं विखो विघ्नः;' 'भिक्षा म्हणिजे पारधि गाः' कधीं कधीं परंपरित रूपकही येतें! " अहंतेचें मूळ सकंदी उपडावें नाएका: एन्हवी अंकुर निगतिः मग शांतीचें रोप लावावें:. पुष्कळदां रूपकातिशयोक्तीही येते. 'गांवाचां कडिसरां खांड देउळी एकी पाहिजेः तेथ **श्वानकुंडली** घालीजेः' किंवा 'हाडांची **रांगवळीं** करावी नाएका : ' किंवा 'मुक्तीची चाड आणि तेवीची **खुंटदावें** सांभाळणेः' श्रीचक्रधरांची वाणी ही कसलेली अस्सल, वाक्प्रचारसमृद्ध जिवंत वाणी आहे. ते बोलतात म्हणजे साक्षात् चित्रच उभें करतात. 'मुक्तीची चाड तेणें मुंगिये वीरू न चिंतावें॥,' 'पोरु जीवु आपुलें मात्रागमन न देखे ' : परि पुढीलाचें वेश्यागमन देखे॥;' 'पोळलेया सुनेयांचेया परी असावे॥' 'खरूज खाजवीना तो विरक्त'॥ 'ओठांतरा निगालें तें देशांतरां जाए;' 'दोहीं ओठां टाळें घालावे.'...इ० इ०...'

यामुळें श्रीचक्रधरांच्या भाषेला एक प्रकारचें दार्ढ्य आहे; कस आहे. श्रीचक्रधरांच्या वाणींत संस्कृत शब्द नेमकेपणानें येतात, पण त्यानें मराठीचें मऱ्हाटपण झाकोळलें जात नाही. श्रीचक्रधरांची वाणी पाहातां 'यादवकालीन मराठी गद्य' वास्तवचित्रणाच्या बाबत 'प्रतिशोत्तर' उघडपणें ऐकवूं शकलें असतें, असें वाटतें.

श्रीचक्रधरांच्या तोंडून मधूनच संस्कृत, हिंदी, गुजराती अशीं वचनें किंवा उद्गार येतात; विशेषतः संस्कृत, 'स्वयं दास्यं तपस्विनाम्' 'स्वस्थे चित्ते बुद्धयः संभवन्ति,' इ० क्वचित् एखादाच नेटका संस्कृत निर्देशही मराठी वाक्यांत येऊन जातो. '**दासोऽहं** न पूरे की नाएका : ' (उत्त० ली० २६) 'स्वयंनामगोपन' नांवाची लीळा :-(पूर्वार्ध खं. १, पृ. ४९) सिन्नर येथें माहादेवो राण्याचा एक माणूस, एका मठामध्यें श्रीचक्रधर आहेत का त्याची विचारपूस करण्यासाठीं आला आणि त्यानें खुद्द श्रीचक्रधरांनाच विचारलें, " श्रीचांगदेवो राउळ : गोसावी : एथ असति कीं : " तेव्हां " सर्वज्ञें म्हणीतलें : मातिः मा इहां कोइ नथी :.....मातारी एकी छे : ते गावमां हें भिक्षामागन गैइ छे : " इ०.....आपली गुजराती मातृभाषा अशी गोपनकार्यासाठीं श्रीचक्रधरांना उपयोगी पडली. 'उत्तरार्धा 'मध्यें ली० ४११, ४१८, ४१९ मध्यें संवादांतून हिंदुस्थानीं भाषा येते. श्रीचक्रधरांनीं ह्या कथा सांगितल्या आहेत.

लीळाचरित्र या गद्यग्रंथांत कांहीं अपवादात्मक पदेंही येतात. पूर्वार्ध, खं. १., ली. १५ मध्यें कांहीं पदांचे प्रथमचरण दिले आहेत, पांच पदें गाइलीं अशी नोंद आहे. हीं पदें अभंगसदृश वाटतात—रचनादृष्ट्या आणि शब्दयोजनेच्या दृष्टीनेंही, दुपारीं कांडण करीत असतां महदाइसेनें गायिलेल्या ओव्या, उत्तरार्ध, ली. २७१ मध्यें येतात.

गोमतीए तीरीं : नीळेया गूढरा : राजेया गुजरा : कृष्णराया : ॥ १ ॥
नीळा गुढरू : राजा गुजरू : माणीकी मंडपीं : श्रीचक्रधरू : ॥ २ ॥
गोमटें मांजीटें : आरव कुंडीचें : राजेया डोंडीचें : चक्रधरा : ॥ ३ ॥
गोरें अंग बाहीया : डवरीया चंदनें : श्रीचक्रधरा झणें : दीठी होए : ॥ ४ ॥
बापु म्हणे कीं भाइया : माझेया साजणी : गोत तो साजणी : चाही याके : ॥५॥
(पूर्वार्ध खं० २, पृ. ७१–७२)

स्वतः श्रीचक्रधरांनीं धनाश्री रागांत गाइलेली एक चौपदी उत्त० ली० ३२१ मध्यें दिलेली आहे. तिच्यांतील आशय पातंजलयोगांतला असून तो नाथसंप्रदायांतून आलेला दिसतो. त्यांत गोरक्षनाथांचा उल्लेख असून अखेर 'अलख निरंजन' हा शब्दप्रयोग येतो. मूलबंध, 'वोडियाणा' बंध, पंचप्राण, उन्मनी स्थिति, चंद्रमंडळ इत्यादि योगांतील पारिभाषिक संज्ञा आल्या आहेत. यांतील मराठी भाषेंत मध्येंच हिंदीची छटा येते. 'मूलस्थानीं भीड ब्रंधो हो जोइ...' किंवा 'अलख नीरंजनीं लोकर हो...इ०

श्रीचक्रधरांचीं सूक्तें आणि त्यांनीं दिलेले दृष्टान्त यांमधील भाषेंत खूप फरक जाणवतो. दृष्टान्तातील भाषा नेहमींची व्यावहारिक अशी देशी–ग्राम्यबोलीं वाटते; तीत संस्कृत शब्द अल्पसंख्येनेंच येतात; संस्कृत सामासिकशब्दतर बहुधा नाहींतच; याउलट सूत्ररचनेंत–म्हणजे आद्याक्षरांच्या साहाय्यानें तत्त्वज्ञान बंदिस्त स्वरूपांत देण्यासाठीं केलेल्या रचनेंत–संस्कृत शब्द, संस्कृत सामासिक शब्द–संस्कृत धर्तीची रचना मुख्यत्वें आढळते.

(१) क्वचित् **संस्कृत सूत्रेंही** येऊन जातात. उदा० 'चातुवर्ण्यं चरेद्धैर्य्यम् !' किंवा 'समर्थो धर्ममाचरेत्' !

(२) **संस्कृतप्राय रचना**—स्वदेश संबंधु त्याज्य ॥ अटन तें निरूद्देशें करावें ॥ क्रियेसि अनुतापु पुरश्चरण ॥ सामान्य स्त्री-सदनस्थिता पासौनि संदेहत्रुटि करावी ॥ इ०.....

(३) **संस्कृत-मराठी सधारण समप्रमाण**—उदा०–जीतेनि मृताचां धर्मीं वर्तावें ॥ परस्परें मथन कीजे मग नूतन होए ॥ अल्पें अनिष्टें बहुत अनिष्ट परिहरे तरि परिहरिजे ॥

(४) **संस्कृत धातूंचीं मराठी क्रियापदरूपें**.....जन्म क्षेपावें ॥ धर्मीं **वर्तावे** ।.....परमेश्वरू **आहांसिति** ॥

(५) **संस्कृत विशेषणें, कृदन्तें इ०.....**
अभोक्त्या म्हातारीचेया परी असावें ॥
अल्पें अनिष्टें ॥ तो **सारस्वत** काळु ॥ एथीची सेवा ते भूतां **अविरोधें** करावी कीं गा' ॥.....मनोधर्मु **परित्यजौनि**...रिगावें ॥

(६) विशेष संस्कृत सामासिक शब्द—

श्रमनिवृत्ति एषणात्रय, क्षुधानिवृत्ति, घृणात्याग, शीतोष्णपरिहार, कर्मजड, विधिकिंकर, प्रियवक्ता इ०.....

तद्धित–तत्सम शब्दांचे समासही यांत येतात. उदा०श्वानकुंडली, कर्मचांडाळ तसेंच साम्याभासानें 'देशांतर' प्रमाणें 'ओठांतर' हा सामासिक शब्दही होऊन जातो.

प्रत्यक्ष दृष्टान्तामध्यें ही संस्कृतप्रचुरता नाही. सूत्रवाङ्मयामध्येंही कांहीं सूत्रें खास मराठी रूपच घेणारीं आहेत. उदा० कराल तरी होइल कीं ॥ (रामदासांच्या 'केल्याने होत आहे रे 'ची येथें आठवण होते.) पोळलेल्या सुनेयाचेवा परी असावें ॥ मधून मधून देशी शब्दांचे समास झाल्याचेंही दिसून येतें. उदा०— झाडातळीं, कोपरदुटी, गोंडीबुंथी.....

लीळाचरित्रांतील एकूण शब्दसंपत्तीचा, त्याच्या स्वरूपाचा आणि विशेषांचा येथें वास्तविकपणें विचार व्हावयास हवा आहे. पण त्याचा विचार याआधीं थोड्याफार तपशिलानें झालेला असल्यानें येथें केलेला नाही. येथें फक्त वाङ्मयीन दृष्ट्या लीळाचरित्रांमधील शब्दयोजनेंतील औचित्यविचार कसा आहे तें दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न केला आहे. लीळाचरित्र, त्यांतील दृष्टान्त आणि सूत्रें यांतील शब्दांचा शब्दसिद्धीच्या दृष्टीनें विचार, तसेंच वाक्प्रचार आणि कांहीं वाक्यरचनाविशेष यांचें संकलन आणि चिकित्सा, महानुभावीय गद्यग्रंथांच्या संपादित पाठ्यपुस्तकांच्या प्रस्तावनांमधून जी करण्यांत आली आहे, ती येथें समाविष्ट करून घेतल्यास हा विचार बराचसा पुरा होईल. (अ) कूपदाटी, सांदीसवडी यांसारखे सामाजिक शब्द; गोरागोमटा, धरेधाकुटा यांसारखें जोड शब्द; पंहुडणे–उपहुडणे, वोटवटें–गोमटें यासारखे विरोधी शब्द; खडेखूबटे, दांडी–डोळी यासारखे द्विरुक्तिवाचक शब्द; जाणिजे–नेणिजे, घे–नेघे यांसारखे अकरण वाचक शब्द; कटंकटीयेमान, तीटत तीटत यांसारखे नादानुकारी शब्द, तसेंच (आ) समाजाच्या ज्या कोणत्या थरांतून हे शब्द आले, त्यांतून ध्वनित होणारें सामाजिक मन, किंवा प्रादेशिक वातावरण, खाद्यपदार्थ, वनस्पति–फळें इत्यादींचीं नांवें, वाक्प्रचार आणि म्हणी यांतून दिसून येणाऱ्या तत्कालीन कांहीं जाणिवा आणि चालीरीती, यांचा अभ्यास मूळ 'लीळां'च्या अर्थांच्या आकलनाच्या दृष्टीनें तर आवश्यक आहेच, पण त्यांतील 'रस' प्रत्यक्षपणें आस्वादण्याच्या दृष्टीनें तर केवळ अपरिहार्य आहे.*

---

* 'दृष्टान्तपाठ'–सं० डॉ. शं. गो. तुळपुळे, कुमुदिनी घारपुरे, (प्रस्तावना) व लीळाचरित्र–एकांक सं०–ह. ना. नेने, (प्रस्तावना) यांमध्यें याचा विचार झालेला आहे.

गुजराती कवींचीं मराठी पद्यें

संग्राहक : डॉ. ना. ग. जोशी, बडोदें

प्रास्ताविक :

गुजरातमध्यें इ. स. १४०० च्या सुमारास लिहिल्या गेलेल्या, जैन साधु नयचंद्राच्या "रंभामंजरी" या सट्टक-रूपकांत आलेलें मराठी पद्य,[1] "जरि पेखिला०" इत्यादि, हें गुजरात प्रांतीं गुजराती कवीनें लिहिलेलें पहिलें उपलब्ध पद्य होय. त्यानंतर इ. स. १६ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कामराजु नामक जैन कवीनें इतर अनेक गुजराती-राजस्थानी 'फागु' काव्याबरोबरच दोन मराठी फागुकाव्यें लिहिलीं. पुढें इ. स. १८०० च्या आसपास कविश्रेष्ठ दयाराम यांनीं शेंकडों गुजराती भक्तिगीतांबरोबरच चार मराठी गीतेंही रचलीं. इ. स. च्या १९ व्या शतकांत श्री. कृष्णराम महाराज यांनीं अनेक गुजराती गीतांप्रमाणेंच तीन मराठी गीतें लिहिलीं; तसेंच त्यांचेच समकालीन श्री. नारायण महाराज यांनीं एक पद मराठींत लिहिलें; हीं चारी पदें कृष्णराम महाराजांच्या गीतसंग्रहांत ('महा-काव्य'-भाग २) समाविष्ट केलेलीं आहेत.

गुजरातेंत राहिलेल्या मराठीभाषी लोकांपैकीं सद्गत श्री. बापूमहाराज गायकवाड यांच्या (गेल्या दीड शतकापूर्वीच्या) मराठी रचना विशेष प्रसिद्ध आहेत

यापुढें फक्त कामराजु व दयाराम यांचीं मराठी गीतें समग्र दिलीं आहेत.

(अ) कामराजुरचित मराठी 'फागु'-काव्यें

इ. स. च्या १६ व्या शतकांत राजस्थानी-गुजरातींत कामराजु नांवाच्या जैन-पंथीय कवीनें मराठींत "सुदर्शनपुराण," "चैतन्य फाग" व "धर्म फागु" हीं काव्यें लिहिलीं. हा कामराजु मेघराज नामक प्रसिद्ध जैन कवीचा गुरुबंधु. "यशोधर चरित्र" नांवाचा ग्रंथ या मेघराजानें रचला असून "गिरनारयात्रा" नामक काव्यांतील एक पद मराठींत असल्याचें श्री. एस. जे किल्लेदार यांनीं "आचार्य भिक्षुस्मृतिग्रंथा"तील आपल्या 'मराठी जैनसाहित्य' नांवाच्या लेखांत म्हटलें आहे. तेथेंच त्यांनीं कामराजुच्या पहिल्या दोन काव्यांचाही उल्लेख केलेला आहे. श्री. अगरचंद नाहटा या हिंदीच्या प्रसिद्ध संशोधक विद्वानांनीं बडोद्याच्या प्राच्यविद्या-मंदिरातर्फे प्रसिद्ध

---

१. पाहा :—के. वा. आपटे, "रंभामंजरीतील मराठी गद्य", **म. सं. पत्रिका**, व. ६ अं. ३, पृ. १४०-१४२.

२. कोकणांत 'फाक' हा शब्द शिमग्यांतील उखाणेवजा अश्लील उक्तींचा वाचक म्हणून रूढ आहे.

होणाऱ्या "स्वाध्याय" त्रैमासिकांत (पुस्तक २, अंक ४, ऑगस्ट १९६५) वरील मथळ्याचा लेख लिहून हीं दोन्ही 'फागु काव्यें' संपूर्ण दिलीं आहेत. त्यांनीं "आमेर शास्त्रभंडारा" मधील (गुटका नं. ५० मधील) हस्तलिखितापासून तीं नक्कल करवून आणविलीं. जुन्या गुजराती–राजस्थानींत 'फागू' काव्यांचा प्रचार जैनसंप्रदायाच्या अनुषंगानें फार होता. मराठींत हा काव्यप्रकार रूढ नव्हता व नाहीं.[२] मुळांत फाल्गुन-विषयक ऋतुवर्णनाचा हा प्रकार पुढें स्वतंत्र काव्यप्रकार झाला.

चैतन्य फागु

त्रिलोकी भवनि राघो होई उदासु।
लक्ष उचरासी झाडे करिता रहवासु॥
करम पारधि तुझा मांडिला पासु।
क्रोध मांजरा तुझा करैल नासु॥ ध्रुपद॥

आतमा चैतन्य राघो रामचंद्रा।
अउठ हाथ कुडी तुझा पांजरा॥
सप्त धात मेलौनी केला साजरा।
कर्म सूत्र धारि आपुण दृष्टिगोचरा॥ २॥

एकसें एकतालीस प्रकृत पारधि।
मायाजाल घालूनी बांधला बुधि॥
आझुनि का न धरसी आपुली सुधि।
मनुक्ष जनमी राघवा पडसील बंधि॥ ३॥

विख योवनि नको जानुं राघवा।
कामिणी नयण वाणे तेंवी(वीं)धवा॥
प्रो(प्री)ती सेवली ऋणि करी राहावा।
पडसी मोहपंजरि मग कवणे काढावा॥ ४॥

नव नाडि सोला सांधि बाहतरि कोठे।
तुझिया पांजरि राघो नव दारोटे(ठे)॥
अष्ट दल कमल सोडौनी कोठे।
भंभावे लाझणी (लाझुनी) जाउ दाही वाटे॥ ५॥

प्रसन रसन घ्राण चक्षु श्रुती।
पांचे ठाइं जाती राघो तुझ (झा) मती॥
सोडै याचा स (सं) गु नको पडु भरांति।
मन वचन काया राखै निरन्ती॥ ६॥

धर्मे वीरी राखें राघो करै पांथरा।
त्रयोदश व्रत फलें चरैं पांचारा॥
राग द्वेष तया झणी जाऊ डुंगरा।
मान अहंकार तुते करती चुकारा॥ ७॥

तुझीय पंजरि राघो त्रिह्मा बार।
झडप लावीजे खेमा पांचारा॥
क्रोध वैरी तुझ एइल मांजरा।
खेमा-खडगे त्याचा संघा(हा)रू करा॥ ८॥

पंजरू घडितु भरले नव मास।
सूत्र धरिता तिनसैसाठ दिवस॥
अस्थि चर्म त्वचा रुधिर मांस।
मल मूत्र वीरपि (विरंची?) रचील रहीवास॥ ९॥

काला गोरा नीला पीला नहे सांवला।
ब्रह्मादिका नकले वरणां वेगला॥
पाहाता पाहाल तरी न दीसे डोला।
अनाथ (हत?) ध्वनि राघो बोले सकला॥ १०॥

आचार पवित्र राघो आहार पाणी।
सकले विकले देती तुज-लागूनी॥
आगमु निर्गमु श्रता बोली-जे वाणी।
पांजरा-भीतरि राही आपुले ध्यानीं॥ ११॥

त्रेपन क्रीया—राघो करीजे।
परब सोला (ळा) रे भावनारंगे रंगीजे॥
जे मुख-दरिसण चारित्र जी-पदम सुरेख।
सिद्धांत सुमती कंठीं राखली रेख॥ १२॥

सप्त तत्त्व पढी राखो रात्रि दिन।
पढता गुणता राघो जाला सुजाण॥
स्वर्ग-लोकैहुन तुज एईल विमान।
प्रदीपी भवनि राही सुखे-निधान॥ १३॥

आत्मा चैतन्य राघो गाथ (ठ?) ला परी
अनंत गुणे राघो तुझी तु सरी॥
जानता नेनता राघो कवीला परी।
'कामराजु' म्हणे राखो वेगें ऊधारी॥ १४॥

इति चैतन्य फागु समाप्त।

धर्म फाग

पहिलें नमन देवा जिनेश्वरा, नमन सार-जे गणधरा ॥ गा जी ॥
नमन करिनजी निग्रंथ गुरा, कवित प्रसन होइजो दातारा ॥ १ ॥
गाइन धरमाचा विस्तारु, धर्म तरीजे संवसारू ॥ गा जी ॥
धरमे पाविजे मुगति-दुवारू धर्म करिति तिहि लोकी उधा(द्धा)रू ॥२॥
धरमें मनुक्ष गति लाहिजे, उतिम कुल पावीजे ॥ गा जी ॥
धरमें रूपवंत होइजे, धरमें आउक्ष संपूर्ण भोगीजे ॥ ३ ॥
धरमें होईजे विद्यावंतु ग्यानी, आगसि शास्त्र-पुराणी ॥ गा जी ॥
धरमे होई जगत्र मोहनी, धरमे कीरति विस्तरे मेदिनी ॥ ४ ॥
धरमे पाविजे बरवी नारी, गुणवंत सविचारू ॥ गा जी ॥
धरमे पुत्र-कन्या बहुयरि, लक्षमी अलंकृत धरू ॥ ५ ॥
धरमे धवल (म) हल सात खणा, धरमे बत्तीस लक्षण ॥ गा जी ॥
धरमे पालकी सुखासनें, जैसे देवाची विमाने ॥ ६ ॥
धरमे राज्यपद पावीजे, चक्रवर्ति होईजे ॥ गा जी ॥
धरमे सर्व सुख भोगीजे, गज तुरंगम रथ लाहीजे ॥ ७ ॥
धरमे स्वर्गलोका जाईजे, इंद्रपद पाविजे ॥ गा जी ॥
धरमे अभीष्ट फल पाविजे, अनुक्रमे सुगति साधीजे ॥ ८ ॥
धरमु माताजी धरमु पिता, धरमु सहोदर बंधु ॥ गा जी ॥
धरमु तिहीं लोकीं तारता, धरमु-विण जीव अंधु ॥ ९ ॥
अैसे जाणुनी जीवा धरमु करी, सुखी होईजे संवसारी ॥ गा जी ॥
धरमु सोई-रा य(ध?)रूत्रीचा, जिवा धरमु हितकारी ॥ १० ॥
संग्रामि जुझता धरमु रक्षण, पाणि बुडता परोहण ॥ गां जी ॥
अगनि जलता धरमु जीवन, रोगु-दालिद्र-हरण ॥ ११ ॥
धरमु धरमु त्रणि तिलोका, लोका नाही विवेकु ॥ गा जी ॥
हींसा-कर्म करती लोक, जीवदया-विण धरमु फोक ॥ १२ ॥
जीवदया-धरमु पालती, हिंसा-पाप हालती ॥ गा जी ॥
कामुराजु म्हणे धरमु करीति, तो जीव पावे मुगति ॥ १३ ॥

(ब) कविश्रेष्ठ दयारामकृत मराठी भक्तिगीतें

गुजरातींतील सुप्रसिद्ध व अत्यंत लोकप्रिय वैष्णव कवि दयाराम इ. स. १८ व्या शतकाच्या शेवटीं व १९ व्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेले. मराठी कीर्तनकार व

लावणीकार त्याकाळीं गुजरातेंत गायकवाड दरबारीं नेहमीं येत. बहुधा त्यांच्या तोंडून मराठींतील कृष्ण-गोपीविषयक रचना ऐकून कवि दयारामांनीं त्यांसारख्या चार मराठी रचना केल्याचें माहीत आहे. त्या यापुढें दिल्या आहेत. कवि दयारामांच्या काव्य-संग्रहांत त्या छापलेल्या आहेत.

(१) पद—राग खमायची, गत ठुमरी

श्री गोपीजन-वल्लभारे हे श्री वल्लभदेवा
विठ्ठल मायबापा माला करुं द्यावी निजसेवा ॥ १ ॥

अहो, देवा तुला अखंड सम्रण, अचलित सतसंग
प्रेमभक्ति सांगावे अनपायनी श्रीरंग ॥ २ ॥

दासत्व अनन्यभाव निजाश्रय परिपूर्ण
प्रपंच-विस्मरण, करी दुःसंग चूर्ण ॥ ३ ॥

देवा एवडी कृपा करावी श्रीहरि कृपावंत
पतितपावना रे आईक भगवंत ॥ ४ ॥

सकळ वेदाने सांगितला सर्वोत्कर्ष गोविंद
तैसीच थोर भक्ति माला त्यासाठी छंद ॥ ५ ॥

महादुस्तर भवरोग हा दुःखाचा उदधि
हरावया समर्थ त्यासी भक्ति-ओखधि ॥ ६ ॥

वशीभूत तुला करितो, तुझी भक्ति हे देवा
ऐसी सम्रथ कळुन घेतली महादेवा ॥ ७ ॥

शिव धरितो निरंतर तुझे रूपाचा (चें) ध्यान
शेष करितो सदा तुझे कीर्तीचा (चें) गान ॥ ८ ॥

पद्मा पदसेवन केली वृंदानिवास
चरणं शरण तुझे, आले कोट्यावधि दास ॥ ९ ॥

देव ब्रह्मा सनकादिक नारद कपिल सुध्यानी
प्रल्हाद वेदव्यास शुक प्रेमसिंधु-पानी ॥ १० ॥

देवा पराशर पुंडरिक विभीषण अंबरीष
शौनक भीष्म प्रथु, भजीतो (ती) जगदीश ॥ ११ ॥

धर्म अर्जुन रुक्मांगद वाल्मिक ध्रुव वशिष्ट
प्रथा पांडव उद्धव आदि केले कृष्ण इष्ट ॥ १२ ॥

सर्वांचे हृदयाहु (तु) न तुमी केली शुभ भक्ति
तेव्हांच तुजवर त्याला झाली आसक्ति ॥ १३ ॥

तैसे माझे हृदयाहुन अविद्या काढावे
तिथे आपुण असावे, हेंच संपत्ति द्यावे ॥ १४ ॥

तुं करसिल तरी नव्हे काय, व्रजेश, निर्मिले ब्रह्मांड
अनंतकोटी निमेष तेव्हा झाले प्रचंड ॥ १५ ॥

दक्ष महासम्रथासी आम्ही काय सीकवावे
बाळ मी तुं माउली, दोष क्षमा करावे ॥ १६ ॥

देवा नको पाहुं माझी करणी, पाहा बर्द (बिरद) तो तुझा
अनायास आत्मसात मला करु (रा) विणपूजा ॥ १७ ॥

हेच प्रार्थना राधिकेश, पूर्ण करा व्रजराजा
एकदा सांग माला, 'दया! तूं दास माझा' ॥ १८ ॥

(२) पद–राग लावणी, गत चालती

वृषभानु सुता राधिका रहितबाधिका
कृष्णचंद्राची प्राणवल्लभा चरणकमळीं—
चरणकमळीं माझी मति लुभा ॥ ध्रु० ॥

परब्रह्म अक्षरातीत सुब्रह्म स्तवितें
होत जिथे मन–वाणी पांगुळे,
गति जाई न कदा कोणि कळे,
ब्रह्मांड कोटि अधिपति नित्य महामति
त्रिगुणपर काळ अजा थरथरी
स्वयंभु सदानंद श्रीहरि;
सर्वेश अनुप सर्वात्मा अपरिमित महात्मा
विधि–शिव जाचे पद वंदिते
सहस्रवदना वाणी गुण गाते
अैसे प्रभु श्रीभूषण, विजितदूषण
म्हणत श्रीमुख राधे मम शोभा—चरणकमळीं,
चरणकमळीं माझी मति लुभा ॥ १ ॥

चंद्रभागा चंपकलता ललित अमृता
चंद्रिका चपला चतुरा रमा,
सुरभा शुभानना सुखधामा,
करुनी प्रभु शरणागत आपुल्या

अविद्यारूपी काढावी बला
दासानुदास दयाराम युगल (ला) चा गुलाम,
म्हणे यश दार (रा-) पुढे निज उभा-चरणकमळीं,
चरणकमळीं माझी मति लुभा ॥ ४ ॥

(३) पद-(मरेठीमां)

पाहावें भाग्य नरसिंह मेहेताचें, वल्लभदेवाचें ॥ ध्रु० ॥
जीर्णागडवासी विप्रजाती, नागराची ज्ञाती;
भेटीले भगवंत अद्भुत भांति, अखिल विश्व ख्याती;
रास पाहीला प्रत्यक्ष हरिचा, घेउनी दीपिकाबल प्रेमाचें ॥१॥
एकदा कोणी आले तीर्थवासी, पुसलें विप्रासी,
येथे कोणी हुंडी करितो खासी, त्याणी केली हांसी;
जा तुम्ही लौकर भक्तराज (जा) कडे, मोठे कोटिक नगराचे॥२॥
आले तो (ते) गोष्टी ऐसी आईकुनी मंदिर पुसून,
केलें हरिभजन हरिचें दर्शन, बसले समजून;
न कळलें कापट्य ब्राह्मणाचें; महा दुष्ट शत्रु संताचे ॥ ३ ॥
मेहेताजिस कळली समस्त गोष्ट, बोलले ते मिष्ट;
आलेत तुम्ही आमुचें भाग्य श्रेष्ठ, झाहालों संतुष्ट;
नका करुं चिंता आम्ही हुंडि लिहुन देतों, वर सामलशाचे ॥४॥
मोजुनि घेतले रुपये सतसात, अरपिले जगतात;
हुंडी त्यांना लिहुन दिली क्षणांत चालले ते प्रातः;
येउन द्वारकीं देवा पाहिले, गोमतिमंजन मन क्रमवाचे ॥ ५ ॥
पुसलें मग नाव सामलरहाचें मी तो हुंडी करांचा
सामल कोणि नाही सर्व नग्रांत, सर्व ह्मणे वाचा;
ऐकुनि बचन निराश झाले, विकल बोलले, पत्र ठगाचें ॥६॥
वाणी होउनी परीब्रह्म आले, चौघांला मिळाले;
पुसलें, 'तुम्ही जुनागडाहुनी आली?' श्रीकृष्ण म्हणाले,
'हुंडि द्यावी पैके घ्यावे आम्ही सामळ गुमास्ते
नरसइयाचे ॥ ७ ॥
दिले रुपये सात शंभर,
त्यावर झाले मग अदृश्य विश्वंभर,
भक्तां सुखकर, यात्री आपुले दाम पाहिले, न कळलें चरित्र
चतुर्भुजाचें ॥ ८ ॥

पुत्राचें लग्न कृष्णें करविलें, मौसाळा दिला;
वचनासाठीं पाउस पाठविला, पितुश्राद्ध केला;
दिली दक्षिणा मोहिर सोन्याची, विप्र तोषले यश भक्ताचे ॥ ९ ॥
पुष्पांची दिधली माळ अविनाशी, पाहातां संन्यासी;
पाणी पाजिलें निशा वृजवासी, होऊनि स्त्री खासी;
मंडलीक आदि सारे हरविलें, केलें सत्य वाक्य दासाचें ॥ १० ॥
मेहेताजीचे निंदक नागर फार, केला अपकार;
तेव्हा ते सगळे झाहले माहार, पाहा चमत्कार;
झक मारुनि जोडुनि आले कर, पडले पायीं निंदक हो त्यांचे ॥११॥
अैसें काट्यावधि केलें काम, मेहेताचें धाम;
झाले वशीभूत सुंदर श्याम, म्हणे जन दयाराम,
काय सांगूं भक्ति नरसिंहाची, सखिरूप प्रिय श्रीकृष्णाचें ॥ १२ ॥

\+ \+ \+

मधुवीणा मणिकुंडला मेना मंगळा,
माधवी मालति मन-आतुरी
प्रगल्भा प्रिया प्रेममंजरी,
हंसा हरषा भगवती स्वरुपारति
केतकी कमळा कृष्णावती,
गोपिका रत्नरुपा सती,
इत्यादिक व्रजसुंदरी, वश केले हरि
हेतु हा सकळ कामिनी आभा-चरणकमळीं
चरणकमळीं माझी मति लुभा ॥ २ ॥
महारुपवती धन्यका नागकन्यका
उर्वशी रंभा तिलोत्तमा
साम्य कोणि ना सांगे आगमा
दमयन्ती अरुन्धति तारा रोहिणी सुदारा
ऐसी शुधबुध सुंदर बायका
ऐसी अधिकी (क) सांगु आयका,
शचि सावित्री सरस्वती उमा रेवती
रति द्रौपदी रमादिका बाळा
कीरतिजा सकळा श्रीवर्या, अतुल सुंदऱ्या
म्हणुं मी काय आता तिची प्रभा-चरणकमळीं
चरणकमळीं माझी मति लुभा ॥ ३ ॥

श्रीकृष्ण प्रभावती सुता, सकृत वस्तुतां
राधिकाजी असुं अविनाशीचे
युग्मरूप लीलाळासाटी भक्तसुं पुरण गोड वाटी,
माला द्यावी प्रेम दृढ भक्ति व्यसन आसक्ति

(४) प्रबंध

श्री रामकृष्ण गोविंदे, म्हणा मिळोनी वैष्णववृंदे ॥ ध्रु० ॥
केशव करुणालय सुखकंदे,
नगधर नटवर नंदननंदे,
माधव मुरारि परमानंदे,
वंसीधर वृंदावन चंद्रे,
श्री राधिकारमण गोपिकेश गुणनिधि गोकुलेश
गोपेंद्र गदाधर गरुडध्वज गोपार गुणाकर।
गोवल्लभ गोवरधनवल्लभ नंदलाल नागर नटनायक
ललित त्रिभंगी मनोहर मोहन,
मोदाकर मदनाभिसम अखिलेश्वर आनंदकंदे ॥ १ ॥
प्रभु परमेश्वर पूर्णानंदे,
पद्माप्रियतम पदारविंदे,
संसृती मात्र हरित दुखद्वंदे,
अज अक्षरातीत जग वंदे,
त्रिगुणातीत नित्य सर्वात्म सर्वज्ञ मग्न रतिरसज्ञ,
रसमय पूरणकाम श्रे (श्री) धामनाम रुचि आत्माराम,
अच्युत अद्वित अकलित अपार,
सिद्धांतसार परब्रह्म परात्पर,
पद्मनाभ परमहंस पुरुषोत्तम श्री बालमुकुंदे ॥ २ ॥
शेष महेष रटति आनंदे,
सनक सनंदन सन स(त्सु)नंदे,
सतत प्रशंस सकलश्रुतिछंदे,
त्यासी सोडिला, ते मत्तिमंदे,
हरिनामाम (मो) घां सगळीं तीर्थें नेम वृ (व्र) त धर्म
कर्मतपजाप यज्ञ अष्टांग,
योग अध्ययन ब्रह्मशुचिदान ज्ञान विज्ञान ध्यान,
ऐकिलें अवघें निगम (मि) चें,

वदनीं हा वर, दुसरा समुळ पाप संताप मेटाया हरिभेटीचा
उपाय नाही,
भाव कुभावे श्रीकृष्ण किरतनीं वांये जात नाही अतुलित प्रताप,
दयाराम म्हणे, त्यासाठी मज मनासि पडिला–
कृष्णनामाच्या छंदे, म्हणा मिळोनि वैष्णववृंदे
श्रीराम कृष्ण गोविंदे ॥ ३ ॥

नामा पाठकांचा अश्वमेध

ले. ज. शां. देशपांडे

ज्ञानेश्वर ते एकनाथपर्यंतच्या सुमारें तीनशें वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रांत धामधूम चालू असल्यानें वाङ्मयनिर्मिति फारशी झाली नाहीं. जी थोडीफार झाली तीपैकीं अजून बरीचशी छापलेली नाहीं. भैरवी टीकेसारखा रसाळ ग्रंथ पडून आहे. या कालखंडांत होऊन गेलेल्या कवींपैकीं पंधराव्या शतकांतले नामा पाठक हे एक कवि होत. त्यांचें अश्वमेधांतर्गत, चंद्रहास आख्यान 'प्राचीन मराठी कविता खंड १ ला' यांत छापलें असून त्यांचीं 'स्फुट काव्यें' दुसऱ्या खंडांत छापलीं आहेत. या दोन खंडामध्यें कवीबद्दल उपलब्ध माहितीहि दिलेली आहे. त्यांच्या उपलब्ध स्फुट काव्यापैकीं कांहीं काव्यें हीं त्यांच्या रामायण व भारतावरील विस्तृत ग्रंथांचे भाग असावेत असें दिसतें. गेल्या शतकांत पुणें जिल्ह्यातील केंदूर येथील पाठकांच्या वाड्याला आग लागून हस्तलिखितें नष्ट झालीं. त्यामुळें अन्य प्रतींवर विसंबणें आतां भाग पडत आहे.

अश्वमेधाचें ऋण घेणारे प्राचीन कवि

श्रीधर, रामसुतात्मज विश्वनाथ यांच्यासमोर चंद्रहासआख्यान होतें हें प्राचीन मराठी कविता खंड १ ला या ग्रंथांत दाखवून दिलें आहे. त्यांचें द्रौपदीवस्त्रहरणावरचें काव्य मुक्तेश्वरासमोर असावें ही गोष्ट द्वितीय खंडांतील विवेचनावरून दिसून येईल. याशिवाय इ. स. १६२३ मध्यें समाप्त झालेल्या कथाकल्पतरुकारांच्या समोर हा ग्रंथ होता व त्याचा त्यांनीं भरपूर उपयोग केला हें खालील ओव्यांवरून स्पष्ट होण्यासारखें आहे :—

"पूर्वील मराठी अश्वमेध। नामा पाठकाचा प्रबंध। तोही मेळविला विविध। प्रयत्न करोनी ॥ १९ ॥ शैशिळेपलीकडे विशेष।

असे पारमाचल देश । तेथ सोमवंशी नृपेश । कामण्णभट्ट नामे ॥ २० ॥ तयाचीये घरी पुस्तक । संस्कृत प्राचीन होते एक । परि ते लिहिलेसे देख । तेलंगिये लिपीचे ॥ २१ ॥ नामा पाठक तेथ जाउनी । तें पंडितापें वाचवुनी । संस्कृत अर्थ जाणोनी मनी । केलें प्राकृत ॥ २२ ॥ तेही येथे प्रसंग जाण । कितीयेक घेतले मेळवून । मग कथान्वय साधोन । संग्रहिला ग्रंथ ॥ २३ ॥ " (स्तबक १४।१)

नामा पाठकांच्या उपलब्ध कृतींत विस्तृत ग्रंथ हा एवढाच. तो मधुकर कवीलाहि मिळवण्यास प्रयास पडले. या अश्वमेधाच्या अनेक फार भिन्न असलेल्या प्रती आढळतात. त्यांची माहिती पुढें दिली आहे. प्रतीपैकीं दक्षिणेकडील तंजावरप्रतीची कथाकल्पतरूशीं तुलना केल्यावर फार साम्यस्थळें आढळतात व मधुकरकवीसमोर प्रस्तुत दक्षिणप्रत होती असें निश्चयानें म्हणतां येतें. कांहीं साम्यस्थळें पाहा :—

अश्वमेध व कथाकल्पतरु यांची तुलना

कथाकल्पतरु	अश्वमेध–दक्षिणप्रत
(१) असो कवणे एके दिवशीं । सूर्य क्रमित आला गगनासी । तव यौवनाश्वाचे पौळीसी । अडखुळला रथ ॥ १४।२।३ ॥	(१) व्यास म्हणे कोण्हे एके दिवशी । सूर्य क्रमित होता गगनासी । तंव यौवनाश्वाच्या पौवळियासी । रथाचे चाक अडखळले ॥ १ । ४८ ॥
(२) असो हस्तनापुरबाह्यप्रदेशी । देवो आला परिवारेसी । रम्यस्थानी कुटुंबेसी । उतरले समस्त ॥ १४।२।२७ ॥	(२) हस्तिनापुरीचे प्रदेशी । समस्त आले दळभारेसी । मग विनविले कृष्णासी । येथेची वरवा रम्य ठाव ॥ ४ । १६ ॥
(३) साठी जाणविले वारुवासी ॥ १ । २ । ५८ ॥	(३) वारुवा साड जाणविला ॥ ४ । ५१ ॥
(४) तैं जाहला हाहाकार । म्हणती पडला वृकोदर । तंव कोपे उठोनी सारंगधर । रथीं आरुढला ॥ १४।२।७७ ॥	(४) तें वेळीं जाला हाहाकारु । म्हणती पडला वृकोदरु । तेथुनी उठीला सारंगधरु । महामारी पेटला ॥ ४ । ७९ ॥

(५) तिये अकस्मात देखिला वारु।
मग धावोनि धरिला शीघ्रु।
पतीजवळी वेगवत्तरु।
धेवोनी आली ॥ १४।१२।५४॥
शामकर्ण पिवळे पुंस
सुनील नेत्र कांती राजस ...
॥१४।१२।५५॥

(६) जेणे समुद्रेसी संग्राम केला।
अवघाचि शोष आदरिला...
॥१४।१३।८६॥

(७) येर शिष्य पळों लागले।
तेही पार्थें मदनें मारिले।
अवघे वाताहत जाहले।
नागविले नगर ॥१४।१४।११४॥

(८) जारे धरुनि आणा वहिला।
उसळते कढयीमाजी
घाला...॥१४।१५।९॥

(९) मग कृष्ण नीलध्वज।
अनुशल्यादि राजराज।
जेथ होता हंसध्वज।
पातले तेथे ॥१४।१५।१५०॥

(१०) तंव मणिपुर देखिलें पुढां।
रत्नें झळकती हुडाहुडां
॥१४।१६।४॥

(११) कृष्णें अमृतदृष्टी पाहिले
॥१४।१७।११७॥

(५) मदनमंजिरी त्याची राणी
तिणे वारुला देखिला नयनी
मग धरिला धावोनी।
पतीजवळी आणिला ॥ ५।४॥
कैसा पाहतसे वास।
शामकर्ण पिवळे पुंस।
सुनील नयन राजस...॥५।६॥

(६) अरे ज्यानें समुद्रासी संग्राम केला।
अवघा शोखु आरंभीला...
।३५।७०॥

(७) येर पळोनी गेले शिष्य।
ते दोघी मारिले निःशेष।
निपात केला अशेष।
भिक्षणनगर नागविले
॥९।१३२॥

(८) जारे कैसी धरुनी आणा।
कढयीमाजी घाला पै ॥६।४४॥

(९) कृष्ण अर्जुन नीलध्वजु।
अनुशैल्य यौवनाश्व
महाराजु।
जेथे होता हंसध्वजु।
तेथें गेले सकळिक ॥८।१७६॥

(१०) तों दिव्य नगर देखिलें पुढां।
रत्नें झळकती हुडाहुडां
॥१०।२॥

(११) मग अमृतदृष्टी अवलोकिले
॥२७।१९०॥

नामा पाठक व विष्णुदास नामा

अनेक ठिकाणीं नामा पाठक व विष्णुदास नामा यांच्या नांवांची गल्लत झालेली आढळते. चंद्रहासकथेच्या एका संक्षिप्त प्रतींत (प्राचीन मराठी कविता खंड २ रा)

एका प्रसंगांत कवीचें नांव नामा पाठक तर दुसऱ्या प्रसंगांत विष्णुदास नामा असें आढळतें. भारतकार विष्णुदास नामा यांच्या एका पर्वाच्या हस्तलिखितांत कवीचें नांव नामा पाठक असें सांपडतें, हनुमंतगरुडकथा दोघांच्याही नांवानें आढळते. अश्वमेधाच्या ८४ प्रसंगांच्या एका प्रतीचा शेवट "समाप्त जाला अश्वमेध। तुम्हासी पावो जगन्नाथ। पाठकनामा म्हणत। विष्णु (दास) नामया ॥ ४८ ॥" असा आहे. हे प्रकार लेखनप्रमादाचे असोत किंवा दोन्ही नांवें विशेषणार्थी वापरलेली असोत, अश्वमेध हा ग्रंथ नामा पाठकांचाच आहे याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

जैमिनींचा संबंध

वर उल्लेखिलेल्या दक्षिणप्रतीला 'जैमिनी भारत ॥ अश्वमेधपर्व ॥' असें म्हटलेलें आहे, परंतु प्रत्यक्ष ग्रंथांत व्यास जन्मेजयाला कथा सांगतात. कांहीं थोड्या ठिकाणीं जैमिनींचा उल्लेख येतो तो लेखन प्रमाद असावा, उदाहरणार्थ 'जयमुनी म्हणे जन्मोजया' (३५।१०६). जैमिनीच्या संस्कृत अश्वमेधाशीं (वाई, १९१३) दक्षिण प्रतीची तुलना केली असतां पुष्कळ साम्य आढळतें. दुसऱ्या बहुतेक प्रतींत जैमिनी गोष्ट सांगतात असा उल्लेख येतो. उदाहरणार्थः—

भा. इ. सं. मंडळ, क्रमांक २९।३९१ — **जैमिनी म्हणे जन्मोजया ३५।१४७**

„ ... २९।२०४७ — **हे आश्वमेधिक जयमुनिकृत्य। ३।१४३.**

„ ... २२।४७५ — **त्या व्यासाचा शिष्य जयमुनी। तेणें अश्वमेध आपुले बुधी करुनी। मानास मति देउनी। ग्रंथ उभवणि पै केली ॥ १।१४९ ॥**

„ ... २९।२१८७ — **इति श्री महाभारते। अश्वमेध जयमुनीकृते। व्यासवचनप्रमयश्लोकार्थे। म्हणे पाठक नामा ॥**

माउली मासिक, सप्टेंबर १९५७ — **जयमुनी म्हणे परिक्षितीसुता – ७४।२**

धुळें, बाडांक ३५९ — **पाठक नामा विनवीत। हा अश्वमेलें जयमिनीकृत्य। महाराष्ट्र भाशा कथिध सत्य। श्रोतीं सावचित ऐकावें ॥ ३।१४८.**

औंध प्रत ... — **जयमुनी म्हणे जन्मोजयासी ३।१५९**

राजवाडेमंदिर, धुळें. — **जयोमुनी झाला बोलता १२।७।२**

माझ्याजवळील ८८ अध्यायांच्या प्रतींतहि 'जयमुनी म्हणतात' असें मधून मधून वाक्य येतें. या संदर्भात दक्षिणप्रतीचें एक वैशिष्ट्य दिसून येईल.

अश्वमेधाच्या प्रती

आतां अश्वमेधाच्या निरनिराळ्या प्रतींचा विचार करूं. या ग्रंथाच्या त्रुटित प्रती जागोजागीं आढळतात, संपूर्ण प्रत एकादीच. जेवढ्या प्रती पाहण्यास मिळाल्या अथवा ज्यांच्याबद्दल माहिती उपलब्ध होऊं शकली, ती खालीलप्रमाणें आहेः—

(१) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे–क्रमांक २९।३९१–या अपूर्ण प्रतींत ३५ ते ४८ प्रसंग आहेत. राम, मयूरध्वज, ताम्रध्वज, सिंहध्वज इत्यादिकांच्या कथा येतात. हिचे खालील प्रतींशीं साम्य दिसतें.

(२) भा. इ. सं. मं. क्र–२९।२०४७–या प्रतींत ३ ते ५० प्रसंग असून यौवनाश्व, निळध्वज, सुधन्वा, इंद्रध्वज, अनिराहो, स्त्रीमंडळ, भिक्षुण काळजिन्हा, बभ्रुवाहन, राम, ताम्रध्वज, मयूरध्वज, दुंदुभि, बाणासुर, चंद्रमौळी, विभ्रंसि इत्यादींच्या कथा आढळतात.

(३) भा. इ. सं. मं. २२।४७५–प्रसंग १ ते ५४ असून वरील प्रतींशी फार साम्य आहे. ओव्या सुमारें ६३०० —शेवट नाहीं.

(४) श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, बाड ३५९ :—या त्रुटित प्रतींत मधून मधून असे प्रसंग आहेत. ९३ वा प्रसंग आहे. हिचें वरील प्रतीशी साम्य दिसतें. या प्रतीच्या आरंभींच्या कांहीं ओव्या—

"ॐ नमोजी अद्याक्षरा । तुजपासुनी चराचरा । तूं मति विकारा निर्विकारा । तूंचि देवा ॥ १ ॥ म्हणौनि तु प्रकृतिपुरुष । बिंदुमात्र तुझा प्रकाश । तोचि आर्धमात्रा ईश । तेथुनी सौरस सदवीद्या ॥ २ ॥ तेथुनी ब्रह्मस्थान निधान । तेचि म्हणति सगुण निर्गुण । जेणें प्रणव पिठीचें स्छापन । पूर्ण चैतन्य भासतु ॥ ३ ॥

(५) भा. इ. सं. मं. २९।२१८७.–ही प्रत फार जीर्ण त्रुटित असून हिच्यांत श्लोकांचे आंकडे नव्हते. कामाक्षी देवी, सावित्री, गंधमालती, पार्वती, चंपावती नगरी इत्यादि उल्लेख या प्रतींत आहेत. अश्वमेध तीनदां लिहिला असा उल्लेख या प्रतींत होता, असें वाटतें. प्रत पुन्हा पाहण्यास मिळाली नाहीं, त्यामुळें तीबद्दल जास्त लिहितां येत नाहीं.

(६) भा. इ. सं. मं. २९।३९२. ही पोथी उपलब्ध झाली नाहीं.

(७) राजवाडे संशोधनमंदिर, धुळें; मराठी पुराण क्रमांक २६–चवथ्या प्रसंगापासून (२६९ क्र. ओवी) बाराव्या प्रसंगापर्यंत (९ वी ओवी, चालू क्रमांक १२५८) आहे. चवथ्या प्रसंगांत काळनदी–वर्णन व बाराव्यांत दुंदुभिकथा आढळते.

(८) राजवाडे संशोधनमंदिर, धुळें दप्तर १२ व १४. हीं प्रकरणें साहित्य-सहकारांत मार्च १९६३ ते डिसेंबर १९६३ पर्यंत प्रसिद्ध झालीं. त्यांत गंधमादन अनिराहो, पद्माक्ष इत्यादि कथा आहेत.

(९) माउली मासिक–वैशाख–जेष्ठ १८७८ या अंकांत ११९ वा प्रसंग व सप्टेंबर १९५७ मध्यें ७४ वा प्रसंग प्रकाशित झाला. ७५ ते ८६ प्रसंग सप्टेंबरनंतर प्रकाशित झाले असावेत.

(१०) इंडिया ऑफिस वाचनालय–१ ते ६ व ११ ते ३० अध्यायांच्या या प्रतीच्या सुरवातीच्या ओव्यांचें (३) व (४) शीं साम्य दिसतें.

(११) भा. इ. सं. मं. २५।२२८––हिच्यांत २३ ते ७९ प्रसंग असून ७५ प्रसंगापर्यंत तेरा हजारावर ओवीसंख्या होती. ही प्रत वरील सर्व प्रतीपेक्षा मोठी व भिन्न आहे. चंपावतदेश, राजा सुर्जन, मदनमंजिरी, दुःशील, ऋतुध्वज, गरुड, गंधमालती, वेदमुनी, नीलपर्वत, पाताळभुवन, भस्मासुर, भवानी, हंसध्वज, भीक्षण, बभ्रुवाहन, राम, दुंदुभि इत्यादिकांची कथानकें यांत सांपडतात. ही प्रत श. १६९३ मधील आहे.

(१२) जवळजवळ वरीलप्रमाणेंच असलेली ८८ प्रसंगांची एक अत्यंत जीर्ण प्रत मला उपलब्ध झाली. या प्रतीला आरंभ व शेवट दोन्ही आहेत. ४ ते १२, १९,२०, २३, हे अध्याय नाहींत व १३ वा अध्याय त्रुटित आहे. उपलब्ध ओव्या सुमारें १२३०० आहेत. यावरून वरील व ही प्रत सुमारें पंधरा हजार ओव्यांची असावी असें वाटतें.

(१३) औंधप्रत–औंध येथील सरकारी वाचनालयांतील ही त्रुटित प्रत जुनी असून तिच्यांत १९ ते ५८ पर्यंत प्रसंग आहेत. कांहीं प्रसंग त्रुटित आहेत. ५८ वा प्रसंग हस्तिनापूरगमनाचा असल्यानें शेवटचा असावा. राम, मयूरध्वज, चंद्रसेन, वीरवर्मा, दुंदुभी, हंसध्वज, बाणासुर, चंद्रमौळी, इत्यादि कथा यांत आढळतात. उपलब्ध ओव्या सुमारें ३ हजार. इंद्रभुवनाला गेलेला घोडा वृषकेतूनें धरला ही कथा (प्रसंग ३८) साहित्यसहकार मे १९६३ मध्यें प्रकाशित झाली.

अश्वमेधाच्या पूर्ण प्रती

वरील प्रती संपूर्ण नाहींत. आतांपर्यंत दोन पूर्ण प्रतींची माहिती मिळाली. एक प्रत ३९ प्रसंग व सुमारे ४६०० ओव्यांची तंजावर येथें आढळणारी व दुसरी प्रत धुळें येथें असलेली ८४ प्रसंगांची असून तिच्यांत सुमारें ६६०० ओव्या आहेत. प्रथम प्रसंगांतील ओव्यांचे वरील (१२) प्रतींतील प्रथम प्रसंगाशीं व दक्षिणप्रतींतील प्रथम प्रसंगाशीं साम्य आहे. औंध प्रतीशींहि हिचें साम्य असण्याचा संभव वाटतो.

प्रतींचें समालोचन; व प्रतींतील फेरफारांची मीमांसा

वरील वर्णनावरून असें दिसेल कीं अश्वमेथाची सर्वांत लहान प्रत सुमारें ४६०० ओव्यांची असून सर्वांत मोठी प्रत सुमारें पंधरा हजार ओव्यांची असावी. या दरम्यान एक प्रत सुमारें ६६०० ओव्यांची आहे. शिवाय एकादी प्रत ८।९ हजार ओव्यांची

असावी. अनेक प्रतींत मिश्रण असण्याचा संभव दिसतो. ही परिस्थिति पाहिल्यावर प्रश्न असा उपस्थित होतो कीं एवढ्या भिन्न प्रती या ग्रंथाच्या कशा ? यासंबंधीं भा. इ. सं. मं. २५।२२८ मधील खालील ओव्या उद्बोधक वाटतात.—

"ते सांगे नामा पाठक। ये कथेचा आदिवास। पारमांचल देश। असे सोमसीळापैलाडी ॥ २८७ ॥ पारमंचल गांव नांवसि। तेथेन भटकाम आदिवासी। संस्कृतलिपी तेलंगे। लिहिली असे ॥ २८८ ॥ नामा तेथे जाउनी। संस्कृत लिहिले पाहुनी। प्राकृत केली करणी। ये कथेची श्रोते हो ॥ २८९ ॥ (प्रसंग २४).

मला उपलब्ध असलेल्या प्रतीतही हा मजकूर आहे. फक्त कामण्णभट्ट असें नांव आहे. ह्या ओव्या कथाकल्पतरुमधील वर उद्धृत केलेल्या ओव्यांप्रमाणें आहेत.

पुढें पसतिसाव्या प्रसंगांत खालील उल्लेख आढळतो :—

" नामा पाठक सांगे श्रोतयासी। अश्वमेधु कथिला थोरा प्रयासी। मज वास्तव्य दक्षिणेसी। तिकडे संस्कृत मना आणिलें ॥ १९२ ॥ तेथें कथन थोडेचि सांपडले। मग पश्चिमेसी येणे केलें। द्वारकातीर्थ केलें। तेथें राहिलों वरुषे पांच ॥ १९३ ॥ तेथें संस्कृत मनासी आणीलें। त्यावरून मन्हाटे कथीले। पूर्वार्ध उत्तरार्ध यकत्र केलें। तें देशी साधीले अर्थमर्थ ॥ १९४ ॥ तेथुनी उत्तरेसी। अवघ्या केलिया तीर्थविधीसी। मग राहिलो भागिरथीसी। वरुषें दहापर्यंत ॥ १९५ ॥ तें देसी घातलें ठाउकें। मेळविलें संस्कृतातें। कथिलें प्राकृतातें। व्यासवचनीचें ॥ १९६ ॥ तेथें अश्वमेधु ग्रंथ साधीला। प्राकृत कथीला। पूर्ण ग्रंथ केला। मग वाचिला श्रोतयापासी ॥ १९७ ॥ मग गेलो पूर्वेसी। तेथीले केले तीर्थासी। राहिलो ते देसी। वरुषे तीनपर्यंत ॥ १९८ ॥ तेथें संस्कृत पाहिलें। थोडेंच सांपडलें। तेही कथिलें। मेळविलें अश्वमेधासी ॥ १९९ ॥ ऐसा ग्रंथ पूर्ण केला। स्रोती परिसीला। अडपडा ग्रंथ वाचीला। स्राप असे व्यासाचा ॥ २०५ ॥ विस वर्षे तीर्थ विधी। तेथें अश्वमेध नेला सिद्धी। संस्कृतावरुन व्यासबुधी। प्राकृत सिधी पाववीलें ॥ २०१ ॥

या ओव्यांत अश्वमेधाच्या लेखकानेंच लिहिलेल्या चार प्रती होत्या असें सांगितलें आहे. ही हकिकत कदाचित् खरी असेलहि. दक्षिणेकडील तंजावरची प्रत सर्वांत लहान आहे ही गोष्ट या हकिकतीशीं जुळते.

प्रस्तुत तंजावरच्या दक्षिणप्रतीच्या भाषेंत थोडेंफार आधुनिकीकरण झालें असावें. भा इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत (१७।३, डिसेंबर १९३७) अश्वमेधाची कांहीं पानें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांची भाषा जुनी आहे. त्यांतील मयूरध्वज व चंद्रहासकथेचा भाग तंजावरप्रतीशीं जुळता आहे. या सर्व प्रती एकत्र आणून त्यांचा अभ्यास व संशोधन कुणीतरी करावें.

जुन्या मराठी भाषेचें व्याकरण

Mr. Alfred Master यांनीं "*Development of the Marathi Language upto A. D. 1300*" या विषयावर प्रबंध लिहून ऑक्स्फर्ड विद्यापीठाकडून पीएच्. डी. पदवी मिळविल्याचा मजकूर आम्हीं 'मराठी संशोधन पत्रिके'च्या (एप्रिल १९६४) अंकांत प्रसिद्ध केलेला वाचकांना आठवत असेल. याच मि. आल्फ्रेड मास्टरांचें "*A Grammar of Old Marathi*" (१९६४) हें पुस्तक Oxford University Press या प्रकाशकांकडून आमच्याकडे नुकतेंच अभिप्रायार्थ आलें आहे. हें पुस्तक बहुधा वरील पीएच्. डी. करितां लिहिलेला प्रबंध किंवा त्या प्रबंधावरील आधारित ग्रंथ असावा. मात्र तसा निर्देश या पुस्तकावर नाहीं.

हिंदुस्थानांतील भाषा, वाङ्मय, इतिहास, धर्म, जाति वगैरे विषयांत रस घेऊन त्यांत संशोधन करणारे पुष्कळ इंग्रज सनदी नोकर होऊन गेले. त्यांपैकीं मराठी वाचकांस Mr. Leonard John Sedgwick यांचें नांव त्यांच्या रघुनाथपंडितकृत 'नलदमयंतिस्वयंवराख्यान' या काव्याच्या संशोधित आवृत्तीमुळें विशेष परिचयाचें आहे, तसें आल्फ्रेड मास्टरांचें नाहीं. वास्तविक सेज्विक व मास्टर हे दोघेही एकाच सालीं म्हणजे १९०६ मध्यें मुंबई सरकारच्या नोकरींत शिरले. सेज्विक हे कॅंब्रिज विद्यापीठाचे, तर मास्टर हे ऑक्स्फर्ड विद्यापीठाचे पदवीधर. एकाच सालीं ते दोघेही आय्. सी. एस्. परीक्षा पास झालेले दिसतात. सेज्विक २३ नवंबर १९०६ सालीं हिंदुस्थानांत आले आणि त्याच महिन्याच्या २७ तारखेला साताऱ्याला आपल्या कामावर रुजू झाले. मास्टर १० डिसेंबरला हिंदुस्थानांत आले आणि त्याच दिवशीं सुरत येथें त्यांनीं आपल्या नोकरीचा तावा घेतला. सेज्विक यांनीं सातारा, ठाणें, पुणें आणि पुनः सातारा येथें पहिलीं पांचसहा वर्षें महाराष्ट्रांत असिस्टंट कलेक्टर व मॅजिस्ट्रेट म्हणून नोकरी केल्यानंतर १९१२ मध्यें त्यांची बदली सुरतेस झाली. तिकडून अहमदाबाद, धारवाड, पुणें अशी मुंबई प्रांताच्या निरनिराळ्या जिल्ह्यांत त्यांची नेमणूक झाली.

मास्टर यांनीं सुरत, अहमदाबाद या गुजरातेच्या भागांत पहिलीं सातआठ वर्षें असिस्टंट कलेक्टर व मॅजिस्ट्रेट म्हणून नोकरी केल्यावर १९१५ सालीं त्यांची विजापूर येथें बदली झाली. तिकडून धारवाड, सातारा, अहमदाबाद येथें नेमणुका होऊन १९२२ सालीं ते साताऱ्याला कांहीं दिवस कलेक्टर, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आणि फलटण व औंध या संस्थानांचे पोलिटिकल एजंट म्हणून काम पहात होते. परंतु याच वर्षाच्या अखेरीस त्यांची पुनः गुजरातेंत बदली झाली. १९२५ सालीं मुंबई सरकारचे सचिव म्हणून कांहीं दिवस त्यांनीं काम केलें. याच सालीं मुंबईच्या कायदेकौंसिलांत सभासद म्हणून सरकारनें त्यांची नियुक्ति केली. पण दुसऱ्याच वर्षीं त्यांची धारवाडला

बदली होऊन १९२८ सालीं ते पुनः गुजरातेंत गेले. १९३१ सालच्या जानेवारींत त्यांना C. I. E. ही बहुमानाची पदवी मिळाली. नंतर ते निवृत्तिपूर्व रजेवर जाऊन १९३३ च्या सुमारास सेवानिवृत्त झाले. म्हणजे सेव्हिकचे जसे महाराष्ट्रांत तसे मास्टरचे गुजरातेंत जास्त दिवस गेले. असें असतांही मराठी भाषेच्या अभ्यासाकडे लक्ष देऊन त्यांनीं प्रस्तुत ग्रंथ तयार करावा, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. इंग्लंडांत परत गेल्यावर त्यांनीं सुप्रसिद्ध The School of Oriental and African Studies या संस्थेमध्यें सीनियर लेक्चरर म्हणून काम केल्याचें नमूद आहे. आय्. सी. एस्. होऊन १९०६ सालीं त्यांनीं नोकरींत प्रवेश केला, म्हणजे आज त्यांचें वय ८५ च्या जवळपास असावें. अशा वयाच्या माणसानें पीएच्. डी. च्या पदवीकरितां प्रबंध सादर करून १९६१-६२ मध्यें ती मिळवावी, ही कौतुकाची गोष्ट नाहीं, असें कोण म्हणेल ?

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च चिन्तयेत् ।
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥

जुन्या मराठी भाषेसंबंधीं आतांपर्यंत राजवाडे, W. Doderet, पानसे, हर्षे, तुळपुळे वगैरेनीं कमजास्त प्रमाणावर विचार केलेला आहे. प्रो. कोलते, नेने, देशपांडे, वगैरे विद्वानांनीं पुढें आणलेल्या महानुभाव वाङ्मयामुळें या विषयाची पुष्कळ साधनसंपत्ति अभ्यासकांस अलीकडे उपलब्ध झाली आहे. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या विषयाचा मुख्य आधारभूत ग्रंथ जी ज्ञानेश्वरी तिची प्रमाणभूत अशी संशोधित आवृत्ति तयार झालेली नाहीं. हर्षे यांनीं 'विप्र प्रती'वर आधारलेला केवळ एकच अध्याय पाठांतरासह प्रसिद्ध केला. पानसे यांनीं विप्र प्रतीची सूचि तयार केली, पण तिची मूळ सबंध प्रत प्रसिद्ध झालेली नाहीं. माडगांवकरांची पाठशुद्ध आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर ज्ञानेश्वरीच्या कांहीं जुन्या प्रती उपलब्ध झाल्या आहेत. त्या विचारांत घेऊन नवी संशोधित प्रत तयार होणें अवश्य आहे. डॉ. तुळपुळे यांनीं मराठी कोरीव लेख एकत्र प्रसिद्ध करून मराठी भाषेच्या इतिहासाचें एक मोठें साधन उपलब्ध करून ठेवलें आहे.

यादवकालीन ग्रांथिक मराठी ही प्रमाणभूत अशी एक बोलीच होती. पुढें ग्रांथिक भाषा व बोली यांच्यामध्यें फरक पडत चालला. मराठी भाषेच्या निरनिराळ्या बोलींचा अभ्यास केला, तर मराठी भाषेच्या जुन्या इतिहासावर नवा प्रकाश पडेल आणि कांहीं नवे दुवे सांपडण्याचा संभव आहे. 'कोंकणी' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या गोमंतकी बोलीसंबंधीं मि. मास्टर आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हणतात, "It preserves certain archaisms and cannot be ignored in a study of Old Marathi". खरें म्हटलें तर तथाकथित

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
क्रम ७५९४७ वि: निबंध-५१
२१३६ नोंद वि: २२१३/७१

जुन्या मराठी भाषेचें व्याकरण

'कोंकणी' भाषा म्हणजेच जुनी मराठी आहे. म्हणून या बोलीचा अभ्यास मराठी भाषेच्या इतिहासाला अत्यंत उपकारक आहे.

मराठी भाषेचा ताडपत्रावरील हस्तलिखित ग्रंथ अस्तित्वांत नाहीं, याबद्दल लेखकानें आश्चर्य व्यक्त केलें आहे (प्रस्ता. पृ. ३); पण असा 'कलानिधि' नांवाचा ग्रंथ उपलब्ध असून त्याचा आरंभींचा कांहीं भाग 'मराठी संशोधनपत्रिकें'त अलीकडे मीं प्रसिद्ध केला आहे (ऑक्टोबर १९६५). शिखांच्या आदिग्रंथांतील नामदेव व त्रिलोचन या भक्तांचीं पदें हिंदी-मराठी मिश्र भाषेंत आहेत, असा लेखकाचा समज आहे. वास्तविक ज्यांना ते 'मराठी' रूपें मानतात तशीं रूपें ग्रंथसाहेबांतील इतर गुरूंच्या किंवा भक्तांच्या लेखनांतही आढळतात, हें मीं दाखवून दिलें आहे ('शिखांच्या आदि-ग्रंथांतील नामदेव,' मुंबई १९३८). नामदेवाचा काळ निश्चित नसल्यामुळें त्याच्या अभंगांतील भाषेच्या रूपांचा काळ ठरविण्यास तीं उपयोगी नाहींत, असें ते म्हणतात. वास्तविक नामदेवाच्या नांवावर असलेले अभंग एकाच आद्य नामदेवाचे नसून निरनिराळ्या काळच्या अनेक नामदेवांचे आहेत, आणि ते वेगळे करणें आतां अशक्य झालें आहे. मराठी भाषेच्या अभ्यासाकरितां ज्ञानेश्वरीच्या संशोधित आवृत्तीची आवश्यकता त्यांनीं सुचविली आहे ती योग्य आहे. कोणत्याही काव्याचा भाषाशास्त्रीय अभ्यास करतांना आपल्यापुढें त्या ग्रंथाची शुद्ध प्रत नसल्यास आपला सारा प्रयत्न व्यर्थ आहे. राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीमध्यें 'बैठला', 'पैठला' अशीं रूपें आढळतात, असें लेखक प्रस्तावनेंत लिहितात (पृ. ९). पण मला 'पैठला' असें रूप आढळलें नाहीं. 'पैठा', 'पैठी', 'पैठीं' अशीं नामें निराळ्या अर्थीं आढळतात.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 942.03

Introduction या पहिल्या प्रकरणानंतर Phonology, Etymology, Nouns, Adjectives, Pronouns, Numerals, Verbs, Postpositions, Verbs and Adverbial Phrases, Conjuctions and Particles अशीं या ग्रंथाचीं एकंदर अकरा प्रकरणें आहेत. याशिवाय सहा कोरीव लेख रोमन लिपींत, A परिशिष्टांत आहेत, आणि Indo-Aryan Loan-words in Kannada, B परिशिष्टांत आहे.

या सर्व प्रकरणांत लेखकाचा प्रयत्न व शोधक बुद्धि सर्वत्र प्रतीत होते. पण कांहीं ठिकाणीं घाईनें किंवा अपुऱ्या माहितीच्या आधारावर काढलेले निष्कर्ष दिसून येतात. त्या सर्वांचा या ठिकाणीं विचार करणें अर्थातच कठीण आहे. नमुन्यादाखल दोनचार उदाहरणें देतों :—

लेखक म्हणतात, " The ज्ञानेश्वरी has one doubtful example of पासाव : म्हणउनि रक्ष प्रमादा पासाव म्हणें therefore, I say, preserve me

after my transgression, (माडगांवकर ११–५७१). This can be translated as above or interpreted to mean 'preserve me from sin,' in which case पासाव means 'from' as Panse translates it. Bhagwat renders the passage 'forgive me my sins', which accords with the former interpretation. In Mahanubhava literature पासाव means 'than': वज्रापासाव कठीणु harder than diamond, ऋद्धिपूरवर्णन २२१, as well as 'from': नाभि मंडळा–पासावा (व) रोमराजीची बरव "the beauty of the line of hairs from the circle of the navel," ibid., 576." (p. 71)

'विवेकसिंधू'च्या भाषेसंबंधीं लिहितांना लेखक म्हणतात, "It does contain some obsolete or rare words, such as पासाव, which occurs only once in the ज्ञानेश्वरी and is generally regarded as peculiar to the Mahanubhavas." (पृ. ६).

ज्ञानेश्वरीच्या विप्र प्रतीत किंवा माडगांवकरांच्या प्रतीत 'पासाव' हा शब्द जरी एकदा आढळला, तरी राजवाडे प्रतीत तो दोनदा येतो–अ. १०–८४; अ. १३–६. 'पासाव' व 'पासौनि' हीं समानार्थक रूपें आहेत. 'पासाव' हा शब्द केवळ महानुभावांचेंच वैशिष्ट्य नाहीं, किंवा सर्वच महानुभाव लेखकांनीं तो वापरलेला आहे असेंही नाहीं. 'ऋद्धिपुरवर्णन' व 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्यांत तो आढळतो; पण 'उद्धवगीता', 'शिशुपालवध', 'वत्सलाहरण', 'महदंबेचे धवळे' वगैरे कितीतरी इतर महानुभाव ग्रंथांत तो मला आढळला नाहीं. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या विशिष्ट ज्ञानेश्वरीच्या ओवींत 'पासाव' असा शब्द ज्ञानेश्वरींत आहे असें मास्टर लिहितात, त्या ठिकाणीं राजवाडे–प्रतीत 'पासौनि' असा पाठ आहे. कारण 'पासाव' व 'पासौनि' हे समानार्थी शब्द आहेत. ते from आणि than या दोनहीं अर्थीं वापरीत. रुक्मिणी–स्वयंवर या काव्यांत नरेंद्रकवीनें तसे वापरले आहेत :—(१) लक्ष्मिये–**पासाव** बहुतें बरवी (३३६), (२) अमृता-**पासौनि** बहुये रसाळ (२७).

'पासाव' हा शब्द आधुनिक मराठींत नसला तरी तो तुकारामादि अलीकडच्या कवींच्या काव्यांत सांपडतो :–'दुजियापासाव परतलें मन', तुका० गाथा, चित्रशाळा, १९२५, ७५२.

यावरून तो "peculiar to Mahanubhavas" म्हणण्यासारखा केवळ यादवकालीन नाहीं, हें कळून येईल.

'तु' हें रूप from या अर्थीं ते पंचमी विभक्तीचा प्रत्यय मानतात. (पृ. ७०)

"वेरेंतु (from वेरें); नगरात्तु (from the city); जातित्तु (from the caste)" ही वेरेंच्या (गोमंतक) ताम्रपटांतील रूपें; तसेंच "आनो बास झाडी मंडळातु सिरपुरासि गेले (Anna Vyās went from the Jhadi district to Sirapura) हें पंचचरित्र ग्रंथांतील रूप ते पंचमी विभक्तीचें मानतात, हें त्यांनीं दिलेल्या इंग्रजी भाषांतरावरून दिसून येतें. वास्तविक हीं रूपें सप्तमी विभक्तीचीं आहेत, असें मला वाटतें. पिशलच्या प्राकृत ग्रामरमध्यें किंवा जुन्या गुजरातीमध्यें अशीं पंचमीचीं रूपें सांपडल्यामुळें मराठींतही तशीं आहेत, असा त्यांचा समज झाला असावा. 'तु' बद्दल 'त्तु' असें द्वित्त करण्याची प्रवृत्ति जुन्या काळीं गोमंतकांत होती व आजही ती कर्नाटकांत गेलेल्या कोंकणी लोकांच्या बोलींत आढळते.

'तु' किंवा 'त्तु' या प्रत्ययासंबंधीं पुढें ते म्हणतात, "The frequent use of these suffixes in Gujarati and their limited use in old Marathi suggests that Marathi borrowed the idiom, just as Hindi and old Gujarati (Narasimha Mehato) borrowed the genitive suffixes चा, चो in sporadic cases from Marathi." (पृ. ७१). वास्तविक 'चा' किंवा 'चो' हा प्रत्यय जुन्या गुजराती किंवा हिंदी भाषांनीं मराठींतून घेतला, ही कल्पना भ्रामक दिसते.

कवि रणछोड पूर्णानंद यानें असें म्हटलें आहे कीं, नरसिंह मेहताला दक्षिणेंतील एका आचार्यानें अरण्यामध्यें शिवपंचाक्षरी मंत्राची दीक्षा दिली आणि त्याच्या इच्छेवरून नरसिंह मेहता 'नरसैयाचा स्वामी,' असें काव्याच्या शेवटीं योजूं लागला. नरसिंह मेहतानें आपल्या 'शृंगारमाले'मध्यें पदाच्या शेवटच्या चरणांत असें रूप वापरलें आहे, तसें मध्येंही वापरलें आहे, पहाः—

'सुंदरीयांचा स्वभाव एवा पीयुजी विना न सोहाये.' इतर काव्यांतही तो मध्यें वापरतो—

(१) मस्तक मुगटचो भार. (चातुरी छत्रिसी); (२) माननियांचा मान छोडावे. (बाललीला). हा 'चा' प्रत्यय इतर कवींच्या कांहीं गुजराती काव्यांत 'वसंत-विलास' (वि. सं. १५०८), 'कान्हडदे प्रबंध' (वि. सं. १५१२), विमल प्रबंध (वि. सं. १५६८) काव्यांत आढळतो. या प्रत्ययासंबंधीं प्रो. दिवाटिया आपल्या Gujarati Language and Literature या पुस्तकांत लिहितात; "I believe that this च termination was the common property of old Gujarati and Marathi and that while it disappeared in later Gujarati, it stuck on and still survives in modern Marathi." (पृ. ६०).

शिखांच्या ग्रंथसाहेबांतील कांहीं पद्यांत किंवा राजस्थानांतील पृथ्वीराज राठोडच्या १६३७–८ च्या सुमारास रचलेल्या 'वैली किसन रुक्मणी रीया' या काव्यांत आढळणारा 'चा' प्रत्यय मराठींतून घेतला नसून मूळ सर्वांचा उगम एकच आहे, असें मला वाटतें. दोन भाषांमध्यें एकादें साम्य आढळलें म्हणजे लगेच एकाची दुसऱ्यानें उसनवारी केली, असा निष्कर्ष काढणें उतावीळपणाचें आहे. 'बीजें' किंवा 'तूप' अशासारख्या शब्दांची मराठीनें कानडींतून उसनवारी केली, हें लेखकाचें म्हणणें मला पटत नाहीं. 'बीजें' या शब्दाचा उगम संस्कृत 'द्वि' किंवा 'व्रज्' या शब्दांत असून 'बीजें' करणें म्हणजे 'दुसऱ्या' ठिकाणी जाणें असा अर्थ दिसतो. तसेंच 'तूप' या शब्दाचा उगम संस्कृत 'तृप' किंवा 'तृप्र' (ghee) या शब्दांत असणें शक्य वाटतें.

कोंकणींतील पंचमीचा -जून हा प्रत्यय वास्तविक जा–असणें ह्याचें ऊन प्रत्ययांत धातुसाधित आहे, असें डॉ. झुल ब्लोक् यानें आपल्या *La formation de la Langue Marathe (1914)* या सुप्रसिद्ध ग्रंथांत जें मत नमूद केलें आहे (पृ०२०६). त्याचा अनुवाद किंवा निर्देश मि. मास्टर यांनीं केला आहे (पृ. ७२). वास्तविक– 'जून' हा प्रत्यय जिला 'कोंकणी' असें नांव आहे त्या गोमंतकीमधील नाहीं, तर 'कोंकण स्टँडर्ड' असें ग्रीयर्सन जिला नांव देतो, त्या मुंबई बेटांतील कोळी बोलीमधील आहे. शिवाय तो पंचमी (ablative) विभक्तीचा नसून तृतीयेचा (instrumental) आहे. गिमारांइसच्या नांवांवर प्रसिद्ध असलेल्या या बोलींतील पुराणांत,

(१) परमेसोराजून रचिली दुनियां. १–९.

(२) सालोमांव राजाजून केलं, एक देऊळ परमेसोराना. १–१४.

किंवा ग्रीयर्सनच्या भाषिक पाहाणीच्या सातव्या खंडांत (पृ० ६८) दिलेल्या मुंबई बेटांतील कोळी बोलीमध्यें,

तदं बापास–जून धन वाटलं।

असें वाक्य आहे. या सर्व ठिकाणीं 'जून' हा प्रत्यय 'नें' या अर्थीं तृतीया विभक्तीचा आहे असें दिसून येईल. लॅटिन भाषेमध्यें तृतीया (instrumental), पंचमी (ablative) व सप्तमी (locative) या तीनही विभक्तींचा ablative मध्यें अंतर्भाव होतो. परंतु आपणांस संस्कृत भाषेप्रमाणें परिभाषा वापरली पाहिजे.

अशीं कांहीं दोषस्थळें किंवा शंकास्थळें दाखवितां येतील; परंतु त्यामुळें या पुस्तकाचें महत्त्व मुळींच कमी होत नाहीं.

ब्रिटिश राजवटींत अनेक सनदी नोकर हिंदुस्थानांत येत आणि आपलें काम सांभाळून फावल्या वेळांत संशोधन करीत. आतां नव्या परिस्थितींत युरोपियनांकडून अशा प्रकारची संशोधनाची आशा बाळगण्यास विशेष जागा नाहीं. सरकारी नोकरींत नसतांही ज्यानें भाषिक संशोधन केलें असें उदाहरण म्हणजे डॉ. झुल् ब्लोक या फ्रेंच विद्वानाचें अपवादादाखल दाखवतां येईल. त्यांनीं *La formation de la Langue Marathe* (१९१४) हा ग्रंथ लिहिलेला प्रसिद्ध आहे. पॅरिस युनिव्हर्सिटीच्या D. Lit. पदवीकरितां प्रबंध म्हणून हा ग्रंथ त्यांनीं सादर केला. भारतीय भाषांच्या अभ्यासाकरितां ते १९०८ सालीं हिंदुस्थानांत आले व दोन वर्षें राहिले. या काळांत केवळ मराठी भाषेच्या अभ्यासाला त्यांनीं वाहून घेतलें असें नाहीं. त्यांचें मराठी भाषेचें अध्ययन मुख्यतः मोल्स्वर्थचा मराठी–इंग्रजी कोश आणि जोशी व नवलकर यांच्या मराठीच्या व्याकरणांवर आधारलें होतें. कृष्णशास्त्री गोडबोले यांचें मराठी भाषेचें नवीन व्याकरण आणि राजवाडे याचें 'ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण' हे ग्रंथही त्यांनीं पाहिले होते. माडगांवकरांची आणि राजवाड्यांची ज्ञानेश्वरी आणि 'नवनीता'ची १९०७ ची आवृत्ति यापलीकडे जुन्या मराठी वाङ्मयाचा त्यांचा विशेष परिचय होता, असें दिसत नाहीं. त्यांच्याकडे शास्त्रीय पद्धति होती; पण पुरेशीं साधनें नव्हतीं. निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्याकडे तोफ होती, पण भरपूर दारू गोळ्याचा सांठा नव्हता. आतां जुन्या मराठीच्या अभ्यासाला उपयुक्त असें पुष्कळ महानुभावांचें वाङ्मय, जेजुईट वाङ्मय, बोलीभाषेसंबंधीं पुस्तकें असें साहित्य प्रसिद्ध झालें आहे. यापैकीं कांहीं साधनांचा लाभ मि. मास्टर यांना मिळाला आहे, ही समाधानाची गोष्ट होय. तरीपण ते हिंदुस्थानांत असते तर त्यांना अद्ययावत् संपूर्ण साधनांचा फायदा घेतां आला असता, व हा ग्रंथ जास्त निर्दोष झाला असता.

पाश्चात्त्य लोकांचें, शास्त्रीय पद्धति (methodology) व बिनचूकपणा (accuracy) या गोष्टींकडे विशेष लक्ष असतें. या पुस्तकांत कांहीं ठिकाणीं त्यांकडे लेखकाचें दुर्लक्ष झालेलें आहे. मराठी शब्दांचें देवनागरींत लिप्यंतर करतांना कांहीं ठिकाणीं चुका राहिल्या आहेत. Bibliography मध्यें 'यादव मराठी भाषा' असें डॉ. तुळपुळ्यांच्या पुस्तकाचें नांव दिलें आहे, तें 'यादवकालीन मराठी भाषा' असें पाहिजे. Abbreviations मध्यें GOS (गायकवाड ओरिएंटल सीरीज्?), Tan_1 (तंजावर महाराज शरभोजी यांच्या सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालयांतील मराठी ग्रंथांची बयाजवार यादी, भा. १,–१९२९) अशा संक्षेपांचें स्पष्टीकरण दिसत नाहीं. परिशिष्टांत विम्रमंत्र्याच्या इ. स. १३४८ च्या ताम्रपटांतील पाठ (पृ. १६३) आणि त्या ताम्रपटांतील म्हणून निर्दिष्ट केलेले पाठ (पृ. ७०) यांत फरक आहे. (जातितु–चालितु) म्हणजे एकीकडे आपटे यांनीं वाचलेला (भारत इतिहास संशोधक

मंडळ, वार्षिक इतिवृत्त श. १८३७) व दुसरीकडे प्रो. पिसुर्लेकर यांनीं डॉ. पंचमुखी यांच्याकडून वाचवून घेतलेला आणि डॉ. तुळपुळे यांनीं आपल्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथांत स्वीकारलेला पाठ दिला आहे.

अशीं कांहीं दोषस्थळें राहून गेलीं असलीं तरी हा ग्रंथ मराठी भाषेच्या पुढील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल. डॉ. ब्लोक यांच्या फ्रेंच भाषेतील ग्रंथाच्या, 'मराठी भाषेचा विकास' या मराठी भाषांतरांत, "प्रो. ब्लोक यांचा ग्रंथ पूर्णावस्थेला पोंचला आहे किंवा निर्दोष आहे अशांतला भाग नाहीं; पण त्यांच्या चुकाच अभ्यासकांना फार उद्‌बोधक होतील," असे जे उद्गार डॉ. वा. गो. परांजपे यांनीं काढले आहेत, तेच डॉ. मास्टरांच्या प्रस्तुत पुस्तकासंबंधींही काढतां येतील.

अलीकडील कांहीं लेखक मागील लेखकांच्या चुका दाखवितांना कडक किंवा अनुदार भाषा वापरतांना दिसतात. नव्या लेखकांना जुन्या लेखकांच्या सत्य शोधाप्रमाणें त्यांच्या चुकांचाही फायदा होत असतो हें त्यांनीं विसरूं नये. जुन्या लेखकांहून आपणास जास्त शहाणे समजणें, म्हणजे आजोबाच्या खांद्यावरून बसून स्वतास त्याच्यापेक्षांही आपण उंच समजण्यासारखें आहे. हें सर्व जरी खरे असलें, तरी जुन्या लेखकांचें कोणतेंही विधान स्वीकारतांना नव्या लेखकांनीं तें आधीं नीट पारखून घेतलें पाहिजे. कारण जुन्या लेखकांपक्षां त्यांच्या पुढें साधनें जास्त असतात. असो.

अशा-प्रकारचा ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. मास्टर यांचे मराठी भाषेचे अभ्यासक सदैव ऋणी राहातील, यांत शंका नाहीं. या ग्रंथाच्या वाचनानें आपल्याकडील भाषांच्या अभ्यासकांना जास्त निर्दोष असा नवा ग्रंथ निर्माण करण्याची प्रेरणा मिळेल, अशी मी आशा बाळगतों.*

अ. का. प्रियोळकर

---

* *A Grammar of Old Marathi by* Dr. Alfred Master, Oxford Unviersity Press, London 1964, pp. XVI+ 172. Price 55 s.

ज्ञानदेवांच्या नांवावरील आणखी कांहीं ग्रंथ

म. प. पेठे, पुणें.

'ज्ञानदेवांचें संशयास्पद वाङ्मय' या संशोधनपर लेखांत प्रा. अ. का. प्रियोळकर[1] यांनीं ज्ञानदेवांच्या नांवावर गणल्या जाणाऱ्या बहुतेक सर्व हस्तलिखित व प्रकाशित ग्रंथाची यादी दिली आहे. श्री. रा. चिं. ढेरे यांनीं त्या यादींत भक्तराज, लखोटा, ज्ञानप्रकाश, पवनविजय या ग्रंथांची भर घातली.[2] याशिवाय ज्ञानदेवांच्या नांवावरील खालील तीन ग्रंथाची भर त्या यादींत घालण्याची आवश्यकता आहे.

(१) कमाल अठ्याहत्त्यारी[3]

रा. ब. वाघ या सद्गृहस्थांकडे हस्तलिखित स्वरूपांत असलेला ज्ञानदेवांच्या नांवावरील हा ग्रंथ श्री. सावंत यांनीं संपादन करून प्रसिद्ध केला आहे. कमाल नांवाच्या आपल्या निस्सीम भक्तास आपला अनुभवसिद्धांत ज्ञानदेव सांगत असल्याचें वर्णन यांत असून ८० ओव्यांत केवळ एकाच ठिकाणीं 'निवृत्तिप्रसादे ऐकता बोध' असा ज्ञानदेव कर्तृत्वदर्शक म्हणता येण्याजोगा निर्देश असून या ग्रंथाची भाषा पाहतां हा ग्रंथ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचा नाहीं हें लक्षांत येण्यासारखें आहे.

'बाळ मध्य ऊर्ध्व। तूं नव्हे मी तसे सर्व। परी कल्पनेचा हाव। नामरूपें ॥२॥ ...निवृत्तीप्रसादे ऐकता बोध। कमाल जाहला ज्ञानशुद्ध। निरसूनीया भेदाभेद॥ गृहस्थाश्रमी प्रवर्ते॥ ८०॥ या दोन अदिअंताच्या ओव्या नमुन्यासाठीं दिल्या आहेत. शुद्ध ज्ञान 'निवृत्तीच्या प्रसादाने' ऐकून गृहस्थाश्रमांत प्रविष्ट होणारा हा कमाल कोण, त्याला उपदेश करणारा हा तथाकथित ज्ञानदेव कोण, हा संशोधनाचा विषय होण्यासारखा आहे.

(२) खेळ

ज्ञानेश्वर व त्यांचे बंधुभगिनी यांचा बहुतेक काल भगवद्भजनांत जात असे. परंतु एखाद्या वेळेस करमणूक व्हावी यासाठीं ज्ञानदेवांनीं 'ज्ञानपट' व सोपानदेव यांनीं 'सोपानपट' असे दोन खेळ रचिले होते असे सांगून त्या खेळांची सविस्तर माहिती

---

१. मराठी संशोधनपत्रिका, ऑक्टो० १९५८, वर्ष ६, अं. १,

२. **तत्रैव,** एप्रिल १९५८, वर्ष, ६, अं. ३.

३. अद्वैत वेदांतपर कमाल अठ्याहत्तरी अथवा श्री ज्ञानेश्वर यांनीं निस्सीम भगवद्भक्त कमाल यांस सांगितलेला अप्रतिम अनुभवसिद्धांत, आबाजी रामचंद्र सावंत, श्रीराम तत्त्वप्रकाश छापखाना, शके १८२६ (१९०४).

श्री. बळवंत खंडोजी पारख यांनीं दिली आहे.[४] सात कवड्या घेऊन अविवेक, द्वेष, मोह, ज्ञानमोह, अहंकार यासारखी मोक्ष मार्गावरील अडचणींचीं स्थानें दाखविणाऱ्या पटावर हा खेळण्याची कल्पना ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानास साजेशी असली तरी असल्या 'खेळांच्या' फंदांत ज्ञानेश्वर पडले असतील असें वाटत नाहीं. १८६९ च्या जुलैच्या सरकारी यादींत[५] या पटाच्या प्रसिद्धीचा उल्लेख असून कांहीं ठिकाणीं[६] याच्या हस्तलिखित प्रतीहि असण्याची शक्यता आहे. परंतु आद्य ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवापेक्षां त्यांच्या कल्पक अशा कुणा तरी भक्ताकडेच याचें जनकत्व देणें योग्य ठरेल.

(३) श्री ज्ञानदेवतेहत्तिशी[७]

या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत टीकाकारानें दिलेल्या माहितीनुसार या ग्रंथाची प्रत कै. लक्ष्मण दीक्षित यांचे शिष्य व टीकाकारांचे आजोबा कै. अंताजीपंत केळकर यांच्या संग्रहांत हस्तलिखित प्रत असून ती नित्यपाठांत व पूजेंत होती. 'ज्ञानदेवयोग-मार्ग' या नांवाखालीं श्री. इरन्नास्वामी महाराज अहमदनगरकर यांनीं शके १८१६ मध्यें चित्रशाळेंत प्रसिद्ध केलेल्या योगमार्गाच्या नकाशांत या ओव्या दिल्या असल्याची माहिती प्रस्तावनेंत आहे. या ग्रंथांत र. ह. कोटनीस व मं. रा. टाकी यांनीं आशीर्वाद दिलेला असून त्या दोघांची हा ग्रंथ ज्ञानदेवांचाच असल्याची खात्री दिसते. 'अरूपप्रकाश' या नांवावरील ग्रंथ व हा 'ज्ञानदेवतेहत्तिशी' हा ग्रंथ, कांहीं शाब्दिक फेरफार, ओव्यांचा क्रम व ओव्यांची भिन्न संख्या या गोष्टी वगळता एकच होय. योगमार्गाचें वर्णन करणारा अरूपप्रकाश अथवा ज्ञानदेवतेहत्तिशी हा ग्रंथ कुणा योगमार्गी ज्ञानेश्वराचा असावा. त्यांतील शब्दांचीं रूपें पाहतां तो अर्वाचीन वाटतो. कदाचित् अभंगाप्रमाणें याहि ओव्यांचें, पठणांत असल्यामुळें आधुनिकीकरण झालें असण्याची शक्यता आहे.

---

४. ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र, १९०६, आ. ३, पृ. १८०–१८१

५. "ज्ञानेश्वर साधु यांनीं करमणुकेसाठी बनविलेला खेळ."

६. पुणें विद्यापीठ जयकरग्रंथालय, हस्तलिखित.

७. श्रीज्ञानदेवतेहत्तिशी, दासरामकृत (राम गोविंद केळकर) सानंद टीकेसह व तात्पर्यासह हरिपाठ, सांगली, १९५२.

ज्ञानदेवाचें शंकास्पद वाङ्मय

[ज्ञानदेवाच्या नांवावर असलेली कांहीं कविता मार्गे म. सं. पत्रिकेंत प्रसिद्ध करण्यांत आली आहे. पुढील कविता श्री. शंकर रा. वडवे, पंढरपूर यांजकडून आली आहे.]

कूटपदे

पैल तुर्येचे भरे। नयनातुनी नयन हेरे। सर्व साक्षी समरे। परब्रह्म ॥ १ ॥ पैल तुर्येचे पाठारी। अउठ पीठासेजारी। अर्धमात्रेच्या माहाद्वारी। नीजरूप उभे असे ॥ २ ॥ तुर्येचे वरुतें। भ्रमरगुंफेचे खालुते। समरस समान सरतें। चहुंकडे ॥ ३ ॥ पंचवटीचे शेवटी। उभें तुर्येपाठी। आकाशाचे पाठीपोटी। वस्तु उभी असे ॥ ४ ॥ पश्चिमेचेनी पाटे। खोलोनी ब्रह्मरंध्र कपाटे। उन्मनी प्रेमलोटे। समाधीसुखाकारणे ॥ ५ ॥ अजपजपाचेनी छेंदे। अनुहाताचेनी नादें। सत्राविचे रसस्वादें। स्वरुप देखावे तुर्येवळें ॥ ६ ॥ आंगुष्टमात्र राहायंत्र। उर्ध लंक्षुनी अर्धमात्र। भेदिला मसुरे प्रमाण नेत्र। चिन्मयरूप देखावया ॥७॥ खेचरि वोळोनी कमान। अर्धोर्ध लावोनी बाण। हादव भेदली स्वरुप निधान। चहुंकडे ॥ ८ ॥ खोलोनी दसवे द्वार कवाड पटी। मन उन्मने परेचे तटी। आरुष दिसतसे जगजेठी। चहुंकडे ॥ ९ ॥ परेचे परेउपरी। उर्ध्वे गगनी लागली वैखरी। नाटोपति आनंदलहरी। समाधिसुखाच्या ॥ १० ॥ खोलोनी दसवे द्वाराच्या छिद्रा। जात बाहेर भेटी रामचंद्रा। योगीया लागली योगमुद्रा। चहुंकडे ॥ ११ ॥ चहुं देहाची साक्षणी। उभी गोल्हाट गगनी। अवस्था ते उन्मनी। भोगीती योगीराज ॥ १२ ॥ पवन मूळ नाभीकमळी। सेवटलीये सहस्रदळी। सोहंनाद लागली टाळी। योगीराजा ॥ १३ ॥ खेचरी उंच उंचावे। उन्मनी नयनी स्थिरावे। समाधीसुखा भावे। दिसो लागें ॥ १४ ॥ खेचरिचेनि लागवेगें। लंघोनी पश्चिमे मार्गे। घेतला चिन्मय दुर्गे। पर पर तेजें ॥ १५ ॥ आउट पीठातळी। भ्रमरगुंफेचे पाठारमाळी। चीन्मय मोती ढळाळी। महातेजें ॥१६॥ पायातळा तळ ब्रह्मपाणी। मस्तकाहुनी उंच गगनी। आदि-मध्या-अवसानी। त्याचा मार्ग न सापडे ॥ १७ ॥ स्वरुपें भेदलें गगन। ब्रह्मी तटस्त दोन्ही नयन। अखंड समाधी समसमान। भोगिती योगी ॥ १८ ॥ मनाची चंचळता। मुरडुनी स्वरुपी पडला गुंता। मीळुनी गेलें अत्मया अनंता। मन मुकले मनपणा ॥ १९ ॥

स्वरुप उभे तुर्येचे मेळे । अर्ध पर्वी अरुप खेळे । दसवे द्वारि ढळढळ उसळे । माहातेज ॥ २० ॥ ईडा पिंगळा शुशुम्ना मेळी । खेळे महा-तुर्येचे खेळी । मग सहज स्वरुपी लागली टाळी । योगीराजा ॥ २१ ॥ अजप जपाचे असनी बैसावे । मन मुरडोनि स्वरुपी मुरावे । गोल्हाट-मंडळ भेदुनी धावें । समाधीसुखाकारणे ॥ २२ ॥ देहेनगरातुनी आहे वाट । शडचक्राचा चढोनी घाट । सहस्त्रदळी समाधी आचाट । भोगीती योगी ॥ २३ ॥ सहस्त्रदळाचे शेवटी । पैल तुर्येचे पाठी । महाकारणाचे पोटी । चीन्मयमोती दिसताहे ॥ २४ ॥ नवाचे माझारी । अउट पीठाचे कळसावरी । गर्जे सोहंनाद मोहरी । स्वरुपधेनु पाहावया ॥ २५ ॥ अंगुष्टप्रमाण राजपत्र । मसुरप्रमाण सीका पवित्र । सनद दिधली स्वतंत्र । सद्गुरुने ॥ २६ ॥ अंगुष्टप्रमाण राजपत्रचिठी । वर लिहिली अर्ध पर्व दीठी । मसुरे प्रमाण शीखा सेवटी । स्वरुपराज्य दिधले सद्गुरुणे ॥ २७ ॥ त्रिवेनिचे महासंगमी । मसुर प्रमाण राउळधाभी । चिन्मय विठल दिसताहे ॥ २८ ॥ अर्धी ठानमुळ ॐकार मेळी । तेथील अष्टदळ कमळी । सोहंकार लागली टाळी । चिन्मयभोंवरा ॥ २९ ॥ त्रिकुट माहासिखरी । भ्रमरगुंफेवरी भीतरी । गगनगुंफेवरी । वस्तु कोंदली असे ॥ ३० ॥ सद्गुरुवानी बैसे गगनपाळी । वस्तु-कान ठेवी नयन खोली । अजपजपाची तागडी तोली । वस्तुचें ग्राहीक मिळेना ॥३१॥ अवकाश माहातेजी । अलक्षमुद्रा लागे सहजी । स्वरुपी मिळाला जीवी जिवाजी । सद्गुरुकृपें ॥ ३२ ॥ अलक्षमुद्रेचें लागतां ध्यान । तेथें हारपलें देहाचें देहभान । योगी स्वरूपी मिळुन । स्वरुपची होय ॥ ३३ ॥ वैखरी स्वयंभी सांपडले । परेचे पाठारी पेरिलें । पश्यंति ज्ञानवाफा उगवलें । मध्यमे पिक पिकले अपाडे । ज्ञानदेव ह्मणे ॥ ३४ ॥ इति ज्ञानदेवकृत्त संपूर्णमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



ताडपत्रावरील ज्ञात एकच मराठी ग्रंथ : कलानिधि

[म. सं. पत्रिकेच्या वर्ष १३ अं. १ मध्यें वरील मथळ्याचा लेख प्रसिद्ध करण्यांत आला होता. या 'कलानिधि' ग्रंथावर प्रा. श्री. शं. खानवेलकर, यांचा 'मराठींतील आद्यकथाग्रंथ' या शीर्षकानें एक लेख या पूर्वीच 'प्रोसीडिंग्ज् ॲन्ड् ट्रॅन्झॅक्शन्स् ऑफ् ऑल् इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स्, थर्टीन्थ् सेशन, नागपूर युनिव्हर्सिटी, ऑक्टोबर १९४६' मध्यें प्रसिद्ध झाला होता. त्यांतील कांहीं भाग येथें उद्धृत करण्यांत येत आहे.—कार्यकारी संपादक]

मराठींतील अगदीं जुना असा आज ज्ञात असलेला कथाग्रंथ म्हणजे "वैजनाथ कलानिधि" होय. हा सध्या भारतीय विद्याभवनाच्या विद्यमानें, भारतीय विद्याग्रंथावलिमध्यें मुंबई येथें छापला जात आहे. हा वैजनाथ नांवाच्या लेखकानें रचलेला आहे किंवा वैजनाथ नांवाच्या कोणा माणसाच्या ग्रंथलायांतील त्याच्या मालकीचा आहे याचा कांहीच उलगडा होत नाही, म्हणून तो 'कलानिधि' या नांवानेच छापण्यांत येत आहे. हा ग्रंथ, संस्कृत ग्रंथ, जुने गुजराती ग्रंथ व अपभ्रंश भाषेंतील ग्रंथ यांच्या संग्रहांत सांपडलेला असून त्याचा कांही भागच फक्त ज्ञात आहे. कारण या ग्रंथाची सुरुवात "अतां मुनि यज्ञ करित दीठले" अशी आहे. त्या अर्थी पूर्वीचा कांहीं भाग सांपडलेला नाहीं असें वाटतें उत्तर भागहि संपूर्ण नाहीं. त्यांतील शेवटचीं पृष्ठें सांपडलीं नाहींत. हा अरुंद ताडपत्रावर शाईनें लिहिलेला आहे. अशी अरुंद (तीन इंची) ताडपत्रावर लिहिण्याची पद्धति तेराव्या शतकाच्या पूर्वी चालू होती. त्यावरून व लिपीवरून हा तेराव्या शतकाच्या पूर्वी केव्हा तरी लिहिला गेला असावा असें वाटतें. शब्दांचीं रूपें, व्याकरण व वाक्यरचना यावरूनहि याचा रचनाकाल इतकाच मागें जातो. कीर्तनकाराची वर्णनपद्धति आणि ग्रंथांतील वर्णनपद्धति यांत फार साम्य आहे. संस्कृत व प्राकृत वाङ्मयाचा परिणाम या ग्रंथावर बराच झालेला दिसतो. यांतील वाक्यें लहान लहान असून मराठी भाषा आजहि थोड्या फार प्रयत्नानें कळण्यासारखी आहे.

कांहीं उतारे :—

एका ऋषीच्या वृद्धापकाळाचें वर्णन भाषा, आणि वाक्यरचना या दृष्टीनें पहाण्यासारखें आहे.

"[३] मुनि वृद्धदशा आलगिला। शापभएं जैसी कंपित प्रणयिनी जैसी केशग्रहण केलें। कापली जैसी भ्रमंगु केला, मातली जैसी आकुलित गतिः। प्रथम चुंवनी दांत पाडिले। ऐसी वृद्धदशा पातली। तपें मुनि जीकले मग पताका उभिलिया। तैसिया जीडे। नांतरिक्ष स्वर्गारोहणु करावेया पुण्याचिया बरता जैसिआ [।] अथवा वाढिनला जो तपोवृक्षु तेयाचिआ कुसुममंजरी, ऐसियां जडै उपैतु। ललाट हिमगिरी शिलापुंजु तिलकु त्रिपथगाथा गंगा जैसी। स्वेतां कलसांचिये राशी जवला राजहंसु तैसा स्फटिकु कमंडलु निकटु [।] करुणारसपूर्ण वक्षस्थल दीर्घिके राजहंस पंक्ति तैसी स्फटिकाक्षमाला। तो गिरी तैसा समेखलु। राहु जैसी आस्वादितसोमु। नक्षत्रराशि जैसा मृगकृतिका श्लेषोपशोभितु। जलधर समा जैसा प्रसमितरजः प्रसन्नु [रु]। हरि जैसा नरकांतकु। वडवानलु जैसा जलाहारू। शांतनु जैसा प्रियदेवव्रतु ॥ छ ॥ "

या वर्णनांवरून बाणभट्टाच्या शैलीची आठवण येते. पण त्या मुनीचें वर्णन वाचतांना लेखकानें बाणभट्टाच्या कादंबरींतील भगवान् जाबालीच्या वर्णनाचा थोडा फेर करून अनुवाद केला असावा कीं काय अशी शंका येते. तो मुनि कसा होता ?

[४] तृष्णा लता खंडन परशु जैसा। नां तरि संतोषामृत सागरु। सिद्धिमार्गा उपदेष्टा। उपशम तरूचें मूल। आचाराचें माइहर। धर्मध्वजाचा प्रासादु [।] सकला विद्यांचें संकेतस्थान। मोहार्णवा वडवानलु। सौख्यसुवर्णा कसवटी। स्मर त (रु) भूमि दावानलु [।] क्रोधभुजंग्य महामंत्रु। मोहांधकारा दिवसकरुं। कलिकालांचा वैरी। तपांचे भंडार [।] सत्याचा सखा। अधोमुखा चंद्रकला तैसिया भ्रूलता। नां तरि भारतीभवन द्वारिचीं तोरणें। जैसी हृदयशुद्धि तैसी

दंतप्रभा अथवा आत्मचंद्रप्रभा। नां तरि गंगेचे कल्लोल [।] जैसी अग्निचीं धूमशिखा। तैसी उदरी रोमरेषा। नां तरि ज्ञाननिराकृता मे (मो?) हाधंकाराची पाउलवाट। विद्यानदीचा संगमी आवर्तु जैसा नाभि। करकमली भ्रमरमाला तैसी रुद्राक्षमाला। अथवा आनंदद्रुमाचीं पुष्पें। गरुडु जैसा स्वभावें उपार्जिलें सकलद्विजाधिपत्य। संतोखकमलामोद-सेवित भ्रमर। जैसी कृष्णाजिनः ॥ छ ॥ "

कांहीं नव्या कल्पना घालून आणि कांहीं कल्पना गाळून हें वर्णन बाणभट्टाच्या कादंबरींतून घेतल्यासारखें दिसतें. प्राकृतांत–विशेषतः अर्धमागधींत–राजे, मुनि, राजवाडे, उद्यानें, मंदिरें, वनस्थली, ऋतु ह्यांचीं ठराविक सांच्याचीं वर्णनें करण्याची पद्धति आहे. त्यांतील एखाद्या प्राकृत वर्णनाचा हा अनुवाद असण्याचा संभव आहे. तें मूळ वर्णन कदाचित् कादंबरीवरून घेतलेलें असेल.

भाषापद्धति या दृष्टीनें पुढील दोन वर्णनेंहि पहाण्यासारखीं आहेत.

॥ ६ ॥ घोरस्व घोर अतिघोर महाघोर भीम भीषण। कराल विकराल दीप्त महादीप्त रौरय महारो (रय) प्रकंपन सूर्यमुख। कुंभीमुख। कुंभीपाक। अंगारराशि। पूर्यहृदा तीक्ष्णपाशि रतिद्रव मांसद्रव। सिंहासन गजाननः।

[१६] तेयां उद्यानीं वसंतु मूर्त्ति पातला। तेथ त्रिभुवन-विजौत्यागार्थ (?) मदनें प्रस्थान स्थापिलें। ते वलि पुंस्कोकिल निनादें ढाढी वाढिनली। विविध कुसुम मधुपरिमला मोदलुब्धें मधुकरीं चूत-विशेषीं मंगलगायनें केलीं। ते वीचि षड्भावा प्रस्थानां सारिका शुकादिकीं वंदीजनीं कीर्तिविस्तार केलें। चकोर चक्रवाक कलहंसु पद्मिनी लालस तास (म?) रस प्रियरस तारस निनाद सकू(त्क)वीचे श्लोक जालें॥ व्य(जे)थ मंदगति मनोहर नीलकंठ चतुरनर्तनोचित कोमल केकाकलाप विराजमान कलाप कनकतुंड विलासोल्लास तेथ सोज्वले किंसुकवनें त्रैलोक्य विजयार्थ अनंगें घातलीं।

उपसंहार

या ग्रंथांतील भाषा महानुभाव भाषापद्धतीची असून कांही शब्दांचीं रूपें ज्ञानेश्वरपूर्वकालीन प्राकृत व मराठी अशीं आहेत. राजे लोकांच्या कांहीं कथा, त्यांनीं केलेल्या यज्ञांचीं वर्णनें, ऋषींनीं केलेला उपदेश इत्यादि भाग या ग्रंथांत आहे. महानुभावांचा दृष्टान्तपाठ हा ग्रंथ जरी कथारूप असला तरी तत्त्वचिकित्सा करतांना दिलेले दृष्टान्त ह्या दृष्टीनेंच त्या ग्रंथाचें महत्त्व आहे. केवळ कथालेखन हा हेतु धरून लिहिलेला मराठींतील पहिला कथारूप ग्रंथ म्हणून 'कलानिधि' या ग्रंथाची योग्यता विशेष आहे असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

कृष्णदास नामाकृत

सुदामचरित्र

सं. ज. शा. देशपांडे

कृष्णदास नांवाचे अनेक कवि होऊन गेले. त्यांची एक यादी प्राचीन मराठी कविता खंड ३ रा यांत आढळेल. या कृष्णदासांमध्यें कृष्णदास सामा, कृष्णदास दामा व कृष्णदास नामा अशीं तीन नांवें येतात. कृष्णदास सामाची भागवत टीका आणि कृष्णदास दामाचें आदिपर्व हीं काव्यें अप्रकाशित आहेत. यांपैकीं आदिपर्वाचे कांहीं उतारे 'नवें नवनीत'मध्यें पाहावयास मिळतील. कृष्णदास नामीं या कवीबद्दल संदेहच वाटतो. एका कर्णपर्वाच्या प्रतींत कांहीं अध्यायांत कविनाम कृष्णदास नामा व कांहीं अध्यायांत विष्णुदास नामा असें येतें व हीं दोन्ही नावें एकाच कवीचीं आहेत कीं, हे दोन वेगळे कवि आहेत, असा प्रश्न उद्भवतो. विष्णुदासनाम्याच्या चक्रव्यूहकथेंत (प्राचीन मराठी कविता, खं. ३) कवि कधीं कृष्णदास तर कधीं कृष्ण असें स्वनाम गोंवतो. विराटपर्वाच्या एका त्रुटित प्रतींत सगळीकडे कविनाम कृष्णदासनामा असें येतें. जमेल तेव्हां विष्णुदास नाम्याच्या उपलब्ध विराटपर्वाशीं ह्या प्रतीची तुलना करून पाहावयाची आहे.

तंजावर येथें १०६ ओव्यांचें कृष्णदास नामाकृत सुदामचरित्राचें हस्तलिखित ८९० या क्रमांकाखालीं उपलब्ध आहे. याचें हस्तलिखित शके १६०२ चें असून बऱ्याच ठिकाणीं अक्षरें गेलेलीं आहेत. अशीं कांहीं अक्षरें अंदाजानें कंसांत घातलीं आहेत. या काव्यांत तीवासी, जमखाना (५८) इ. फारसी शब्द आढळतात.

महाराष्ट्र सारस्वतांत उल्लेखिलेलें सुदामचरित्र याहून वेगळें असून त्यांत आर्या व वृत्तें उपयोजिलेलीं असावींत. प्रस्तुत काव्याचें हस्तलिखित श० १६०२ चें आहे, तेव्हां हें काव्य निदान एकनाथकालीन आहे, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. आणखी अप्रकाशित कविता पुढें आल्यावर कदाचित् या कवीसंबंधीं अधिक माहिती उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

॥ श्री ॥

॥ श्री सुदाम चरित्र ॥

श्रीरामसत्यः ॥ आतां वंदुनी श्री गुरूराव । जेन्हे दिधला भक्ती भाव ॥ फेडावया अविदेचा[1] (टाव) । करूनि उपदेश ॥ १ ॥ स्रोता व्हावे सावधान । सांगेन कृष्णचरित्र गहन ॥ जेन्हे कलभक्ष[2] भर

१ अविद्येचा. २ किल्मिष

(क्षालन)। स्मरण मात्र केलियां ॥ २ ॥ कृष्णा सारिखा समर्थ सखा। परि ते कर्म बळीवंत देखा ॥ (भो?) गील्यावांचुनी न सोडी आयका। सुदामदेवा ब्राह्मणासी ॥ ३ ॥ मोडके खोपडे झरझरा। भुरभुरा येतसे वारा ॥ कुसु कैंचे आवारा। दाहिं दिशा मोकळियां ॥ ४ ॥ तेथ असे तया(ची) कांता। तीयेस नेसावया नाही सर्वथा ॥ सुदामदेवासी अनाचीं[3] चिंता। कही करणे नलगे ॥ ५ ॥ त्याहाच्या बाळा नाहीं अन्न। कहींचे लवन माखन ॥ अखंडभूमीचे शयन। उपवास करिती ॥६॥ ऐसा उपवासी पारण। परी चींतन न सोडी जगजीवन। दाहीं दिशा...विभण ॥ पोटाच्यिये काकुळती ॥ ७ ॥ घरी सदा गोष्टी करी। म्हणें माझा सखा नरहरी। (नां) दे द्वारकेभीतरी ॥ सदा सामराज्य करितु असे ॥८॥ तो माझा बाळपणीचा सांगाति। विद्या अभ्यासु केला येकें पंक्तीं ॥ गुरु दक्षिणा मागती। ते वेळे त्यान्ये काय केले ॥ ९ ॥ त्याचा (परा-क्र)मु थोरू। पंचत्व पावला कुमरू ॥ तो आणुनि पूजीला गुरु। मग तेथुनि निघाला ॥१०॥ तेणें कौशि[4] केसिया मारिला। उग्रसेनु राजि स्थापिला ॥ पांडवांचा शाहाकारी. जाला।... जोहरी रक्षीयेलें ॥११॥ काय सांगतां तयाचे समर्थपण। घरी पीडतसों वरोविन ॥ अ...या नाहीं चडुतपन। तरी तेथे का नवजा ॥१२॥ येरु-म्हणें कैसे परी जावें। काहिंतरि न्यावया...असावें ॥ रुखुमाई पुसेल स्व भावे। भाउजी काय आणिलें ॥१३॥ तव ईतुकीया अवसरी। काय करिति जालीनारी। पाहे तव अक्षता नाहि घरी। नीडळी ल्यावयासी ॥ १४ ॥ मग ते (सेजा)रनीचे घरासी गेली। मुष्टि येकु पौहे घेउनियां आली ॥ भटाचे पदरी गांठी बांधली ॥...तो निघाला द्वारकेसी ॥ १५ ॥ भटासि घरीहुनि निघता। शकुन जाले ते सांगेन आतां ॥ कळशु भरुनि माथा। दोघी नारी भेटलिया ॥ १६ ॥ तिसरी भेटली वेल्हाळा। कडिये सुत ...क्षेन बाळा ॥ बरवे रेखुनी त्रिपुंड टीळा। दोघेही द्विज भेटले ॥ १७॥ नगरा बाहेरी आ(ला)। तव उजवा काग रूपीं जाला। मनी थोर संशला॥ मग लवलाहे चालतु ॥१८॥नकुळ...भारद्वज तास। डावे जाउनी करिताति उल्हास ॥ ब्राह्मणे मानिला विश्वास ॥ सकुंत.. टी पाडीली ॥१९॥ नगराची सीव वोलांडिली। पाडसासहित कुरंगी वामभागी जा (ली) ॥ पुढे येक नारी अनुवादली। या जी या जी म्हणोनिया ॥२०॥ थोर संतोष मानिला मने। ...निर्मिला ब्राह्मणे ॥ तवं देखिली राउळ गणे। झळाळीत द्वारका ॥ २१ ॥ जैसे कोटी सूर्ये उगवले। तैसे सकळ देखिले ॥ सर्वांगीं रोमांच

३ अन्नाची ४ कंस

दाटलें । आले जळ लोचनीं ॥ २२ ॥ (ह्न) ने धन्य धन्य माझे जिणें । मी निवालो द्वारका देखुनी ॥ फिटले डोळ्याच पारणें...विद्र ताप हरले ॥ २३ ॥ म्हणें मी सुस्नात जालो । जेव्हां द्वारका पावलो ॥ हाची लाभु थोर...जाला । ऐसे जिवि भावित असे ॥ २४ ॥ स्वमनीचे गोष्टी करी । म्हणें मज कैसा वोळखे हा...हरी ॥ कैहीचा ब्राह्मण भीकारी । कहिची वोळखी काहडीतु असे ॥२५॥ परि येक अनुसंधान असे तेथें । जो ब्राह्मण भक्त म्हणवी आपणातें ॥ विप्र पुरोहित तेथें । आप...केले चालेल हा ॥२६॥ ऐसा विचारू करितु । सवेची मानातें आवरितु ॥ म्हणे तो कृपाळु अनंतु ॥ कैसे काय करीतु ॥ २७ ॥ ऐसी विवंचना करितु । सुदामा दारवट वोलांडितु ॥ तंव देखिला गोपीनाथु । सभामंडपी बैसला असे ॥ २८ ॥ बाप भक्त (वत्सल) रांव । च्यारी भुजा उचलुनि देव ॥ दीधले क्षेम सुदामयासी पाहा हो । ते सु-(भ)क्त जाणती ॥ २९ ॥ सुदामा कृष्णासी भेटला । तो मज कैसा गमला ॥ तंव तेजेसी मीनला । सवेंची... दो ठांई ॥ ३० ॥ माना ब्रह्मरसी वोतिला । कीं सुसी गुणीहुनी निवडिला ॥ तैसा देवआ भक्त देखिला । भक्तिच्यानि संयोगे ॥ ३१ ॥ आपुले आसनी बैसविला । हात स(वां)गी पुसीला ॥ दादोजी फार राडेला । मार्गु चालता आम्हालागीं ॥ ३२ ॥ तंव चरणकमळ प्रक्षाळावया । उदक आणीले रखुमाया ॥ आपुले स्वहस्ते कान्हया । अ...पातु सारितु ॥ ३३ ॥ बाप दैव सुदामयाचे ॥ कृष्ण दैवत त्रैलोकिचे । रुखमीन सहित अतिताचे ॥ पूजन करितु असे ॥ ३४ ॥ सोळा सहस्र अंतापुरें । उभिया राहोनी गवाक्ष द्वारे ॥ म्हणती पाहा हो पुण्य विस्तारले । पूर्विल कैसे ब्राह्मणाचे ॥३५॥ ब्रह्मादिका नलवे ईश्वरु । तो तपाते पुजी सारंगधरू ॥ जगीं दैवाचा हाचि थोरू । (पू) र्विल पुण्य कोण जाणे ॥ ३६ ॥ कृष्ण पुसे सुदामयासी । काय भातुके पाटविले वोहीनी आम्हासी ॥ ते द्यावेजी परियेसी । कृपे करुनि बोलिला ॥ ३७ ॥ तंव सुदामा...याते । पाहुं लागला खालते ॥ तव बोली धाफली अनंते । मग गाटोडी सांपडली ॥ ३८ ॥ बाप भक्तवछळ राव ॥ पोहे करीं घेउनीयां देव ॥ म्हणें दादोजी प्रीति भावें । भावे भल (ते...)...द्या आम्हा लागी ॥ ३९ ॥ पहिली पुर्णाहुति घेतली । दुसरी रिद्धि सिद्धि दिधली ॥ तिसरी रखुमाया धरिली । विचारा जी म्हणतसे ॥४०॥ हे तव वेदविद ब्राह्मण । या (चे) घेउ नये उसिन ॥ कैसे कोरडे कन । मटमटा खात असे ॥ ४१ ॥ मग त्या पाठीमोऱ्या हांसती । राउळ रुचिले आहेति ॥ अमृताचि आली विकृती । म्हणौनि पालटु केला ॥ ४२ ॥

आतां असो हे पुसु गाविची वेवस्ता । तरी उसीरू होईल आतां ॥ प्रसाद करू समस्ता । मग सुखे गोष्टि करूं ॥ ४३ ॥ वेगी पडदनी दादोजीसी । भावजया म्हणती सुदामयासी ॥ धोतर फेडावेजी वेगेसी । पडदनी द्या म्हणताती ॥ ४४ ॥ मग चापेले सु(प)रमळे । माथा चर्चीतांति निवतिल डोळे । कृष्णाचे सेवक जवळे ॥ आंग-मर्दना करिताती ॥४५॥ वेगी चर्चीली चोखणी । संवेची सारिले पाणि ॥ उष्ण उदक (आ)नुनी । सुदामदेवाते न्हानीती ॥४६॥ मग देवांगणें वस्त्रे आनविली । सुदामदेवासी परिधान केली ॥ आसन निघातली । नीतनेम सारिला ॥ ४७ ॥ पंचा यज्ञ पूजा सारिली । तुळसी साळग्रामासी वाहिली ॥ तव भीतरी ताटे जाली । रखुमाया जानविले ॥ ४८ ॥ करा जी पांतिकरा हाकारा । अक्रूर निघाला बाहेरा ॥ बोलाविले यादववीरा । जेवाया लागुनी ॥४९॥ मग वऱ्हीले ताटी सुदामदेव । वाढीला येरा ठाईंचा डाव ॥ काहीं करणें नलगे संदेह । आप आप बैसले ॥ ५० ॥ कृष्णासारिखा स(म)र्थ सखा । प्रतक्ष वाढिते रखुमाई माता ॥ तेथे उपमा काय देणें आतां । ते स्रोते व्हावे सावधान ।५१। जेथें ब्रह्मरसाचीया मांदुसा । अमृत-घटपूर्ण कळसा ॥ घारिया पूरिया वडुरिया राजसा । देखुनी मण बोधतु असे ॥ ५२ ॥ शुद्ध सा(ळी)चा भातु । मोगरीयाचा झेला मिरवतु ॥ चोखटपणे दिसतु । चंडु जैसा ता(रका)मध्ये ॥ ५३ ॥ नक्षत्राचिया प्रभावळी । तैशा पत्रशाखेच्या वोळी ॥ लेहेपेहे... ॥ मध्ये घृतवाटिया भरलिया ॥ ५४ ॥ घडीया वाढीताती मांडीयाच्या । कान...काहाडुनी तयेच्या ॥ जेविताती अमृताच्या । डुल्लताती पुरे पुरे म्हणौनियां ॥ ५५ ॥ (पे)से अमृताहार जेवणें । तेथें कैहीचे आचमणे ॥ आत्मज्ञानीया कारणें । काहीं.. ने नलगेची ॥ ५६ ॥ परी हे वेव्हारसंपादनी । पांति उटली जेउनी ॥ सुवर्णकळस (भ)रूनि । उष्ण उदक आनविली ॥ ५७ ॥ मग गादीया तीवासीया जमखानें । मुडेच ...उरी वरी टेकनें । कस्तूरी उटी देउनि चंदनें ॥ वरी वींजणे जानविती ॥ ५८ ॥ जैसी (सु)वर्णाचि तगटे । तैसी पानें अती चोखटे ॥ कापुर घालुनी सुपारी पुढे । आणूनी (ठे)विलिया ॥५९॥ सुदाम देवासी आपुलीया माने । विडा दिधला जगजीवणें ॥ येरा पां(ति)करा कारणे । परहस्ते विडे देताती ॥ ६० ॥ विडे जालीया समस्ता । आज्ञा पुसती कृष्णनाथा । वेगी बीजु म्हणें अनंता ॥ सुदाम देवासी येकांतु ॥६१॥ तुम्हा वृतिं भूमीका अर...कनकरवटे । पीकति कि न पिकति ॥ राजे पाळीती कि न पाळीती । ते आम्हाप्रति(सांगा)वे ॥ ६२ ॥ देवा आम्हा

वृति भूमीका काय कैसी। जेथे पिकताती पुन्नियाच्या राशी। तु कृपा(लु) रूपीकेसी। म्हणौनी मीं सांगु आलो ॥ ६३ ॥ देवा तुझा पाखावा असे जाण। ते चिर बाळका जीवन ॥ मज लागले तुझे ध्यान। तेणें तृप्त सदा असे ॥ ६४ ॥ दादोजी धाकुटपणीचीया गोष्टी। आठवति गुरू सुश्रीकासी पाटविति ॥ तेथें लागले पाणी स जालीनीसी। ते बळ काय जाणे ॥ ६५ ॥ ते अवदशेभीतरी। वांनर भेटला करणी करी ॥ आम्ही कष्टलो जी भारी। दैतकुळ वधीता ॥ ॥ ६६ ॥ दुष्टा जरासंधा भीने। समुद्रि न(गर)(व)सविले गहणें ॥ तोहीं आप खर्ग आपणे। आप हस्तेची मेला ॥ ६७ ॥ जे जैसे कर्म करिति। ते तैसे फळ पावती ॥ लोक आमुते नीमीत्त ठेविती। अज्ञानपणें ॥ ६८ ॥ आतां भा(ग)लेति उसीर जाला। आपण कृष्ण अनुवादला ॥ पैल भोवर पलंग पासोडीला। ते(वरी) शयन करावे जी ॥ ६९ ॥ जैसा क्षीरसागरी उपमन्यु। तैसा पहुडला ब्राह्मणु ॥ अ...कृष्ण जगजीवनु। काय करिता जाला ॥ ७० ॥ विश्वकर्मा पाचारिला। तया निरोपु दिधला ॥ सुदामपुरासी जावे वहिला। रचना करावयासी ॥ ७१ ॥ जैसी द्वा(रके)ची उभवनि। त्याहीपरीस करावि चढवनी ॥ सवें रिद्धि सिद्धि देउनी। तयासि पाटवले ॥ ७२ ॥ तव ईतुकिया अवस्वरी। ब्राह्मण राहिला दिवस दोनी च्यारी ॥ कांहीं देईल मुन्हारी। म्हणौन असे लागला। ७३॥ त्यान्हे दिधले ते कहीच न सरे। परी अज्ञानपण स्मरे ॥ ध्रुव प्रल्हाद वेव्हारे। त्याहुनी स्थीर केला ॥ ७४ ॥ म्हणें बहुत दिवस लागले येथें। दादोजी काहींच नेंदि आमुतें ॥ कुटंबे अवसर करिती तेथें। आतां आ(पण) मागुं म्हणें। ७५ ॥ सुदामा म्हणें कृष्णासी। गांवा पाठविजो जी आम्हांसी ॥ वेगी वी (जे?) म्हणे वोहीनी। वाट पाहत असतील ॥७६॥ कृष्णे सुदामा धरिला करीं। बोलावित निघाला बाहेरी ॥ दादोजी गांवां जावे बरवेपरी। आमते चित्ति असुं द्यावे ॥ ७७ ॥ येर येराचे प्राण। वेगळे जाले दोघई जन ॥ हृदई धरुनि कृष्णचरण। मग मार्गी (नि) घाला ॥ ७८ ॥ वाटे जाता विचारू करी। मज कांहींच नेंदिच मुरारी ॥ आतां नुस्ती...ति घरी। रीघावा कैसा होईल ॥ ७९ ॥ दिवसा दोचा स्वयपाक देता। तरिआ...घारी रीघावा होता ॥ स्त्रीयेचा कोप शमता। पुढे राज्य असे ॥ ८० ॥ मज घरीहुनी (नि)घता सकुन जाले। ते अवेवेचि व्यर्थ गेले। परी येक उपकारी लागले ॥ जो सखा कृष्ण भेटला ॥ ८१ ॥ उदेग उपजले मनासी। वेगडी पडतसे पायासी ॥ चाचरी-जातसे व...रयासी। पडतु पडतु सावरी ॥८२॥ होता भक्तीचा जिव्हाळा।

तो आठवला तये वेळा। हृदई धरुनि मेघसावळा ॥ तेणें सावधु पैं जाली ॥८३॥ म्हणें नेदिसी राज्यसंपती ॥ हे बरवे केले लक्ष्मिपति। आतां उपजेल तुझी भक्ति। तुझे चिंतन घडेल ॥८४॥ नाही तरी धन जातो अपारू। थोर पावतु अहंकारू ॥ तु कृपेचा सागरू। म्हणौनि मज तारिले ॥ ८५ ॥ तव पुढे द्वारकेसमान। गाव देखिला गहन। थोर भ्रमित जाला ब्राह्मण। दाहीं दिशा पाहतसे॥ ८६ ॥ म्हणें मी मार्गु चुकलो। कीं अनु मार्गीं पडलो...॥ कीं भोवता भोवता आलो। मागुती द्वारकेसी ॥ ८७ ॥ तव पुढे गाई म्हैसी। पशुवा चरतीसी गुरवासी ॥ सुदामा गोपाळा तेवीची पुसी। हे क्षीरारे कवणाची ॥ ८८ ॥ गोपाळ म्हणती गा ब्राह्मणा। सुदामा कृष्णाचा सखा जाणा ॥ तयाची क्षीरारे कां तु म्ह(णा)। मग आमुते काय पुसतसा ॥ ८९ ॥ हो गा त्या कृष्णे तैसेचि केले ॥ तुम्ही हासत तैसे...जाले। आमुचे मानुसपण गवाविले। आपली भेटी देउनियां॥ ९० ॥ तंव नगरांत गुढिया तोरणे। आनंदे वाजती वाद्यध्वनी ॥ वाट पाहती सकळै जणे। सुदामदेवाचे घरीच...॥ ९१ ॥ नगरीचे लोक सामोरे आले। आणि सुदाम देवासी भेटले ॥ थोर संभ्रम करिते जाले। सखा कृष्णाचा म्हणौनी ॥ ९२ ॥ सुदामा बैसविला पालखीसी। घेउनी आले राज्य-भुवनासी ॥ गजरू होताहे तुरेसीं। वोवाळनिया पडताति ॥ ९३ ॥ (घे)उनी अक्षवाणें। आली पतिव्रता सीरोमणि ॥ सुदामदेव नोळखे ब्राह्मणी। मग (ट)क्मका पाहातुसे ॥ ९४ ॥ देखुनीयां उपरिया ढवळारे। रत्नखचिते दामोधरे ॥ तेथे वोलु नये आंधारे। रत्नदीप लागले ॥ ९५ ॥ जेथे स्राडेपंधराच्या भीति। (दी)पसाळे असे निगुती ॥ मानिक मोती मिरवति। विश्वकर्म्यानें निर्मिली...॥ ९६॥ इंद्रनिळाचे प्रकाश। तेणें तेजे मिरवे आकाश ॥ खणोखणी मोतियाचे घोष। जैसी नक्षत्रे उगवली ॥ ९७ ॥ पौर्णिमेचा चंद्र जैसा। दिसे घरामाजी कळस तैसा ॥ किर्न फांके दाहीं दिशा। अमृतवर्षाव होतु असे ॥ ९८ ॥ तेथें सडक चवरे मानिक मोती। रिद्धि सिद्धी प्रसवती ॥ काय ल्याली सौभाग्यवती। सुदामदेवाची भार्या ॥ ९९ ॥ लेईली हळवटचि लेणें। करी मेढासुर काकणे ॥ अंदु पायेवटे रुण झुणें। आणि जोडवी विरोदिया ॥ १०० ॥ श्रवणी नवरत्नाची कुंडळे। वरी बांधली मुक्ताफळे ॥ नादिया भोवरिया पनकेस्वरे। तेज झळाली हिरयाचे ॥ १०१ ॥ गळा तियाचि येकावळी। पदकु चिंत (मणी) येकु झळाली ॥ तेजे वेगळाली। मिरवतु ॥ १०२ ॥ ल्याली

पिवळी काचोळी । क्षीरोदकु वेढिली वेल्हाळी ॥ सुदामदेवाते वोवाळी । जैसी कृष्णाते रखुमाई ॥१०३॥ बाप करणी समर्थाची । दैन्य फेडिली ब्राह्मणाची ॥ नगरी दिधली सुवर्णाचि । येके पोहेकारणे ॥१९४॥ देवा तुं गुप्त दान देसी । कृष्णा हृषिकेसी ॥ कृष्णदास नामा म्हणे परियेसी । कृष्ण दाळिद्रभज्जन ॥ १०५ ॥ सुदामदेव चरित्रकथा । पुण्य पावे परीसता ॥ दाळीद्रभज्जन होये आतां । कृष्णचरणासी भेटी होये ॥ १०६ ॥ सुदामदेवचरित्रसंपूर्णमस्तु । तथास्तु ॥

शके १६०२ रौद्रिनाम संवत्सरे तिथ पौष वद्य चतुर्दशी १४ त दिने लेखितं पुस्तक त्र्यंबक आडीकीन्यानेची ॥ च ॥

॥ श्रीरघुनाथार्पणमस्तु ॥

एक अज्ञात कवि : हरदास

नारायण बळवंत जोशी, विजापूर,

डिसेंबर १९६४ मध्यें संगमनेर येथें कांहीं कामानिमित्त गेलों असतां पोथ्या वगैरेंचा एक गळाठा पाहावयास मिळाला. त्यांत आद्यंतींचीं बरींच पानें फाटलेलें एक बाड व कांहीं सुटीं पानें मिळालीं. एक दोन लहान लहान प्रकरणांच्या पोथ्याहि मिळाल्या. तीं नीट तपासतां त्यामध्यें आजपर्यंत अज्ञात असे कांहीं लेख व लेखक-कवीहि असल्याचें आढळून आलें. त्यापैकीं कांहींच्या बद्दलची टांचणें आपले पुढें ठेवीत आहे.

वर ज्या बाडाचा उल्लेख केला ती एक उभी वही असून तिची सुरवातीचीं व अखेरचीं बरीच पानें-निदान पन्नास पाऊणशें तरी-नष्ट झालीं आहेत. उरलेल्या भागामध्यें पांच सहा कवींचीं पदें व छोटीं प्रकरणें आहेत. ही वही कोणा एकाच्याच हस्ताक्षरांत नसून चार पांच निरनिराळ्या लेखनिकांनीं केलेल्या नकला आहेत. हरदास नामक कवीच्या कृतींना त्यांत प्राधान्य असून त्याच्या पुरुषोत्तम नांवाच्या शिष्याच्या लिखाणास त्याच्या खालोखाल जागा दिलेली आहे. याच वहींत शाहीर फतनजीचा अफझुलखानाच्या वधाचा पोवाडा आहे. आजपर्यंत अगिनदास अथवा अज्ञानदासाचा या विषयावरचा पोवाडा माहीत होता. आतां हा एक नवा पोवाडा उजेडांत येत आहे. पण त्या पोवाड्याविषयीं या लेखांत कांहीं लिहिणार नाहीं. तो एक स्वतंत्र विषय आहे.

ही, वर नमूद केलेली, वही निदान दीडशें ते दोनशें वर्षांची तरी जुनी असावी असें वाटतें. या वहींत मध्येंच रिकाम्या जागेंत पांच सहा ठिकाणीं मोडींत आधुनिक वळणाचा व निराळ्या शाईत कित्याचा मजकूर असून एका पानावर कार्तिक शके १७५१ चा निर्देश मोडीमध्यें केला आहे. वहींतील मूळ मजकुराच्या अक्षरांचें वळण, लेखनपद्धति यांचा विचार करतां ही वही शके १७०० च्या सुमाराची असावी असें दिसतें. त्यांतील मजकूर हा अर्थात् त्याच्याही पेक्षां जुन्या काव्यांच्या नकला आहेत. या सर्व गोष्टींचा सामग्र्यानें विचार करतां वहींतील कविता निदान शके १६२५ ते १६७५ च्या दरम्यानच्या असाव्या असे अनुमान केल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. या वहींतील सामुद्रिक हें प्रकरण कोणा येधोजी गडगावन यानें लिहिलें असून तें गीत ऐकणाऱ्यांत रामदास होते असें म्हटलें आहे ! हे रामदास प्रसिद्ध रामदासस्वामीच असतील तर त्या प्रकरणाची रचना शके १६०३ मधील अथवा त्याचेहि अगोदरची मानावी लागेल.

नकलकार अशिक्षित दिसतात; त्यामुळें भाषेच्या व शब्दलेखनाच्या बऱ्याच चुका आढळतात. मात्र एकंदर कवितांचा विचार करतां त्या नकला हरदासाच्या परंपरेंतील लोकांनींच केल्याचें दिसते. तूर्त या वहींतील सर्वच प्रकरणें व कवि यांचेसंबंधी न लिहितां फक्त हरदासासंबंधीच अगदीं त्रोटक माहिती व त्याच्या कवितांची ओझरती ओळख करून देणार आहे.

हरदास अथवा हरिहरदास याच्या चरित्रपर अशी कांहींच माहिती मिळत नाहीं. याच्या ग्रंथांचा, अथवा पोवाडे, लावण्या, पदें या पैकीं कशाचाहि ठावठिकाणा संशोधकांना अद्याप तरी मिळाल्याचें दिसत नाहीं. श्रीरामदासी संशोधनाच्या ३९ व्या बाडांत हरिहरदासाच्या पवनविजयाचा उल्लेख असून त्यांतील ५ व ६ अशा दोन दोन ओव्या तेथें दिल्या आहेत. पण तो ग्रंथ या बाडांतील कवि हरिदास अथवा हरिहरदासाचा वाटत नाहीं. या वहींत कोठेहि नृसिंहास नमन नाहीं. श्री. रा. चिं. ढेरे यांना एक हरिहरदास मालोची पवन-विजयाची त्रुटित पोथी मिळाली आहे; पण तीहि या हरिहरदासाची दिसत नाहीं. या वहींतील हरदासाची रचना पहातां त्यांत पदें व श्लोकच आहेत, ओंवीबद्ध रचना असणारें काव्य एकहि नाहीं

या बाडांतील कविता वाचून एक गोष्ट स्पष्ट होते कीं हरदास हा एक संत कवी होता तसाच शाहीरहि होता. त्याचा तसा स्पष्ट उल्लेखहि या बाडांतील कांहीं रचनांत आहे. शाहिरी वाङ्मयांत हरदासी वळ (ओळ) प्रसिद्ध आहे.*

* भा. इ. मं. च्या पाक्षिक सभेंत ही बाब श्री. य. न. केळकर यांनीं निदर्शनास आणिली. त्याचप्रमाणें श्री. म. ना. सहस्रबुद्धे यांच्या "मराठी शाहिरी वाङ्मय" ग्रंथांत पान २९ वर या हरदासाच्या परंपरेंतील शाहिरांचे याच्यासंबंधीचे उल्लेख आले आहेत.

मनोरंजक शाहिरी वाङ्मय साधारणतः अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील मिळतें, त्याचे अगोदरचें मिळत नाहीं असें श्री. म. ना. सहस्त्रबुद्धे म्हणतात (पान ७२–७३). आतां या लेखावरून व बाडांतील पदांवरून अठराव्या शतकाच्या अगोदरचें वाङ्मय उजेडांत येत आहे.

या हरदासाच्या रचनांची आतां त्रोटक माहिती देत आहे. हेतु हा कीं, संशोधकांचें याच्या काव्याकडे लक्ष्य वेधावें. या त्रुटित बाडांत खालील काव्यें आढळतातः–

१. अजपा पिंडींची ९ पदें.–पानें फाटल्यानें त्रुटित.

२. अजपा ब्रह्मांडीची. ११ पदें–पानें फाटल्यानें त्रुटित. पण वरीलपेक्षां जास्त सुस्थितींत.

३. पांची तत्त्वें—७ पदें.

४. सुंगीचें पद– ४ पदें. यांत अखेरचा पारमार्थिक अनुभव आहेः—

अनेक मार्ग अनंत पंथ ॥
वीवेक विवर अर्थ परमार्थ ॥
समरस वेद साखें ग्रंथ ॥
हरदास म्हणे समर्थ सतिगुरुराजा ॥ ४ ॥

५. सुलताण का सफर–५४ पदांचें हिंदी प्रकरण.

" बोले हरदास स्याहिर । पुरसोत्तमपीर । दस्त पंज्या दीये" ॥५४॥

६. गोपीवस्त्रहरण– लावणीच्या चालीची २९ पदें. यामध्यें चंद्रवदना गवळण नायिका आहे. ती कृष्णास वश न झाल्यानें वस्त्रहरणाचा प्रसंग उद्भवला असें यांत दाखविलें आहे. काव्य फार सुंदर आहे.

७. राधारुक्मिणीसंवाद–पदें ११.

रुक्मिणी शृंगार करून कृष्णाची मार्गप्रतीक्षा करीत असते. पण तो वृंदावनांत गेलेला लवकर येत नाहींसें पाहून ती राधेस त्याला बोलावून आणण्यास पाठविते. राधा कांहीं कालानें परत येते. राधेकडे पाहून रुक्मिणीस यावयाचा तोच संशय येतो व ती राधेस छेडते असा प्रसंग यांत वर्णिला आहे. यांत अपह्नुति अलंकाराचीं सुंदर उदाहरणें आहेत. काव्य फार बहारीचें आहे.

८. अनुसया आख्यान—१८ पदें. यांत दत्तजन्मकथा आहे.

९. अंगदशिष्टाई—दोन प्रसंग. पहिल्या प्रसंगांत २५ पदें व दुसऱ्या प्रसंगांत ३२ पदें.

"एथन सुंदरकांड संपले। मग येउधाकांड आरंभलें॥ जे कां वालमीकें कथीलें। तें म्हणे हरिहरदास॥ ३२॥"

–यावरून यानें सबंध रामायण रचिलें असावें असा संशय येतो.

१०. रामकीर्तन – यांत रामरावणयुद्धाची कथा ३० पदांत वर्णिली आहे. कवीनें रावणाचा वध न घडवितां तो युक्तीनें पळून गेल्याचें दाखविलें आहे.

"न साहवे सेत्रमार मेणे मुरडला लंकापती। केली माव पळाला राक्षेस॥ मागे परतले आदिपुरुस। म्हणतसे हरदास आईका रामकीर्तण॥ ३०॥"

–या आख्यानांत वाल्मिकीरामायणापेक्षां कांहीं निराळी कथा आढळते.

११. निराकाराची खूण—११ पदांचें प्रकरण. यांत स्थूळ–सूक्ष्म–विचार सांगितला आहे व शेवटीं म्हटलें आहे :—

"अहीसी सांगितली वेदांतील खुन।
आईका हो सुरतेनो तुम्हां सांगितले गुजज्ञान॥
म्हणें पुरुमोत्तमा हे काय नीराकाराची खुण।
म्हणे हरिहरदास लटका सांडाना अभिमान॥ ११॥"

–निराकाराची खूण दाखवितां येत नाहीं, सर्व अगम्य आहे, त्याचा फक्त अनुभवच घ्यावयाचा आहे, त्याकरितां अहंकार नष्ट करावा लागतो, शब्द स्तब्ध होतात, हें कवि आपल्या शिष्यास–पुरुषोत्तमास–यांत सांगत आहे.

१२. दिवा– २ पदें. ज्ञानाचा दिवा लावून निजवस्तु शोधा, असें यांत सांगितलें आहे.

हरदास अथवा हरिहरदास हा प्रथम उत्तम लावणीकार आणि शाहीर असावा. शाहीरकवींना आध्यात्मिक विषय वर्ज्य होते असें मात्र नाहीं. कलगीतुऱ्यांच्या स्पर्धांत अध्यात्माची चर्चा केली जाते, हें प्रसिद्धच आहे. अशा कवींना संतकवींच्या मालिकेंत गोवतां येईल किंवा काय, असा संभ्रम उत्पन्न होतो. हरदासाच्या चरित्राची आणि ग्रंथरचनेची संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्याशिवाय आणि त्याच्या कवितेचा सामूहिक ठसा अजमावल्याशिवाय त्याची संतकवींत गणना करावी कीं शाहीरकवींत गणना करावी, याचा निर्णय घेणें, कठिण आहे.

[भारत इतिहास सं. मंडळाच्या १९६५ च्या जून महिन्यांतील सभेपुढें वाचलेल्या निबंधावरून]

श्रीकृष्णचरित्रांतील कांहीं शब्द

देवीसिंग व्यं. चौहान

सदस्य, लोकसेवाआयोग, मुंबई.

श्रीकृष्णचरित्र हा ग्रन्थ महानुभावीय वाङ्मयापैकीं एक जुना गद्यग्रन्थ आहे. तो प्रथमतः श्री. अ. का. प्रियोळकर यांच्या प्रयत्नानें व पुरस्कारामुळें मुंबई येथून प्रकाशित होणाऱ्या मराठी संशोधनपत्रिकेंतून खंड ३,४ व ५ मधून (शके १८७७) प्रसिद्ध करण्यांत आला होता. अलीकडे शके १८८१ मध्यें तो पुस्तकरूपानें प्रकाशित झाला आहे. या ग्रन्थाच्या कर्त्याबद्दल विद्वानांमध्यें मतभेद असला, तरी म्हाइंभट या श्रीचक्रधरांच्या लीळाचरित्रकाराकडेच त्याच्या ग्रन्थकर्तृत्वाचें श्रेय देण्याकडे विद्वानांचा कल दिसतो (पाहा– शं. गो. तुळपुळेकृत, ॲन ओल्ड मराठी रीडर, शके १८८२, पृ. १७२). प्रकाशित ग्रन्थारम्भींही कंसांत 'महेन्द्रभट्ट संगृहीत' असें म्हटलें आहे. ग्रन्थकर्तृत्वाच्या मतभेदाचा प्रश्न बाजूस ठेवून, मूळ ग्रन्थाकडे पाहिलें तर, श्री. प्रियोळकरांनीं प्राध्यापक डोळके यांच्याशीं सहमत होऊन, सांगितल्याप्रमाणें "एक प्राचीन मराठी गद्य ग्रन्थ या दृष्टीनें मात्र श्रीकृष्णचरित्राचें मूल्य फार मोठें आहे" असें दिसून येतें. लीळाचरित्र, रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध इत्यादि जुन्या महानुभावीय साहित्यांत या चरित्राला मानाचें स्थान आहे. शिवाय हा ग्रन्थ गद्यांत असल्यामुळेंहि त्याला आगळें महत्त्व येतें.

महानुभवीय वाङ्मयाचे संशोधक व संग्राहक श्रीक्षेत्र ऋद्धिपूरनिवासी महन्त गोपीराज यांच्या प्रयत्नानें हा ग्रन्थ मराठी अभ्यासकांच्या समोर येऊं शकला, परंतु प्रकाशित ग्रन्थ अपूर्ण आहे. महाराजांनीं सवड मिळेल तशी पोथीची नक्कल केली. परंतु नकलण्याचें काम पूर्ण होण्याआधींच मूळ पोथी त्यांना मालकास द्यावी लागली. अपूर्ण कां होईना हें चरित्र प्रकाशित झालें.

येथें ही गोष्ट नमूद करणें योग्य होईल कीं, या प्रकाशितग्रन्थांत पृ. ७३ वरील ओळ २० पासूनचा सर्व मजकूर व पृ. ७४ हें पुनः पृष्ठ ७५ व ७६ वर पुनरावृत्त झालेलें आहे. ही भीम-दर्प-हरणकथा आहे. हें पुनरावर्तन चालू नक्कलकारांच्या हातून व त्यांच्या पूर्ववर्तीयांकडून झालेलें असावें. पृ. ७३–७४ पृष्ठावरील लिखाणापेक्षां पृ. ७५–७६ वरील लिखाण अधिक स्वीकार्य वाटतें. शिवाय पृ. ७४ वरील लिखाणांत ओळ २९ वर द्यावयाची मूळ प्रतींतील एक ओळ व वाक्य नकलण्याचें राहून गेलेलें आहे.

हें प्रकाशन आहे; संपादन नव्हे. पुस्तकाच्या शेवटीं डॉ. कृ. भि. कुळकर्णी यांचा एक कठीण शब्दांचा कोश जोडलेला आहे. या कोशांत शंभर सव्वाशें कठीण शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. पुष्कळशा शब्दांचे दिलेले अर्थ यौगिक स्वरूपाचे आहेत. हा ग्रन्थ जुना, साडेसहाशें वर्षांपूर्वीच्या मराठीचा भाग आहे. हें लक्षांत ठेवून शब्दांच्या अर्थनिश्चितीचा प्रयत्न व्हावयास पाहिजे होता. असा प्रयत्न झालेला नाहीं, असें म्हणावेसे वाटतें. जुन्या मराठींतील शब्दांच्या अर्थनिर्धारणांत व्युत्पत्ति-शास्त्राचा उपयोग आवश्यक व अपरिहार्य आहे, हें लक्षांत बाळगणें अगत्याचें आहे. शब्दकोशांत दिलेल्या शब्दांच्या चुकीच्या अर्थांची किंचित् चर्चा पुढें देत आहे. पहिला अंक पृष्ठाचा व बिंदूपुढील ओळीचा आहे.

पारशदु (१·२७) :—या शब्दाचा अर्थ कोशांत सेवक असा दिलेला आहे. परंतु हा कसा निष्पन्न होतो याचा उल्लेख केलेला नाहीं. पुढील पानावर पारखद (२·८) व पार्खद (२·११, १४, १६) असे शब्द आलेले आहेत. यांचा अर्थ दिलेला नाहीं. दोन्ही शब्द एकच कीं वेगवेगळे याचाहि निर्देश नाहीं. शेवटच्या चार शब्दोल्लेखांवरून हें स्पष्ट होतें कीं, ब्रह्मदेवाचे सात पारखद होते. ते सभेंत बसलेले होते. त्यांना ब्रह्मदेवाच्या विचलित मनोवृत्तीची चाहूल लागली व ते कुजबुजले. या तपशीलावरून ते ब्रह्मदेवाचे सामान्य सेवक होते असें म्हणता येत नाहीं. वस्तुतः पारशद, पारखद व पार्खद हे तिन्ही शब्द संस्कृत पारदृश्वा या शब्दाचीं किंचित् उच्चारभेदानें झालेलीं प्राकृत रूपें होत. दृश्वन् या शब्दांशांचे प्राकृतीकरण होऊन श् चा ख झाला. तो उच्चारसौकर्यार्थ अगोदर आला व 'द' अंतीं आला, 'ऋ' चा लोप झाला. तसेंच 'व' चाहि लोप झाला. श चा ख विकल्पानें झाल्याची साक्ष येथेंच मिळते त्याच्यामुळें दोन्ही शब्दांच्या अभिन्नत्वाची व सगोत्रत्वाची खात्री होते. सात पारदृश्वे यांची कल्पना प्राचीन भारतीय जीवनांत फारच दृढमूल झालेली आहे. हा कल्पनाविलास नव्हे. मनुसप्तर्षि या धर्माधर्मनिर्णय करणाऱ्या संस्थेचें वर्णन स्वर्गीय के. ल. दप्तरी यांनीं आपल्या 'औपनिषदिक जीवनसौख्य' ग्रंथांत केलेलें आहे. येथें सांगावयाचा मुद्दा एवढाच कीं, पारशद वा पारखद हे ब्रह्मदेवाच्या सभेंतील पारदृश्वे सात ऋषि होत. ते मरीचि 'महर्खीचे पुत्र' (२·८) असेंहि तेथें सांगितलेलें आहे. यावरून या शब्दार्थांची अडचण वाटूं नये. ज्यूल्स ब्लोक आदि विद्वानांनीं पारखणे शब्द परीक्षपासून व्युत्पादिलेला असला तरी यांतील पाचे दीर्घत्व कसें आले याचा उलगडा होत नाहीं. ही अडचण पारखद शब्दापासून तो व्युत्पादिला तर राहात नाहीं, अर्थहि जुळतो हें तज्ज्ञानीं विचारांत घ्यावें. त्याला हा इतिहासहि पुष्टि देत आहे.

भडखळ (५·३४) :—या शब्दाचा 'बलाढ्य' अर्थ कसा होतो, हें समजत नाहीं.

असा अर्थ देण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. आजच्या भारतीय राष्ट्रभाषा हिन्दी व तिच्या शैलीरूप उर्दूच्या पूर्ववर्ती दक्खिनी हिन्दी या फार्सी लिपींतून लिहिल्या गेलेल्या भाषेंत भडकल हा शब्द नेहमीं वापरला जातो. त्याचा अर्थ मोठा दरवाजा असा होतो. औरंगाबाद शहरांतील सूबेदारी विश्रामघामाजवळील मोठ्या वेशीला भडकल दरवाजा असें नांव आहे. विशेषतः किल्ल्यांच्या मुख्य द्वाराला हा शब्द लाविलेला दिसून येतो. इंग्रजी कालाच्या आरंभीं तयार झालेल्या दक्खिनी-इंग्रजी कोशांत हा शब्द दिलेला आहे. भडखळ हा तोच भडकड शब्द असला पाहिजे असा निष्कर्ष निघतो. दोन्ही शब्द समकाय आहेत. मराठींतील या शब्दांत फक्त क चा ख झालेला आहे. संस्कृत मध्यें कट शब्दाचा अर्थ लांकडाचा एक मोठा तुकडा, फळी, असा दिलेला आहे. भड हा शब्दांश संस्कृत भट्ट पासून व्युत्पादिला तर, ट चा ड बनून, भडकल म्हणजे फारच मोठी फळी, फळयांचे मोठे दार असा अर्थ प्राप्त होतो. दक्खिनींतील शब्दाबद्दल व त्याच्या अर्थाबद्दल वाद नाहीं. येथेंहि तोच शब्द आहे. बाहेर जाण्याच्या मार्गांत शिपांयची महाद्वार-राखणाईत होती. ती दोन कोपऱ्यांत निद्रेनें व्यापिलेली होती, असा अर्थ चांगला जुळतो. दक्खिनींतील 'भडकल' शब्दाचा वापर मुल्ला नुस्रतीच्या गुल्शने-इश्क या प्रेमाख्यानक-काव्यांत असा आहे-राक्षसांची जीभ अशी होती :—(अध्याय २८, बैत २२)

अछें जीब पर खार यूं दाट कर
सनीनां हैं भडकल के जूं पाट पर

(त्या राक्षसाच्या) जिभेवर असे कांटे होते जसे लोखंडाचे धारदार खिळे (सनीनां) भडकलाच्या पाटावर असतात.—नुस्रतीचें दुसरें ऐतिहासिक महाकाव्य, अली-नामा या ग्रंथांत 'भडकल'चा वापर असा केला आहे :-(अध्याय ४१, बैत ७६)

लगे मूं पो हात्यां के तीर दाट
दिस्या हो हर यक मुहरा भडकल का पाट

हत्तीच्या तोंडावर बाण असे लागले कीं, प्रत्येक नग (हत्ती) जणूं काय भड कलाचा घाटच शोभायला लागला.

शिशुपालवधांत भडकल (ओवी ९७३) व उद्धवगीतेंत भडखळ (३६४) असे शब्द वापरलेले आहेत. या दोन्ही शब्दांचा अर्थ महाद्वार असाच आहे. डॉ. कोलते यांना दोन्ही ठिकाणी नीट अर्थबोध झालेला नाहीं, असें नम्रपणें म्हणावेसें वाटतें. उद्धव-गीतेंत त्यानीं या शब्दाची व्युत्पति 'भट + खल' अशी सुचविली आहे. पण ती अर्धसत्य आहे. कलखल शब्द संस्कृत कटपासून आला हे पूर्वी सांगितलेंच आहे. ड, र, ल हे आधुनिक आर्यभारतीय भाषांत परस्पर परिवर्तनीय आहेत. हा शब्द हिन्दी कोशांत मिळत नाहीं.

पेखणे (६४·१३,१५ आणि ८२·७) हा शब्द या ग्रन्थांत तीन वेळां प्रयुक्त आहे. ब्रह्मदेवाच्या सभेंत पेरवणें चालू होतें. रेवंतानें तें ऐकिलें असें वर्णन आहे. दुसऱ्या ठिकाणींहि मदनमुद्रेनें पेखणें केले व तें श्रीकृष्णानें ऐकलें असें संदर्भ सांगतो. परंतु शब्दकोशांत मात्र पहिला उल्लेख देऊन 'नृत्य' असा अर्थ दिला आहे. दुसरा उपयोग नोंदलेला नाहीं. परंतु हा अर्थ सुसंगत नाहीं हें स्पष्टच आहे. 'पेरवणें' हा शब्द संस्कृत 'प्रेक्ष्व्' धातूपासून आलेला आहे. हें अर्थावरून व समकायत्वावरून दिसतें. 'प्रेक्षन' शब्दाचा नृत्य असा अर्थ कोशांत दिलेला आहेहि. परंतु तो येथें सुसंगत नाहीं. याच शब्दाचा दुसरा अर्थ मोनियर वुइल्यम्सनें-एक प्रकारचें किरकोळ नाटक, ज्यांच्यांत नायक नाहीं-असा दिलेला आहे. तोच अर्थ या प्रसंगीं युक्त होय असें दिसतें. नृत्ययुक्त गायनप्रकार किंवा नाटक, असा येथें अर्थ निष्पन्न होतो. दक्खिनी हिन्दींत पेखना शब्द असून त्याचा पाहाणें असा अर्थ आहे, तो पश्यति या संस्कृत धातूपासून निघालेला आहे.

निर्वडि (५·७, ४४·१४ व ९९·२४) :—या शब्दाचा अर्थ कोशांत तयारी असा दिलेला आहे परंतु हा अर्थ या शब्दाला कसा व कोठून प्राप्त झाला हें कळत नाहीं. तो अर्थ योग्य नाहीं. पहिल्या संदर्भात (५·७) श्रीकृष्ण जन्माच्या दिवशीं कृष्णाच्या भीतीमुळें देवकीला ठेवलेल्या कारागृहांत कंसानें घेतलेल्या काळजीचें वर्णन आहे. जन्मदिनीं त्यानें थोर 'निर्वडि' केली असें सांगून दारावर निरनिराळ्या योद्ध्यांना नेमल्याचें सांगितलें आहे.

वट्टा (७-३१) :—असा शब्द देशीनाममालेत हेमचन्द्रानें दिला आहे त्यापासून वाट, वाट, असे शब्द नव आर्यभारतीय भाषांत आहेत. निर्वडि म्हणजे निर्वट्टा निर्वाट असा शब्द येथें वापरलेला आहे. कंसानें थोर 'निर्वडि' म्हणजे सर्व कारागृह निर्मार्ग केले, तुरुंगाच्या सर्व द्वारांची, रस्त्यांची पक्की नाकेबंदी केली असा सारांश प्राप्त होतो. हा अर्थ सुसंगतहि आहे.

वरील चर्चेवरून निर्वडि म्हणजे 'तयारी' नव्हे, हें सहजच ध्यानीं येतें. दुसऱ्या प्रसंगीं कृष्णाच्या कंसनगरीवरील आक्रमणाचें वर्णन आहे. तेथेंहि कंसानें श्रीकृष्णाचे राजप्रसादाला पोंचण्याचे सर्व मार्ग बंद केले अर्थात् नाकेबंदी केली, हा अर्थ सुसंगत होतो. तिसऱ्या प्रसंगीं (९९-२४) उषेच्या पृथ्वीवरील सर्व वाटा कोंडल्या 'थोरि निर्वडि केली' असें म्हटलें आहे. येथेंहि हा अर्थ चांगल्या प्रकारें सुसंगत ठरतो. गोविंदप्रभुचरित्रांत नीरवडि (लीळा ४९) या शब्दाबद्दल डॉ. कोलते यांचा अर्थहि तितकासा बरोबर नाहीं. वरील मूळ अर्थ चांगला लक्षांत घेतला तर पूर्वजांसाठीं सिद्ध केलेल्या श्राद्धान्नाचें व रांजणांतील प्यायच्या पाण्याचें अमंगल होऊं नये म्हणून

उपध्यायांनीं आपल्या घरीं केलेलीं नीरवडि चांगली ध्यानीं येते. निरवानिरव चांगली जुळते.

बहुडा (८२·१२):—या शब्दाचा अर्थ कोशांत 'निरोप' असा दिलेला आहे. हा साधारणतः जुळणारा नक्की अर्थ नव्हे. शब्दांच्या व्युपत्तीचा प्रयत्न कोशांत केलेला नसल्यानें ही अर्थप्राप्ति कशी झाली व ती योग्य आहे का, याचा नीटसा बोध होत नाहीं. वस्तुतः 'बहुडा' शब्दाचा अर्थ 'पाठवणी', 'परत पाठवणे' असा आहे. हा शब्द जुन्या हिन्दींत व दक्खिनींत उपयोगांत आहे. हिंदींत त्याचें रूप बहुरना बहुडना या रूपानें होतें. येथें नेहमींच्या प्रथेनुसार र, चा ड रूपभेद दिसून येतो. मराठींत दक्खिनीप्रमाणें त्याचें रूप बहुडा असें आहे. क्रियापदरूपांत त्याचा मराठींत उपयोग आहे कीं काय, हें मला ज्ञात नाहीं.

'बहुडा' हा शब्द दक्खिनी कोशांत बहिस् + आनापासून व हिंदी कोशांत प्रद्यूर्णनपासून व्युत्पादिलेला आढळतो. परंतु या दोन्ही व्युपत्ति अर्थाच्या मागोव्यावरून व शब्दाच्या रूपावरून समाधानकारक वाटत नाहींत. माझ्या दृष्टीनें हा शब्द प्रति + उत्थापयति या शब्दापासून झालेला आहे. प चा ब होतो. त चा ह बनून उ त्यांत मिळाला. थ चा ड बनला व बहुडणें, बहुडविणें, बहुडा असे शब्द बनले. पहिले दोन दक्खिनींत व अंतिम मराठींत प्रयुक्त होतात. महाकवि मुल्ला नुस्रतीनें आपल्या गुल्शने-इश्क कथाकाव्यांत बहुडा (पाठवणी) व बहुडानी (पाठवण्याचा समारंभ) असे शब्द वापरले आहेत :—(पाहा : अध्याय २९ बैत १)

सिफत बहुडे की माज्लिस की हुए पर रीत रस्माना
अरूसो-शौ कों समद्यां के नगर कों हुइ सो बहुडानी।

सर्व प्रकारचे विधि आटोपल्यानंतरच्या पाठवणीच्या समारंभाचें हें वर्णन आहे. व्याह्यांच्या वधुवरांना(आणि)नगराला झालेला हा पाठवणी-समारंभ होय. नुस्रतीनें बहुडा (पाठवणी ३९-२०), बहूडना (ले जाना ४१-२८), बहुडे (चले गए ४२-४१) असा नाम व क्रियापद म्हणूनहि उपयोग केलेला आहे. यावरून नुस्रतीचा (मृत्युशक १५९५) तद्भव शब्द रावविण्याचा सराईतपणा दिसून येतो ही बाब वेगळी.

ढिशाळ (२३-२९) वा ढिसाल (२४-२६):—या शब्दाचा अर्थ पर्वताकार असा दिलेला आहे. यौगिकार्थानें हें योग्यहि आहे. पण खऱ्या वाचिक अर्थाचा त्यावरून बोध होत नाहीं. व्युत्पत्ति अर्थातच सुचविलेली नाहीं. माझ्या विचारें हा शब्द दिक् + शाल पासून झालेला आहे. दिक्शाल म्हणजे शाल वृक्षाच्या उंचीचा. वृद्धि शब्दापासून वाढ, या प्रक्रियेनुसार द चा ढ बनला व ढिशाल हें रूप सिद्ध झालें. 'श' चा उच्चार पूर्वेतिहासाचा सूचक मानतां येईल.

'शाल' वृक्षासारखा उंच अर्थात् अकाळविकाळ असा अर्थ प्राप्त होतो. हें मान्य व्हावेसें वाटतें.

जांघवां (८०-३२) :-शब्दाचा अर्थ मुलगा असा दिलेला आहे. परंतु तो सुसंगत कसा ? हा अर्थ प्रत्यक्ष जांघवांपासून निघणें दुरापास्त. जांघवा शब्दांतील अंत्याक्षर सानुस्वार आहे. त्यावरून ही 'जांघु' शब्दाची तृतीया विभक्ति आहे हें उघड आहे. 'जांघ' शब्द सं. जंघा शब्दापसून आलेला आहे. जांघ हा गुडघ्यापासून कमरेपर्यंतचा पायाचा भाग. त्याशिवाय कमरेच्या जवळ आंतील निम्नभागीं कांहीं ग्रंथींचा भाग आहे तीदेखील 'जांघ' होय. घोट्याजवळ पायाला जखम झाली तर जांघेंत अवदान येतें. प्लेगचा गड्डा जांघेंतहि येत असे.

येथें जांघु शब्दाची तृतीया वापरून 'सर्वज्ञांची जांघवां मज जन्म होआवे' असा वर मूर्छाप्रपन्न झालेल्या मदनानें श्रीकृष्णचक्रवर्तीजवळ मागितला. येथें ग्रन्थकारानें आपला आशय अत्यन्त मार्मिकपणें व्यक्तविला आहे. मी तुझ्या पोटीं जन्माला यावें असें मदनाला अभियाचावयाचें होतें. परंतु श्रीकृष्णाच्या पोटीं जन्मण्यास तो कांहीं स्त्री नव्हता. त्याच्या वीर्यानें जन्माला यावें असें मागणें सदाभिरूचीला सोडून व तेंहि इंद्राच्या आस्थानींत. किती अभिरूचिहानि ! ग्रंथांत बोलणारे श्रीचक्रधरस्वामी व ऐकणारी महादाइसा असा सर्व योग. म्हणून मदनानें श्रीकृष्णांच्या जांघांपासून जन्म प्राप्त व्हावा याचा अर्थ स्पष्ट होतो कीं, त्याच्या वीर्यापासून जन्मप्राप्ति व्हावी. औरस (उरस पासून) पुत्र होणें हेंदेखील मातृसाध्य आहे, पितृसाध्य नव्हे. सगळ्या वाक्याचें सार पाहिलें तर मदनाची कृष्णाचा मुलगा होण्याची मागणी होती हें खरें. पण जांघवां म्हणजे मुलगा नव्हे. जांघेच्या साहचर्यानें मुलगा होणें शक्य म्हणून हे सर्व शिष्टसम्मत आढेवेढे. श्रीचक्रधरांच्या तोंडीं हा वाक्प्रयोग अगदीं शोभणारा व परमोच्च सदभिरुचीचा द्योतक आहे, यांत संशय नाहीं. 'जांघ' शब्दाचा 'जांघु'या प्रथमान्त शब्दाला मूळ कल्पून त्याची तृतीया उलगडावी लागेल. नसतां 'जांघां' असें साधे तृतीयेचें रूप झालें असतें.

वाजतुवारा (४·९) याचा अर्थ कोशात 'संकट' असा दिलेला आहे. परंतु तो कसा निष्पन्न होतो, याचा बोध होत नाहीं. वस्तुतः 'वाजतु' म्हणजे वाहणारा वारा म्हणजे वायु, हवा. मथुरेंत कंसाच्या कारावासांत असलेल्या व सात पुत्र वधिलेले पाहाणाऱ्या देवकीला यशोदा आश्वासीत आहे कीं "माते, तुझेआ आठवेआ पुत्रा वाजतुवारा नलगे."-तुझ्या पुत्राला वाहता वारा देखील लागणार नाहीं. हें देवकीला तिच्या पुत्राच्या सुरक्षिततेबद्दल आश्वासन आहे. निदान तशी यशोदेची मनोमन इच्छा होती. तुझ्या पुत्राला वाऱ्याची झुळूकदेखील लागणार नाहीं, श्रीकृष्णावर कसलेंहि संकट येणार नाहीं, असें यशोदेचें भाकित वा इच्छा होती याचा अर्थ स्पष्ट आहे. म्हणून 'वाजतुवारा' नलगे याचा अर्थ संकट येणार नाहीं असा असला, तरी 'वारा' या शब्दाचा अर्थ 'वारा'च !

फाळुकें (८९·१०):—ह्या शब्दाचा अर्थ कोशांत 'फडक्याचा तुकडा, फडकें' असा दिलेला आहे. तो योग्यहि आहे. व्युपत्तिकोशांत कृ. पां. कुलकर्णी यांनीं तो नोंदलेला आहे. परंतु वरील संदर्भांत 'फडकें' हा शब्द जुळत नाहीं, ही अडचण आहे. सत्यभामा तोंड नुघडति, असें वाक्य आहे. सत्यभामा तोंड नुघडी, म्ह. उघडीत नव्हती. तें कां? तर फाळुकें. ही तृतीया विभक्ति; पंचमी नव्हे. पंचमी असती तर कदाचित् अर्थ जुळता. म्हणून 'फाळुक' शब्दाचा अर्थ येथें वेगळा असला पाहिजे असें स्पष्ट होतें. मला असें वाटतें, पारूष्य शब्दांतील र, ष चीं प्राकृत रूपान्तरें ळ, क मध्यें होणें नित्य परिचयाचें आहे. म्हणून फाळुक हा शब्द पारूष्य पासून निघालेला असून त्याचा अर्थ रोष असा आहे, हें स्पष्ट व्हावें.

नोकणे–नोकीला (६०·६) शब्दाचा अर्थ 'धिक्कारिला' असा दिलेला आहे. परंतु हा चुकीचाच आहे. याचा यौगिक अर्थदेखील हा होणें कठीण आहे. कंसवधोत्तर कंसाच्या राण्या जरासंधाकडे जाऊन श्रीकृष्णाच्या आततायीपणाची तक्रार करीत आहेत. त्या जरासंधाचा धिक्कार काय करतील? त्यांनीं तक्रार केली. ती बायकांची बोंचणी होती; धिक्कार नव्हे. असो. परंतु त्याच पानावर आणखी दोनदां नोकणे (६०·२०,२६) शब्द वापरलेला आहे. तेथें या शब्दाचा अर्थ 'धिक्कारणे' किंवा 'बोंचणी लावणें' कदापि होऊं शकत नाहीं. कारण प्रत्यक्ष युद्धक्षेत्रांत या मानसिक धिक्कार, बोंचणीचा काय उपयोग? नोकणें शब्द पृष्ठ ४६·४ मध्यें आला आहे. त्याचा नीट अर्थबोध न झाल्यानें सम्पादक वा संग्राहकांपैकीं कोणींतरी 'रोकणें' असा नवीन पाठ सुचवून रो अक्षर कंसांत घातलेलें आहे.

नोकणें क्रियापद जुन्या मराठींत प्रयुक्त होत आलेलें आहे. ज्ञानेश्वरींत (सरकारी प्रत) नोकणेंचा 'वापर' असा आहे :—

> ते हे चतुर्भुज कोंभैली। जेयाची शोभा चि रूपा आली।
> देखौनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदें। ६·३२४

नोकिली–नोकणें शब्दाचा छळणें असा सुयोग्य अर्थ कोशांत देण्यांत आला आहे. शिशुपालवधकाव्यांत "पुण आमसीं नोकून बोलणें: हें निकें नव्हे: ९१९" असा नोंकणें याचा उपयोग आलेला असून डॉ. कोलते यांनीं कोशांत 'टोचणें' असा अर्थ दिला आहे, तो योग्य असाच आहे. कृ. पां. कुलकर्णी यांनीं नोकणे, नोक (नाम) यांचा उल्लेख केलेला आहे. परंतु हे शब्द फार्सीतून आले अशी चुकीची व्युत्पत्ति दिली आहे. वरील उल्लेखावरून हे शब्द स्वतंत्र रीतीनें–फार्सीच्या माध्यमाशिवाय, मराठींत आहेत, हें दिसतेंच आहे.

दख्खिनी हिन्दी व हिंदींतहि नोक (नाम) शब्द आहे. मुल्ला नुस्रती या महाकवीच्या अली–नामा ग्रन्थांत नोकचा (२५–६८) वापर असाच आहे :—

तुफंगी जिते हुक्म–अंदाज अचूक
सब्रद पर निशान मारते साद नोक ।

अर्थ असा कीं त्या सेनेंत, बिंदू (नोक) साधून शब्दानुसारी निशाण मारणारे आज्ञाधारक जेवढे अचूक बंदूकधारी होते.

नोक शब्दाचा प्रो. कुलकर्णी यांनी टोंक, बिंदु, अणी असा अर्थ दिलेला आहे. कांहीं यौगिक अर्थहि दिलेले आहेत.

नोक शब्द फार्सी भाषेंत वापरांत आहेच. नोकदार आदि शब्द तिकडून मराठींत आले. नोक शब्दाची व्युत्पत्ति कोठें दिलेली आढळत नाहीं. माझ्या मतें संस्कृत 'कोण' शब्दापासून वर्णविपर्यय प्रक्रियेनें 'नोक' हा मराठी शब्द बनलेला आहे. त्याचा अर्थ बिंदू, टोंक, अणि असा मराठींत उतरलेला आहे. त्यापासून 'नोकणे' हें क्रियापद बनलें. त्याचा अर्थ टोचणे, जखमी करणे असा मूल वाचिक अर्थ होतो. यौगिक अर्थ 'छळणे' 'टोचणी' किंवा 'बोंचणी लावणे' असा निष्पन्न होतो.

या श्रीकृष्णचरित्रांत टोचणे, टोचणी–बोचणी लावणें असा अर्थ 'जरासंधु बहु नोकिला' (६०·६) या वाक्यात आहे. दुसऱ्या ठिकाणीं झालेल्या नोकिले शब्दाच्या वापरांत (६०·२०, २६,४६·४) जखमी करणें असा अर्थ प्राप्त होतो.

गोसा(७९·७):—या शब्दाचा अर्थ कोशांत धनुष्याचें टोंक असा दिलेला आहे. तो एका अर्थी ठीकच आहे. फार्सी हीदेखील संस्कृतोत्पन्न किंवा संस्कृतची सहोदारी भाषा असल्यामुळें अनेक तत्सम व तद्भव शब्दाप्रमाणें तिच्यांत गोशह हा शब्द आहे स्टीनगास या फार्सी–इंग्रजी कोशकारानें या शब्दाचा अर्थ-बाणाच्या मागील टोंकाची खांच, जिच्यांत धनुष्याची दोरी चिप बसते–असा दिलेला आहे. या अर्थावरून गोसा शब्दांतील आणखी एक अर्थच्छटा उजेडांत येते–गोसा म्हणजे धनुष्य नव्हे. तर बाणाच्या बुडाची खांच म्हणजे गोसा.

गो शब्दाचा मूल अर्थ गाय. पुढें गाईपासून मिळणाऱ्या सर्व दुभत्याच्या पदार्थांसाठीं हा शब्द वापरांत येऊं लागला. म्हणून दूध, दहीं, ताक वगैरे गो शब्दाचे अर्थ संस्कृत कोशांत मिळतात. गाईच्या कातड्यालाहि 'गो' शब्द आहे. वाढत्या विकसनशील मानवी जीवनामुळें त्याच त्या शब्दांचा, परंतु वेगळ्या अर्थानें, वापर करण्याची गरज दिसून येते. मराठी गोसा किंवा फार्सी गोशह हा शब्द संस्कृत गोष्ठ, गो +स्थ पासून बनलेला आहे हें यावरून दिसून येईल. गो म्हणजे कातड यावरून गोष्ठ म्हणजे बाणाची खांच असा, कदाचित् बहुव्रीहि समासपद्धतीनें अर्थ प्राप्त झाला असावा.

मोगरी(१८·३३):—या शब्दाचा 'सैन्यांतील निवडक लोक' असा अर्थ दिव आहे. परंतु मला वाटतें ही अर्थदात्याची चूक नसावी. शब्द नकलतांना कुठल्या तरी

दुसऱ्याच शब्दांचा अर्थ सन्दर्भासहित मोगरीच्यासाठीं लिहिला गेला. मोगरी म्हणजे एक विशिष्ट बडवणे. हा शब्द ग्रामीण जनता आजही वापरते. सुताराच्या निहावर ती मिळतेच. मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतांतहि ती असते. ती साधारणतः ५–६ इंच व्यासाच्या लांकडाची केलेली असते. लांबी सामान्यपणें एक हातभर. ती घरण्यासाठीं ५–६ इंचाची मूठ तासून बारीक केलेली असते. मोगरी हा शब्द संस्कृत मुद्गर शब्दापासून व्युत्पन्न झाला असून संस्कृतांतहि त्याचा, हातोडा, हातोड्यासारखी अन्य वस्तु, असा अर्थ सांपडतो.

मोगरसूल (४४·११):–या शब्दाचा अर्थ लूट असा दिलेला आहे. हा यौगिक अर्थ योग्य दिसतो. गीविंदप्रभुचरित्रांतहि (लीळा १२४) हा शब्द आला आहे. डॉ. कोलते यांनीं या शब्दाचा अर्थ 'लुटविणें' असा दिलेला आहे. प्रस्तुत चरित्रांत लढाईनंतर समर्थवादानें लूट करणें असा अर्थ आहे; तर गो. प्र. चरित्रांत लाक्षणिक अर्थानें संक्रांतीच्या समयीं महिलांचा आवा लुटविण्याचा उल्लेख आहे.

मोगरसूल हा शब्द संस्कृत मुग्दर + शूल–मुग्दरशूल या शब्दापासून झालेला असावा. मोगऱ्या, शूल म्हणजे काठ्या, लाठ्या, भाले इत्यादींच्या सहाय्यानें केलेली क्रिया अर्थात् लूट असा अर्थ निष्पन्न होईल. वस्तुतः मूलतः मोगरसूल करणे म्हणजे लूट करणे असा अर्थ असावा, कालांतरें मोगरसूल हें लुटीशींच सारूप्य पावलें.

बोणे (९५·१५):—या शब्दाचा अर्थ अन्न दिला आहे. पण वस्तुतः बोणे म्हणजे नैवेद्य. श्री. कोलत्यांनीं व कुलकर्णी यांनीं योग्य अर्थ दिलेला आहे. श्री. कुलकर्णी यांनीं व्युत्पत्ति साधण्यासाठीं, त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनुसार, साक्षीदार उभे केले आहेत. पण कोणत्या साक्षीदाराकडून इष्टार्थसिद्धि होते, हें मात्र ते सांगत नाहींत. येथें कानडी शब्द बोन म्हणजे भात व भोजन असे शब्द उल्लेखिलेले आहेत. मला वाटतें, भोजन पासून भोअन, बोअन व अंतीं बोने–णे असा शब्द सिद्ध झाला असावा. नैवेद्य अर्थ होण्यासाठीं देवताभोजनाची पाकसिद्धि असा पूर्वील संकेत असावा. देवता शब्द गळून 'बोणें' म्हणजे नैवेद्य शब्द शेष राहिला. आजदेखील मराठी ग्रामस्थ लोक बोणें देवाला दाखवितात. पेरणीच्या समयीं त्यांचे चाडेबोन्याचें जेवण असतें.

सावाधावा (४·१३):–या शब्दाचा अर्थ 'मदत' असा देण्यांत आला आहे. परंतु तो लाक्षणिक अर्थानें जुळत असला, तरी तो योग्य नव्हे आजदेखील ग्रामस्थ जनता हा शब्द वापरते. त्याचा अर्थ 'धडपड, प्रयत्न' असा आहे. कधीं कधीं त्याला अनावश्यक धडपड असाहि अर्थ येतो. सासू आपल्या सुनेला म्हणेल, मी बाहेरगावीं गेलें असतांना घरांत काष सावाधावा केला.

या ठिकाणीं मात्र आवश्यक धडपड, प्रयत्न असा अर्थ आहे. 'पर माझा सावाधावा कवणी न करी' म्हणजे माझ्यासाठीं कोणी धडपड करीत नाहीं अशी

देवकीची तक्रार आहे. या शब्दांत मुख्य शब्द धावा–धावणे पासून, असून सावा शब्द स्पष्टतर आशयव्यक्तीसाठीं आणलेला आहे. या चरित्रांतच बुरूडांचा उल्लेख करीत असतांना ओरूडा बुरूडा (९४·४) हा शब्द आलेला आहेच. त्याच धर्तीवरील सावाधावा शब्द होय.

रुखवत (८४·२५) :— या शब्दाचा अर्थ, साहजिकच तो दररोजचा परिचित मराठी शब्द म्हणून दिलेला नाहीं, हें योग्यच आहे. परंतु डॉ. तुळपुळे यांनीं तो फार्सी रुश्वत्–लांच देणें' या शब्दापासून निघाल्याचें सांगितलें आहे. परंतु हें निराधार होय. त्याला इतिहास नाहीं. र-रि–रूश्वत् शब्द अरबी आहे. ह्या रूखवत शब्दाचें मूळ आर्यभारतीयच आहे. सं. ऋक्ष शब्दाचा अर्थ उत्तम, परमोत्कृष्ट असा कोशांत दिलेला आहे. 'ऋक्ष + वत्' म्हणजेच रूखवत. हें वधूपक्षाकडून वरपक्षाकडे आपल्याकडील उच्च आदरभावाचें प्रतीक म्हणून पक्वानाचें पाठविलेलें, अनुनयात्मक दान होय. व्युत्पत्तिकोशांत केवळ डॉ. तुळपुळे यांचें पुनरुच्चारण केलें आहे. डॉ. तुळपुळे यांनीं फार्सीचा महानुभावकालीन मराठीवर प्रभाव म्हणून उल्लेखिलेल्या ९ शब्दांपैकीं पेरोज, तेजी, सुल्तान व तुरूक हेच फक्त विशेषनामरूप शब्द फार्सी–अरबी आहेत. शेष पांचहि तद्भव आहेत.

बुजितु (२१·२९; ६७·११) :—याचा अर्थ 'समजावित' असा दिलेला आहे. परंतु तो चूकच आहे. प्रथम तर अर्थ प्रयोजकरूपांत दिला आहे परंतु मूळ क्रियापद तसें नाहीं. बुजणें याचा अर्थ दचकणे असा आहे. त्यांत भिऊन, दचकून एकाएकीं पळापळीची क्रिया करणे हा अर्थहि अभिप्रेत आहे. बुजणे, बु–बूझणे असाहि शब्द आहे त्याचा अर्थ समजणें असा आहेच. प्रयोजकरूप बुजावणे, बुझाविणे असें होतें. दोन्ही अर्थी हा शब्द कुलकर्णी यांच्या कोशानुसार संस्कृत बुध् पासून आलेला आहे. भिणे दचकणे हा अर्थ मराठींत नंतर आलेला आहे 'भिणे' या अर्थी हा शब्द हिंदींत रूढ नाहीं, परंतु तो दक्खिनींत आढळतो. मुल्ला नुस्रतीच्या अली–नामा महाकाव्यांत तो बूज (१·२१ भीति) या नाम-रूपानें आणि बुजना (२८·२३६ ; ४१·१४२ डरणे, भिणे) या क्रियारूपानें आलेला आहे.

दुजे रुख ते बहलोल खान सफ–शिकन
किया हम्ला ले भार भारी अपन । २३४
हजारों तुरंगां का लक तल **बुज्या**
जमीन की धमक तल फलक हल **बुज्या** । २३६

अध्याय ४१·१४२ मधील वापर असा—

मछर ते हुए ऊंट डर कर जबूं
बुजे सुई के नाके कूं भडकल का मूं ।

यावरून सर्वांच्या अगोदर प्रौढा झालेल्या मराठीची दक्खिनी हिन्दीला व पर्यायानें आजच्या राष्ट्रभाषेला कशी देन प्राप्त झाली हें सहजतया दिसून येईल. (सविस्तर चर्चेसाठीं माझा गोहत्ती येथील भारतीय प्राच्यविद्या परिषदेंत (शके १८८६) वाचला गेलेला निबंध पाहावा.)

ग्रंथाचें जुनेपण :—

लीळाचरित्र, ज्योतिषरत्नमाला, ज्ञानेश्वरी आदि ग्रन्थांतून मराठी भाषेच्या ज्या स्वरूपाचें दर्शन होतें, त्या स्वरूपाचे सर्व अवशेष श्रीकृष्णचरित्र या छोटेखानी ग्रन्थांत सापडतात. लीळाचरित्र व हा ग्रन्थ यांच्यांत सर्व प्रकारें साम्य आहे. लीळाचरित्राचे सर्व भाषिक विशेष येथें आहेत. यावरून हा ग्रन्थ म्हाइंभटाच्या लीळाचरित्राइतकाच जुना व प्रमाणपात्र आहे असें वाटतें. दोन्ही ग्रन्थांचें अंतरंग पहिल्यानंतर म्हाइंभट हा या ग्रन्थाचा कर्ता असूं वा होऊं शकतो असें म्हणावयास हरकत नाहीं. ग्रन्थकर्तृत्वाच्या वादांत न शिरतां, भाषिक अंतरंगावरूनहि असें म्हणतां येईल.

प्रतिलेखनांत विशेष स्थित्यन्तरें झालेलीं नाहींत असें विधान सामान्यपणें करावेंसें वाटतें. ही प्रत केव्हां लिहिली गेली हें दुर्दैवानें उपलब्ध नाहीं. परंतु मूळ प्रत गहाळ होणें ही, चालू काळांतीलच घटना असल्यामुळें, कोणी भाषाप्रेमिकानें व महानुभावपंथाभिमान्यानें चांगला प्रयत्न केल्यास मूल प्रत उपलब्ध होणें असंभव आहे असें वाटत नाहीं. प्रतलेखनांत कांहीं उघड उघड चुका असल्या, तरी ती बरीच शुद्ध व प्राचीन आहे. भाषाशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीनें स्मृतिस्थळ हा ग्रंथ सर्वांत नंतरचा. संपादक वा. ना. देशपांडे यांनीं त्याचा लेखनकाल सामान्यपणें शक १३५४ च्या जवळपास ठरविलेला आहे. स्मृति–स्थळांत तृतीयान्त कर्त्यासाठीं प्रत्यक्ष नें–प्रत्ययाचा वापर आलेला नाहीं. परंतु प्रस्तुत ग्रंथांत केवळ दोन तीनदांच प्रत्यक्ष नें–प्रत्ययाचा वापर दिसून येतो. पाहा विष्णूनें (१·१६,२२,२५ आणि पहिलेने–१०१·३०) या खेरीज प्रत्यक्ष ने–प्रत्यय वापरलेला नाही. हे उघड उघड प्रतिलेखकप्रमादाचें उदाहरण होय. डॉ. तुळपुळे (रीडर, पान ५५) यांनीं म्हटल्याप्रमाणें, प्रतलेखकप्रमादाच्या पायीं नें–प्रत्ययाचा उद्भव या ग्रंथांतून दिसतो. नवीनीकरणाचा प्रयत्न म्हणून तो दुर्लक्षावा हें योग्य.

व्याकरणविशेष :—भाषाशास्त्रीय अभ्यासांत तृतीयेच्या नें–प्रत्ययाचें विशेष स्थान आहे. त्याचें असें कीं मराठी व आजची राष्ट्रभाषा हिंदी व तिची पूर्ववर्ती दक्खिनी हिंदी या दोन भाषांखेरीज कोणत्याहि नव आर्यभारतीय भाषांत नें–प्रत्यय अस्तित्वांत नाहीं. नेपाली भाषेंत ले–प्रत्यय ने–प्रत्ययाच्या जागीं आहे. पण तो स्वतंत्र रीतीनें लग् धातूपासून बनलेला आहे. विद्वानांचें असें अनुमान आहे कीं, व्रज, अवधी, राजस्थानी, गुजराती आदि भाषांत तृतीयांत कर्तृवाचक नें–प्रत्यय नसल्यामुळें व तो हिंदींत प्रादुर्भूत झाल्यामुळें, हिंदींत तो मराठींतून आला असावा. डॉ. शौकत सब्जवारी

या डाक्का विद्यापीठातील विद्वानांनें आपल्या 'उर्दू भाषेचा विकास' (डाक्का, शक १८७८) या विद्वत्तापूर्ण प्रबंधांत (उर्दू) म्हटलें आहे.

"पूरबी हिन्दी में ने–प्रत्यय का अभाव बताता है कि ने व्रज की अपनी चीज नहीं है। हिंदुस्तानी से उधार लिया गया है। ग्रिअरसन इस बात को मानते हैं कि ने व्रज और पुरानी हिंदी में प्रयुक्त नहीं होता था (कलकत्ता रिव्ह्यू, खंड ५१, पृष्ठ १५४)। लेकिन यह तय न कर सके कि यह दिल्ली और मीरठ की पैदावार है या उन स्थानो में मरहटी से लाया गया। उन के शब्द यह है–८ उस के (उर्दू) तृतीयान्त कर्तृवाचक ने–प्रत्यय के सम्बन्ध में मतभेद है कि यह मरहटी से उर्दू में आया या दिल्ली की आसमन्तात की भाषा से। इतना विश्वसनीय है कि यह शब्द भाषा (व्रज) में इस अर्थ में कभी प्रयुक्त नहीं हुआ।'. पृष्ठ ८५. (फार्सी शब्द वदलून).

भाषाशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीनें श्रीकृष्णचरित्रांत ने–प्रत्ययाचीं जीं रूपें सांपडतात, तीं नेंच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. प्रथम ही गोष्ट उल्लेखनीय होय कीं षष्ठीमिश्रित तृतीयान्त कर्ताकारकाचा प्रयोग बहुतांशीं आढळतो. श्रीकृष्णाचेनि करस्पर्शें (१७·३१) म्हणजे श्रीकृष्णाच्या करस्पर्शानें असे प्रयोग दिसून येतात. अशीं उदाहरणें अनेकानेक आहेत. पाहा १८·६,१०; २५·२०, २२; २६·१२; २७·३, ५५·१०; ६४–१०; ६७·३२; ८८·२०; ९६·१७ इत्यादि. षष्ठीरहित नि–प्रत्ययहि तितकाच किंबहुना थोडा अधिकच प्रयोग–प्रचुर आहे. दुसरेनि (दुसऱ्यानें ७९·३), तिसरेनि (तिसऱ्यानें ७९ ४), दुसरेनि (दुसऱ्यांदा १८१४)इतुकेनि (२५·३; ४७·२७; ४८·११; ८३·९, ९६·४), दुर्वासेनि (९५·२७; ३१) काइसेनि (७७·१९; ७८·११) सुदामेनि (५३·१६), एतुकेनि (२·६; ३·३) ब्रह्मेनि (२·१२; ४·२१; ५·१; ३४·९; १००·१२), दावेनि (१७·३३; १८·३; २०·९; २५·२३), इत्यादि. या कालखंडातील मराठीच्या तृतीया–प्रत्ययाचे ईं, एं, एनि, आं, सिं, हीं हे प्रकार प्रयुक्त झालेले आहेत. विशेष म्हणजे वरि–वेंही हा प्रत्ययहि प्रयुक्त झालेला आहे. पाहा घागरीवरि (६६·४), थापेवरि (४४·९) श्रीचरण वेंही (चरणाने ३० १७). शेवटच्या शब्दांतील वेंहीं शब्दाचा अर्थ कोशकार डॉ. कुलकर्णी यांनीं पर्यंत असा दिलेला आहे. पण तो योग्य नव्हे. वेंहींचा पर्यंत हा अर्थहि आहे, पण तो अन्यत्र. पाहा :— महाद्वार वेंहीं (५३·८). एकाच शब्दाला वेगवेगळीं दोन प्रत्यय लागल्याचींहि तृतीयेचीं उदाहरणें सांपडतात. पाहा :—सैन्येनसि (८३·७) वळभद्रेंनसी (१९·३१) ग्राहणें निसी (१७·३१) तेणेंनसिं (२०·३) इत्यादि. या शेवटच्या शब्दांत णें वरील अनुस्वार चुकीचा समजावा लागेल. नाहीं तर ईं, एन, सिं हे तीन प्रत्यय लागले असें होईल.

पंचमीच्या हून, ऊन प्रत्ययांबद्दल :–हा प्रत्यय 'होऊन' या भूतकालिकापासून निघाल्याच्या विधानासंबंधीं कांही विद्वानांनीं शंका घेतलेली होती. परंतु आतां

तो 'होऊन' पासूनच निघाल्याचें सर्वमान्य झालें आहे. याला उद्बलक ऐतिहासिक पुरावा प्रस्तुत ग्रन्थांत सांपडतो. 'होऊन' हा प्रत्यय म्हणूनच या ग्रंथांत वापरल्याची उदाहरणें सांपडतात. उदा० :–कैलासाहोउनि (६१·३५), द्वारावतिअे होऊनि (६५·१८) लंकेहोनि (७६·२५) इत्यादि. पासून या प्रत्ययांत पण हाच प्रत्यय आहे. पास (पार्श्वे) शब्दाला ओनि लागून पासौनि, (पाहा :—नेत्रांपासौनि ६३·१४) पासून अशीं रूपें सिद्ध होतात.

पंचमीच्या तरभावसाधक रूपांसाठीं पासाव (५१·८; ९३·३५) आणि पसि (७८·३०; ९३·९) यांचा वापर करून 'पेक्षां' शब्दाची अर्थनिष्पत्ति केलेली आहे. ही जुन्या मराठीची खूण या ग्रंथांतहि सांपडते.

'तिअेचिभा सौंदर्याचेनि पाडें पृथिवीसि सुंदरू वरू न जोडे' (६४·१०) आणि "मग रेवंतु ब्रह्मेआतें पुसावेआ सत्यलोकासि गेलाः तंव ब्रह्म सभेसि (६४·१३) पेखणें होत होतें." या दोन वाक्यांत पृथिवीसि व ब्रह्मसभेसि यांची विभक्ति कोणती? या दोन्ही शब्दांच्या अर्थांच्या अनुषंगानें सप्तमी विभक्ति असावयास पाहिजे. पहिल्या वाक्यांत वरेच्छु पृथ्वी नव्हे. रेवंती हे वरेच्छु नवरी आहे. पृथिवीसि म्हणजे पृथ्वीवर असा स्पष्ट अर्थ आहे. दुसऱ्या वाक्यांत ब्रह्म सभेसि म्हणजे ब्रह्मसभेंत पेखणे म्हणजे नाटक चाललें होतें. अडचण अशी कीं, सप्तमीसाठीं सि, शी प्रत्यय प्रयुक्त होत असलेले आढळत नाहींत. येथें दोन्ही शब्दांची चतुर्थी आहे. परंतु अर्थ मात्र सप्तमीचा प्राप्त होतो. याचा विचार व्हावा.

शब्दांतील प्रथमोत्तर व्यंजनाचा अ बनविण्याच्या प्राकृत–अपभ्रंशांच्या भाषिक प्रक्रियेचें प्रत्यंतर या ग्रंथांत आढळतें. नदीपासून नयी (३७·११), क्रियापासून क्रिआ (५६·१८), राजाशीपासून राआशी (५६·१९), राजा शब्दापासून राया, राआ (५९·२४; ४८·१०), राजनीति शब्दापासून राजनीई अर्थात् राजनी (६०·२७), जीवितपासून जीइत अर्थात् जीत (६०·४) इत्यादि शब्द प्रत्यक्ष साक्षीदार होत.

संस्कृत शब्दांतील 'प'चा 'व' होण्याचीं उदाहरणेंहि सांपडतात. पाहा :–वावी (वापी ७३·१८), वहिला (प्रथम + ला स्वार्थे ७१·३३), पाठोवाठीं (पाठोंपाठीं ६३·१२; १०२·१४) इत्यादि. प्रथमाक्षरांतहि प चा व होण्याची प्रक्रिया वहिला शब्दांत दिसते. कामनापासून निघालेला आमना शब्द आजदेखील ग्रामीण भागांत रूढ आहे. तो दक्खिनी हिन्दींतहि साहित्यनिविष्ट आहे. प्र + उत (वे धातु) पासून निघालेला पोवणे (८७·७,१०) हा शब्द ओवणे (सुईदोरा) शब्दाच्या पितृस्थानीं आहे. मराठी हत्यार हा शब्द सं. हस्तिकारपासून आल्याचा पुरावा येथें मिळतो. प्रथम रूपान्तर हातिकरच्या (६५·५) रूपानें दिसते. तदनंतरें हातिअेरू (७७·१८) आणि मग हतियार (८५·१०) व शेवटीं हत्यार आलें.

जुन्या मराठींत संस्कृत अस् धातूचीं अनेक रूपान्तरें व अनियमितपणा येथें दिसून येतो. 'सं. अस्ति' रूपापासून अ च्या पुढें अर्धाक्षर असल्यामुळें व अ ला दीर्घत्व येत असल्यानें, अला दीर्घत्व आलें, स् चा लोप झाला व शेवटीं आति म्हणजे आहे, हें रूप सिद्ध झालें. आति मधील अंत्याक्षराचा हे बनून शेवटीं आहे रूप प्रचारांत आलें असावें. आति रूप हें या जुन्या प्रक्रियेचा अवशेष असावें. आति शब्द सर्वत्र आलेला आहे. अस्ति मधील स् चा ह होऊन तो तिशीं एकरूप झाला व आथि (नाथिला २५·२६) रूप बनलें. संस्कृत अस् च्या अस्ति रूपावरून असते, असती अशीं रूपें आजच्या मराठींत आहेत. परंतु जुन्या मराठींत आरंभींच्या अ चा लोप झालेला आढळतो. उदाहरणार्थ सति (२९·२५). तीच स्थिति असे रूपाची आहे. पाहाः– से (असे ५२·२७, ५५·११; ६२·२०; ६७·१८; ६८·२५). प्रथम पुरुषी कर्तरि रूपांत क्रियापद सानुस्वार असे. हा नियम से (७६·३०) मध्येंहि दिसून येतो.

संस्कृत आस्थानी शब्दाचें मराठी रूप अस्थानि करून आरंभीच्या अ चा लोप झाल्याचें आढळते. "सर्वज्ञाच्या ठायी घनदाट स्थानि दाटली से" या वाक्याचा अर्थ श्रीकृष्णाच्या समोर जंगी सभा भरली होती, अर्थात् श्रीकृष्ण अशा सभेंत होते, असा आहे.

वरील सर्व चर्चेंतून मला मुख्यतः दोन गोष्टी सुचवावयाच्या आहे. पहिली ही कीं, जुन्या मराठीचा अभ्यास हातीं घेतांना भाषाशास्त्राची ओळख झालेली चांगली. अशा प्रकारची तयारी नसतांना या क्षेत्रांत पाऊल टाकणें हितकर नाहीं. नुसती संहिता प्रसिद्ध करण्याचा काळ संपला आहे. संहितांचीं पुस्तकें या पूर्वीच्या पिढींत छापलीं गेलीं. परंतु आज त्यांची उपयोगिता कमी झाली. उदाहरण म्हणून अनेक संपादनांचा उल्लेख करतां येईल. दुसरी बाब अशी कीं जुन्या मराठींतील अनेक शब्द आजेदखील खेडेगांवांतून घरोघरीं वापरले जात आहेत. याच ग्रंथांतील परवर शब्द खेड्यांतील लहानथोरांना ठाऊक आहे. पण कोशांतील 'भुई' हा प्रतिशब्द योग्य नव्हे. शेतांतील जमिनीला परवर कोणीहि म्हणणार नाहीं. 'माळवधांतील राहत्या घरांतील मोकळी जागा' असा या शब्दाचा अर्थ आहे. सांगण्याचा मुद्दा असा कीं, निदान कांहीं शब्दांच्या बाबतींत खेड्यांतील शब्दज्ञानानें अध्ययन अधिक भरीव बनूं शकतें.

तसेंच हेंहि सुचवावेंसें वाटतें कीं मराठीवरहि दक्खिनी हिंदीचा थोडाबहुत परिणाम झालेला आहेच. दक्खिनीचा महाराष्ट्रांत अभ्यास झाल्यास, मराठीच्या अध्ययनाला अधिक भरीवपणा येईल. दक्खिनीच्या अध्ययनानें मराठी माणसाला हेंहि कळेल कीं, महाराष्ट्रवीरानींच पराक्रम केलेला आहे, असें नव्हे; तर मराठी भाषेनेंहि मोठा सांस्कृतिक पराक्रम केलेला आहे. तिनेंहि आजच्या राष्ट्रभाषेच्या गतेतिहासकालीं अडचणीच्या वेळीं मोठें साहाय्य केलेलें आहे. "वीद्या आणि पुरुषू महाराष्टरीं असे" याचें चार शतकांनंतरचें हें प्रत्यन्तरच आहे हें दिसून येईल.

'नवरा'–मराठी भाषेंतील एक आप्तसंबंध

— डॉ. मु. श्री. कानडे

— सु. वा. कुलकर्णी

आप्तसंबंधवाचक शब्द हे आप्तसंस्थेची घटना व इतिहास समजावून घेण्याचें प्रमुख साधन आहे. आप्तसंबंध हे तद्वाचक शब्दांहून प्राचीन असले तरी त्या संबंधांच्या घटनेचें, उत्क्रांतीचें व परिवर्तनाचें स्वरूप आप्तवाचक शब्दांच्या अभ्यासाशिवाय कळणें शक्य नाहीं. आप्तवाचक शब्द, सामाजिक चाली–रीती, आचार–विचार, यम–नियम यांनीं बद्ध असल्यानें सामाजिक इतिहासाभ्यासाचें एक प्रमुख साधन आहेत. समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे ते चालते–बोलते शिलालेख आहेत. तौलनिक व ऐतिहासिक पद्धतींच्या भाषाशास्त्रीय अभ्यासांत या शब्दांचें महत्त्व अनन्यसाधारण असतें. दोन भिन्न भाषांतील वांशिक संबंध स्पष्ट करण्याचें एक साधन या दृष्टीनें हे शब्द फार उपयोगी पडतात. कोणत्याहि भाषेंत बालकाला प्रथम आत्मसात् होणारे शब्द आप्तवाचकच असतात. मानव हरघडी त्यांचा उपयोग करीत असतो. पुरातन काळांत एखाद्या स्त्रीनें आपल्या सहचराचा **'नवरा'** या अर्थी एखादा शब्द वापरून उल्लेख केला असेल, अगर एखाद्या बालकानें आपल्या जन्मदात्रीस **'माता'** या अर्थानें संबोधिलें असेल, तेव्हांच मानवी समाजजीवनास प्रारंभ झाला.

आप्तसंबंध हे रक्ताच्या नात्यानें आणि विवाहादि संस्कारांनीं जुळत असतात. त्यांच्या विस्ताराच्या कक्षा समाजासमाजांत भिन्न आढळून येतात; स्वरूपही विविध प्रकारचें असतें. आप्तवाचक शब्द हे या संबंधाच्या स्वरूपविस्ताराचे निदर्शक असतात. हिंदी भाषेंत **'नाना'** या शब्दानें 'आईचा बाप' हा संबंध दर्शित होतो; तर आफ्रिकेतील कांहीं भाषांतून हाच शब्द 'बापाचा बाप', 'बापाच्या बापाचा भाऊ' वगैरे कमींत कमी चौतीस नात्यांसाठीं वापरतात. इंग्रजींतील आप्तसंबंधा इतकाच तद्वाचक शब्दसंग्रह संकुचित आहे.

ऋग्वेदकालीन आर्य–भारतीय भाषेकडे दृष्टिक्षेप टाकल्यास, तिच्यामध्यें प्रमुख तेवढेच आप्तसंबंध–निदर्शक असे शब्द आढळून येतील. **आई, बाप, भाऊ, बहीण, आजोबा** (बापाकडून), **वंशज, पुत्र, कन्या, नातू, पणतू, पत्नी, पति, सून, जांवई, सासू, सासरा, मेहुणा** व **मेहुणी** एवढ्याच आप्तसंबंधांचा उल्लेख वेदांत आढळतो. **'आईचा भाऊ'** हा संबंध दर्शविणारा शब्द सूत्र-वाङ्मयांत प्रथम आढळतो. **मावशी, आत्या, भावजय** इत्यादि संबंध दाखविणारे शब्द महाभारत व तदनंतरच्या संस्कृत साहित्यांत प्रथम आढळून येतात.

प्रस्तुत निबंधाचें स्वरूप व हेतु मर्यादित आहे. हा निबंध म्हणजे मराठी भाषेंतील यच्चयावत् आप्तसंबंधबोधक शब्दांच्या ससंदर्भ पाहणीचें एक अंग आहे. मराठीच्या प्रारंभकालीं शिलाखंडांवर खोदलेल्या लेखांपासून सुरुवात करून, प्रत्येक कालखंडांतील प्रातिनिधिक स्वरूपाच्या ग्रंथांत आढळणारे व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत बोलल्या जाणाऱ्या विविध मराठी बोलींतून सद्यःकालांत वापरांत असणारे आप्तवाचक शब्द या पहाणींत संग्रहीत केलेले आहेत. समाजशास्त्रीय व भाषाशास्त्रीय अभ्यासास प्रस्तुत पाहणी उपयोगी पडेल असा भरंवसा आहे.

मराठी वाङ्मयांत **'नवरा'** या अर्थानें वापरले जाणारे बहुसंख्य शब्द संस्कृत असून ते तत्सम अगर तद्भव स्वरूपांत आढळतात. त्यांतील **'भर्ता, स्वामी, वल्लभ, धनी, वर, नाथ, गृहस्थ'** इत्यादि शब्दांचा वापर व्यवहारांतून नाहींसा झालेला आहे. **'पति'** हा शब्द मालक, प्रमुख, नियंत्रक या अर्थानें आजहि राष्ट्रपति, सभापति, सेनापति वगैरे शब्दांत आढळून येतो. **'दंपती'** शब्दानें गृहाचें स्वामित्व पति व पत्नी या दोघांच्याही हातांत होतें, व कर्तेपणाचा वसा आजच्याप्रमाणें फक्त नवऱ्याच्याच हातीं गेलेला नव्हता हें सूचित होतें. (दम = घर + पति = स्वामी).

'कांत' :—या शब्दानें केवळ पति एवढाच अर्थ सूचित होत नसून प्रियपति किंवा आवडता पति असा अर्थ व्यक्त होतो.

उदा :—अर्जुना तो चि भक्तु । तो चि योगी मुक्तु ।
तो वल्लभा मी **कांतु** । ऐसा पढियें । — ज्ञा० १२·१५६.

कांताला एकांतीं कधीं पाहूं गे सखये ॥ — रामजोशी : लावणी

वाटच्या वाटसरा ! नको करूं उभा घोडा
कंथ माहा जंगलांत मोजे वाघिणीच्या दाढा ! – वऱ्हाडी लोकगीतें ५२

'यजमान' :—या शब्दाचे आज अनेक अर्थ प्रचलित आहेत. संस्कृतांत 'यज्ञ करणारा' हा या शब्दाचा मूळ अर्थ होता. त्याचे आज पति, मालक, प्रमुख, एकाद्या स्त्रीचा जार किंवा गणिकेचा आश्रयदाता असे वेगवेगळे अर्थभेद झालेले आहेत.

'नाथ' :—मराठींत हा शब्द नित्याच्या व्यवहारापेक्षां काव्यनाटकांत, आणि तोहि संबोधनार्थी वापरला जातो.

उदा० :—सत्य वदें वचनाला नाथा—एकच प्याला.

ज्ञानेश्वरींत (९·२८४) याचा 'मालक' या अर्थानेंच वापर झालेला दिसतो.

'स्वामी' :—हा शब्ददेखील वरील शब्दाप्रमाणें पति अगर मालक या अर्थानें वापरला जातो.

उदा० :—**स्वामिचें** काज । ना बापिकें व्याज ।
परि यमेंसिं जूझ । नीच नवें ॥ — ज्ञा० (१२·६७)

'**वल्लभ**' :—याचा केवळ आवडता, प्रिय असा अर्थ न राहतां 'आवडता पति' हाही अर्थ रूढ झाला.

उदा० :—म्हणौनि जिये बाहे उभा ।
तो लक्षुमीयेचा **वालभा** ॥ ज्ञा० १८·१६२६.

'**भ्रतार**' :—कानडीनें केला मऱ्हाटा **भ्रतार** ।
एकाचें उत्तर एका न ये ॥ — तुगा० ८७.
तो विश्वश्रियेचा **भर्त्ता** । मीं चि गा पांडुसुता ॥— ज्ञा० ९·२७९.
मनासारिखे दीर **भर्तार** भावे । — रामदास, सकृतयोग-श्लो० २
कोण सरदार हिचा **भरतार** ? । रामजोशी : लावणी
तीयेचा **भातारू** तेथ संध्या करूं आला ॥
— लीळाचरित्र, एकांक ६८.
बाई ! **भ्रताराचे** राजीं मोठं **भ्रतारा**चं सुख
पिंडीवर शंकराच्या फूल वाहतें नाजुक !
— वऱ्हाडी लोकगीतें ७२

संस्कृत 'भतृ' शब्दांचीं अनेक अपभ्रष्ट रूपें (**भ्रतार, भ्रतारु, भर्त्ता, भर्तार, भरतार, भातार, भातारू**) प्राचीन मराठींत वापरांत असलेलीं दिसतात. आजही चांदा जिल्ह्यांतील माळी व मराठी शेतकरी '**भर्तार**' हा शब्द नवरा या अर्थीं वापरतात.

'**रमण**' :—मुळांत खेळणें, क्रीडा करणें असा अर्थ असलेल्या या शब्दास पुढें 'पति', एवढाच मर्यादित अर्थ प्राप्त झाला. प्रामुख्यानें हा 'राधारमण', 'रुक्मिणीरमण' अशासारख्या समासांतूनच आढळतो.

तयामध्यें मज ठेवीं नारायणा ।
लक्षुमी**रमणा** सोइरिया ॥ — तुगा ४४३७

'**पुरुष**' :—अत्यंत व्यापक अर्थाचा शब्द असूनहि 'नवरा' एवढ्याच मर्यादित अर्थानेंहि हा शब्द वापरला जातो.

कांता तरुण **पुरुष** वृद्ध ॥ — दासबोध ३·५·२५.
तुझा जन्म कवणें वंशी ।
पुरुष तुझा कोण सांगे ॥ गुरुचरित्र ३५·२४१.

'**वर**' :—हा शब्द हल्लीं 'नवरा' या अर्थानें वापरला जातो, तो प्रायः विवाहप्रसंगींच. परंतु, प्राचीन वाङ्मयांत त्याचा अन्यत्रहि उपयोग केला जात असे.

नोवरी आलिया घरा । अति हव्यास वाटे **वरा** ॥
— दासबोध ३·२·३९

परपुरुषाचे पायीं स्त्रियांनीं
सोडून आपला **वर** ॥ — होनाजी ६५.

'**वरधवा**' :—एकाच अर्थाचे दोन शब्द एकत्र येऊन (Blend formation) हा शब्द तयार झाला आहे [वर + धव (सं.)].

वटेश्वर चांगा **वरधवा** ।
तुम्ही नेउनी मध्यें बैसवा ॥ — चांगदेवगाथा.

'**प्राणनाथ**' :—मराठी नाटकांतून नवऱ्यास लडिवाळपणें हांक मारण्यासाठीं उपयोगांत येणारा हा शब्द आज वापरांतून नाहींसा झाला आहे.

सुभद्राः—**प्राणनाथ**, आपण दुसरी कांहींतरी युक्ती करावयाची होती तें सोडून संन्यास घेऊन लोकांनीं चेष्टा करण्याला साधन कां बरें केलें ?—सौभद्र

नाना वेंटाळूनु जीवितें । गुणावगुण उखिते ।
प्राणनाथा उचितें । दीन्हलें प्रिया ॥ ज्ञा. १३·३७२

रामदासांनीं हा शब्द प्राणांचा स्वामी या अर्थानेंच वापरलेला दिसतो.

उदा.—हनुमंतास बोलिजे **प्राणनाथ**; येंणें गुणें हा समर्थ ॥—दासबोध १६·६·२६

नवरा हा स्त्रीच्या प्राणाचा व प्रेमाचा सर्वस्व असल्यानें '**प्राणेश्वर, प्राणजीवन, प्राणवल्लभ, प्राणपति, प्राणप्रिय, प्रिय, प्रियकर, प्रियतम, प्रियोत्तम**' असे अनेक सामाजिक शब्द मराठी वाङ्मयांत रूढ झालेले दिसतात. संस्कृत-मराठीच्या संगमांतून **प्राणप्यारा**, **प्राणनाहो** या शब्दांचा उद्भव झाला आहे.

'**घरवाले**' :—मराठी कुटुंबपद्धतींत नवरा हा कुटुंबप्रमुख व घराचा मालक असल्यानें 'घर' या शब्दाशीं संबंधित असलेले '**घरकार, घरकरी, घरधनी, घरधणी, घरठाव, घरबारी घरभारी, घराचारी**' असे अनेक शब्द वापरांत असलेले आढळून येतात.

भार्या मित्र **घरवारिया** —मुक्तेश्वर वन० १८·७१

ऐशिया स्त्रियांचे **घराचारी** ।
खराच्या परी नांदती ॥ —एक० भाग० १३·२१४

'**घरठाव**' या शब्दाचा संसार असा व्यापक अर्थ आहे. '**घरधनी**' शब्दाऐवजीं नुसता '**धनी**' शब्दहि वापरला जातो.

'**दादला**' :—मराठीच्या अनेक बोलींतून '**दादला**' या पतिवाचक शब्दाचा वापर केला जातो. या शब्दाचे '**दादुला, दाला, दादल्या, दादलोजी**' असेहि पर्याय आढळतात.

दादला सेज नावडे। निजे जगझोडीचे चाळे॥ तुगा० ४५८.
बिरिदांचे **दादुले** जाले। हीवां ऐसे॥ ज्ञा० १·१३५.
जेया **दादुलेयाचा** संकल्पु। विश्व रची॥ ज्ञा० १३·१०८.

ज्ञानेश्वरींत 'दादुला' हा शब्द साधारणतः वीर, समर्थ अशा अर्थानें वापरलेला आढळतो. महानुभाव वाङ्मयांत तो केवळ 'पुरुष' या अर्थीं वापरलेला दिसतो. (लीळाचरित्र-पूर्वार्ध १३६, १३७; वृद्धाचार २२; नरुस्व० ३८३). अमृतानुभवांत मात्र हा शब्द 'नवरा' या अर्थानेंच वापरलेला आढळतो.

जेणें **दादुलेन** सत्ताविशेषु। शक्ति जाली॥—अमृ० १.२७.

'**अंवुला**':—हा शब्द '**आमुला, अवला, आमोला**' या स्वरूपांतहि आढळतो.

आमुलेया आवुलिये। संगति ना सोये॥ज्ञा० १३·९७४.
कांतेचिया भिडा। **अवला** होये जगायेंव्हडा]—अमृ० १·३४.
नंदनंदन हा आचोज **अंवुला** वो॥—निळोब गाथा ६५.
जियेचा विसांवला नुरे। **आंवुलेंपणही**॥—अमृ० १·३७

'**गोहो**':—कोंकणी, कुडाळी व डांगी बोलींत हा शब्द अगर याचे पर्याय नवरा या अर्थीं वापरले जातात. याचे पर्याय '**घो, घोऊश, घोव,**' असे आढळतात. **घोवगाडा** ह्या शब्दाचा तिरस्कारार्थीहि उपयोग केला जातो. हा शब्द संस्कृत 'गोघः' शब्दापासून व्युत्पादिला जातो.

सुखे बोळंब **गोहा**। माझे दुःख नेणा पाहा॥—तुगा.

'**कवेश**':—व्यर्थ दिवस जातात। खबर सांगा माझ्या **कवेशा**॥—होनाजी १११.

'**नावो**':—[नाथ (सं.) **नाहो** (प्रा.) रमानाह (ज्ञा. १२·२१६)

जैसा व्यंकटाचळीं **नावो**। लक्ष्मीचा प्रत्यक्ष॥—मुक्तेश्वर आदि० ४·५६

'**धगड**':—एक अशिष्ट प्रयोगांत वापरला जाणारा शब्द. मूळ अर्थ जार.

'पोरी आज मुके देतांना तोंड असें वाकडें करतेस पण उद्यां **धगड** मुके घेऊं लागला म्हणजे कसें करशील?—बहकलेली तरुणी ६·३.

'**अयाळ**':—विधवेच्या नांवापुढें नवऱ्याच्या नांवापूर्वी लिहिला जाणारा 'नवरा' या अर्थाचा शब्द. वस्तुतः 'अयाल' ह्या शब्दाचा फारशींत 'स्त्री' असा अर्थ आहे. याच तऱ्हेचे '**कोम, भ्रतार** व **जवजे**' असेही शब्द वापरांत आहेत.

'**कारभारी**':—मराठी कुटुंबांत आपल्या पतीचा, नांवानें उल्लेख करणें, अगर त्यास नावानें हांक मारणें त्याज्य समजलें जातें. तसा उल्लेख करणें झालेंच, तर '**कारभारी, कारबारी, हे, इकडे**' अशासारखे अप्रत्यक्ष उल्लेख केले जातात. हांक मारावयाची

झाल्यास, मुलाच्या नावानें मारली जाते. हल्लीं मात्र कांहीं सुशिक्षित कुटुंबांतून प्रत्यक्ष नांवानेंच हांक मारली जाते.

'**बामुण**' :—कारवारी-कोंकणींत आढळणारा एक शब्द.

'**ओहोडास्**' :—कातकरी नांवाच्या वन्य जमातींत नवरा या अर्थानें येणारा शब्द.

'**मिष्टर**' :—सुशिक्षित महाराष्ट्रीय कुटुंबांतून पतीचा उल्लेख **मिष्टर** किंवा **साहेब** याही शब्दांनीं केला जातो.

'**नवरा**' :—सर्व महाराष्ट्रभर आढळणारा शब्द. कोंकणींत याचे पर्याय **नव्हरो, न्हवरा** असे आढळतात.

नवरीचें मन नवऱ्यावरी । —दा० १७·२·२२

'**मालक**':—ह्या फारसी भाषेंतील शब्दानें, अन्य व्यक्तीबरोबर बोलतांना स्त्रिया आपल्या नवऱ्याचा उल्लेख करतांना आढळतात.

'**दिलवर**' :—फारशी दिल् शब्दाशीं संयोगित **दिलभर, दिलवर, दिलबर** हे शब्द शाहिरी वाङ्मयांत आलेले आढळतात. या शब्दांना मुख्यत्वें करून प्रियकर असा अर्थ असला, तरी नवरा या अर्थानेंहि त्यांचा वापर केलेला आढळतो.

'**बिजवर**' :—द्वितीय विवाह करणाऱ्या गृहस्थास **बिजवर, 'पाटकर'**, किंवा **पाटाचा नवरा** असे शब्द आहेत. गोमंतकांत '**होरेत**' असा शब्दहि आढळतो.

हीनवर **बीजवर** दोघी त्या गडणी ॥—तुगा० ४४९५.

आधीच वर **बिजवर** पतीला हिणवर मी झाले ॥—परशराम : लावणी.

'**दरभाऊ**' :—एका स्त्रीस दोन नवरे असल्यास त्यांना **दरभाऊ** अगर **भाडेभाऊ** अशी संज्ञा आहे.

आधुनिक काळांतील कांहीं साहित्यिक स्त्रियांनीं आपल्या वाङ्मयीन प्रपंचांत पतिनिर्देश खालील पद्धतीनें केलेला आढळतो :—

रमाबाई रानड्यांनीं आपल्या आयुष्यांतील आठवणी सांगतांना न्या. रानड्यांचा उल्लेख करण्यासाठीं '**स्वतः**' असा शब्द योजलेला आहे. पार्वतीबाई आठवले आपल्या आत्मचरित्रांत पतीचा निर्देश '**आमचीं माणसं**' असा करितात, तर लक्ष्मीबाई टिळक व आनंदीबाई कर्वे यांनीं आपल्या यजमानांचा उल्लेख त्यांच्या आडनावानें, अनुक्रमें टिळक व कर्वे असा केलेला आहे. लीलाबाई पटवर्धनांनीं आपल्या ११ वर्षांच्या संसाराचा चित्रपट रंगवितांना कविवर्य माधव जूलियन् यांचा 'माधवराव' असाच उल्लेख सर्वत्र केलेला आहे.

पतिवाचक मराठी शब्दांचें मूळ पाहिलें आणि त्यांच्या बदललेल्या अर्थच्छटांचा विचार केला कीं मराठी समाजपद्धतीवर आणि 'पती'च्या विशिष्ट स्थानावर उद्बोधक प्रकाश पडतो. पण तो समाजशास्त्रीय विषय या लेखाच्या कक्षेपलीकडचा आहे.

'फार' शब्दाची थोडी चर्चा

—स. गं. मालशे

'पुष्कळ', 'विस्तृत', 'अधिक' या नेहमींच्या अर्थांनीं 'फार' हा शब्द किंवा त्या शब्दाचीं रूपें ज्ञानेश्वरींत अनेकदां येतात, उदा०—३-२४३, ६-१३४, ७-१२२, ८-७३, ८-१९४, १३-६३३, १३-८४९ इ०

परंतु पुढील स्थळीं 'फार' या शब्दाचा अर्थ वेगळा होतो :—

(अ) यन्हविं दोरिएचेआ उरगा । डांगा मेळवितां पैं गा ॥
तो वाओचि फारु गा । केला होए ॥ १५-२२८ ॥

(आ) जैसें सिंपीपण हारपे । तंव तंव खरें होए रूपें ।
कां दोरी लोपतां सांपे । फारां होइजे ॥ १५-२७८ ॥

या शब्दांचे कोशगत तसेंच ज्ञानेश्वरीच्या प्रमुख प्रतींतील अर्थ आतां पाहूं.

(१) रा. ना. वेलिंगकरकृत ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार :—

फार :—अधिक, विस्तृत.

— वेलिंगकरांनीं १५-२२८ या स्थळींचा अर्थ 'ती मारहाण व्यर्थ केली असें होतें' असा दिला असून १५-२७८ या स्थानींचा अर्थ 'दोरीच आहे हें खरें ज्ञान लोपल्यावर, सर्प आहे हा भास जास्त दृढ होतो' असा केला आहे. म्हणजे पहिल्या ठिकाणीं 'फार' चा 'मारहाण' आणि दुसऱ्या स्थळीं 'दृढ' असा अर्थ ते करतात.

(२) शि. न. भावेकृत श्रीज्ञानेश्वरी शब्दार्थकोश :—

फार :—(वि.) पुष्कळ, बहुत, अधिक. ३-२४३ (स्फार)

फार :—(पु.) धडपड. १५-२२८ (प्र + कर)

फारां :—(क्रि. वि.) उघड, स्पष्ट. १५-२७८ (स्फार; प्रायः)

(३) एम्. जी. पानसेकृत लिंग्विस्टिक पिक्युलिॲरिटीज् ऑफ् ज्ञानेश्वरी :—

फार :—'a' much, immense, wide.

(४) आगाशेप्रत :—१५-२२८ या ओवींत 'ती धांवाधाव व्यर्थ केल्यासारखी होते'...फारु = स्फुरण शब्दाचें हें विकृत रूप असावें. स्फुरणावरून फुरफुर, धडपड, धांवाधांव असा अर्थ आम्ही येथें केला आहे. या प्रतींत पुढें १५-२७८ संबंधांत अर्थ असा केला आहे :—'...सापें फारां होइजे = सापाचें स्फुरण होतें, हा साप, असें ज्ञान स्फुरण पावतें...फारां = स्फुरण...'

(५) वा. अ. भिडे-प्रत :—

या प्रतींत १५-२२८ (म्ह. त्यांच्या प्रतींतील १५-२५१) या स्थळीं 'तो शिणुचि वाउगा । केला होय' असा उत्तरार्धाचा भिन्न पाठ आहे. १५-२७८ (म्ह.

त्यांच्या प्रतींतील १५–३१०) या ओवीच्या उत्तरार्धाचें 'ज्ञान लोपतें, तसतसा दोरीवरील सापाचा भ्रम दृढ होतो'—सारांश 'फारां' चा अर्थ दृढ असा घेतात.

(६) शं. वा. दांडेकर-प्रत :—

दांडेकरप्रतींत १५–२२८ (म्ह. १५–२५१) या स्थळीं पुढीलप्रमाणें अर्थ दिला आहे :—'तर त्याचें व्यर्थच ओझें गोळा केल्यासारखें होतें.' आणि १५–२७८ (म्ह. १५–३१०) या ओवीच्या उत्तरार्धाचा अर्थ असा दिला आहे :—'दोरीच्या यथार्थ स्वरूपाच्या अज्ञानांत सापाचा भास जसा जास्त दृढ होत जातो...'—साखरे व कुंटे या प्रतींमध्यें 'फार' चा अर्थ अनुक्रमें 'प्रतीति' व 'प्रसृत' असा केलेला आढळतो.

—या ओव्यांतील अभिप्राय पाहतां येथें सर्प–रज्जु दृष्टान्त किंवा 'साप समजून दोरी घोपटण्याचा' दाखला ज्ञानेशांना द्यावयाचा आहे, हें उघड आहे. 'ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार' मध्यें १५–२२८ च्या संदर्भात अनुमानधपक्यानें 'मारहाण' असा जो अर्थ केलेला आहे, तो मूळ अभिप्रायाशीं जवळ येणारा आहे. 'फार' हा शब्द आद्य व्यंजनलोप आणि मध्य अ–स्वरलोप (Syncope) या प्रक्रियांतून 'प्रहार > पहार > फार' असा सिद्ध झालेला आहे.

फा० स्टीफन्सच्या क्रिस्तपुराणांत 'फार' हा शब्द 'घाव, तडाखा' या अर्थी येतो. पुढील उदाहरणें स्वयंस्पष्ट आहेत :—

(१) मारिती उदंड फार। दिधले कस्ट अफार (१–१५–१०)

(२) दाहां फारांचे घाये आघवे (२–१२–२२)

(३) फारु फारावरि पडत। घावो घायावरि वैसत॥
रक्त रक्तावरि वाहांत। जेजुचां पवित्र अंगीं॥ (२–४७–९८)

—दियोगु रिबैरु यानें इ. स. १६२६ मध्यें रचिलेल्या कोंकणीपोर्तुगीज कोशांत 'फारु' शब्दाचा अर्थ a Pancada असा दिलेला आहे.

वर चर्चिलेल्या १५ व्या अध्यायांतील दोन्ही ठिकाणीं 'फार' चा अर्थ प्रहार असाच घ्यावा. 'एरवीं दोरीरूप सापाला ताडण करण्यासाठीं काठ्या जमवून केलेला प्रहार व्यर्थच ठरतो' असा १५–२२८ या ओवीचा अर्थ उघडच आहे. १५–२७८ मध्येंहि "जसा दोरीचा भास लोपल्यावर सापावर प्रहार व्हावे' असा अर्थ घेतां येईल.

सारांश ज्ञानेश्वरींत १५ व्या अध्यायांतील १५–२२८ आणि १५–२७८ या दोन ओव्यांतील 'फार' हा शब्द 'प्रहार' वरून आलेला असून त्याचा अर्थ 'घाव, आघात' असा होतो.

विष्णुदासकृत शिबिकथा अथवा कपोताख्यान

ज. शा. देशपांडे

भारत इतिहास संशोधकमंडळाच्या श. १८३४ च्या षाण्मासिकांत कै. गो. का. चांदोरकर यांनीं 'नामदेवराय व कपोतनामा' या लेखांत शिबी राजा व कपोत यांच्या आख्यानाचा परिचय करून दिला. परंतु हें प्रकरण कुठेंहि उपलब्ध होत नव्हतें. कै. आजगांवकरांच्या कविचरित्रांतहि नामा पाठकांच्या शिबीकथेची माहिती दिलेली आढळते. डॉ. वसंत पारखे यांनीं महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत (जुलै–डिसेंबर १९६३) विष्णुदास नरसिंहाच्या तंजावर येथील कपोताख्यानाचा उल्लेख केलेलें काव्य आणवून पाहतां त्या काव्यांतल्या ओव्या कविचरित्रांतील नामा पाठकांच्या ओव्यांशीं जमत नाहींत; परंतु चांदोरकरांनीं वर्णन केलेल्या कपोताख्यानांशीं जुळतात असें आढळलें. हीं दोन काव्यें थोड्याफार फरकानें एकच आहेत यांबद्दल शंका उरत नाहीं. तंजावर (हस्त. क्र. ८७३) येथील प्रकरण १५२ ओव्यांचें; तर चांदोरकरांचें प्रकरण १५३ ओव्यांचें आहे. त्यांनीं उद्धृत केलेल्या ३,११, १७, २४, २६, २८, ३८, ४५, ७१, ८५, ८६, ९८, ९९, १०३, ११०, १२५, १२७, १२८, १२९, १५०, १५३ या ओव्या तंजावर प्रतीच्या ३, १२, १८, २७, २९, ३१, ३८, ४४, ६९, ८३, ८४, ९६, ९९, १०२, १०९, १२३, १२७. १२८, १२९, १४८, १५२ ओव्यांशीं जुळतात. मात्र चांदोरकरांच्या आख्यानाच्या शेवटच्या ओवींत कविनाम नुसतें विष्णुदास आहे. ती ओवी "विष्णुदासाचा दातारु। पावला भक्तालागी सारंगधरु। प्रसन्नरुपी सदा हरिहरु। नामस्मरणे पावतुसे॥ १५३॥ अशी आहे यावरून हें काव्य विष्णुदासनामा याचें नसून विष्णुदास कवीचें आहे असें दिसतें. त्याचें विष्णुदास नरसिंह असेंहि नांव असेल. आख्यानाच्या प्रास्ताविक ओव्यांत कवीच्या गुरूचें नांव रामभारती असल्याचा उल्लेख येतो; तर विष्णुदास नाम्याच्या गुरूचें नांव चिंतामणी व गोपिनाथ असल्याचे उल्लेख (महाराष्ट्र सारस्वत व भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३७) आढळतात. आत्मागुरु व लौकिक गुरु अशी निरनिराळीं गुरुनामें असूं शकतात, परंतु एकंदरींत पाहतां, हा विष्णुदास कवि विष्णुदास नामा नसून निराळा असावा असें वाटतें. त्याचें तंजावर येथील काव्य खालीं दिलें आहे. या प्रतींत 'ळ' ऐवजीं सर्वत्र 'ल' येतो; तो जरुर तेथें बदलून घेतला आहे. या काव्यांत 'मूग आरोगणें', वीतले, अवीश यासारखे जुने शब्द व शब्दप्रयोग आढळतात. प्रत थोड्याशा ठिकाणीं अशुद्धतेमुळें दुर्बोध आहे. काव्य एकनाथकालीन अथवा थोडें पूर्वीचें असावें.

॥ शिबी कथा ॥

श्री गुरुभ्यो नमः ॥ नमो जी फरशेधरा। सरळसोंड लंबोदरा। येकदंता वीघ्नहरा। वीनती परियेसा माझी ॥ १ ॥ मग तें ऐकोनी सारदा। जे कास्मीरीची अभयेवरदा। ते मज प्रसंन सदा। मग प्रबंधीं सौरसु ॥ २ ॥ मग म्या वंदीला गुरू। रामभारथी दीगांवरू। तेणें मस्तकीं ठेविला करू। मती विस्तारू तो जाला ॥ ३ ॥ करूणावचनीं अभ्र भरलें। भावे अनंत प्रसंन जाले। मग प्रबंधी आरंभीले। चरीत्र पवित्र रायाचें ॥ ४ ॥ बाप सत्वधीरू राजा। येणे देह वेचीला बरवीया वोजा। देव प्रसंन केले पैजा। वैकुंटीच्या निवासीया ॥ ५ ॥ मुक्तीक्षेत्र नि विस्णुकांती। तेथे राजा सीभ्री चक्रवर्ती। तयाची राणी सत्येवती। ते मीरवे धर्मपुत्रेसी ॥ ६ ॥ राजा सूर्यवंसी नीधान। केला आश्वमेध येज्ञ। नव्याणव सीधी गेले गहन। पवीत्र जाले ते वेळे ॥ ७ ॥ नारदु वीचारी मानसी। पुर्ण जालीया येज्ञासी। राजा पाविल इंद्रपदासी। ते इंद्रासी जाणउ ॥८॥ कली जोडली आन पासी। थोर गांजलो उपवासी। राजा टालावा सत्वासी। मग स्वर्गासी नीघाला ॥९॥ तो कली लावावयाचा राणा। कली लावीतीया जाणे खुणा। संतोश उपजवी आपुलीया मना। मग होणार होते ये ॥ १० ॥ मग तो नारदु माहामुनी। पावला ईंद्रभुवनी। ईंद्रे सन्मान करूनी। कर जोडुनी पुसीयेले ॥ ११ ॥ कवणा कार्या बीजें केलें। यैसें इंद्रें नारदाते पुसीले। येरे आदरे सांगीतले। आपुर्व वर्तले मृत्येलोकी ॥ १२ ॥ कांती नगरी सीभ्री चक्रवर्ती राजा। तेणे येज्ञ केला बरवीया वोजा। तुम्ही जावे आपुलीया काजा। सत्वें राजा टालावा ॥ १३ ॥ टालीता वर्म आसे बरवें। येकाल तरी सांगेन स्वभावे। येज्ञकाली जे मागावे। ते द्यावे राजयानी ॥ १४ ॥ येणे नेमे राजा टले। तरी केले पुण्य वीतुले। येज्ञ कैचा ते वेळे। आभिलासीता न पवीजे ॥ १५ ॥ तुम्ही व्हावे जी कपोता। येज्ञ ससाणा नीभ्रांता। तुम्ही पाठीये धावता। जावे त्वरीतां कांतीये ॥ १६ ॥ राजाकरीं तुम्ही वैसावे। याने अंतरे दुरी राहावे। राहुनी तुम्हासी मागावे। सत्व टालावे रायाचे ॥ १७ ॥ यैसा वीचार नारदें सांगीतला। ईंद्र थोर संतोशला। यज्ञाचा ससाणा केला। आपण जाला कपोता ॥ १८ ॥ इंद्र पाठी येज्ञु धांवतां। आले मृत्येलोका त्वरीता। नगरीमाजी प्रवेसता। कपोता रळे वेगेसी ॥ १९ ॥ तव रावो आरूढ सींह्यासनी। सुबुधी प्रधान कर। जोडुनी। धर्मपुत्र अर्धसिंह्यासनी। ऐसे स्थानी मीरवती ॥ २० ॥ नवल

वीतले ते आवस्वेरी। कपोता बैसे रायाकरी। ससाणा बैसे देखोनी दुरी। राजा जीवी वीस्मीतू ॥ २१ ॥ रावो सुबुधीसी बोलिला। कपोता काये म्हणोनि आला। येरु म्हणे ससाणा पाठी लागला। हा शरण आला स्वामीयासी ॥ २२ ॥ जी हे कपोते राखावे। ससाणा भोवडावे। शरणागता नेदावे। हे पोसावे कवतिक ॥ २३ ॥ जे शरणागत येती। ते जरी वैरीया देइजती। तरी जोडेल आपकीर्ती। तु तो चक्रवती नव्हेसी राया ॥२४॥ जी या कपोतासी देणें। त्याहुनी काये आहे उणे। हे काये जी ससाणे। दवडुनी घाला वाहेरी ॥ २५ ॥ तव ससाणीया जाली वाचा। पापा ग्रासु दे गा आमुचा। बोल ऐकोन कोपाचा। ग्रासाआड येतसे ॥ २६ ॥ हा पापाचा उपदेशु। माझा राहावीतो ग्रासु। (व)न वीचारीनी प्रवासु। पोटालागी वोलगता ॥२७॥ हा काये होये जी तुमचा। कवणु उचारु याच्या नावाचा। नीस्टुर बोलतसे वाचा। कले पापाचा रीघावा ॥२८॥ ऐकोनी बोलाची टेव। रायासी जाले आपुर्व। सांगे प्रधानाचे नाव। म्हणे प्रधाना नाव सुबुधी ॥ २९ ॥ आईकोनी ससाणा माथा तुकी। बुधी नेदवे नावासारीखी। हा प्रधानु तरी नीकी। राया किर्ति होईल ॥३०॥ ईश्वरू नाव मोली आणी। कुबेरू नावे वाहे पाणी। वीधवा नाव सोवासणी। हे भांडवणी नावाची ॥ ३१ ॥ धोतरीया नाव कनकु जाणा। भीतरी वीश दे द्रवणा। सुबुधीया कुडेपणा। हे नीर्वाण-बुधी ॥ ३२ ॥ राया वीचारीता हेची घडे। हा मायेबापासी आवडे। तेही नाव ठेवीले कोडे। हे बापुडे काये जाणे ॥ ३३ ॥ राया याचेनी विचारे। राज्य कैसेनी सावरे। बोल हे पापाची उतरे। राज्ये न धरे बहुत दीवस ॥ ३४ ॥ प्रधानावीण केंवल। राया राज्ये होये व्याकुळ। कैसेनी संचरे प्रजाकुळ। लोक सकल दुःख पावती ॥ ३५ ॥ राया राजी(या)पाप घडे। ते पाप राजया जडे। राज्या पापी प्रधान कुडे। मग नीका पाहीजे प्रधानु ॥ ३६ ॥ तरी याचे बोल नायीकावे। माझे अवीश मज द्यावे। याचीया बोला न वीस्वासावे। म्हणे या नावे कुबुधी ॥ ३७ ॥ केवढे कस्टी आहारु जोडला। तो तुवा पाठीसी घातला। रंकावरी राव कोपला। त्याणे सांगावे कोण्हासी ॥ ३८ ॥ पशु पडे स्वामीया दाखु। हा काये नेणेसी वीवेकु। तुजवाचुनी असे आणीकु। मग त्यापुढे सांगावे ॥ ३९ ॥ बापे पुत्रासी वीकावे। माये बाळकासी वीश द्यावें। राये सर्वस्वे हीरावें। तेणे सांगावे कवणासी ॥४०॥ तरी तुं पृथ्वीपती राजा। ग्रासु राखसी कवण काजा। आहारु नेदीजे माझा। हा भाव तुझा कवणु ॥ ४१ ॥ कपोतयासी

द्या सुख। आणि मज उपजावें दुःख। आलीया होणे वीमुख। हे कौतीक कायीसे॥ ४२॥ राया वृतीलोप करुनी। अन्नछेत्रासी लाउनी। हे पुण्ये म्हणउनी। जाणतेनि कैसे मानावे॥ ४३॥ राया वीहीरी मोडीजेती। आणी देउल करीजेती। या धर्माची परी ये गती। कोठे सरती सांग पां॥ ४४॥ ब्राह्मण पाचरुनी अपमाने। वाढीजेती शडरश पकवाने। वीचारुनी पाहे पां मने। येणे आनदान काये लाभु॥ ४५॥ मी जी खावया भुकेलु। प्राण जाता न लगे वेलु। जव मी नव्हे व्याकुलु। तव सांभालु करी माझा॥ ४७॥ हा पक्षीया तुझाची जाला। तरी मी अतीत आसे आगळा। मज आहारु आपुला। वाचुनी आनु नावडे॥४८॥ तुवा येज्ञ करावे। तरी जो जे मागेल ते द्यावे। माझे मजची नेदावे। तरी कां करावे हे धर्म॥४९॥ ऐसे ससाणे बोलीले। तव राये धर्माकडे पाहीले। थोर सायास पडले। पुत्रा वीचारु सांग पां॥ ५०॥ तव धर्म आसे बोलत। राया नेदावे शरणागत। हे दीधलीया त्वरीत। सत्व नीभ्रांत गेले राया॥ ५१॥ व्याघ्राहाती गाये देणे। की त्यापासुनी सोडवणे। वीचारूनी पाहे पा मने। शरणागता नेदावे॥५२॥ जे शरणागत येती। ते जरी वैरीयां देईजती। तरी जोडेल अपकीर्ती। राया चुकी पड(त) से॥ ५३॥ जे शरणागत देणे। तरी पा धैर्या येईल उणे। जीणे होईल लाजीरवाणे। ते कवणे साहावे॥ ५४॥ राया सर्वस्व द्यावे। शरणागत राखावे। पाहे पां स्वप्न साच करावे। हरीश्चंद्र रायानी॥ ५५॥ नवल रखुमांगदाचे। शरीर देवो आदरिले पुत्राचे। रक्षण केले सत्वाचे। येवढे राया चरीत्र॥ ५६॥ पाहे पा सेजारीया श्रीपालु। तेणे सत्वर पाठीचा बाळु। प्रसंन बोला स्वनीळु। तेणे सत्व राखीले॥ ५७॥ ऐसे धर्माचे बोलणे। ऐकोनि म्हणे ससाणे। हा पवित्र सुजाण। याचे नाव सांगिजे॥५८॥ तव म्हणतसे राजा। या नाव धर्मपुत्र माझा। परीयेसी गा सत्यार्णव द्वीजा। धर्मनीती सांगतुसे॥५९॥ ससाणा म्हणे वरवी नावे। परी येकुही शाहाणा नव्हे। काये कराल वरवी नावे। तु हीत नेणसी आपुले॥ ६०॥ धर्मपुत्र जी अज्ञान। तैसाची सुबुधी प्रधान। राया नेणेसी अनुमान। त्याचा वीचारू कायेसा॥ ६१॥ आतां मज जाणवले। याचीया बोला तुंवा चीत दीधले। मग ससाणे बोलीले। माझी आस तुज नाही॥६२॥ राया भुक न लगे तव पुत्र। भुक न लगे तव मैत्र। भुक न लगे तव शास्त्र। लोकाचार मीरवत आसे॥६३॥ भुका लागलीया समंधु का पीसा। दाहाही दीशा दीसती वोसा। भुकेपुढे परीयेसा। मायेबाप नाठवे॥ ६४॥ राया परीयेसी गा गाधारीये। भुक लागली तीये माये।

...राडा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
मजुरम ७५९४७ दि: ...निर्लेख्य...

मेलीया पुत्रावरी उभी राहे । धड तोडुनी जायेची चोचा ॥ ६५ ॥ राया भुकेपुढे भोग । ते समस्त मा रोग । चान्ही आश्रमयोग । जेविलेवीण न चलती ॥ ६६ ॥ आन्नदेव प्रसंन होती । अन्न घेतलीया चाले भक्ती । आन्न देवरूशीजन तृती । आन्नेवीण नाही गती सौंसारी ॥६७॥ अन्नवीण राहो म्हणती । हे लटिके गा भूपती । ते भर्वसे न जेवीती । हे वैराग्येपण मीरवणे ॥६८॥ आगा राया तुझी आण । गेले गेले माझे प्राण । आता न वाचती जाण । गेले लोचेन बेवळे ॥६९॥ राया भुक न लगे तव आचारू । भुक न लागे तव वीचारू । भुक न लागे तव साचारू । लोकामध्ये मीरवत आसे ॥७०॥ राया अन्नाकारणे समस्त । वेदशास्त्रे अभ्यासीत । स्वर्गीचे देव येत । मृत्येलोका ॥ ७१ ॥ आन्नाकारणे आगम नेम । आन्नाकारणे याग उत्तम । आन्नाकारणे नीस्कर्म । दीगांबर हिंडताती ॥ ७२ ॥ अन्ने आवघे भेद भक्ती । अन्नेवीण नाही मुक्ती । हे साचार भूपती । ऐसे म्हणोनि व्याकुल पडला ॥ ७३ ॥ ससाणा देखोनी व्याकुल । राजा राहिला नीश्चेल । धर्म सुवुधी लोक सकल । ते व्याकुल राहिले ॥ ७४ ॥ कोण्ही कोण्हास न बोले । आवघे तटस्थ राहिले । म्हणती ससाणी जीव गेले । राया आले आपेश ॥ ७५ ॥ सुवुधी प्रधान जवली जाउनी । ससाणा आणीला उचलुनी । त्यावरी सावुली करूनी । डोळे पुसीयेले पाणीये ॥ ७६ ॥ राजा म्हणे उपाव करा । पालवी घालुनी वारा । येकवेळा उठवा पाखीरा । मग वीचारु करू भलताची ॥ ७७ ॥ सीतल उपचार करीता । ससाणा नव्हे सावचीता । तव राजा आसे बोलता । प्रधाना बुधी सांग पां ॥ ७८ ॥ हा बोल आइकोनी । प्रधान समीप जाऊनी । उठवे झडकरुनी । म्हणौनि कानी बोभायेला ॥७९॥ पतिव्रता सीरोमणी । सत्येवती बोले वचनी । आन्न नाईके जव कानी । तव कैसेनी उठवेल ॥ ८० ॥ राये सत्ये मानीले । आन्न कानि घे म्हणतीले । येरे डोळे उघडीले । मुख पसरीले तये वेळी ॥ ८१ ॥ राये सर्वाकडे पाहीले । म्हणे यास सुवुधी काये बोले । तव येरी म्हणतीले । राया कपोता दे याचा ॥ ८२ ॥ याचे यासी देता । तुज कायेसी चींता । येवढा दग्ध तुमचे चीता । जी कपोता सोडवा ॥ ८३ ॥ सुखे राज्य करीता । मध्ये कायेसी चींता । रामा येइ सीधी नेता । हे वीवसी उठली ॥ ८४ ॥ आता हाची वीचार । कपोता देईजे हा नीर्धार । हे ऐकोनी नव्हेची धीर । कपोता बोले ते वेळी ॥ ८५ ॥ राया काये वीचारीले । ते तु सांग पां वहीले । मग हीत देखेन आपुले । तेणे तुज साकडे न पडे ॥८६॥ तुवाची जी मज द्यावे । जगी तुझे हास व्हावें । ते म्या कां जी करावे । तुझे हीत देखेन ॥ ८७ ॥

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.
94203

प्राण देईन तुजपासी । मग दे सुखें वैरीयासी । परी याचे मुख परीयेसी । प्राण नेदवे आपुला ॥ ८८ ॥ बहुत येही वीचारीले । माते द्यावे ऐसे केले । आता मज तुजची पडले । कैसी देसी ते पाहुं ॥ ८९ ॥ म्हणसी बोलतसे बरळ । हा भेडसावीतो केवळ । तरी वृत्तांतु सकल । ऐक माझा ॥ ९० ॥ माझीया प्राणासवें । दोघे बाळ जाती जीवे । ते कवणे साटवावे । कवणे साहावे ते दुख ॥ ९१ ॥ राया आस्त्रीवीण घर । ते आरण्य गा साचार । तीणे सांडीले सरीर । मग हे दुख मज पडले ॥ ९२ ॥ ते बाळे माझी वाट पाहाती । मजवाचुनी आन्न नेघेती । थोर दुःख वाटे चीती । राया संगती वोखोटी ॥ ९३ ॥ बाळा मीलवावया चारा । नीघालो घरावाहेरा । चारा मीळउनी जावे घरा । तव वैरीये देखीले ॥ ९४ ॥ माते देखोनीया दुस्टी । मग लागला पाठोपाठी । मग रीघालो तुझे पाठी । थोर हींपुटी जालो जी ॥ ९५ ॥ थोर उपजला जी भयो । मग ठाकीला तुझा ठावो । शरणागता येईल देवो । तरी वीचारुनी देईजे ॥ ९६ ॥ राया मी जीवा नाही भीत आता । मज वाटे तुझी चींता । जे जे शरणागत देता । सत्वा हानी होतसे ॥ ९७ ॥ हे साच नवटे तुज । तरी नीर्धारु सांग पां मज । म्हणसी आपुलीया काज । साभीमान तुज आसे ॥ ९८ ॥ ईतुकीया बोलासी । मज उतर नेदीसी । तरी काये आसे तुझे मानसी । ते मज सांग पां ॥ ९९ ॥ कां न बोलसी ते सांग । त्वा तरी आरोगीले मुग । मज द्यावे चांग । या वीचारू याचाची ॥ १०० ॥ आता म्या काये जी पुसावे । आणी तुवा काये जी सांगावे । यावरी काये येक नेणावे । आता करीन ते पाहो ॥ १०१ ॥ यावरी बोले सत्येवती । राया परीयेसी माझी वीनती । आईक आठवले चीती । जरी मानेल तुम्हासी ॥ १०२ ॥ राया ससाणा समजावा । पालटा आहार द्यावा । जी कपोता सोडावा । कार्य जाले दोघाचें ॥ १०३ ॥ यावरी आवघे संतोशेले । जाउनी ससाणिया जवळी आले । आम्ही ऐसे वीचारीले । ते म्हणती ऐक पां ॥ १०४ ॥ आमचे उतर परीयेसा । कपोता इतुके देउनीया मासा । येरू म्हणे राया दे भाशा । या बोलासी न ठलावे ॥ १०५ ॥ या ससाणीया बोला । राये करु उचलीला । तुवाची संदेह फेडीला । या भीतरी काये आस ॥ १०६ ॥ राये सेवक बोलावीले । मोले मास आणवीले । येरू त्वरीत बोले । राया नरमांस व्हावे ॥ १०७ ॥ रावो पडीला वीचारी । ससाणा बोले तये अवश्वरी । राया भीतोसी याची-वरी । पुढे नीर्धारी केवी राहासी ॥ १०८ ॥ तव प्रधान बोलीले । राया तस्कर आसे मारीले । ते मांस आणावे वहिले । भले आठवले ये वेली

॥ १०९ ॥ येरू म्हणे जी नेघे मेलीयाचे । आणि नोघे मोलाचे । मास व्हावे जींतीयाचे । राया भाक सांभाळी आपुली ॥ ११० ॥ राजा म्हणे कैसे करावे । म्या तरी अनाथ दुखवावे । तरी तेणे कवणासी सांगावे । ते पातक आम्हासी ॥ १११ ॥ आणीक येक वीचारीजे । तव प्रधान बोलीजे । राया याचे पासि दीजे । नको करू आन वीचारू ॥ ११२ ॥ रावो काहीच न बोले । तव धर्मपुत्रे म्हणतीले । राया मांस देईन आपुले । सत्व तुझे राखेन ॥ ११३ ॥ तव बोले सत्येवती । राजा परीयेसी जी वीनती । आणीक न धरावे चीती । मांस देईन आपुले ॥ ११४ ॥ तव ससाणा म्हणे । नीवारा आपुले बोलणे । म्या तुमचे मास न घेणे । बतीस लक्षणा वाचुनी ॥ ११५ ॥ हे बोली राये ऐकीली । मनी नीश्चीती मानीली । म्हणे आता बोली पारीखीली । आम्हासी पडला समंधु ॥ ११६ ॥ आता येणे मास मागणे । म्याची पासि देणे । तुम्ही उगेची राहाणे । सत्व उणे करु नका ॥ ११७ ॥ मग बोलती तीघेजणे । तुम्हामागे नाही राहाणे । मग तुम्ही आम्हा वर्जणे । हे सांगणे नलगे जी ॥११८॥ मग राये तुले आणवीली त्वरीता । पालडा घातला कपोता । लोका समस्त देखता । राये शस्त्र करी घेतले ॥ ११९ ॥ राये मास कापीले । ते दुसरीया पालडा घातले । तव कपोते जड जाले । तीन टाक आगळे ॥ १२० ॥ राये सुख मानीजे । म्हणे आता थोडेची पाहीजे । म्हणउनी आणीक कापीजे । घालीजे तव ते आगळाची ॥ १२१ ॥ मग लोक गजबजीला । पहा हो कपोता वाढीनला । जव जव पडे मास गोळा । तव तो आंग वाढतुसे ॥ १२२ ॥ आता राया नाही उरी । लोक सकल रुदना करी । म्हणती कपोता कैचा वैरी । रावो जीवे घेतला ॥ १२३ ॥ म्हणती न (ग)रा (न) रनारी । आम्हा कपोता कैचा आला वैरी । आधीका आधीक शरीरी । जडपण धरीतसे ॥ १२४ ॥ ससाणीयाते मानउ आता । आड पडो गे समस्ता । आवघीयावीण उगे हा कपोता । जडपण नीवारू ॥ १२५ ॥ रावो कापी चाकला । तव तो वाढे आगळा । रावो कापी वेळोवेळा । येरू वाढोन राहे ॥ १२६ ॥ जे जे ठाई मास अतीले । ते समस्त कापीले । मास मात्र वेचीले । मग उरले अस्तीचर्म ॥ १२७ ॥ मग शरीर व्याकुल जाले । शस्त्र हातीचें पडले । कपोते थोर भारी जड जाले । मांस तुका न पुरेची ॥ १२८ ॥ म्हणती रावो गेला रे गेला । थोर हाहाकारू जाला । लोक दुखे आरंबळला । शरण गेले कपोतपासी ॥ १२९ ॥ तुम्ही व्हावे जी सान । मास तुकावे समान । राया द्यावे जीवदान । जीवे कंठीं प्राण धरीयेले ॥ १३० ॥ तव तो बोले काये ।

सावया जड होये। रायाचा हात न वाहे। मास कवणे कापावे॥ १३१॥ तव सत्येवतीये पाचारीले। रावो तीयेसी न बोले। तीचे मन उचंबळले। आस्वपात करीत आसे॥ १३२॥ तव ससाणे बोलीले। राया राणीया दुख केले। मास देउ नको रे आपुले। तुझे सत्व गेले रे राया॥ १३३॥ हे बोल राये ऐकीले। राणीयेते हाते वारीले। धर्मपुत्राते बोलावीले। डोळे पुसले पाणीये॥ १३४॥ मग म्हणे पुत्राते। मास कापी आपुलेन हाते। ससाणा वर्जी तयाते। तु कापीसी ते नेघे॥ १३५॥ जेथे जेथे हात पडे। तेथे शस्त्री काहीच नातुडे। मग चींतावनी पडे। देवा मास काये जाले॥१३६॥ मग वीचारी जीव्हारी। म्हणे आता पोटी घालु सुरी। जे नीघेल जठरी। ते तुकासी पुरेल॥ १३७॥ ऐसा वीचारू केला। तव नारदु वैकुंठासी गेला। देवा भक्त सांभाळी आपुला। नको करू अविचारु॥१३८॥ मग अनाथाचा नाथ। पावला लक्ष्मीसहीत। राये उचलीला हात। तो धरीला चहु करी॥१३९॥ देवे येउनी अंवरी। आरूढ जाले वीमानावरी। वीस्मो केला जीव्हारी। पाहा हो उजरी याचेया दैवाची॥१४०॥ तेणे धरियेला ततक्षणी। राये देखीयेला चक्रपाणी। नीवाला अंतःकरणी। शरीर पूर्ण देखिले॥ १४१॥ रावो दीव्य देही जाला। कपोता इंद्ररूप पावला। ससाणा येज्ञ होउनी ठेला। दोघे कर जोडुनि राहीले॥ १४२॥ ते देवे आस्वासिले। दोघे स्वर्गासी पाठवीले। वीस्वकर्म्यासी हाकारीले। आणवीले वीमान॥ १४३॥ मग राजा वीनती करी। माझी पाळावी जी नगरी। ते जरी न्याल मुरारी। तरी मी येइन वैकुंठासी॥ १४४॥ देवे रायेईक्षित हश (?) केलें। तये लक्षीमीया वीनवले। याचे कीजे जी म्हणतीले। हा भत्क उधरावा॥ १४५॥ देवराये हो म्हणतीले तव वीमानी अंबर भरलें। थोर गजर जाले। देवे दुंदुभी (त्रा)हाटीलीया॥ १४६॥ पुत्र राजा राणी। तीघे बैसवीले वीमानी। सुबुधी प्रधान आणुनी। तो सहपरीवारी बैसवीला॥ १४७॥ ऐसे सकलही परीवारीले। वैकुंठभुवनासी गेले। सिंव्हासनी आरूढले। देवो रावो मुरारी॥ १४८॥ करी आरती घेउनी। ओवाळीती सवासणी। सीश्री चक्रवर्तीलागुनी। आक्षवण करीतातो॥ १४९॥ सीश्री चक्रवर्ती राजा। आणी कांतीनगरीच्या प्रजा। त्या केलीया चतुर्भुजा। देवे रूपे वैकुंठी॥ १५०॥ पुढील यातायात। आवघी नगरी जाली मुक्त। देखा देव समस्त। पूजा करीती सुमनी॥१५१॥ ऐसा भक्तकरूणाकरू। विष्णुदास नरसिंहाचा दातारु। पावला सारंगधरू। सीश्रीरायाकारणें॥ १५२॥

॥ इती श्री सीश्रीकथा संपुर्णमस्तु॥

लावणीकार ज्योतिराम

प्रा. गंगाधर मोरजे, बार्शी

"मराठी लावणी" वाङ्मयासंबंधी संशोधन करीत असतां पुण्याच्या भारत इतिहास संशोधकमंडळांत "ज्योतिराम अथवा जोतीराम" नांवाच्या लावणी-कराच्या लावण्या असलेलें एक बाड पहाण्यांत आलें.

सदर बाड भारत इतिहास संशोधकमंडळांत बाड क्रमांक २८३ म्हणून नोंदलेलें आहे. त्याचा आकार ६"×४½" असून अक्षर बाळबोध आहे. सबंध बाड एकाच हस्ताक्षरांत पाठपोट लिहिलेलें असून अक्षर चांगलें वळणदार आहे. प्रत्येक पृष्ठावर साधारणपणें १३ ओळी लिहिलेल्या आहेत. बाडासाठीं वापरलेला कागद परदेशी असून त्यावर उदकचिह्न आहे. अक्षराच्या मोडणीवरून व भाषेवरून बाडाचा लेखनकाल अठराव्या शतकाच्या अखेरीस किंवा एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं असावा असें दिसतें. प्रा. ग. ह. खरे, चिटणीस, भा. इ. मंडळ यांना विचारलें असतां त्यांनीं वरीलप्रमाणेंच मत प्रदर्शित केलें. बाड कातडी वेष्टनांत शिवलेलें आहे. त्यांत प्रारंभीं उपमन्युआख्यान लिहिलेलें आहे. पण तें अर्धवट असून कागद उलटसुलट शिवलेले आहेत.

मूळ बाडांत ज्योतीरामासंबंधीं विशेष माहिती नाहीं. पण त्यांत ज्योतीराम कृत बोधल्याचें आख्यान, बोधकिर्ति व लावण्या आहेत. त्यासंबंधीं कै. वि. का. राजवाडे यांनीं भारत इतिहास संशोधकमंडळाच्या वार्षिक इतिवृत्तांत (शके १८३७ पान. १३) पुढीलप्रमाणे माहिती नोंदलेली आहे.

"(माणकोजी बोधले) याचा ज्योतिराम किंवा जोतीराम या नांवाचा एक शिष्य होता. त्यानें याचें (माणकोजीचें) आख्यान कीर्ति वगैरे लिहिल्या आहेत. ज्योतिराम लावण्या, कटाव, अभंग वगैरे करीत असे. कऱ्हाडास एका बाडांत ज्योतिरामकृत बोधल्याचें आख्यान व कीर्ति लिहिलेली आढळली. सदर बाड भा. इ. स. मंडळांत आहे."

कै. राजवाडे यांनीं याच अंकांत ज्योतिरामकृत बोधल्याची कीर्ति नमुन्या दाखल दिलेली आहे, तसेंच बोधराजआख्यानाचे अकरा लहान अध्याय असल्याची नोंद घेतलेली आहे. महाराष्ट्र सारस्वतकारांनीं याच लेखाच्या आधारावर उल्लेख केलेला असावा (५ वी आ. पृ. ८०५). ज्योतिरामाच्या लावण्यासंबंधीं विशेष उल्लेख नाहीं.

कै. राजवाडे यांच्या लेखावरून सदर बाड ज्योतिरामाचें असावें असा समज होणें शक्य आहे. मंडळांत जें कऱ्हाडचें बाड आहे; म्हणून कै. राजवाडे

सांगतात तेंच वरील क्रमांक २८३ चें बाड होय. तें संपूर्णपणें ज्योतिरामाच्या लिखाणाचें नाहीं. या बाडामध्यें ७ ते १४ लावण्या ज्योतिरामाच्या आहेत. प्रत्येक लावणीवर "लावणी" असें लिहिलेलें आहे. या लावण्यांचे प्रारंभीचे चरण पुढीलप्रमाणें आहेत :—

(७) पतितपावन ब्रीद—
(८) चिद्विलासि मुळ पीठ—
(९) भक्तिज्ञान वैराग्य—
(१०) निराकार सद्गुरुसावळा—
(११) साधनासि करी बोध—
(१२) दिवाळखोर विठोबा पंढरपुरी—
(१३) नामसुधारस—
(१४) श्री भगवद्गीता माता—

लावणी क्रमांक १५ चें नांव "गारुड लावणी" असें असून तिचा कर्ता शंभुराज हा ज्योतिरामाचा मुलगा आहे; कारण लावणीच्या शेवटीं "जोतीरामसुत शंभुराज मी तत्कीर्तनीं डोले" असा स्पष्ट उल्लेख आहे. १६ व्या लावणींत कवीचा नामोल्लेख नाहीं; पण सरुद्गुरु म्हणून उल्लेख आहे. पहा.—

सद्गुरु जोतीरामासी । अलंकार वस्त्रे खासी
कस्तुरी भाळी बोधाइं । केसरी उट्या या दोही ॥

१७ व्या लावणींत कवीनें स्वतःचा उल्लेख पुढीलप्रमाणें केलेला आहे:—

आदित्यवारीं पुजा विष्णुपद जोतिराम ध्याउ
हवाल्यास मी रामासिंपी कुळ यकतार वहु ॥

यावरून निर्णय निघतात ते असेः—या बाडांतील बोधारव्यान, बोधकीर्ति, आणि लावणी क्रमांक ७ ते १४ इतकें लिखाण ज्योतिरामाचें व लावणी क्रमांक १५–१६–१७ पैकीं ला. क्र. १५–१६ शंभुराजाची व लावणी क्रमांक १७ ही रामा शिंपी याची होय. शंभुराजे व रामा सिंपी हे दोंघेहि ज्योतिरामाचे शिष्य असावेत. ज्योतिरामानंतर त्यांनीं आपल्या लावण्या लिहिलेल्या असाव्यात व सर्वांचा एकत्र संग्रह केलेला असावा.

ज्योतिराम आपल्या लावणीच्या अखेरीस धामणगांवच्या माणकोजी बोधल्याचा गुरु म्हणून उल्लेख करतो. लावणी क्रमांक ११ मध्यें "करि घेउनि पादुका स्वामिच्या सन्निध सेवेला" असें तो म्हणतो. यावरून ज्योतिराम हा माणकोजी बोधले याचा निकटवर्ती शिष्य असावा, असें वाटतें. मी, माणकोजी बोधल्याची

माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. माणकोजी बोधले याच्या वंशजांना भेटलों. पण माणकोजीचा ज्योतिराम नांवाचा शिष्य असल्याचें त्यांना माहित नाहीं. धर्मदास, भजलिंग, व लाडी अशा प्रमुख शिष्यांचीं नांवें सांपडतात. शके १७७३ मध्यें शिवरामसुतानें लिहिलेले "बोधलीलांबरी" नांवाचें ओवीबद्ध माणकोजी बोधल्याचें चरित्र सध्यांच्या वंशजाकडून मला मिळालें आहे. त्यांत २५ अध्याय व ५२४६ ओव्या आहेत. त्यावरून आणि माणकोजी बोधल्याच्या धामणगांवीं असलेल्या समाधीच्या जागेंत सांपडलेल्या हस्तलिखितांतील नोंदीवरून माणकोजी बोधले याचा समाधिकाळ निश्चितपणें सांगतां येतो. "सके १६१६ भावानाम सवत्सरे जेष्ट मासे वद्ये पक्षी त्रितिया गुरुवारि ते दिनि बोधराज समाप्त" अशी ती नोंद आहे. खरेजंत्रीप्रमाणें तो दिवस गुरुवार दि. ३१ मे १६९४ असा ठरतो. माणकोजी बोधले सुमारें १०० वर्षे जगला असें चरित्रकार म्हणतो.

ज्योतिराम हा १७ व्या शतकांत किंवा अठराव्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला असावा. बोधल्याच्या चरित्रकारांनीं त्याचा उल्लेख केला नाहीं; याचें कारण ज्योतिराम फार काळ धामणगांवांत राहिला नसावा असें वाटतें. बोधले याचे तसे खूप शिष्य असल्याचें दिसतें. किंवा ज्योतिरामानें बोधल्याची कीर्ति ऐकून त्याचें शिष्यत्व पत्करलेलें असावें. माणकोजीच्या शिष्यमंडळांत धर्मदास हा त्याचा मुलगा आहे. भजलिंग आणि "लाडी" यांना माणकोजीनें आश्रय दिलेला आहे, म्हणून प्रमुख्यानें त्यांचा उल्लेख आलेला असावा.

ज्योतिरामाच्या लावण्या ह्या गुरुस्तुतिपर आणि अध्यात्मपर आहेत. 'पतित पावन' हेंच वृत्त त्यानें सर्वत्र वापरलेलें आहे.

त्याच्या लावण्या ज्या हस्तलिखित स्वरूपांत आहेत; त्या स्वरूपांत देण्यांत येत आहेत. अनुस्वार वा लिहितांना गळलेलीं अक्षरें मात्र घालण्याचा प्रयत्न केला आहे.

लावणीवाङ्मयाचा विचार करतांना या लावण्यांची मांडणी व विषय लक्षांत घेतला जावा, असें वाटतें.

लावणी ॥ ७ ॥

पतीत पावन ब्रिद हरि तो नांदे पंढरिला ॥
भक्तकाज कैवारी बहुताच्या कामा आला ॥ धृ० ॥

चहु युगाचा भक्त नामयां पात्रीं जेवुनिया ॥
विठलवाणी होउनी लोटी सुवर्णगोणियां ॥

जनी सवे दळि कांडि लोटि आणी सेणी जाय धुया ॥
रांजण नोहे रिक्त घेइ घागर जाय पाणिया ॥
चोख्या मेळ्याची ढोरे वोढि तेथ जाये जेवाया ॥
ब्राह्मण त्याही खैरि जुंफितां तारियले तया ॥
दामाजीपंताचा विठल पाडिवार जाला ॥
रसद गुदरिली बेदरासी करि जोहार वाछायाला ॥ १ ॥

गोऱ्या कुंभारासि पांडुरंगे दिधलें कर ॥
सावंत्या माळयाचे हृदय केलें मंदिर ॥
रोहिदास त्या कंकण देउनि रक्षियला बरें ॥
सेना वारिक भूपतिचा होय त्याचा चाकर ॥
जनमित्र नाग्याला व्याघ्ररूपें कृपाकर ॥
मिराबाइ मुक्ताइ तारिली कान्हा सुंदर ॥
ज्ञानदेवाची भिंत चाले वेदवक्ता पशु केला ॥
द्वादश वर्षें येकनाथ घरीं पाणक्याच जाला ॥ २ ॥

अभंग वदला तुकाराम निगमार्था प्रमाण ॥
जळीं बुडवितां तारियलें श्री पंढरिनाथा ॥
नरहरि सोनारासि शिवार्चन तो न ह्मणे ॥
दाउनि मस्तकें लिंग घडु फुंकु लागे आपण ॥
गुरुपदविचा पट्ट विसो खेचरासि देउन ॥
परसा भागवतासी परीस दिधलें आपण ॥
पुंडलिकाला आपणापेक्षां थोर वाढविला ॥
सिका तयाचा ह्मणती ह्मणुनि अधि नमस्कार त्याला ॥ ३ ॥

सगुण ब्रह्म पंढरिचें विश्वाच्या साह्या आला ॥
भक्तराज येकेक आभय देउनिया रक्षिला ॥
धामणगावी माणकोजि बोधला प्रगट जाला ॥
पंढरिच ते केली लोक जाताती यात्रेला ॥
किर्त्तन केलें तया पाटिसी उभा ठाकला ॥
असाच परंपरेसी ह्मणउनी भाक दिली त्याला ॥
जोतिराम किंकर त्याही आपलासा ह्मणविला ॥
बोधराज श्री पांडुरंगपदि माथा ठेविला ॥ ४ ॥

पतित पावन० ॥ धृ ॥

लावणी ॥ ८ ॥

चिद्विलासी मुळपीट निवासिनि शरणांगत तुजला ॥
विश्वचाळके पतितोद्धरणे तारि तारि मजला ॥ धृ० ॥
आउम तुज पासुनिया जालें तु तव मुळ माता ॥
अष्टधां गुणे प्रथक् प्रथक् दाखविले तत्वार्था ॥
नभ वायु आणि तेज आप कुंभिणी पंचभूता ॥
अहंकार मन बुद्धि इंद्रिये शब्दादि गंधता ॥
चोविस अटाविस पचतिस म्हणताती अनेकतां ॥
तत्त्ववेत्ते तत्वार्थ बोलती गीताभागवता ॥
जगडंबर मृण्मय हे निर्मुनि नाचविसी याला ॥
स्वर्ग मृत्य पाताळ खेळ हा तुझाच मांडला ॥ १ ॥

हरिहरब्रह्मा सृष्टीक्रमा लाउनि तिघासी ॥
सत्यलोक वैकुंठपीट कैलास दिले त्यासी ॥
अमरावतिचा अमरनाथ शचि दिक्पति सिद्धऋषी ॥
गणगंधर्वादिक महिराजे अपार दाखविसी ॥
सप्तद्विपे नवखंड अष्टगिरी सात सागरासी ॥
अतळ आणि पाताळादि राजें स्थापुनि शेषासी ॥
मछकल्कि अवतार तुझे त्वा चाळविले त्याला ॥
राहाटगाडगा खेळ कसा हा माइक मांडला ॥ २ ॥

कृत त्रेता द्वापार कलि संख्या लक्ष त्रेचाळ ॥
विस सहस्र तै चौकडि अैशा हजार होतिल ॥
दिवस होय ब्रह्माचा अैसी शंभर भरतील ॥
ब्रह्मा होउनि जाय घडि वि ची होईल ॥
असे दिस मास शंभर वर्षे याची जातील ॥
सदाशिवाचें किंचित ध्यान वि जव गेलें ॥
सदाशिवाची शंभर वर्षे होउनि निमाला ॥
जगदंबे तै तुझा स्वास प्रतिस्वार दूर ठेला ॥ ३ ॥

शिव ब्रह्मादिक तुझिया स्वासी होउनिया गेलें ॥
आयुष्य गणना करितां तरिते अपार होइल ॥
तुझ्या रुपाला सांख्यशास्त्रीं काहिसे वर्णिलें ॥
न कळे महिमा कोणा ह्मणउनि वेद मुके जाले ॥

अनंत ब्रह्मांडे पळमात्रें दाउनि नेसिल ॥
जगन्मोहनी निर्गुणा सगुण तुवा लावियेलें ॥
तुजपलिकड जोतिर्मय गुरु नाम न रुप ज्याला ॥
जोतिराम प्रणतीसह वंदी सद्गुरुबोधाला ॥ ४ ॥
चिद्विलासि मुळ पीट निवासिनि० ॥ छ ॥ छ ॥

लावणी ॥ ९ ॥

भक्ति ज्ञान वैराग्य सत्क्रिया या धनवंतासी ॥
शरण म्हणुनि जरि चरण धरिसि तरी पार न भाग्यासी ॥धृ०॥
धनिक संत प्रेमळ पेठारें नवविध भक्तिचें ॥
नाहित कुलफें दिवस राति मोकळे तोंड त्याचें ॥
मी तुं विसरुनि प्रवेश करितां सकळै मग त्याचें ॥
देघे अैसें उरलें नाहीं नवही येकाचें ॥
कारभारि तेथिल तें करिती व्यवसाय त्याचें ॥
जामिन रोखा दुष्ट कुळाला ठाव तिथें कैचें ॥
होउनि श्रद्धायुक्त श्रवण आर्पण आदि नेमासी ॥
मानव तनु जो आहे कसे तो विसरावे त्यासी ॥ १ ॥

सप्तावरणासकट गुणत्रय याच शरीरात ॥
कर्म ज्ञान इंद्रिय द्वय पंचक चाळवि मन त्यांत
वाल ठेउनी संतपदी घ्या निजधन निज देहात ॥
सत्त्वगुणे करि जमाखर्च काढि नर जनमात ॥
शडविकार शडरिपु दरवडा घालणार तेथ ॥
विवेक नायक भूतदयेची फिरवो द्या घस्त ॥
तीन पाच आठ पंचाविस तिस पचातिस निवडिसी ॥
संग धरुनि जरि दंग होय मन ते तु हे नससी ॥ २ ॥

अजिव करि संताचे ते धन अपार देतिल ॥
अनंत जन्मिचे श्रम दरिद्र तें दुर होईल ॥
भक्तियोग सत्कर्म याचि व्यापारि योजितील ॥
ज्ञाने जळल संचित क्रियमाणावर येइल ॥
वसतां उठतां देतां घेतां मी हे विसरेल ॥
चिद्विलास नग ठसे पाहातां दिसेनाच जालें ॥
स्थावर जंगम आदि करुनि निजधन भासल ज्यासी ॥
तो ना पसरी हात वराइं मोहरां रुपयासी ॥ ३ ॥

संत सावकाराचा विठल गडी येक तार ॥
कारभार करि उभा समपर्दी कटि ठेउनि कर ॥
पुंडलिकास्तव उभा करी विश्वाचा उद्धार ॥
भिमाशंकर साक्ष आणि स्वर्गिचें सुखर ॥
माणकोजि बोधला त्याहि घेतला बरोबर ॥
ताळ वाजवी परंपरेसी त्याच्या अजवर ॥
जोतिर्मय जोतिराम मागे पाहाता आसे त्यासी ॥
शरण मने धन काया अर्पुनि सद्गुरुबोधासी ॥ ४ ॥
भक्ति ॥ छ ॥

लावणी ॥ १० ॥

निराकार सद्गुरु सावळा काळा ना पिवळा ॥
पाट पोट हात पाय नाहि जो शब्दावेगळा ॥ धृ ॥
निरंजन गुरु दुजा नसंगति धामणगावांत ॥
कोटि कोटि रविचंद्र प्रभा परि ते नाहित तेथ ॥
वृक्ष मुळ फळ पत्र पुष्प ना छाया सदोदित ॥
घन निरद तो नाही परंतु खरा अखंडीत ॥
रज बिज नाही काया मायां कैची दिनरात ॥
ब्रह्मार्णवात सज्जन लहरा नाही पर दिसत ॥
शास्त्रपुराणे जपतप साधन अलक्ष गुरु त्याला ॥
नेती म्हणती वेद काय समजे मज मंदाला ॥ १ ॥
गावाचे नाही जेथ शिव मग असेल काशासी ॥
रूप रंगहि नाम न अनाम दाउ कसा त्यासी ॥
जात वर्ण कुळ गोत्र उंच निच नये म्हणायासी ॥
जिवशिवत्व लोपलें ठाव पिंड न ब्रह्मांडासी ॥
च्यार न सा दाहा बारा सोंळा दो परतां आससी ॥
सहस्रदळिचा महिमा जाणे सद्गुरु सुखरासी ॥
नयनचि सर्वांगाचा करुनि पाहील जो त्याला ॥
दिसेल तेव्हां नातरि नकळें नवरसवक्त्याला ॥ २ ॥
स्थुळ सुक्षेम कारण महाकारण या पर तो आसता ॥
अनुहात डंका वाजे परि तो अगम्य वाजवितां ॥
पोथीवाचुनि मुखाविणे रसनेविण रस घेतां ॥
कागद कोरा अक्षरना नित्य पढो आतां ॥

दिसता हे परि हतें न धरवे ते गुज श्री संता ॥
घुसवुनि ध्यावे साधक होवुनि अज्ञानी असतां ॥
मनचि मुरलें त्या पर उरलें शोधुनि घ्या त्याला ॥
पाहतां पाहणे मी तु विसरुनि ब्रह्मरूप जाला ॥ ३ ॥

अजरामर अविनाश अरुपारुपी गवसावा ॥
होउनि श्रद्धावान साधकी देही वळखावा ॥
ज्ञान कर्म आणि उपासना त्रिकांडि शोध पहावा ॥
किर्त्तन प्रेमा विज्ञानेसी अखंडित व्हावा ॥
बसतां उठतां देतां घेतां आनंदरूप अवघा ॥
स्वयेचि होउनि देसिक देशिक विलास जाणावा ॥
सद्गुरुबोधचि सारा जोतिरामरुपि झाला ॥
गुरुचि अवघा निशब्दि आसता जनि वदनि दाटला ॥ ४ ॥
निराकार सद्गुरु काळा ना पिवळा ॥ धृ ॥

लावणी ॥ ११ ॥

साधनासि करी बोध संत सुर पदावरिल धुरळा ॥
तोच देई श्रीहरी नको सायुज्यादी सोहळा ॥ धृ० ॥

संतराज ब्रह्मांड कोटिचे कायापुरि वसति ॥
उपासनेचा डारा तेथ कारभार करती ॥
भावभक्तिचे स्तंभ रोविले कदापि ना हालती ॥
शांतिदयेचे अबरे घालुनि वरवर शोभविती ॥
तृष्णा वायु नसिरे दुर्वेसने आणू दूर राहाती ॥
बहु दैवत तनाव्या साधक डेरा हा पाहाती ॥
तिस पचतिस चमू सुमनराव करि सविना दिननिसिला ॥
सत्कितिच्या ध्वजा नेमिली काळावरि हल्ला ॥ १ ॥

अधारि देवुनि बंद समागमि मारुत घेउनिया ॥
समाधिसुख कोठडित जाती खल्वत करावया ॥
त्रिकुट श्रीहाट गोल्हाटाहुनि औट पिट ठाया ॥
तेथुनि पुण्यगिरीहुनि भ्रमर गुंफा वेगुनिया ॥
ब्रह्मरंध्र सातवे स्थान मग तेथ जावुनिया ॥
जोतिर्मय रुप अनंत रविशशि दिसती त्या ठाया ॥
माझिच सत्ता म्हणोनि हळु हळु मागारा आला ॥
सोहं शब्दे विवेकराव अमात्य बोलाविला ॥ २ ॥

कर्म ज्ञान वैराग्य तिघे हे सन्निध सरदार ॥
विनिचा वैष्णव मुखी नाम यशस्वी तलवार ॥
ताळविणे मृदांग विरश्री प्रेमाचे गजर ॥
हरहर शब्दे म्हणोनि हल्ला केली एक सरे ॥
शडविकार रिपु कळिकाळादी धरुनि महावीर ॥
मितुपणाचे ठाणे पाडुनि केले वरोवर ॥
दुवाई श्रीसंताची फिरली आज्ञा सकळाला ॥
भक्ति भजन नर तनु रोजगार टिकला ॥ ३ ॥

रोजगारी येक स्वसुखे फिरता पंढरिस आला ॥
पुंडलिकानं जग उद्धरि तो कारभारि केला ॥
देहाभिमानी लोक चाकरी लागेना त्याला ॥
भाविकासि धनप्रेम नृत्य गीत चालली जिलबिला ॥
माणकोजि बोधला विठोबा घेउनिया गेला ॥
धामणगावी मुकाम नाही कुच करणें त्याला ॥
करि घेउनि पादुका स्वामिच्या संन्निध सेवेला ॥
जोतिराम कुल यकतारिचा खिसमतगार भला ॥ ४ ॥

साधनासि करि ॥ ६ ॥

लावणी ॥ १२ ॥

दिवाळखोर विठोबा पंढरपुरी तो सापडला ॥
पायगळा जो बांधुनि घेतो देतो धन त्याला ॥ धृ. ॥

धामणगावाहुनि सगुणत्वि व्यापारासी आला ॥
नाम पालटी परि सद्भक्ति तयासि ओळखिला ॥
रजतमसत्व त्रिगुण चोविस तिस पचतिस हा मेळा ॥
धातु सप्त ब्रह्मांड पिंड स्वर्गादी सात ताळा ॥
करणी मम मायेची म्हणोनी सांगे जन सकळा ॥
अहंकार स्वरुपि निर्मुनि झाकविला डोळा ॥
गुणमइ नानारंग विषय बाजार आसा भरिला ॥
सूत्र दोरिक ऐवज भुलवुनि भोळयाचा हरिला ॥ १ ॥

मछ कुर्म आणि वराह नरहरि वामन रुप धरिले ॥
परशराम श्रीराम कृष्ण गोकुळात अवतरले ॥

गोवळ गोपी मुले गोधने वेणुनादि भरिलें ॥
रुक्मावाई आण्णावयासि पंढरिस गेले ॥
प्रेमळ ग्रापीक वहुना दरिद्र यास्तव वहु फिरलें ॥
मात्रपित सेवें पुंडलिका पाहुनि स्थिर थरले ॥
विट झुगारिलि मागे धरिली वर उभा राहिला ॥
प्रेम सोडल्या धन घ्या ऐसा कृतनिश्चय केला ॥ २ ॥

पंढरपुरि ऋण फिटे जगाचे मात प्रकट जाली ॥
फाडीखत चहूवर्ण जन्मिची भक्तिपोहच दिधली ॥
जामिन होउनि पुंडलीक हवतेवंदि केली ॥
आशाढि कार्तिकि वर्षा यावे वोलि असि ठरली ॥
पाय आमुचे डोई तुमची मिळवुनि गाटी दिली ॥
तोहि इमानी निजधन सापडेल त्याला ॥
लटिके म्हणता जिव्हा झडेल वेद गोहि याला ॥
चतुर्युग तै चौकडी हजार चौकड्यासी दिवस ॥
अशा प्रकारे वर्षे विधिला जाली पन्नास ॥
आणखी त्यावरी युगे वाढली हे आठाविस ॥
उभा राइला तेव्हां देतो धन ज्याचे त्यास ॥
वोधल्याचे न फिटे ऋण म्हणउनि राहे चाकरीस ॥
टाळ वाजवी परंपरेला सुटका ना त्यास ॥
जोतिराम गुरुबोधाचा शिरस्या पाटी ठाकला ॥
संतजनाचे दृष्टी दिसतो अलक्ष इतराला ॥ ४ ॥

दिवाळखोर विठोबा ॥ धृ ॥

लावणी ॥ १३ ॥

नाम सुधारसधार सार धरि सेवुनि सुखी रहावे ॥
दंडकुमंडकशासि जपतप अरण्यासि जावें ॥ धृ ॥

नामिच उघडा देव साधका उपाय आन नाही
नवरसकथात ना नाम वदे नामधारका ही ॥
सरळ नाम श्रीरामकृष्ण गोविंद विठाबाई ॥
सद्गद दाटत कंठ नयनी प्रेमासि खंड नाही ॥
सतत कीर्त्तनी अहं ब्रह्म ह्मणणे सरले तेही ॥
ताळविणा मृदांग समइ येकादे आहे नाही ॥

उघड समाधी बोलत चालत डोलत गीत गावे ॥
आनंदरुप स्वस्वरुपी लयस्त अक्षर जागावे ॥ १ ॥

वाला कोळी वाल्मिक ऋषि तो उफराट्या स्मरणी ॥
शतकोटी रामायण वदला वाचिति लोक तिन्ही ॥
ब्रह्मकर्म सांडुनि वर्षे आठ्यासिला कादासि सदनी ॥
नारायणसुत नामे अंति जाय स्वरुप सदनी ॥
ज्या त्या कुंठिणि राघोबा खग बोलत दिनरजनी ॥
विमानि वाउनि वैखुंटाप्रति नेलि पापखाणी ॥
गज मंडुक खग मृग नामे हरिलोकाप्रति जावे ॥
नामधारका निरय कोणत्या शास्त्री उमगावे ॥ २ ॥

ब्राह्मण क्षेत्री वैश्य शुद्र चहुवर्णी कोणतरी ॥
हत्यारी गोब्राह्मण श्रीबाळ आचळापति मारि ॥
पितृगोत्रवध सुवर्ण हरिवर ज्यार सुरा आदरी ॥
स्वकर्महि न मुळि भाव नाहि परि नाम तया तारी ॥
नामे गति दोष जाति नामे ये सायुज्य घरीं ॥
नाम श्रेष्ठ ह्मणुनि तो शंकर निसिदिनि उच्चारि ॥
सन्मार्गे स्तुतिस्तोत्र निसिदिवस जपत जावे ॥
देवद्विज गुरु प्राज्ञ जन तप तनुचे अचरावे ॥ ३ ॥

ध्यायनुति यजन यज्ञ त्रेति अर्चन द्वापारी ॥
कलिमाजी संकीर्तन करितां सापडेल श्रिहरी ॥
नाना परिचे साधन तेणे श्रय पदरि ॥
स्वर्गि भोगितां तेही सरल्या लोटिनी महीवरी ॥
नामदेव वेगळे वदति ते आज्ञानाची दरी ॥
नामचि देव श्रीव्यास शुक वदति भागवती थोरी ॥
गुरुबोधाचे नाम वदे जोतिराम द्रढभावे ॥
नामचि देव अनाम निरामय संतासि पुसावे ॥ ४ ॥

नाम सुधारसधार सार धरि सेवुनि ॥ छ ॥

लावणी ॥ १४ ॥

श्रीभगवद्गीता माता वेदाचि नमिलि भावे ॥ धृ ॥
गीता ब्रह्मयोगशास्त्रार्था ॥ सांगे कृष्ण अंगलगपार्था ॥
तीते पुसे अंबिका माता ॥ शंकर म्हणे नेति तु त्यार्था ॥

ब्रह्मादी ऋषी गंधर्वा ॥ किन्नर मुनि सुर मघवा ॥
संत साधु महानुभवा ॥ हा ब्रह्मसुखाचा ठेवा ॥
कलिकलुषाहरण उपाव ॥ साधकासि केला देवे ॥ १ ॥

गीता अर्चन घडे जयाला ॥ श्रय ते अपार होय तयाला ॥
अलभ्ये वैकुंठासम हरिला ॥ रचिली श्रद्धा येइ हताला ॥
मेरूसम घन वाटित ॥ लक्षावधि द्विज जेवित ॥
वाराणसि यात्रा बहुत ॥ साडेतिन कोटि तीर्थे ॥
याहुनि घडले आपार ॥ सज्जनासि अवघे ठावें ॥ २ ॥

गीता अवर्तने जे करिति ॥ त्याला वरि सायुज्या मुक्ति ॥
कर्मि न चोर जार ते तरती ॥ दिन दोही पतिते उद्धरति ॥
श्रवणी रिघती अक्षर ॥ अश्वमेध तितुके सारे ॥
अघ बहु जन्मीचे न उरे ॥ पुर्वज उद्धरिले साहे ॥
आवर्तन श्रवणे तरले ॥ कृतनिश्चय करूनि बसावे ॥ ३ ॥

गीता दोन अक्षरे पढतां ॥ सायास न हरिलोका जाता ॥
श्रवणार्चन अवर्त्तन जपता ॥ साधक तरले तरती आतां ॥
श्रद्धेन जो का आथिला ॥ हे सर्वे घडे तयाला ॥
बिंदुले पडे जननाला ॥ संती कृतनिश्चय केला ॥
जपतो जोतिराम गुरुबोध ॥ द्वेक्षर या पर ना ठावें ॥ ४ ॥

श्री भगवद्गीता ॥ ६ ॥

लावणी ॥ १५ ॥ (गारुड लावणी)

कविवर कायापुरी गारुडी शिवराम संत आले ॥
साधक हंडीबाग गर्जता ॥ बहु लोक मिळाले ॥ धृ ॥

ब्रह्मकर्म पेठारे सा मांडोनी उभे ठेलें ॥
टाळि ढोल नामाचे ॥ नागेसर अधि वाजविलें ॥
पतित तारू काळ जिंकू ॥ पदि ब्रिद तुरा डोले ॥
नाम कृष्ण नामाचे भाषण त्यातचि आरंभिलें ॥
विधिमार्गाचे पेठारे उघडचि नाहि देखिले ॥
काळसर्प वादिचा मिथ्या पावुनि जन भ्याले ॥
आत्मा तोचि रुपाया मांडुनि पण भुजि थापटले ॥
गारूडियाचे निजधन कैसे हतास येइल ॥ १ ॥

पैसा पैसा अंतरंगी हत पसरूनि विनविति ॥
ब्राह्मण देव गुरू पुजना देह धन द्या जी म्हणती ॥
दौड दौड वाचा गा भजन करा सद्गुरुस्तुति ॥
मौन मने गुरू गोडी घेती संशय धूर सोडिती ॥
साक्षात्कारे उघड समाधी देह भोपळा हति ॥
निग्रह करिता दशेंद्रिये मुक्त न परि वावरति ॥
चालत बोलत डोलत जाता जनही नाचविलें ॥
युगे लोटतां खेळ सरेना हंडिबाग बोले ॥ २ ॥

वेद मुहूर्ती ब्राह्मण पौराणिक अयाचित ज्ञानी ॥
क्षत्रि वैश्य शुद्रादि श्रिया सादर संत अंगणी ॥
शिवरामस्वामी गारुडी फिरता बसे योग आसनी ॥
अधारि देवुनि बंद उडाला ब्रह्मरंध्रभुवनी ॥
नानापरिचे आसन उटणे धावत जाउनि ॥
देती घेती रुपाया पारखि पाहतो हती धरुनि ॥
घ्या जी रुपाया म्हणुनि सेखि मांडोनी ठाकले ॥
जपितपिसा धनियाच्या हतासि नलगे दुर ठेले ॥ ३ ॥

गावगुंड धामणगावी पाराशर स्थानी ॥
जोतिराम आवतार बोधला म्हणती सीखा मणि ॥
श्री एकनाथ संत स्वामी गारुडिया ऐकोनी ॥
विश्वंभर श्री जनार्दन म्हणे धर दक्षण चरणीं ॥
अर्चन वंदन पुजा करुनि सेवियले पायवणी ॥
पात्री वादुनि आम्हा स्वयें मग बसताती भोजनी ॥
विडा दक्षिणा पोशाख आम्हा देउनि तोषविले ॥
जोतिरामसुत शंभुराज मि तत्कीर्त्तनी डोले ॥ ४ ॥

करवीर कायापुरी ॥ ६ ॥

लावणी ॥ १६ ॥

गुरुबोधे बोधिले बाई ॥ मीतुपण उरलें नाही ॥
बोलु नका ॥ धृ ॥

स्वयंभ गुरु देखोन ॥ हरिले सखि इये मन कान ॥
त्वाचा नयन घ्राण या रसने ॥ ज्ञानेंद्रिय पंचक जाण ॥
कर चरण गुद हे सिस्न ॥ कर्मेंद्रिय चार मिळुन ॥
स्पुरणासि वाणी अकराही ॥ निर्गुण तेथ गुरु आई ॥ १ ॥

स्वस्वरुपी उठता शब्द ॥ अचळासह चंचळ द्वंद्व ॥
तेथुनि त्रिगूण प्रसिद्ध ॥ गुणिजाले अनेक भेद ॥
रज प्राण इंद्रिये विविध ॥ अंतःकरणी विष्णू नांदे ॥
पाच पाच भुते विषयेहि तमगुण प्रसवला पाही ॥ २ ॥

हिरण्य लिंग देह जाण ॥ अज्ञान जिवाचे स्थान ॥
शिवपदीं तयासी राहणे ॥ ईश्वर होइल कैसे न ॥
करि नृत्य गाइ गुरुगुण ॥ संताचा संग धरून ॥
तत्त्वें सहसमाधि पाही ॥ समजुनि उमजे लवलाही ॥ ३ ॥

संताची होता दासी ॥ दाखविले गुरुपदासी ॥
तन मन धन अर्पुनि त्यासी ॥ शोडश उपचार पुजेसी ॥
सद्गुरु जोतिरामासि ॥ अलंकार वस्त्रे खासी ॥
कस्तुरी भाळी बोधाई ॥ केसरी उटया या देही ॥ ४ ॥

बोलु नका गुरुबोधे बोधिले ॥ धृ ॥

लावणी ॥ १७ ॥

संतराज हे गायमाय विश्वाची धरु दोहू ॥
प्रेमपात्र साटी शाखेचे नमुनि धन देऊ ॥ धृ ॥

ब्रह्मरंध्र गोठ्यात रोविला ॥ सत्याचा खुंटा ॥
भक्ति दावे लावुनी बांधिली संत जनी श्रेष्ठा ॥
कुरवाळुनि या पहातां ॥ नाहीं मळ गोचिड ताटा ॥
शुद्ध सत्त्वपर कपिला शोभे माळ उंच जाटा ॥
श्रवण नयन नाशिक मुख गळयात सुवर्णाची घंटा ॥
मुक्तमाळ वर नवरत्नाचा हार गळा मोटा ॥
पाटी पोट मांसाळ दयाळ जी साधकासी चाटा ॥
सरळ पुछ गंगावन कासे स्थने चार वाटा ॥
पाईं वाळे रंग त्रिकाळ ही नानापरि पाहू ॥
नाचत हरिनामे हंबरडा फोडुनिया धावूं ॥ १ ॥

साधू साधक जनी कीर्त्तनी श्रवणाचे पात्र केले ॥
चतुर्वेद नवरस दशमादी हि दोहन आरंभिले ॥
विणे ताळ मृदांग चाळ पदि नृत्य गाति बाळे ॥
तरुणी वृद्धे अबळा मुढासि बोध तये वेळें ॥
ताळी नामस्मरणें नाहिच केली पाप पुंळे ॥
गरुटके आणि दिव्य पताका डोलती वायुबळे ॥
बावण वर्णही बावण आभंग श्रवण होत वेळे ॥
मनन हो तक्षणि हनन भाव देह मितु हे गळे ॥
निजध्यास मग आसनाही नैराश्य योगिराउ ॥
साक्षात्कारी आनंदरुप त्या चतुर्वेण गाउ ॥ २ ॥

एक गाइ तिसि विश्व ध्यायी ज्या त्या घरि बांधियली ॥
श्रवण आदि आर्पण वर लोकी सांग स्तुती केली ॥
आपापुली या घरासी सकळी पुजावया नेली ॥
शडरस अन्ने पक्वान्ने वादुनिया तोषविली ॥
बसकारासी गादि तिवाशा लोडे अर्पियली ॥
तगटि दिल्हे पोशाख विडा तेरा गुणि मुखलाली ॥
साधक साधूजनि सेवावृत्ति नाहीच सोडीयली ॥
बुका माळ फळ अर्पण करितां कृपा बहुत जाली ॥
वराइ मोहरा सिरपेच तुरा मुक्तघोष लाऊं ॥
ज्वाहार करोनी चोपदारपण लोकाप्रति दाऊं ॥ ३ ॥

ज्वाहार ज्वाहार ज्वाहार ज्वाहार सकळाने केला ॥
विरसुरि येकेक विडा पैजेचा उचलीला ॥
हरहर म्हणोनी गोव्यावरती नेमियली हल्ला ॥
यक शह यकविस पतकी त्यात मी आहे विनिवाला ॥
येकेक ढाल दर घाटासी मुलुक सुरु जाला ॥
हत जोडोनि फिरंगिचा कर शरणांगत आला ॥
पुनरपि नलवी वैर म्हणुनि भंडार बेल सिवला ॥
भगवी निशान किल्लयावर दर्यासी रंग चढला ॥
आदित्यवारी पूजा विष्णुपद जोतिराम ध्याउ ॥
दावा त्यास मी रामा सिंपी कुल यकतार बहु ॥
जोतिराम हे ॥ छ ॥

परभी बोली

डॉ. व. दि. राव

पाठारे प्रभु ही एक मुंबईतील हिंदुधर्मीय मध्यम वर्गीयांची छोटी ज्ञाति आहे. या ज्ञातीची लोकसंख्या अवघी पांच हजाराच्या आसपास असावी. तिच्यापैकीं जवळजवळ ९५ टक्के लोक मुंबईंत राहतात. यावरून एक गोष्ट दिसून येईल कीं, ही पूर्णपणे नागरी ज्ञाति आहे. इतर अनेक ज्ञातींना मूळ गांवें असतात. पाठारे प्रभूंचे गांव मुंबई हेंच म्हणतां येईल.

पाठारे प्रभूंची भाषा मराठी आहे; पण त्यांची 'परभी' ही बोलभाषा प्रमाणमराठीपेक्षां कांहीं बाबतींत वेगळी आहे. या लेखांत पाठारे प्रभूंच्या 'परभी' बोलीचीं वैशिष्ट्यें दिग्दर्शित करण्यांत येणार आहेत. भाषेचा इतिहास हा भाषाशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचा असतोच, पण त्याचबरोबर तो सांस्कृतिक इतिहास म्हणूनहि उपयुक्त असतो. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे आणि इतर कोणत्याहि सामाजिक संस्थप्रमाणें तीमध्यें ती बोलणाऱ्या जमातीच्या संस्कृतीचें प्रतिबिंब दिसतें. प्रमाणभाषेपेक्षां बोलीच्या अभ्यासामध्यें इतिहास आणि संस्कृति याविषयींचा पुरावा अधिक निखळ स्वरूपांत मिळतो. एखाद्या जमातीचा अभ्यास करण्यासाठीं आणि त्यावरून विश्वसनीय असे निष्कर्ष काढण्यासाठीं त्या जमातीच्या बोलभाषेचा अभ्यास करणें अत्यावश्यक असतें.

भारताचा पश्चिम किनारा हा बहुभाषिक म्हणून प्रसिद्ध आहे. या पश्चिम किनाऱ्यावर मराठी भाषेच्या अनेक बोली प्रचलित आहेत. या बोलींतहि अनेक उपभेद आहेत; पण ते मूलभूत स्वरूपाचे असतील, असें वाटत नाहीं. कोकणामध्यें अनेक प्रादेशिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक बोली प्रचलित आहेत. कांहीं बोली विशिष्ट जातीपुरत्या किंवा गांवापुरत्या मर्यादित आहेत. मालवणी किंवा मंगलूरी या बोली प्रादेशिक होत. आगरी ही व्यावसायिक बोलीचें उदाहरण म्हणतां येईल तर चित्पावनी, कऱ्हाडी, परभी या ज्ञातिविशिष्ट बोली होत. परभी बोलीचा कोंकणी बोलींत अंतर्भाव होतो. ग्रियसन यांच्या लिंग्विस्टिक् सर्व्हे ऑफ इंडियाच्या ७ व्या खंडांत त्यांनीं परभी बोलीचा अंतर्भाव इंडोआर्यन भाषाकुटुंबात केला असून तिला प्रमाणकोंकणीचा (Konkan Standard) एक उपभेद मानला आहे (पृ.९३). त्यांच्या मतें 'परभी' ही उत्तर कोंकणांतली बोली असून ग्रांथिक मराठी भाषेस ती फार जवळची आहे. मराठीच्या उत्तर व दक्षिण बोलींचा परभी हा कदाचित् दुवा ठरण्याचा संभव आहे.

गणपतराव सोकरजी त्रिलोकेकरांच्यां 'हुंडा' (स. १८९७) या नाटकाचा अपवाद वगळता 'परभी' बोलींत साहित्य जवळ जवळ नाहींच. सुमंतलाल विनायक धुरंधरकृत 'दादाजीची दिवाळी' (प्रभुप्रभात, दिवाळीअंक, १९२७) यांसारखे स्फुट लेखन अगदीं क्वचितच प्रसिद्ध झालेलें आहे. अगदीं थेट तेराव्या शतकांतील मराठी भाषेंत आढळणारे शब्द, चालू परभी बोलींत आढळतात.

कांहीं शब्द तुलनेसाठीं घेऊं या :—

परभी आणि जुनी मराठी	चालू ग्रांथिक मराठी.
तुकणें	उचलणें
मुरावड	अनुकूल
ओखटें	वाईट
चोखट	शुद्ध
उपेग	उपयोग
ठेलें	ठेविलें
देखणें	पाहणें
लटकें	खोटें
ढवळा	पांढरा
उदेलें	उदयास आले
पोखणें	आदर दर्शविणें
पाईक	शिपाई.

कांहीं परभु लोक हे गुजरातेंतून मुंबईस आले असावेत. गुजरातेंत असतांना परभी बोलीवर गुजराती भाषेचा चांगलाच प्रभाव पडला असावा. आजमितीसहि तो प्रभाव परभी बोलीच्या अनेक शब्दांत आणि उच्चारांत आढळतो. कदाचित् हा प्रभाव मुंबईतील गुजराती भाषिकांशीं संपर्क आल्यामुळें पडला असणेंहि पुष्कळच शक्य आहे.

उच्चारांच्या बाबतींत गुजरातीचा परिणाम परभी बोलीवर न, स, ल या अक्षरांच्या बाबतींत झाला असावा. परभी बोलींत गुजरातीप्रमाणेंच हीं अक्षरें ण, श, ळ, याप्रमाणें उच्चारलीं जातात. वर्णविपर्ययाच्या बाबतींतहि परभी आणि गुजरातीच विलक्षण साम्य आढळतें. गुजराती भाषेंतून परभी बोलीनें बरेच शब्द उचलले आहेत. त्यापैकीं बहुतेक शब्द सैंपाकघरांतील भांडीं, घराचे भाग, नातीं इ० विषयक आहेत.

परभी	गुजराती	चालू ग्रांथिक मराठी
अयदोरा	अयवादोरा	सरी
अवड	आवडु	एवढें
आगाशी	आगासी	गच्ची
आसा	आसो	आश्विन
आदितवार	दितवार	आदित्यवार (रविवार)
आखाड	आसाड	आषाढ
उजागरा	उजागरो	जागरण
उचकणें	उचकवुं	उचलणें
ओटा	ओटलो	ओटी
ओशी	ओछुं	कमी
ओखद	ओखद	औषध
खाकरा	खाकरो	पोळी
गैला	घेलो	वेडगळ
गजवा	गजवा	खिसा
डोकरी	डोसी	म्हातारी
ठाय	ठाम	भांडें
ढाकण	ढाकणां	झांकण
चांदला	चांदला	अहेर
चोपडी	चोपडी	वही
ताकाबारी	ताकाबारी	फडताळ
तिजा	त्रिज्यो	तिसरा
थाळी	थाळी	ताट
दादर	दादरो	जिना
देखाडणे	देखाडवुं	दाखविणें
नफ्फड	नफ्फड	निलाजरा
निसण	निसरणी	शिडी
पागडी	पाघडी	पागोटें
पौस	पोस	पौष
पादरा	पादरो	शहाणा
फाणस	फाणस	कंदील
फलाणा	फालाणुं	अमुक

परभी	गुजराती	ग्रांथिक मराठी
वणवय	बनेवी	मेहुणा (बहिणीचा नवरा)
बिजा	बिजो	दुसरा
बाजवट	बाजोठ	चौरंग
भावी	भावी	वहिनी
भावणें	भाववुं	आवडणें
मा	मा	आई
माई, माहीं	मा, माह	माघ
मगशीर	मगसर	मार्गशीर्ष
माकोडा	मंकोडा	मुंगळा
माथाकुट	माथाकुट	कटकट
मोरं	मोरं	ताजें
रकांबी	रकाबी	झांकणी
रासणें	रासवुं	कांपणें
लोढी	लोढी	तवा
ववु	वहु	सून.
वाळी	वाळी	नथ
वाडगा	वाडिगो	प्याला (पेला)
शिव	छिवुं	झांकण
स	छ	सहा
सोकरा	छोकरा	मुलगा
साळा	साळो	मेहुणा
सुकडी (दिवाळीतील मिठाई)	सुखडी	मिठाई,
हिंदोळा	हिंदोळो	झोपाळा

ग्रांथिक मराठीशीं परभी बोलीचें बरेंच साम्य आहे, पण कांहीं थोड्या बाबतींत फरकहि आहेत. परभी बोलीचें वैशिष्ट्य दाखविणारे हे फरक पुढील चार विभागांत बसतात : (१) ध्वनिविचार, (२) रूपविचार, (३) वाक्यविचार, (४) शब्दसंपत्ति.

ध्वनिविचार

१. स्वर

(अ) आद्याक्षर—

	परभी	मराठी
(१) अ > आ	अखंड	अखंड
	आस्मान	अस्मान
(२) ए > अ	अवढं	एवढें
(३) हि > इ	इचें	हिचे
(४) वि > इ	इभूत	विभूति
(५) वो > ओ	ओशट	वोशट
(६) ऑ > आ	काफी	कॉफी
(७) उ > ओ	कोंडी	कुंडी
	घेवाचा	घ्यावयाचा
	पियाला	प्यावयाला

ह्या उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं, आद्याक्षरांचे बाबतींत परभी आणि मराठींत फारच थोडे फरक आहेत. मराठींतील दीर्घ 'ए' ऐवजीं परभींत 'अ' वापरण्याची प्रवृत्ति दिसून येते. उदा. "ह" आणि "व" यांतील व्यंजन नष्ट होऊन फक्त स्वरानेंहि कांहीं ठिकाणीं सुरूवात होते. याच्या बरोबर अगदीं उलट ग्रामीण मराठींतील प्रवृत्ति दिसते. तिच्यामध्यें ओ आणि ए यांच्याऐवजीं वो आणि वे वापरण्याची पद्धति दिसून येते. मराठींतील ही वृत्ति कांहीं व्याकरणकारांच्या मतानें द्राविडी भाषांच्या संसर्गानें आलेली असावी. ह्या दृष्टीनें पाहतां मराठींतील वो च्या ऐवजी ओ वापरण्याची वृत्ति ही प्राचीन मराठीशीं साधर्म्य दर्शविते.

(आ) मध्याक्षर

मध्याक्षराचे बाबतींत परभी बोली आणि ग्रांथिक मराठी यामध्यें फारसा फरक नाहीं. एकच लहानसा फरक म्हणजे मध्यस्वर 'अ' असतां त्याचा जरा लांब उच्चार करण्याची परभींत रीत आहे. जसें पुरण–पुरऽण, किरण–किरऽण.

२ व्यंजनें:—

	परभी	मराठी
(अ) अद्याक्षर :—झ् > ढ्	ढाकण	झांकण
(आ) मध्याक्षर :—ण् > ग्	म्हगून	म्हणून
र् > ळ्	दळीदर	दरिद्र
र् > स्	भस्कन	भरकन्

(इ) अन्त्याक्षर :—ख् > ग्		पोषाग	पोषाख
ष् > ख्		विख	विष
ल् > ळ्		दूधवाळा	दूधवाला

वरीलपैकीं बरींच रूपें ग्रामीण मराठींतही आढळतात. फक्त 'र' ऐवजी 'ळ' (दळिदर–दरिद्र) आणि 'ण' ऐवजी 'ग' हे दोन फरक परभी बोलीचें वैशिष्ट्य दर्शवितात असें मला वाटतें.

ध्वनीच्या बाबतींत होणारे फरक हे सामाजिक आणि संस्कृतिक संपर्कामुळें होतात. परभी बोलीमध्यें असलेले कांहीं फरक कोळी आगरी, भंडारी यांच्या बरोबरील संपर्कामुळें आले असणें शक्य आहे.

महाप्राणाचा उच्चार नसलेल्या ठिकाणीं घालणें आणि असलेल्या ठिकाणीं न करणें हे ग्रामीण मराठीचें स्वरूप परभींतही आढळतें. उदा.

परभी	मराठी
म्होटा	मोठा
जीब	जीभ
बगणे	बघणें
मगाशी	मघाशी
आंमी	आम्हीं

वर्णविपर्यय

परभी	मराठी
पिवशी	पिशवी
बालदी	बादली
अडाणी	अन्नाडी
वाद्दट	वातड.

रूप–विचार

मराठीचे व परभीचे विभक्तिप्रत्यय खालील कोष्टकांत दिले आहेत.

विभक्ति	मराठी	परभी
	एकवचन — अनेकवचन	एकवचन — अनेकवचन
प्रथमा	— —	— —
द्वितीया	स, ला तें. — स, ला, ना, तें	मराठी प्रमाणेंच
तृतीया	ने, ए, शी. — नीं, ईं, हीं, शीं	नेंसाठीं, जून — नींसाठीं जून व नें, साठीं न —
चतुर्थी	स, ला, तें — स, ला, ना तें	मराठी प्रमाणेंच
पंचमी	ऊन, हून — ऊन, हून	ऊन, हूनसाठीं, शीं–मराठी प्रमाणेंच
षष्टी	चा, ची, चें — चे, च्या, चीं	मराठी प्रमाणेंच
सप्तमी	ता, एं, आंत — ता, एं, आंत	आंतसाठी आन
संबोधन	नो	नोसाठीं, नु.

सर्वनामें :—ज्याला उद्देशून वाक्य बोललें आहे त्याचा किंवा त्याच्यासाठीं इतरांचा अंतर्भाव करावयाचा असल्यास प्रथम पुरुषी अनेकवचन "आपुण" (मराठी 'आपण') असें योजतात. ग्रांथिक मराठीहून तृतीया, पंचमी, सप्तमी आणि संबोधन यांच्या बाबतींत परभीचे विभक्तिप्रत्यय निराळे आहेत असें दिसून येईल. मराठीमध्यें तृतीयेचा एकवचनी प्रत्यय नें व अनेकवचनीं नीं या दोन्हीं ऐवजीं परभीमध्यें 'जून' हा प्रत्यय वापरतात. जसें 'त्यानें' किंवा 'त्यांनीं' ऐवजीं 'त्याजून', कांहीं वेळेस 'नें' आणि 'नीं' हे प्रत्ययहि वापरले जातात; पण त्यांचें संक्षिप्त रूप 'न' एवढेंच होतें.

ह्यापेक्षां वैशिष्ट्यदर्शक फरक पंचमीच्या एकवचनांत दिसून येतो. तेथें मराठी 'हून' ऐवजीं परभीमध्यें 'शीं' हा प्रत्यय योजतात. जसें 'गांवाहून' ऐवजीं 'गांवाशीं'. सप्तमी प्रत्ययांत 'आंत' ऐवजीं 'आन' हा प्रत्यय लावतात. जसें : 'घरांत' साठीं 'घरान'. हे सर्वनामांना सारखेच लावले जातात. नामाचें लिंग कोठलेंहि असलें किंवा अन्त्य स्वर निराळा असला, तरी प्रत्यय बदलत नाहींत.

कालवाचकप्रत्ययांचीं कोष्टकें पुढें दिलीं आहेत :—

वर्तमानकाळ

	मराठी		परभी	
पुरुष	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
प्रथम—	तो, ती, ते	तो	मराठी प्रमाणेंच	
द्वितीय—	तोस, तीस, तेस	ता	तोयस, तायस, मराठी प्रमाणेच	
तृतीय—	तो, ते, ती, ते	तात	तेय, ताय,	मराठी प्रमाणेंच

द्वितीयेच्या एकवचनी 'तोस' प्रत्ययाऐवजीं परभींत 'तोयस' किंवा 'तयस' असे प्रत्यय लागतात. जसे 'जातोस' ऐवजीं 'जातोयस' किंवा 'जातेयस'. तसेंच तृतीय पुरुषी एकवचनांत 'तो' ऐवजीं 'तेय' किंवा 'तय' हे प्रत्यय वापरतात : 'खातो' ऐवजीं 'खातेय' 'खातय'.

वरील फरकांकडे नीट लक्ष दिल्यास आपल्या चटकन् लक्षांत येईल कीं, परभी बोलींतील हे प्रत्यय मराठींतील 'आहे' या शब्दावरून आले आहेत. उदा. 'जातेयस' किंवा 'जातेस' हे शब्द 'जात आहेस' यांचें लघु स्वरूप आहे. तीच गोष्ट 'जातेय' किंवा 'जातय' याविषयींहि खरी आहे. 'जातय' किंवा 'जातेय' ही रूपें मुळांत 'जात आहे' ह्याचीं आहेत.

भूतकाळ

पुरुष	मराठी		परभी	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
प्रथम	—लों लीं, लें,	लों	लुं, लुं, लुं (फक्त अकर्मक क्रियापदामध्यें)	मराठीप्रमाणेंच
द्वितीय	—लास, लीस, लेस	लांत	मराठीप्रमाणेंच	
तृतीय	—ला, ली, ले,	ला, ल्या, ले	लेय, लेय,	मराठी प्रमाणेंच

वरील कोष्टकावरून दिसून येईल कीं, प्रथम पुरुषाच्या एकवचनांत ला, ली, लें, यांऐवजीं 'लुं' हा एकच प्रत्यय लागतो. जसें :–गेलों याऐवजीं 'गेलुं.' तृतीय पुरुषाच्या एकवचनांत ला, ली, ले, याऐवजीं 'लय, लेय, लय' येतात. जसें :– गेला, गेली, गेलें, यांऐवजीं गेलाय, गेलीय, गेलेय.

भविष्यकाळाच्या प्रत्ययाविषयीं मराठींत व परभी बोलींत कांहींच फरक नाहीं. परभी बोलीचें आणखीं एक वैशिष्ट्य म्हणजे कांहीं ठिकाणीं महाप्राण उच्चार सोडून देणें. उदा: आमी (आम्हीं), तुमी (तुम्हीं), जासी (जाशी), जीब (जीभ). तर कांहीं ठिकाणीं 'स' च्याऐवजीं 'श' वापरण्याची ह्या बोलींत पद्धति आहे. जसें–'असेल' ऐवजीं 'अशेल'. परभी बोलीमध्यें 'असणें' ह्या क्रियापदाचे प्रत्यय मूळ क्रियापदाला लावून जोड क्रियापद करण्याची वृत्ति दिसून येते. 'गेला असेल' याऐवजीं 'गेलशेल', 'आला असेल' 'आलशेल' इत्यादि.

मराठींतील बरेचसे अनुच्चारित अनुस्वार तसेंच मराठींतील अनुनासिकाशिवाय इतरहि अनुस्वार गाळण्याची परभी बोलींत पद्धत दिसून येते. परभींतील कांहीं शब्द इंग्रजींतून घेतलेले सहज दिसून येतात. उदा० देसक (डेस्क), बाकस (बॉक्स) वासकोट (वेस्ट्कोट). कांहीं इंग्लीश शब्द जसेच्या तसे परभींत वापरले जातात. उदा० बटन.

इतर जातींना उद्देशून "आडुजात" हा शब्द परभींत वापरला जातो- पाठारेप्रभूंचा अहंभाव या शब्दांत दिसून येतो. कारण ब्राह्मणांसकट सर्व जातीं, विषयीं तुच्छतादर्शक उल्लेख करण्याकरतां हा शब्द वापरण्यांत येतो.

(१) परभी शब्द आणि त्यांचे ग्रांथिक मराठींतील प्रतिशब्द पुढें दिल आहेत. :—

परभी	ग्रांथिक मराठी
अडली	परडी
अर्दी	पै
आडुजात (तुच्छतादर्शक)	इतरजात
आंदणी	रांजणवडी
आयस	आई
इस्की	ऐट
कलंगडी	करंगळी
कानी	किनार
कासला	चहाचा प्याला.
कांतेरा	माळा
काउल्टी	लहान सरंगा (पाऱ्हेट)
कोपरा	कोनाडा
कुडकी	माशाचा तुकडा
गचडी	गर्दी
गराळाचा करंडा	लहान मुलांकरितां लागणाऱ्या आयुर्वेदिक औषधांचा डबा
गुळाम्बु	घुमड
गिलीप	अभ्रा
चवा	लाटणें
चुलीपस	स्वयंपाकघर
जनेल	खिडकीवरील झडप
जिभडी	खीरा (लहान काकडी)
जोन	औषधाचा भाग
टेमरू	टेंगुळ
टिपरें	पत्र्याचें भांड (टिनपॉट)
डोफरा	गुढगा
ताजलें	कढई
तामतवी	आंघोळीचें पाणी तापविण्याचा लहान तोंडाचा मोठा तांब्याचा हंडा.
थवर	पळ
थवरी	पळी
देउत	देवक

परभी	ऑथिक मराठी
दिवठाणी दिवा	लामणदिवा
दुटली	गोधडी किंवा चौघडी
धुडी	पुतणी
निवशी	निरामिष, शाकाहारी पदार्थ
पापड्या	खडावा
पिडं	पाट
पेक	थांब
बादीक	त्रास किंवा दुखणें
बापूस	बाप
बासा	पारोसा
बट	गंगावन
बोने	जेवणाचा डबा [बोन=भात, अन्न]
भारकुम	भारदस्त
मिरी	तिखट
याद्दन	जन्मपत्रिका
रोजाची फुलें	झेंडूचीं फुलें
रासणें	कापणें
रसविणें	मुलामा देणें
वर्षदणें	लग्न होणें
वाटवणी	मूत्र
विरोळी	रोवळी
विसणें	शिजणें
शिरें	नारळाचें दूध
शिंगडी	करंजी
होळणें	सांडणें

(२) परभींत, जुन्या मराठींत असलेले पण प्रचलित मराठींत नसलेले खालील शब्द आढळतात --ओखद (औषध), कलमदान (झडप), कणा (रांगोळी), कांटा (माशाचे हाड, डोकींतला आंकडा), जांगळे (गोरे शिपाई), निसण (शिडी), निगुत (नुकते), निसुर (सावकाश), बगर (शिवाय), सुपैती (गादी), हेंद्रा (घाणेरडा), होबासा (होकार).

'ओलाण' या शब्दाचा अर्थ महाराष्ट्रशब्दकोशांत 'कपडे वाळविण्याची दोरी' असा दिलेला आहे (पृ० ४९१); पण परभींत तो 'कपडे ठेवण्याचा लाकडी स्टँड' या अर्थी वापरतात. 'पोस्ती' (आळशी) या परभी शब्दाचा अर्थ 'गलेलठ्ठ' या मराठी शब्दानें व्यक्तवितां येईल. 'फाटक' हा 'जुनी अर्धी साडी किंवा धोतर' या अर्थी परभींत येणारा शब्द, या शब्दाच्या जुन्या मराठींतील अर्थच्छटेशीं जुळणारा आहे.

(३) मराठींत प्रचलित असलेल्या अर्थापेक्षां वेगळ्या अर्थानें उपयोजिले जाणारे परभी शब्दः—

(केस) उकलणें ((केस) विंचरणें), कौल (विस्तव ठेवण्याचें पावड्याच्या आकाराचें लोखंडी भांडें), खेळणें (स्त्रियांनीं दंडांत घालण्याचा चटईसारख्या विणीचा सोन्याचा दागिना), गज (कोबा), गाळ (लाल आणि पिवळ्या रंगाची साधारणतः सोंवळ्यांत वापरण्याची साडी), गवळण (सवाष्ण), जबाब (साखरपुडा), ढेबरी (केळ्याच्या गोड वड्या), दौत (दिवटी), पाच (एक विशिष्ट तऱ्हेची रेशमी साडी), लेप (भाताचें शीतं), लेपलें (खरकटें), वाटणें ([भांडीं] घासणें), शेंडा (अंबाडा), शिब (झांकणी), सायली (एक विशिष्ट डिझाइनचें पातळ), सोय (रसासहित नारळाचा कीस, [या अर्थी हा शब्द जुन्या मराठींत मिळतो.पहा महाराष्ट्र शब्दकोश, पृ. ३१५०]).

(४) **कांहीं खाद्यविषयक परभी शब्द** :—ग्रांथिक मराठींत ज्यांना प्रतिशब्द देता येणार नाहींत असे कांही खाद्यपदार्थांचे व चालीरीतींचे शब्द परभींत येतात. यांतील कांहीं शब्दांचे संदर्भ 'गृहिणीमित्र'[१] आणि 'आमचा जुना जमाना'[२] या ग्रंथांतून पुढें दिले आहेत.

'गृहिणी मित्र' मधील खाद्यपदार्थविषयक शब्द :—

आप्पे (पृ० १०९), आटले (पृ० २२९), अयरोळी (पृ० १११), अयतोळे (पृ० १३३), केरवळी (इंग्रजी पॅटीस् पृ० १९७), कोवळ (पृ० ५०), खडखडले (पृ० २४२), घडा (पृ० २३), चिकसे (पृ० १४८), पंगोजी (पृ० १६०), बाफोळे (पृ० १२८), बिरींज (पृ० १४५), भुजणे (पृ० ३९), रोट (पृ० १४८), सांबारं (पृ० १), सोलाचे (पृ० २२६).

---

१. लक्ष्मीबाई कुंजविहारी धुरंधर, **गृहिणीमित्र अथवा हजार पाककिया**, १२ वी आ.. मुंबई, १९५६.

२. सखाराम विठ्ठल राव, **आमचा जुना जमाना**, मुंबई, १९५४.

'आमचा जुना जमाना' मधील शब्द :—

धनदिवे (पृ० ३०), नवस (पृ० १५०, १५१), पायपाखणी (पृ० ८८), रीत (पृ० ६९, ८२, ८४).

(५) कांहीं खास परभी शब्दांचे अर्थ पुढें दिले आहेत :—

ओटली = स्वयंपाक करण्याकरितां स्वयंपाकघरांत बांधलेली सुमारें सहा इंच उंचीची जागा.

खापा = स्त्रियांनीं केस विंचरतांना दोन्ही कानशीलावरील केस सरळ मागें करणें.

खोय = पीठ वाफणें.

गंजाच टोप = विशिष्ट आकाराचें एक भांडें.

गोवळा = वयांत न आलेला मुलगा. याला सवाष्णबरोबर हळदीकुंकूं देतात.

जोड = दोन बांगड्या जोडल्यासारखा दिसणारा दागिना.

तसलें = कमी उंचीचें रुंद पातेलें.

तिरखोले = सरंग्याच्या (पापलेट) पोटाकडील त्रिकोणी भाग.

नांद = विशिष्ट आकाराचें पातेलें.

पेचकी = सोललेला सबंध बोकड.

मंगाळा = आंघोळीचें पाणी तापविण्याकरितां तीन दगड मांडून केलेली चूल.

लंगरी टोप = विशिष्ट आकाराचें पातेलें.

वावुळ = पहांटेचा वारा [वायु > वाव.]

तीर्थमालिकास्तोत्र

प्रा. (सौ.) कांचनमाला प. हरमलकर

महंत आराध्य मुरलीधरशास्त्री यांनीं, 'प्राचीन मराठी कविता' चे संपादक श्री. ज. शा. देशपांडे यांना हयग्रीवकृत गद्यराजस्तोत्राच्या संपादनासाठीं जीं हस्तलिखितें दिलीं होतीं, त्यांतील एका हस्तलिखित पोथीच्या शेवटीं तीर्थमालिका हें स्तोत्र होतें. त्या हस्तलिखिताचा व हैदराबाद येथील महानुभावीय साहित्याचे संपादक आणि प्रकाशक श्री कृष्णदास महानुभाव यांनीं मला दिलेल्या हस्तलिखित पोथीचा, उपयोग करून प्रस्तुत स्तोत्र मीं सिद्ध केलें आहे.

'तीर्थमालिका' हें स्तोत्र इ. स, १९१६ मध्यें सोलापूर येथें प्रभू गोविंद कानडे यांनीं सच्चिदानंद छापखान्यांत छापलेलें आहे असा एक उल्लेख आढळतो.[१] त्याचप्रमाणें तीर्थमालिका सोलापूर येथें १८९५ (शक?) मध्यें छापली गेली, असाहि निर्देश माझ्या वाचनांत आला.[२] यावरून वरील काव्यावर दोन वेळां मुद्रणसंस्कार झाले असावेत, असें वाटतें. दोन वेळां प्रसिद्ध झालेल्या प्रस्तुत स्तोत्राचा प्रसार केवळ पंथीय भक्तगणांमध्येंच झालेला असल्यानें इतर साहित्यप्रेमी रसिकांच्या वाचनांत तें येऊं शकलें नाहीं. आज तर तें फारसें कोठें उपलब्धहि नाहीं, त्यामुळें या स्तोत्राच्या मुद्रणाची आवश्यकताच होती.

तीर्थमालिकेचा काळ :—निरनिराळ्या ठिकाणीं येणाऱ्या उल्लेखांवरून तीर्थमालिका हें स्तोत्र स्थूलमानानें १४ व्या शतकांतील असावें असें वाटतें[३]. भाषेच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास हयग्रीव व्यासांच्या गद्यराजापेक्षां या काव्याची भाषा सोपी व नंतरच्या काळांतली वाटते. यावरून वरील काव्य हें चौदाव्या शतकांतीलच असावें असें गृहीत धरल्यास चुकीचें ठरणार नाहीं.

तीर्थमालिकेचा कर्ता :—तीर्थमालिकेचा कर्ता कवी शार्ङ्गधर भोजने हा उपाध्याय आम्नायांतील पंडित होता. याच्या वडिलांचें किंवा गुरूचें नांव एकनाथ असावें असें वाटतें. "अशन (भोजने) धनुष्य (शार्ङ्गधर) नामा

---

१. ह. ना. नेने (संपा), **लीळाचरित्र भा. ४ था, पूर्वार्ध, खंड ३**, "प्रस्तावना", नागपूर, शके १८७२,

२. य. खु. देशपांडे, **महानुभावीय मराठी वाङ्मय** आवृत्ति २ री, पुणें, १९६०, पृ. ४,

३. वि. भि. कोलते (संपा), **स्थानपोथी**, "प्रस्तावना", मलकापूर, (?) पृ. १०, व ह. ना. नेने, **उ. नि.**, पृ. ३.

गोत्र औपाध्यकाचें । सुत अति मतिमंदू नाम एकाभिधाचें",[४] या काव्यपंक्ती-वरून कवीचें नांव व व्यवसाय यांची निश्चिति होते. कवि शार्ङ्गधरानें आपल्या काव्यांत लेखनकाळ कोठेंच उद्धृत न केल्यानें केवळ अंदाजाची मोट येथेंहि बांधावी लागते. शार्ङ्गधर भोजने यांनीं ओवीबद्ध महाभारत रचल्याचा उल्लेख महाराष्ट्र सारस्वतांत केलेला होता.[५] कवीनें 'नवरसनारायण' हें टोपणनांव घेतल्याचेंहि तेथें म्हटलें होतें. परंतु सदर माहिती चुकीची असून शार्ङ्गधर भोजने हा नवरसनारायणाचा गुरु आहे, असें मत अधिक संशोधनांअंतीं सिद्ध झालें आहे.[६]

प्रस्तुत स्तोत्राचें प्रयोजन :

महींद्रभटकृत लीलाचरित्रामध्यें महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांच्या जीवनांतील अनेक लीळांचें वर्णन आलें आहे. अवतारी पुरुषांचा ज्या स्थानांशीं वा वस्तूंशीं संबंध आला, त्या सर्वांना पवित्र मानण्याची आपली परंपरा आहे. महात्म्यांचा स्पर्श झाल्यानें एक दिव्य संचार या वस्तुमात्रांतून होतो आणि त्यामुळें त्या वस्तूंचें महत्त्व वाढतें. प्रत्यक्ष चक्रधरांनीं याचें महत्त्व पुढीलप्रमाणें सांगितलें आहे :—

"परमेश्वरू भज्य : संबंधु वंद्य : एथीचेया संबंधा गेलें.
तेतुलें ओटे गोटें आदिकरौनि : तुम्हां नमस्कारणीये कीं गा :"[७]

तसेंच श्रीचक्रधरांनीं आपले निरंतर स्मरण करायला भक्तमंडळींना सांगितलें होतें. हें स्मरण चतुर्विध प्रकारचें. "नामः लीळाः मूर्तिः चेष्टा."[८] अर्थात् या चतुर्विध स्मरणांत चतुर्विध सेवाही आली. "स्थान : प्रसाद : भिक्षु : वासनिक :". अशा प्रकारें परमेश्वराच्या सेवेंत श्रीचक्रधरांनीं स्थानांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करून दिलें. या मौलिक निरूपणांतून परमेश्वरस्वरूप अशा व्यक्तींच्या चरणरजानें पुनीत झालेलीं स्थानें महानुभावांना वंदनीय वाटलीं.

---

४. **तीर्थमालिका**, श्लोक ९१.

५. वि. ल. भावे, **महाराष्ट्र-सारस्वत** पुरवणीसह, आवृत्ति चवथी, शके पुणें, १८७३, पृ. ९२४.

६. वि. ल. भावे, **महाराष्ट्र-सारस्वत** पुरवणीसह, आवृत्ति ५ वी, मुंबई, शके, १८८५ पृ. ७५९.

७. ह. ना. नेने (संपा), **श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ**, आ. १८५-८६, नागपूर, शके १८६४, पृ. १७.

८. **तत्रैव**, आचार २८, पृ. १०.

श्रीचक्रधरस्वामींच्या समवेत असलेली मंडळी, नागदेवाचार्य, नागांबिका, नाथोबा वगैरेंनीं स्वामींचें जीवन जवळून पाहिलें होतें. तेव्हां 'याची डोळा' पाहिलेलें सर्व सत्य संकलित करून लीळाचरित्राची बांधणी झाली. हा गद्यरूप ग्रंथ याचे एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे तीन भाग आहेत. या तीनही भागांचें दैनंदिन जीवनांत परिशीलन करणें वा मनन करणें हें निश्चितच कठीण व आवांक्याबाहेरचें. ही अडचण दूर व्हावी या हेतूनें 'तीर्थमालिका' या पद्यमय, स्तोत्ररूप व आटोपशीर काव्याची रचना पंडित शार्ङ्गधरानें केली असावी. स्थानपोथी या ग्रंथांत महानुभावांना पूज्य असलेल्या सर्व सान-थोर तीर्थस्थानांची माहिती आलेली आहे. ही सर्व गद्यग्रंथांतील स्थानें लक्षांत ठेवणें हें सर्वसाधारण व्यक्तीला अशक्यच. स्मरणसुलभतेच्या दृष्टीनें पद्यग्रंथांचें महत्त्व अधिक असतें, हें जाणून चक्रधरांच्या स्पर्शानें पावन झालेलीं पूज्य स्मृतिस्थानें शार्ङ्गधरानें काव्यांत गुंफलीं असावींत.

तीर्थमालिकेचें काव्यस्वरूप :

या स्तोत्रकाव्यांत प्रामुख्यानें महानुभावांचीं तीर्थस्थानें वर्णिलेलीं आहेत "वस्तु संबंधे शक्तिनिक्षेप : वस्तुसंबंधें तीर्थचा योनि मोक्ष : देवा आनंदु वस्तुसंबंध जडा अजडा भले," अशा प्रकारचें निरूपण चक्रधरानें केल्यामुळें अवतारी पुरुषांच्या संबंधित अशा वस्तूना एक अन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें. या भूमिकेंतून श्रीचक्रधरस्वामी व गोविंदप्रभू या ईश्वरस्वरूप व्यक्तींनीं ज्या ज्या स्थळांना आपल्या भेटीनें पुनीत केलें, त्या सर्व पूज्य स्थळांची स्मृति प्रस्तुत स्तोत्रात निबद्ध झालेली आहे. हें स्तोत्र एकूण ९१ श्लोकांचें असून यामध्यें सुमारें सव्वादोनशें पूज्यस्थानांचा अंतर्भाव केलेला आहे. स्थानपोथीमध्यें तर यांहूनहि अधिक तीर्थस्थानांचा उल्लेख आढळतो. महानुभावांच्या मतें तीं एकूण ६५० असावींत अशी माहिती मिळते.[१०] प्रस्तुत तीर्थमालिका लिहीत असतांना कवीच्या नजरेपुढें स्थानपोथीपेक्षां लीळाचरित्रच अधिक असावें असें या काव्याच्या अभ्यासावरून वाटतें. याचा सबळ पुरावा म्हणजे लीळाचरित्राप्रमाणेंच प्रस्तुत काव्याचे तीन भाग आहेत. श्लोक एक ते चवदापर्यंत एकांक संपला आहे. श्लोक पंधरापासून अठावन्नपर्यंत पूर्वार्ध विस्तारलेला आहे व एकोणसाठाव्या श्लोकापासून ते अखेरपर्यंत म्हणजे नव्वदाव्या श्लोकापर्यंत उत्तरार्ध निवेदिलेला आहे. त्याचप्रमाणें एकांकांतील लीळांशीं बद्ध असलेलीं स्थानें एकांकांत, पूर्वार्धांतील लीळांशीं संबंध असलेलीं स्थानें पूर्वार्धांत, अशाच क्रमानें स्थानांचा उल्लेख आढळतो.

---

९. **तत्रैव**, पृ. १७१–१७३.

१०. य. खु. देशपांडे, **उ. नि.**, पृ. ४–५.

श्रीचक्रधरस्वामींनीं बारा वर्षें सातपुडा पर्वतावर एकांतवास केला. एकांतांतून लोकान्तांत आल्यावर तत्कालीन धर्मस्वरूप, समाजव्यवस्था, लोकस्थिति यांचें अवलोकन करण्यासाठीं म्हणून त्यांनीं महाराष्ट्रभर प्रवास केला. या त्यांच्या दीर्घ प्रवासांत त्यांनीं ज्या ज्या ठिकाणीं मुक्काम केला, ज्या तीर्थस्थळांना भेटी दिल्या, त्या स्थळीं लोकजागृतीचा त्यांनीं प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नांचें वृत्त म्हणजेच त्यांच्या लीळा आहेत. या लीळांमध्यें अद्भुततेपेक्षां उदात्तता आणि मानवता यांचाच साक्षात्कार अधिक होतो. श्रीचक्रधरस्वामी कांहीं ठिकाणीं अधिक काळ राहात. तर कांहीं ठिकाणीं अल्पकाळ राहात. यासाठीं या स्तोत्रांत कांहीं शब्दप्रयोग विशिष्ट अर्थाचे द्योतक म्हणून आले आहेत. उदा. 'वसति', 'अवस्थान', 'संबंधमात्र'. जेथें 'वसति' असा उल्लेख आहे तेथें ते एक रात्र निवास करीत, 'अवस्थान' म्हणजे तीन दिवसांवर बारा वर्षेपर्यंत दीर्घकाल मुक्काम करीत, आणि 'संबंधमात्र' म्हणजे एखाद्या गांवाला पोंचले असतां क्षणमात्रही बैठक न ठोकतां उभ्या उभ्या तेथून प्रयाण करीत. अशा प्रकारें कांहीं शब्दांचे खास अर्थ या स्तोत्रांत वापरले गेले आहेत.

स्तोत्र कां म्हणावें ?

तीर्थमालिका या काव्यस्वरूप ग्रंथाचा कांहीं ठिकाणीं स्तोत्र; तर कांहीं ठिकाणीं केवळ पद्य असा उल्लेख आढळतो. अर्थात् पद्य असें संबोधणाऱ्यांना तें स्तोत्र आहे असें अभिप्रेत नसेलच, असें कांहीं म्हणतां येत नाहीं. केवळ स्थूलमानानें केलेला हा नामनिर्देश आहे, स्तोत्र म्हटल्यानंतर स्तुत्य वस्तूविषयींचा भक्तिभाव, त्या विषयापर्यंत जाऊन पोंचण्याची तळमळ, मनाची तन्मयावस्था, सेवावृत्ति, लीनता या भावनात्मक गोष्टी आल्याच. त्याचबरोबर गेयता, गतिमानता, प्रत्ययकारिता हेहि रचनेचे गुणधर्म यावे लागतात. एका उन्मनीअवस्थेत कवीनें लिहिलेलें हें स्तोत्र भक्तांच्या परंपरेला तन्मयावस्थेंत यशस्वीरीत्या कसें नेऊन सोडतें, हीच तर स्तोत्राची कसोटी आहे. या दृष्टींतून पाहिले असतां हें स्तोत्र बऱ्याच कसोट्यांना उतरू शकतें. सदर काव्य लिहिण्यामागील कवीचा हेतु, तें पंथीयांना मार्ग दर्शक व्हावें हाच आहे. नित्याच्या जीवनांत चक्रधराचें प्रातःस्मरण करीत असतांना चक्रधरस्वामींनीं पुनीत केलेल्या स्थळांची व त्यांच्या अनुषंगानें येणाऱ्या लीळांची पुण्यस्मृति होऊन सामान्य लोकांचें जीवन निर्मल व्हावें हा एकमेव हेतु प्रस्तुत स्तोत्ररचनेमागें आहे. ह्या स्तोत्रांतील कवीचा पूज्यभाव, आदर व भक्तिभाव या पार्श्वभूमींतूनच प्रकट होतो. स्तोत्राच्या समारोपांत

"श्रवणपठण योगे सेवीती नीत्यकाळी
परमसुख नव्हाळी वामुनाथा प्रियेळी"

अशी फलश्रुतीहि कवीनें उघड करून सांगितली आहे. हें स्तोत्र अनेक वृत्तांत रचलेलें आहे. एकाच वृत्तांत स्तोत्ररचना केल्यास स्तवनांत जो एकसुरीपणा येईल तो येऊं नये व कांहीसें रचनावैचित्र्यहि राहावें या जाणिवेंतून कवीनें विविध वृत्तांचा समावेश यांत केलेला आहे. यांत समाविष्ट झालेलीं सर्वच वृत्तें स्तोत्राचा प्रवाहीपणा, भावोद्रेक कायम टिकविणारीं आहेत. त्यामुळें हें स्तोत्र पठण करीत असतां कंटाळवाणेपणा वा शैथिल्य न येतां तें अधिक सुरम्य पद्धतीनें गातां येतें, असा निर्वाळा पंथीय मंडळीनें दिलेला आहे. पंथीय भक्तगण 'माळका' या शब्दांत त्याचा परस्परांत उल्लेख करतात. या स्तोत्राचें वैशिष्ट्य असें कीं, महानुभावपंथाच्या भक्तसंप्रदायांत कांहीं लोक अजूनहि हें स्तोत्र दैनंदिन पूजेच्या वेळीं भक्तिभावानें गातात.

भौगोलिक दर्शन :—या स्तोत्रांत आलेल्या तीर्थस्थानांच्या नांवांवरून चक्रधरस्वामींच्या प्रवासाच्या आराखडा नजरेपुढें येतो. विशेषतः मराठवाड्यांतील अहमदनगर, नाशिक जिल्ह्याच्या पूर्वेकडील भाग, हैद्राबादमधील परभणी, बीड इत्यादि भागांतील स्थळांचा निर्देश यांत प्रामुख्यानें आलेला आहे. गोदावरीच्या उभय तीरांवरील स्थळांचा यांत अंतर्भाव आहे. पैठण, उत्तरेस हिवरळी (जालना), पूर्वेकडील नांदेड अशा प्रमुख शहरांचा पुनःपुन्हां उल्लेख आला आहे. एलिचपूर-ते मेहकर या वाटेवर असलेली 'आंबजाई', 'पातुरडी', 'विघयी', 'आलेगाव' इत्यादि गांवांचा उल्लेख आहे. एकांकाच्या अखेरीस ते पैठण येथें जातात आणि तेथून परमेश्वरपुरला म्हणजे रिधपुरला जाण्यासाठीं पूर्वार्धाच्या सुरवातीला निघतात. वाटेंत लागणाऱ्या 'राहाटगांव' 'कडेठाण' 'राजुरा' 'सेंदुर्जनी' 'मेहकर' 'इसवी' 'पातूर' 'टाकळी' 'लाखेपुरी' 'वाकी' इत्यादि गांवांची नामावळ पुढें आली आहे.

चक्रधरस्वामी आपल्या या प्रवासांत जेथें जेथें राहिले त्या त्या ठिकाणच्या अनेक देवळांचे उल्लेख या स्तोत्रांत आले आहेत. रावसगांवीं सिद्धनाथाचें देऊळ, आपेगांवीं महालक्ष्मीचें देऊळ, नांदोरे येथें आदित्याचें स्थान, अशा एक ना अनेक देवळांचा उल्लेख यांत आहे. कांहीं लेण्यांतून चक्रधरस्वामी राहिल्याचे उल्लेख आढळतात. हीं लेणीं वेरूळ, नाशिक इत्यादि ठिकाणचीं आहेत. लोणार येथें धारातीर्थाच्या जवळ भैरवाच्या मंदिरांत श्रीचक्रधरस्वामींचा वीस दिवसांहून अधिक मुक्काम होता. निरनिराळ्या गुंफा व मठ येथेंहि ते वस्ती करून राहिले होते. यांवरून काळ, वेळ व परिस्थिति पाहून स्वामी आपला प्रवास कसा योजकतेनें आखीत. याचें सम्यक् दर्शन आपल्याला या स्तोत्रांत घडतें.

कांहीं महत्त्वाच्या घटनांचा निर्देश :

(१) चांगदेव ऊर्फ श्रीचक्रपाणी (महानुभावपंथाचे तिसरे अवतार)

यांनीं द्वारकेंत 'कामाख्या' या हट्टयोगिनीच्या कामुक हट्टाला कंटाळून देहत्याग केला याचा उल्लेख तिसऱ्या श्लोकांत आहे.

(२) वरंगळ येथें जाऊन स्वामींनीं कमलनायकाची मुलगी हंसाबा हिच्याशीं विवाह करून ते कांहीं काळ संसारी बनले याचा उल्लेख सातव्या श्लोकांत आहे.

(३) एकांकाच्या अखेरीस ते पैठणला आल्याचा जो उल्लेख आहे, त्यांत

"शाके शास्त्रपुराण भू परिमीते ११८६ रक्ताक्ष संवत्सरी
मासे कार्तिक संज्ञीके मुनी १४ तिथौ शुक्ले शशी वासरी
नागांबेप्रति भेटि देऊनि तदानंता जीवा उद्धरी
त्यातें मी मनसी सदा स्मरतसे तारी भवीं श्रीहरी ॥"

स्वामींच्या नागांबिकेशीं झालेल्या प्रथमभेटीचा असा उल्लेख येतो.

ही नागांबिका चक्रधरांच्या प्रमुख शिष्यगणांपैकीं एक. सडासंमार्जन, स्वयंपाक, पूजासाहित्य वगैरेची व्यवस्था पाहाण्याचें काम हिच्याकडे होतें. तिचा उल्लेख 'बाईसा' असाहि केलेला आहे. ही स्वामींची एकनिष्ठपणें सेवा करीत असे. स्वामींच्या मृत्यूची खोटी बातमी ऐकून तिनें देहत्याग केला.

(४) चक्रधरस्वामी व नागदेव यांची भेट होऊन कांहीं काळ लोटला तरीसुद्धां स्वामींनीं त्याला दीक्षा दिलेली नसते. हा नागदेव महादेवभट व आत्राइसा यांचा मुलगा. तारुण्यांत हा अनेक 'ढांढाळांचा' होता.[११] पुढें रामदेव उर्फ दादोस याच्यामुळें तो निवळला व त्याच्याचमुळें त्याची श्रीनगर (हल्लीचें सिन्नर) येथें चक्रधराशीं प्रथम भेट झाली. आपल्या शिष्यत्वाला तो पूर्णपणें लायक झालेला आहे असें पाहूनच पूर्वार्धाच्या अखेरीस (५९ व्या श्लोकांत) चक्रधरानें नागदेवाला खडकुली (जि. औरंगाबाद) येथें दीक्षा दिली.

"श्री भटे मग येउनी मुख धनी दीक्षा नीकी घेतली" असा नागदेवानें चक्रधराला 'अनुसरण' केल्याचा उल्लेख प्रस्तुत स्थळीं आहे.

(५) उत्तरार्धातील ७९ व्या श्लोकांत

"शाके वेद न वदे भुमि गणिता संवत्सरे चांगी रे
कृष्ण माघ चतुर्थी मंगळ दिने ११९४ ग्रामेतु बेलापुरे
गंगातीर तेजुनीया जीवपती बीजें करी उत्तरे
माझे चांगत जाणुनी चपलता लंघीत देशांतरे"

---

११. वा. ना. देशपांडे (संपा.), **स्मृतिस्थळ**, दुसरी आवृत्ति "प्रस्तावना", पुणें, १९६०, पृ. २४.

यावरून श्रीचक्रधरस्वामी शके ११९४ मध्यें गंगातीर सोडून उत्तरेसा (बदरिकेदार) गेले असा पुरावा मिळतो.

(६) अखेरच्या ८९ व्या श्लोकांत

"नखि शशि १२१ वरुणी श्री ऋद्धिपूरी विहारी ॥
मग विभु निजधामा वास इच्छांगिकारी"

असें शार्ङ्गधर म्हणतो. यावरून गोविंदप्रभु यांनीं ऋद्धिपुरांत १२१ वर्षें अवतारकार्य केलें, असें म्हणायला सबळ पुरावा सांपडतो.

समारोप :—प्रस्तुत स्तोत्र हें लीळास्मृतींचें स्मरण घडविणारें एक गेय स्तोत्र आहे.

श्रीयेळिये भोकर वस्तिकारी। बेलापुरी मास तिनी विहारी ॥
श्री उत्तरार्धी नगदेव ऐसी। ग्रामादि संख्या परसौख्यराशी ॥७६॥

यासारखे रचनेचा भोंगळपणा दर्शविणारे कितीतरी श्लोक प्रस्तुत स्तोत्रांत आहेत. परंतु कवीचा काळ व काव्यसंपदा लक्षांत घेता या दोषांकडे कांहींसें दुर्लक्ष करावेसें वाटतें. नवरसनारायणाचा गुरू या दृष्टीनें तर कवीचें व्यक्तिमत्व या काव्यांत फारच अभावानें प्रकट होतें.

या तीर्थमालिकेंतील चक्रधर–नागांबिका यांची भेट, नागदेवाचें चक्रधराला अनुसरण, चक्रधराचें अंतीचें उत्तरेकडील प्रयाण, इत्यादि गोष्टींचा अधार अनेक महानुभावीय ग्रंथकारांनीं घेतलेला आहे. या दृष्टीनें या काव्याचें महत्त्व अनन्य-साधारण आहे.

प्रस्तुत स्तोत्राच्या संपादनासाठीं ज्या पोथ्या मला मिळाल्या, त्यामध्यें कांहीं किरकोळ फरक सोडल्यास कोणतेही पाठभेद आढळले नाहींत.

तीर्थमालिका

श्रीपरेशाय नमः

(शा. वि.)—**वंदु श्रीचक्रधरा कृपा गुणवरा सर्वेश्वरा चित्परा**
कारूण्या नट नागराद्वय करा विघ्नादी दोषा हरा
संबंधे जड जीव तारून वरा पुता कृपा हे धरा
दातारा करुणाकरा वरमते द्यावी विभु गुर्जरा ॥ १ ॥
सर्वेशा पदसंगमी महीतळी तीर्थाभिदा पातळी
ठेवीली निजशक्ति जे पुरविती सत्कामना चिंतीली
नामादि चतु साधने प्रतिदिनी ज्ञानांमृते घोळीली
ते 'माळा' वंदनार्थ हेत धरुनी त्वत्प्रार्थना मांडीली ॥ २ ॥

सग्धरा—आदौ श्री फलेठानी निजरुप धरुनी क्रीडला चौकदानी
तेथौनी चक्रपाणी विचरत धरणी येत माताभिधानी
पुढा तो मोक्षदानी अघभय हरुनी वावना सिद्धीदानी
कामाख्या ते न मानी निजपुर त्यजुनि येत खांवाभीधानी ॥ ३ ॥

तेथौनि तो चक्रपानी पतीत उठउनी क्रीडतु मोक्षदानी
नाना आश्चर्ये करुनी वीचरत धरनी ब्रह्मचर्यादि चिह्नी
ऐसे जाणौनि ज्ञानी प्रभु नीज वेश येत कैवल्यदानी
आर्ताचा आर्तदानी इती समय तदा मार्ग वाय नीदानी ॥ ४ ॥

तेथे श्रीश स्मशानी पतीत उठउनी माल्हनी सौख्यदानी
वीशाळा पुत्र आनी गृहिणी कमळनी आन गोपाळ मानी
द्युतक्रीडा करुनी सकळहि तेजुनी रामे नेम धरुनी
नीगे कैवल्यदानी विलसीत चरणी नौमी ते धन्य क्षौनी ॥ ५ ॥

छंद मालिनी—वीचरत प्रभु भेटी ऋधिपुरासी आला
पर तर गत वींझा गोंडवाडा अनंतु
विभु अनीयतवासी कांती ये स्थीतमंतु
पुत करीत वीरंता मुक्तीके भेटि देतु ॥ ६ ॥

छंद भुजंग—करी द्युत क्रीडे सुपाळा परेशु । तदा स्थीत अरंगले गुर्जरेषु
करी तेथ वीव्हाव हंसावीकेसी । वीभुडा करामस्तु भांडारवासी ॥७॥

करी तेथ श्री नीळ भटांगिकारी । तदा येतसे दुर्जनासि उदारु
क्रमे क्रीडता पुत नांदेड कर्ता । तदा दाम वीहीरीय होय येता ॥८॥

कदा स्नेहयुग्मासि पै स्थीतिकारीं । कदा सीद्ध रे सीद्ध बोलुनि तारी
कदा नौत्य नासौनि तो प्रेमदानी । शशा रक्षीला व्याधि खेदा हरौनी ॥९॥

कदा गोप चोढी सुरा येरवासी । प्रभु पंचकौळी ग्रहत्वासि नासी
कदा भोगरामी वसे तो भवारी । अळर्कापुरी राज्य धर्मोगीकारी ॥१०॥

मालनी—प्रभु स्थीत वडनेरा अंब जय सुहावा[1]
प्रहरीत अहरोषा भेटला राम देवा
पर तर गत पुढा वासनी आलग्रामी
भवभय अघ नासी पातुरी वस्ती स्वामी ॥ ११ ॥

---

१. य. खु. देशपांडेकृत महानुभावीय मराठी वाङ्मय या ग्रंथांत पृ० ४५ वर दिलेल्या उताऱ्यांत या श्लोकाचा क्रम १० असून श्लोक पुढीलप्रमाणें आहे :—

प्रभुस्थि 'वडनेरा' 'आंबजय्ये' सुहावा
प्रहरित अहिरोशा भेटला 'रामदेवा' ॥
परतर गत पूढा 'वासनी' 'आलग्रामी' ॥
भवभय अघनाशा 'पातुरीं' वस्ति स्वामी ॥१०॥

छंद स्रग्धरा—वीशई आंजनीसी भवभय हरनी पुत मेघंकरातें[1]
लोनारी कुंडधारे गृहित कमळ जे रामसा पैठनातें
तेथे नागांबिकेते प्रहरुनी कळीका प्रेमसंचार केला
जाला येकांक ऐसा करी भुज गनीता ग्रामखेडी समस्ता ॥ १२ ॥

छंद शार्दूल—शाके शास्त्र पुराण भु परमीते (११८६) रक्ताक्ष संवत्सरे
मासे कार्तिक संज्ञी के मुनी (१४) तीथौ शुक्ले शशी पैठने
नागांबेप्रति भेटि देऊनि तदानंता जीवा उद्धरी
त्याते मी मानसी सदा स्मरतसे तारी भवी श्रीहरी ॥ १३ ॥

छंद भुजंग—अवस्थान श्री पैठनी देवरावा। कृता भोगनारायणी बीज करवा
बहु वेधुनी बोधुनी उर्द्ध केले। आहो या परी तेथ दीग्मास जाले॥१४॥

एकांक पूर्ण

अथा नंतरे भक्तवृंदा सहीतु । प्रभु वस्ती राहाट ग्रामासि येतु
कडेठान राजौर सेंदुर्जनासी । तदा येत मेघंकरी वीशयीसी ॥१५॥

आलेगावी पातुरी टाकळीसी । वेळरख्यी लक्षपुरी वीशेसी
ईत्यादीकी ग्राम खेडे समस्ती । केली देव आदरें पुन्य वस्ती ॥१६॥

छंद वज्रनामा—सीग्नापुरी येउनी दीननाथे । वस्थान केले जन तार नाथें
सप्ताहि संख्या वीभु राज्य करी। कोडेश्वरी पंचदीनी वीहारी॥१७॥

वाकी थुगावी वीभु वस्ती जाली । तारी जीवा जो युग दाम मेळी
रामासनी वाळ समुद्र पाहे। येउनि वस्ती तळवेलि राहे ॥१८॥

खैराळ पुर्वे वीभु आसनस्तु । ते जी उपाह्वो प्रभु भेटि येतु
देवी पुढा माल्हनी येतु आहे। प्रभोध्रीकंजा वीभु दावीताये॥१९॥

आळंदीये भेदुनि श्री प्रभुसी । वीजे करीतो मग भैरवासी
राहुनीया वासर वीस तेथें । प्रयाण कीजे मग याम पंथे ॥ २० ॥

---

१. प्रस्तुत श्लोक उ. नि. ग्रंथांत येणेंप्रमाणें आहे :—
'विषये' आंजनीसी भवभय हरुनी पूत 'मेघंकरातें' ॥
लोनारी कुंडधारी प्रहिण कमळजा 'रामसा' 'पैठणाते'
तेथें 'नागांबिकेतें' प्रहरुनि कळिकाप्रेमें संचारकर्ता ॥
झाला येकांक ऐसा करभुज मगिता ग्रामखेडी समस्ता ॥ ११

छंद भुजंग—अथा नंतरे ईश बेलोरवासी। सीराळे करी पुत श्री आसटीसी
तदा वाठवाडा विभु मांगरौळी। प्रभु वाळवंटी लीळा पूर्व केली ॥२१॥

छंद वज्रनाम—सेंदुर्जनी पै विभु कोळगावी। श्री डौद्रग्रामी भीमडाउ संज्ञी
फुलंबरी येऊन देववासी। इत्यादि वस्ती विभु सौख्यरासी ॥ २२ ॥

येळापुरी परम सुंदर देवराजा। क्रीडा करी अनुचरा समवेत वोजा
चोवीस दिस नवमास विहार तेथे। ते धन्यभूमि नमिली विहीतार्थ जेथे।२३।

छंद वज्रनामा—या नंतरे मातखेडादि ग्रामी। श्रीलासुरी घोगरग्राम धामी
क्रमुनिया डोंबपुरी वीहारी। इत्यादि ग्रामी प्रभु वस्त करी ॥ २४॥

छंद भुजंग—क्रमे क्रीडता या परी चक्रधारी। तदा सिन्नरी जीव हेतु विहारी
अवस्थान दिग्मास जाले भवारी। तथा दिग्दीनी नाशीका पुतकारी ॥२५

वसंततिलका—गोवर्धनी परमसुंदर अंजनेरी
वस्ती करूनी मग त्रंबक पुतकारी
वाहूनी तेथे वीडा दिनपंच राहे
वस्तीस तो पुनरपी विभु आंजनी ये ॥ २६ ॥

छंद मालिनी—पुनरपी परमेशु नाशकी वासकारी
नवदिन अडगावी येऊनी वस्तिकारी
अतिगहन कृपेने वस्तीने पुत केलें
नवदिन सुनीफाडे चीद्वरें राज्य केले ॥ २७ ॥

छंद वज्रनामा—खांडे भेडाद्री विभुचा समस्ता। मध्येश्वरी नांदुनी वस्ती येता
श्री कानदळी शुभवास ग्रामी। सुरेशग्रामी सुसवर्णग्रामी ॥ २८ ॥

संवत्सरी कुंकुमठाणवासी। त्रिरात्री वस्ती विभु गुर्जरासी
श्री पुणतांबा शुभ नायग्रामी। नाउर कंटेश्वरी वस्ति स्वामी ॥२९॥

मालिनी—पुनरपि पुणतांबा राहणे वीसदिनी
विचरत परमेशु हिंगुनी पूर्णग्रामी
परजन निवासा सांगरखेडी अनंतु
सुखदय अघनाशीं वांजरी विश्वनाथु ॥ ३० ॥

चंपकमाळा छंद—नाना ग्रामठाणी अवलग्रामी। खातभीदानी डोंबाभिधानी
मागील वस्ति डोंबाभिधानी। सप्तदिनी तो राहात स्वामी ॥ ३१ ॥

छंद शार्दुल—ऐसा सुंदर विश्वनाथ परमा डोंबभिधे पैठनी
येउनी नवलादिका करुनिया तो स्थित शैयासनी
नागांबादिक भक्तवृंद सकळै पुजा त्रिकाळी तदा
मिळुनी सुरकिन्नरी मुनीवरी तो योग वांछी सदा ॥ ३२ ॥

मालिनी—विचरत वसुधेसी येत श्रीवर्धनासी
परगुणसुखरासी राहणे वेद मासी
तिथी परमित संख्या भक्तभेटीस आला
करुनि परम पूजा ईश्वरा योग्य जाला ॥ ३३ ॥

वज्रनामा—तेथौनियां निघत श्री अनंतु । मैराळ वस्तीकृत निंबयांतु
ऐसा परी पाटवधानी येता । सद्वासरी वाण शशी प्रमीता ॥ ३४ ॥

जाऊनिया साकद वस्तकारी । राजासनी रामदरा भवारी
राहुनियां वासर वीस मासे । श्री मात्र कौळी मग वस्त जाणे ॥ ३५ ॥

वसंततिलका—तो आष्टीय परमसुंदर पारंग्रामी
वस्ती सीराळा भुवनी मग वाकीधामी
राहुनी मास मिरडा मग वस्तिकारी
श्री घोगरादी गण मांडव पुतकारी ॥ ३६ ॥

छंद वज्रनाम—आरण्यग्रामी दिन पंचवासी। भिंगारवासी तिथी संज्ञीकेसी
अवस्थग्रामी शुभ पापनाशी । तो आसनस्थ विभु सौख्यराशी ॥ ३७ ॥

छंद स्रग्धरा—वामोरी त्रिरात्रि वसत सुखनिधी सोनये वस्त केली
वस्ति श्रीभालग्रीमी सुहरीण ये कानडीय त्रिरात्रि
येऊनि गागपुरी वस्ति फुलसरा वेरुळी वास कारी
संख्या बाणेंदु नेसी विरहण वसती हातनौरी भवारी ॥ ३८ ॥

द्रुतविलंबीत—कनरडे मग वेउनि श्रीहरी । द्वीज गृही वसति बरवी करी
परम साएगव्हाणही वाघळी । विचरता वसुधा सुख मंगळी ॥ ३९ ॥

छंद शार्दुलविक्रीडित—येऊनी मग कानसे सुखनिधि वस्तीसी पै राहिला
नागांबा मुनि भक्तराज सकळै स्वामी परिवारीला
ते स्थानी अभिमानपूर्वक तदा संबंध निक्षेपिला
तो अद्यापी दिसे वसे मज म पावे जनाची तिला ॥ ४० ॥

छंद इंद्रवज्रा—वटातळीचा सन सौख्यरासी। भिक्षासनी कामदुहा प्रसंशी
तदा प्रभु येऊनि या विशाळा। त्रिरात्री वस्ती निजभक्त वाल्हा ॥४१॥

भुजंगप्रयात—भडेग्रामवासी प्रभु वस्ते इसी। करी सिमगा खेळ भक्तविलासी
नखी वासरी राहणे तेथ जाले। तथा वस्ति पांचोर या सिद्धपाळे ॥४२॥

अवस्थान 'सेंदुर्नीये' चार दिनी
तया चांगपुरी वसे द्वादशादी
कवी दान देसी प्रभु सौख्यराशी
तयाचासनी स्थीता हाताळयासी ॥ ४३ ॥

छंद शालिनी—मार्गी व्याघ्रदर्शन निववीसी। दाया मेटील्या दयारूढ होसी
देमांबरेसी कुब्जिका भुवनाची। गोष्टी सांगे तो नवानंदरुची ॥४४॥

छंद चंपकमाळा—आठवणी दे तो जगत्राता। सावळदेवी होय नीयंता
वीस दीनी तो तारित जीवा। नासीत दुःखा देत विसावा ॥ ४५ ॥

छंद स्रग्धरा—वस्ती श्रीवालसंगे शुभ तपदनी भेटला रामदेवा
दांडीय रूढ कैसा मग गमन करी मासरुळा सुहावा
दामा असंख्य भैरी अभीनव नगरी थोर आनंद केला
चौकीत मास येकु वीहरन करीतु उद्धरीतु जीवाला ॥ ४६ ॥

भुजंगप्रयात—तदा स्वस्थ ग्रामी भुगोवर्धनासी। करी वस्त वाणेश्वरी चारुवेषी
वनी अवस्थान जाले आणवाया। नखी वासरी सुंदरें राज्य केलें ॥४७॥

छंद वज्रनामा—श्री पारनेरी प्रभु वस्ती केली। द्वैमास वासु सुकरंज खेडी
श्रीराम तीर्थी वीभु वस्तीकारी। दाभाडीय वस्ती करी भुवारी ॥४८॥

छंद वसंततिलका—मास द्वयी हीवरळी शुभ वासकारी
जाऊनि राजभुवना जड जीव तारी
क्रीडासनी वीचरतु मग काचराळी
भक्ता करी दीपवती सुखदान मेळी ॥ ४९ ॥

वज्रनामा—खानौपुरी भाटळीपुरी वीहारी। आभीर मल्लासनी पुतकारी
ढाकेफळी येउनि वस्तीकारी। मानीक दंडासनी विश्वतारी ॥५०॥

शार्दुलविक्रीडित—ऐसा येऊनी रामस नवदीनी राहे जगत्तारनी
पुजारोगण देवता सुभवनी पैलाडिकायासनी
मैराळागमनी सुवस्ती करुनी काटापुरीचासनी
येतु पाप वीनासनी सुखनिधी राहुनी बानी दीनी ॥ ५१ ॥

छंद शालिनी—मीरेगावी येउनी वस्तीकारी । वानीदिनी संगमा पुतकारी
गागापुरी येउनि तारी जीवा । क्षुद्रस्वेतु तो कपाटी विहारी ॥५२॥

शार्दुल—नांदुरी नख वासुरी विपरतु गेउरवावी स्तथा
वस्ती पिंपळग्राम तो वनमळा खांबेगव्हानी विभु
डोनी श्रीपुर उत्तरुनि जळदा घानेगव्हानी तदा
पुजारोगण सारुनि विचरतुं काट्यासनी डोबला ॥ ५३ ॥

छंद वज्रनामा—तो साचासनी पिंपळग्राम तारी । वाहूनी वीडा प्रभु धे विहारी
देउनी मेदी जन पुत केला । सत्याभिधानी मग वास त्याला ॥ ५४ ॥

भुजंगप्रयात—वल्हेगामवासी सदानंदरासी । नखी वासरी येत पांचाळयासी
प्रसंगी बरें तीर दत्तात्रयाचें । तदा पंच दी राहणें होय त्याचें ॥५५॥

छंद वज्रनामा—गोवर्धनी आंगलग्राम धामी । वस्ती क्रीडेतो परीपूर्ण कामी
श्री विझगावी शयनी विहारी । श्री निष्कलंका मग पुतकारी ॥५६॥

छंद शार्दुल—क्रीडौनि वडवाळीए अवधुता भिक्षा अनु आरोगिजे
घाटी आसन गोप भोजन तदा ते श्रीकरे दाविले
पव्हे आसन पैठणी त्रिपुरुषी राहे त्रिदिनी विभु
वस्ती पिंपळवाडीय विचरतु बावुळरण्यी विभु ॥ ५७ ॥

वस्ती ब्राह्मणगाव सेवतपुरी श्री देउळाला करी
येउनि मग वास मास करीतु जोगेश्वरी श्रीहरी
तेथौनि त्रय वासरी विचरतु संग्मेश्वरी श्रीपती
पूर्वार्धा रस रामभूमि १३६ गणिता ग्राम समस्ती इति ॥ ५८ ॥

इति पूर्वार्ध पूर्ण.

उत्तरार्ध

(शा. वि.)—श्रीभटें मग येउनि मुखधनी दीक्षा निकी घेतली
तेजौनि धन योषीता स्वतनुते चक्रेश्वरी अर्पिली
ऐसा तेथ विशेष ते खडकुली प्रेमादरें वंदिली
केला मास वीहार तीनि सदये पादांबुजी रंगिली ॥ ५९ ॥

छंद भुजंग—अथा नंतरे तो छीनपापीं । करी वास गुंफेसि पुण्यप्रतापी
अनंता लीळा ज्ञानचर्चा विशेषे । कीजे तेथ छीनस्थळी चारुवेषे ॥६०॥

छंद शार्दुल—भांडेमेदनी पींड सिकीता श्रीदेव डोनीवना
क्रीडे श्रीजलसेन रामगढही श्रीसींहनारायणा
ऐसा मास विहार चार करुनी डोंबाभिधे येउनी
राही जे खलु वेदीके नृपमठी जो वैद्य विश्वाजनी ॥ ६१ ॥

क्रीडे उंच मठा प्रसन्न सदनी येउनि रायांगणी
दृष्टिपुन करुनि मंगळ दिशा तेथे प्रभु विजनी
डोंबाईये मलार्जुनी सुआसनी छिन्नीखुरीचासनी
षण्मास स्थीत वेदीके नृपमठी ज्ञानामृताचा धनी ॥ ६२ ॥

देगावी विचरे सरालभुवनी राहुनी पंचैदिनी
क्रीडै घुमनदेव आसनी विभु श्री टाकळीए मळा
वस्ती घोगरग्राम चाचरमुर्दी तो आसनी उद्धरी
नेवासे प्रवरातिरी पुतकरी षण्मास संख्यावरी ॥ ६३ ॥

छंद वज्रनामा—वस्ती करी रांजणग्राम तारी। नखी दिनी श्री मीरीए विहारी
श्री खांडेगावी सुकनेर पुजा। साधींकृता स्वीकरी देवराजा ॥ ६४ ॥

वस्ती करी पींपळग्रामधामी। श्री चींचबंदी दिनसप्तस्वामी
घेउनिया श्री मढ पींपरीसी। तो वासकर्ता तिथी संज्ञीकेसि ॥६५॥

यानंतरे वंकीपुरी विहारी। बानेंदु संख्या पर चक्रधारी
तो पारग्रामी विभु वस्तकारी। तथापि वस्ती मीरडागीकारी ॥६६॥

शार्दूलविक्रीडित—वस्ती घोगरग्राम मांडवगणी राहे त्रिदिनी विभु
तेथुनि नखवासरी विचरतु आरण्यग्रामी प्रभु
भींगारी नखवासरी जीवपती नारण डोहासनी
वस्ती ते पती ये तथा नखदिनी श्री पारनेरी धनी ॥ ६७ ॥

(वज्रनामा)—लोणी क्रमें क्रीडत जांबग्रामी। नागापुरी येऊनि वस्ती स्वामी
वामोरिएसि विचर अव्हाणा। श्री देउळानी पर देवराणा ॥ ६८ ॥

काउळग्रामा गत जामग्रामी। श्री बांगडीए सुगव्हान धामी
डोंबाभीधी पक्षदिनी वीहारी। मासेक श्रीनेउरग्राम तारी ॥ ६९ ॥

वस्ती मढी श्री सुरग्रामकारी। टोकेंगव्हाणी नगदी वीहारी
श्रीपेहरासंगम वीषदासी। सप्तान्ही स्वामी गळनीबयासी ॥ ७० ॥

वस्ती करीता गळनीबयातु। कोळेश्वरी मासदिनी अनंतु
येउनीया श्रीसुरग्राम वस्ती। मेंडासनी पंचरु गौर मुर्ती ॥ ७१ ॥

वाडेग्राम घटेचासन करी वाउनी वीडा हरी
वस्ती ब्राह्मणी पैठणी शुभ तदा वस्तीत विघ्ने हरी
तेथे मास वीहार चार करुनी तत्तुल्य ढोरेश्वरी
क्रीडे श्रीहरी नामनाथ शुभदिनी तारी अनन्यापरी ॥ ७२ ॥

छंद माल(नी)—नखदिन सुखरासी काळीकेसी वीहारी
ध्वनि खळमठादि सप्तमात्रांगिकारी
जनसुख हयवृद्धा संगमापुतकारी
परमीत यममासी सन्निधी जीव तारी ॥ ७३ ॥

वज्रनामा—खैराडीय कावलपुर स्वामी । श्रीघोटनीचा पडग्राम धामी
जीवा वीसावा जळग्रामवासी । इत्यादि वस्ती विभु गुर्जरासी ॥७४॥

नागार्जुनी तो दिन वीस वासी । कदार क्रीडे जळमांडवीसी
आंवा नखीवासर वासकारी । भक्ती जनाचा तमदुःखहारी ॥७५॥

श्री पंचलिंगी वसती प्रभुसी । श्री सेंकुटा षोडश दीसवासी
श्री पारग्रामी पर सौख्यराशी । वस्ती करी तो खरवंडीयेसी ॥७६॥

श्री एळिएसि भोकरी वस्तीकारी । बेलापुरी मास त्रयी वीहारी
श्री उत्तरार्धा नगदेव ४७ येसी । ग्रामादि संख्या पर सौख्यरासी ॥७७॥

इति उत्तरार्ध

(शा. वि.)—पूर्वार्धी गुणशास्त्र भूमि १६३ गणिता अवस्थान श्रीअच्युत
अब्धी विश्व १२४१ दिनी वसे परगुणी श्री उत्तरार्धा वीभु
मास विबुळी ऐसा हायन चाष्ट १८ चांगी ६ दिनी सुंदरे
गोदातीरनिवास पै करुनिया पुता कृता हे धरे ॥ ७८ ॥

शाके वेद नवेंदु भुमि गणिता संवत्सरे चांगी रे
कृष्ण माघ चतुर्थी मंगळदिने ११९४ ग्रामेतु बेलापुरे
गंगातीर तेजुनीया जीवपती बीजें करी उत्तरे
माझे चांगत जाणुनी चपलता लंघीत देशांतरे ॥ ७९ ॥

छंद वज्रनामा—लीळावतारी परशक्त शारी । श्रीकर्मक्षौनी वीचरे भवारी
मातुळग्रामी द्वीजकुळवासी । श्रीकानवासी परसौख्यरासी ॥ ८० ॥

गर्भी स्वीकारी जडजीव तारी । श्रीरुध्पुरी क्रीडत ब्रह्मचारी
धुळाक्षेरी पाठक वेद वीद्या । संन्यास दीक्षा खिळ शक्त वंद्या ॥८१॥

श्री द्वारकेसी अनीयतवासी । लीळावसे क्रीडत सासरेसी
स्वामी अळर्कापुरीए विहारी । देउळवाडा स्थित खेड तारी ॥८२॥

श्रीबोरजैये स्थित डोंबकीसी । नानौरीय काजळीये वीशेशी
सोनारीय कुंभ जय त्राता । दामेरीय पीठ जयेसी यंता ॥ ८३ ॥

बेलुरवासी परवे नाथु । क्रीडे सीराळा सुखदान हेतु
श्रीपुसदा क्रीडत ब्राह्मणासी । त्रीरात्री स्वामी अनदुरवासी ॥८४ ॥

कटोसरा तो दीन तीन वासी । श्रीमातुली दावी तमा तुळासी
श्री नंदग्रामी दीन पंच राहे । जीवा वीसावा खलु बापु माये ॥ ८५॥

त्रिवासरी तो अंजनग्रामधारी । राहाटग्रामी जनग्राम तारी
श्रीयाळपुरी वीचरे अनंतु । सेंदुर्जनी पै तीवसा अनंतु ॥ ८६ ॥

छंद सग्धरा—भीस्णोरीये त्रीरात्री वसत जीवपती गोदरीय त्रीरात्री
वस्तीचा शेतवाडा गुण दीन गणीती वासुदेवा श्रीखेडी
काटेपुरी विहारी परमदुख हरी श्री तळेग्रामवासी
श्रीक्रीडे श्री ब्रह्मवाडा वीहरण करीतु कोळवीहीरीयेसी ॥ ८७ ॥

छंद शार्दुल—क्रीडे उंचमठी त्रीपुरुषी श्रीबारवे केशवी
सुधांग ६१ शोडश १६ स्वरी नाथी नवाऽष्टो जवी
बाणांगी ६५ खलु देउळी वीचरतुं पाषाणचास्वासनी
वापी कुप तडाग पुण्यसरीता श्री चीद्धवा स्पर्शनी ॥ ८८ ॥

छंद मालती—नखि शशि वरुषी श्री ऋद्धिपूरीं विहारी
मग विभु निजधामा वास इच्छांगिकारी
परमीत सुरग्रामी राहाणे श्री प्रभुसी
शशी विधु भुज २११ संख्या ग्राम चक्रेश्वरासी ॥ ८९ ॥

नीजपती वरदानें ग्रंथीली तीर्थमाळा
मीरवत शुभकाटी साधका पुण्यशीळा
श्रवण पठण योगे सेवीती नीत्यकाळी
परमसुख नव्हाळी वासुनाथा प्रियेळी ॥ ९० ॥

अशनीधेनेश नाम गोत्र उपाध्य त्याचे[1]
सुत अति मतीमंदें नामा येकाभीदेव
तव गुण महिमेचा येकुहि मार्ग नेने
कवीत सुमनमाळा वाईली बाळकानें ॥ ९१ ॥

अनुष्टुप्— स्तोकं स्तोकेवमात्रेण कथीता तीर्थमाळीका
डींभा ज्ञानाववोधेन क्षेम भृंदे परमेश्वर ॥

---

१. मुरलीधरशास्त्रीप्रत :—आसन धनुषनामे गोत्र औपाध्ये त्याचे ।
सुत अति मतीमंदे नाम येकाभीदेवे ॥

वटेश्वर—एक अध्ययन

—डॉ. वा. ना. मुंडी, ग्वाल्हेर.

श्री संत नामदेवांच्या विशेष अध्ययनाच्या निमित्तानें त्यांचे श्रीज्ञानेश्वरादींच्या समाधीचे अभंग वाचीत होतों. माझ्या प्रबंधांत प्रस्तुत समाधीसंबंधीं विचार मीं पूर्वी मांडले–प्रदर्शिले होते. तशांत "ज्ञानेश्वरांच्या समाधि" संबंधीचे श्री. गोडबोले ब शारदा मो. देशमुख यांचे लेख अनुक्रमें **वसन्त** (फेब्रु. १९६६) व **सत्यकथा** (ऑगस्ट १९६५) या नियतकलिकांत वाचनांत आले. त्यांवरून पुनः "समाधी"-चें प्रकरण पहात होतों. सोपानदेवांच्या समाधीच्या अभंगांत जागजागीं "सोपान वटेश्वर" "वटेश्वर सोपान" असा निर्देश आढळला. वटेश्वर व चांगदेव यांच्या-संबंधीं आलेल्या लेखनाच्या निमित्तानें बरेच इकडचे तिकडचे संदर्भ निर्देशित करण्यांत आलेले आहेत; परंतु "सोपान–समाधि" वर्णनांतील वटेश्वरासंबंधींचा संदर्भ मात्र कोणी निर्देशित केल्याचें माझ्या वाचण्यांत–ऐकण्यांत नाहीं. हें असें कां याचें योग्य निराकरण होत नाहीं. त्यांत सोपानवटेश्वराला वटेश्वरांनींच नमन केलेलें आहे; (नमो सोपाना वटेश्वरा—अभंग ८६१) व त्यावरून सोपान हेच वटेश्वर असा बोध होतो; तर इतरत्र सोपान व वटेश्वर यांचा वेगळेपणा स्पष्ट दिद्दर्शिलेला आहे :—

वटेश्वरें वृत्तांत सांगितला सकळ ।
पूर्वी आमचे स्थळ याची क्षेत्रीं ॥ ८४७ ॥
सोपानवटेश्वर करिती एकांत ॥ ८४७ ॥
सोपानवटेश्वर पातले समोर ॥ ८४८ ॥
म्हणे मुक्ताबाई जाती दोघेजण ॥ ८४८ ॥
जाती उभय समाधीसी ॥ ८४८ ॥
नामा म्हणे यांनी आरंभिले हित ॥ ८४८ ॥
सोपान वटेश्वर उभे ठेले पुढती ॥ ८४९ ॥
सोपान वटेश्वर सोवळे झाले सांग ॥ ८५५ ॥
वटेश्वर सोपान मध्यभागीं ॥ ८५७ ॥
सोपान वटेश्वर घेतले वोसंगळा ॥ ८५७ ॥
सोपान वटेश्वर पूजिती आवडीने ॥ ८५७ ॥

वटेश्वर सोपान सोवळे झाले ॥ ८५९ ॥
उभयतांनी नमन केले यथासांग ॥ ८६२ ॥
प्रतिवर्षी भेटी देऊं उभयतां ॥ ८६३ ॥
वटेश्वर सोपान त्यागियेला ॥ ८६४ ॥
सोपान वटेश्वरें केला नमस्कार ॥ ८६५ ॥
सोपान वटेश्वर बैसविले ॥ ८६४ ॥
सोपान वटेश्वर सुखधामी शेजा ॥ ८६६ ॥

अशा प्रकारें उभयतां, दोघे, गेले, जाती, करिती, उभे ठेले; बैसविले; पूजिती; उतरले; समाधीच्या सेजा इत्यादि अनेकवचनी प्रयोगही त्यांचा वेगळेपणाच सूचित करतात. अ. ८४४ मध्यें " वटेश्वर उतरले " असें मुद्रिलें असलें तरी तें बहुधा " वटेश्वरीं " उतरले असें असाव; कारण पुढें लगेच " दुरोनि हे स्थळ दिसे मनोहर " " देवा स्थळ आदी हे अनादी " असें स्थल-सूचन केलें आहे. या स्थळाची देवता या अर्थी वरील " वटेश्वर उतरले " हेंही बरोबर असूं शकतें. " या वटेश्वरीं सगुण सुलभे । समारंभ प्रतिवर्षी । महा **सिद्ध साधकाचे** स्थळ । तो हा वटेश्वर सानुकूळ । असा निर्देश (अ. ८३५-८३८) संवत्सर नगरीची पूर्वकथा सांगतांना केलेला आहे. संवत्सर-ग्राम-प्रशस्तीवरून; वटेश्वर या ग्राम-स्थळनामावरून व्यक्तिनामांत परिवर्तन लगेच पुढल्या अभंगांत " वटेश्वरें वृत्तांत सांगितला " अशा प्रकारें झालेलें आहे (अ. ८४७). यानंतर सोपानाबरोबर वटेश्वर यांनींही समाधि घेतली तिचें लौकिक वर्णन केलेलें आहे. जे विधि, जीं क्रिया-कर्में सोपानांनीं केलीं तीं वटेश्वरांनींही केलीं. त्यांच्या समाधीची तयारी होत असलेली पाहून उपस्थित सगळेच संत साधुजन दुःखित झाले, समाधिस्थलाजवळ ते आले, तेथें कुंकवाचे सडे पडल्याचा दाखला त्यांनीं पाहिला; लाल मृग छाला पाहून त्यांनीं त्यावर दर्भ, फुलें, बेल, दुर्वा इत्यादि साहित्य समर्पिले. साहित्य आणण्याचें काम वटेश्वर शिष्य " चांगा "नें केलें; (चांगदेव हाते आणिले साहित्य समाधीसी-अ. ८५४). खेचर हा सोपानाचा शिष्य (कांहीं त्याला ज्ञानेश्वरांचा मानतात), म्हणून त्यानें गंधाक्षता केल्या. खेचर आणि चांगा या दोघांकडून आपापल्या गुरूच्या समाधीच विशेष कार्य-साहित्य व गंधाक्षता-करविण्यांत नामदेवरायांनीं सत्याचें दिग्दर्शन करून औचित्यही साधलें आहे. स्नान, पूजा, गंधाक्षता, पारणें, भोजन, आचमन वस्त्रपरिधान, नंतर कीर्तन आदि कार्यक्रम विधिवत् एकापुढें एक चालू होते. निवृत्ति आणि पांडुरंग समाधि-स्थळाजवळ येऊन बसले व **सोपानानें** तसेंच **वटेश्वरानें** नमन केलें. सर्वांस अतिशय दुःख झालें. पण शोक आवरीत उभयतांना समाधि

दिली गेली. हें सर्व वर्णन ज्ञानेश्वरसमाधीच्या वर्णनाप्रमाणेंच बहारीचें आहे. नामदेवाचें हें वर्णनकौशल्य व सामर्थ्य मुळांतूनच वाचणें योग्य.

सोपान आणि वटेश्वरांच्या या समाधीनंतर लगेच "चांगा म्हणे माझी करा बोळवण"–तेव्हां "चांगदेवा प्रेमा समाधि देऊ" असें सांगून नामदेवानें "देवा **माघ मास** नेमा" असें नारायणास सुचविलें. हाही विधि यथाक्रम, यथाकाल माघांत झाल्याचें वर्णन "चांगदेवाची समाधि" यांत आलें आहे.

हें सगळें सांगण्याचें मुख्य कारण असें कीं वटेश्वर व चांगदेव यांचा परस्पर-संबंध ज्ञात आहे. "चांगा वटेश्वर" "चांगा वटेश" हीं नांवें व त्याचा "तत्त्वसार" हा ग्रंथही ज्ञात आहे, परंतु "तत्त्वसाराचे" संपादक डॉ. दिवेकर यांनीं निर्णयात्मक असें चांगा व वटेश्वर याचें दिग्दर्शन केलेलें नाहीं. प्रस्तावनेंतील त्यांची पुढील वाक्यें लक्षणीय आहेत :—

"चांगदेवाचा गुरू एक वटेश्वरच, मग तो वटेश्वर कोणी असो.

"वटेश्वर म्हणजे दुसरे कोणी नसून चांगदेवाच्या अंतर्यामी प्रकाशणारे ईश्वर स्वरूप (ही आपली कल्पना असे संपादक स्वतःच म्हणतात)...श्री मुक्ताबाईनी चांगदेवास विश्रांतिवटाखाली चांगदेवपासष्ठीचा अर्थ सांगितला व चांगदेवास ईश्वर स्वरूप करून दिले. या दंतकथेवरून वटाखालीं दाखविलेल्या स्वतःचे ईश्वर–स्वरूपाशीं एकजीव झालेला चांगदेव तर पुढे वट + ईश्वर = वटेश्वर या नांवानें ओळखिला जात नसेल ना? म्हणजे मूळचा चांगदेव वटाखालीं ईश्वर झाल्यामुळें चांगा वटेश्वर झाला असावा.

"वटेश्वराचे कोडें दुसऱ्या एकाद्या अधिक बळकट पुराव्याने सुटेपावेतो वटेश्वर म्हणजे चांगदेवाचे शुद्ध आत्मस्वरूप असेच मानिले पाहिजे. हे स्वरूप समजल्यावर **चांगदेव, चांगावटेश्वर** किंवा **वटेश्वर** या तिन्ही नांवाने एकच व्यक्ति ओळखिली जाण्यास हरकत नाहीं.

"वटेश्वर नांवाचा त्याचा योगमार्गी कोणी गुरू होता असें वाटत नाहीं. वटेश्वराचा योगमार्गाशीं कोठेंही संबंध चांगदेवानें सांगितलेला नाहीं. तसाच योग–सिद्धांचे मालिकेंत वटेश्वराचें नांव न येण्याचें कारण या आपत्तीमुळें (वटेश्वर चांगदेवाचें आत्मस्वरूप) स्पष्ट समजतें."

या वाक्यांतून दिसून येणारा परस्परविरोध व विसंगति लक्षणीय आहे ते एकीकडे वटेश्वर व चांगदेव हे एकच सांगतात तर दुसरीकडे त्यास त्याचा गुरु म्हणतात, व लिहितात ".....वटेश्वराचें रूप वटेश्वर होऊनच चांगदेव सांगत

आहे. त्रिगुण गोप्य गव्हर वटेश्वर—स्वामीच्या प्रसादानें चांगदेवाचा संसार नाहीसा झाला व वटेश्वरानेच आत्मब्रह्म दाऊन चांगदेवास चांगदेवाचें स्वरूप सांगितलें. गुरू शिष्य एक झाले...या प्रकारें अवधूत चांगदेवानें किंवा वटेश्वराच्या सुतानें वर्णन केलें आहे."

चांगा व वटेश्वर एकच म्हटले (पांडुरंग शर्मा–ज्ञाने. तत्त्व. पृ. ३६३) तर सगळा ग्रंथ गुरु–शिष्यसंवादात्मक कसा? गुरूनें "उगळु" दिला तो कोणाला? शिष्य गुरूच्या चरणि लागला व पुढे गुरूच्या मुख–विवरीं प्रवेशून एकरूप झाला तें काय? हा त्यांचा वेगळेपणा एकच कसा मानावयाचा? कीं चांगदेवानें स्वतःच्याच दोन मनांत प्रश्नोतरांच्या द्वारें संवाद करून ग्रंथ लिहिला? या सगळ्या बाबी विचारणीय आहेत. यांच्या निराकरणाच्या दृष्टीनें विचार करितांना तत्त्व-सारांतील वटेश्वरासंबंधींचे उल्लेख काय सूचित करतात तें पाहणें उपयुक्त होईल.

आतां वटेश्वरप्रसादें। मी निर्गुणभक्ति अनुवादें।
तरि आइकतु श्रोते विनोदें। चांगा म्हणे॥ तत्त्वसार–ओ. ६००॥

आतां वटेश्वरू होउनु निगुतें। सांघैन मि वटेश्वरातें।
मनाकरवि गिळवीन मागुतें। संसारासि॥ ६६५॥

त्रिगुण गौप्य गव्हरू। तो स्वामि माझा वटेश्वरू॥ ६७७॥
गुरू वटेश्वरि वाइली पूजा। चांगा म्हणे॥ १०२३॥

गुरूशिष्य येक जाले। ते जालेपणहि गेलें।
गेले पण राहिले। वटेश्वरीं॥ १०२५॥

वटेश्वराचा सुतु। चांगा म्हणे अवधुतु॥ १०२५॥
कथिलें वटेश्वरप्रसादें। योगरहस्य हे॥ १०३५॥

वाइली वटेश्वर चरणयुगुळ। चांगा म्हणे॥ १०३६॥
श्री वटेश्वरार्पणमस्तु—(समाप्ति)

याच जागीं, तत्त्वसारांत इतरत्र सुत, पुत्र, तात, अर्शी संबोधनें आहेत तीं पाहून ठेवणेंही उपयुक्त होईल :—

"तव गुरूमूर्ति म्हणे पुत्रा। येथे तुजचि आईता।
हे आणिकासी सर्वथा। सांधो नये॥ ८३६॥

आइक पुत्रा—॥ ६३७॥
शिष्यु म्हणे ताता॥ ८६५॥
तव शिष्यु म्हणे ताता॥ ९६४॥

येथें गुरू व शिष्य परस्परांचें पिता–पुत्राचें नातेंही दर्शवितात' पुत्र, वत्स, तात, सुत असें संबोधन शिष्यगुरू परस्पर अधिक जवळिक किंवा निकटता दाखविण्याकरितां करीत नाहींत असें नव्हे. अशीं उदाहरणें मराठी साहित्यांत इतरत्र अमूप सांपडतात. परंतु तेवढ्यानेंच त्यांच्या वास्तविक पितापुत्राच्या असलेल्या संबंधाला बाध येण्याचेंही कारण नसावें. वटेश्वर वस्तुतः अवधूतच (दिगंबर) होते (पहाः सोपान समाधि अ. ८५४). संसाराची किंवा त्यांचे वास्तविक अपत्य असण्याची शक्यता कमीच नव्हे; तर मुळांतच नाहीं. परंतु पुत्र म्हणजे प्रत्यक्षच असला पाहिजे असें नव्हे. दत्तक, मानलेला हे प्रकार आहेत, तसाच "वेदसंतान" हा प्रकारही होताच. "वेदसंतान" मानण्याच्या प्रथेचा प्रकार पुढें नाथपरंपरेंतील गुप्तनाथ शिष्य उद्बोधनाथ यांच्याबद्दल असल्याचें शिवदिननाथ यांच्या "ज्ञानप्रदीप" या ग्रंथावरून (ओ. ९७१) कळतेंच. उद्बोधनाथाचे "वेदसंतान" म्हणून "मल्हारी" यांचा उल्लेख आहे. शिवाय "वटेश्वराचा सुतु" असा स्पष्ट उल्लेख तत्त्वसाराप्रमाणेंच स्वतः चांगदेवांच्या अभंगांत तर जागजागीं सांपडतोच पण ज्ञानेश्वरांच्या "चांगदेव पासष्टी "तही आहे.

"वटेश्वरसूत चांगा अवधूत ॥—अभंग ७ चांग. अभंग पृ. १३० आवटे गाथा

"मुक्ताई म्हणे नांव पै ठेवीन । सुता बोलवीन वटेश्वरा ॥ ९ ॥

"वटेश्वरसुता बोले मुक्ताई ॥ १० ॥

"वटेश्वरसुताते बोले मुक्ताई ॥ १६ ॥

"वटेश्वरसुता म्हणे मुक्ताई अवधारी ॥ १९ ॥

"चांगदेवपासष्टींत" ज्ञानेश्वरांनीं "तया पुत्र तू वटेश्वराचा" (चां. पा. ३७) असाच उल्लेख केला आहे, व त्याला पत्र लिहितांना "स्वस्ति श्री वटेशु" असें संबोधून वटेश्वराशीं संबंध दर्शविला आहे. "वंदू प्राकृत कवीश्वर । निवृत्ति प्रमुख ज्ञानेश्वर । नामदेव चांगदेव वटेश्वर ॥ (एकनाथी भागवत) असा चांगदेवाहून भिन्न वटेश्वरांचा उल्लेख एकनाथांनीं केला आहे.

यावरून चांगदेवांना वटेश्वरांचे "वेदसंतान" मानायला प्रत्यवाय नसावा.

चांगदेव हे वटेश्वरांचे शिष्य. पण मुक्ताई त्यांची गुरु असें सर्वज्ञात आहे. मग ह्याची–या दोन गुरूंची संगति कशी लावावयाची ? डॉ. दिवेकर तर म्हणतात, "चांगदेवांनी दोन गुरु करण्यावर सणसणीत कोरडे ओढले आहेत. (ओ. ९३०–९५६) तेव्हां स्वतः चांगदेवांनीं दोन गुरु केले असतील असें म्हणवत नाहीं." हें म्हणणें खरें असलें तरी **विशिष्ट प्रसंगोपात्त** तसें करावयाला **प्रत्यवाय**

आहे. त्रिगुण गोप्य गव्हर वटेश्वर—स्वामीच्या प्रसादानें चांगदेवाचा संसार नाहीसा झाला व वटेश्वरानेच आत्मब्रह्म दाऊन चांगदेवास चांगदेवाचें स्वरूप सांगितलें. **गुरू शिष्य एक झाले**...या प्रकारें अवधूत चांगदेवानें किंवा वटेश्वराच्या सुतानें वर्णन केलें आहे."

चांगा व वटेश्वर एकच म्हटले (पांडुरंग शर्मा–ज्ञाने. तत्त्व. पृ. ३६३) तर सगळा ग्रंथ गुरु–शिष्यसंवादात्मक कसा ? गुरूनें "उगळु" दिला तो कोणाला ? शिष्य गुरूच्या चरणि लागला व पुढे गुरूच्या मुख–विवरीं प्रवेशून एकरूप झाला तें काय ? हा त्यांचा वेगळेपणा एकच कसा मानावयाचा ? कीं चांगदेवानें स्वतःच्याच दोन मनांत प्रश्नोतरांच्या द्वारें संवाद करून ग्रंथ लिहिला ? या सगळ्या बाबी विचारणीय आहेत. यांच्या निराकरणाच्या दृष्टीनें विचार करितांना तत्त्व-सारांतील वटेश्वरासंबंधींचे उल्लेख काय सूचित करतात तें पाहणें उपयुक्त होईल.

आतां वटेश्वरप्रसादें । मी निर्गुणभक्ति अनुवादें ।
तरि आइकतु श्रोते विनोदें । चांगा म्हणे ॥ तत्त्वसार–ओ. ६०० ॥

आतां वटेश्वरू होउनु निगुतें । सांघैन मि वटेश्वरातें ।
मनाकरवि गिळवीन मागुतें । संसारासि ॥ ६६५ ॥

त्रिगुण गौप्य गव्हरू । तो स्वामि माझा वटेश्वरू ॥ ६७७ ॥
गुरू वटेश्वरि वाइली पूजा । चांगा म्हणे ॥ १०२३ ॥

गुरूशिष्य येक जाले । ते जालेपणहि गेलें ।
गेले पण राहिले । वटेश्वरीं ॥ १०२५ ॥

वटेश्वराचा सुतु । चांगा म्हणे अवधुतु ॥ १०२५ ॥
कथिलें वटेश्वरप्रसादें । योगरहस्य हे ॥ १०३५॥

वाइली वटेश्वर चरणयुगुळ । चांगा म्हणे ॥ १०३६ ॥
श्री वटेश्वरार्पणमस्तु—(समाप्ति)

याच जागीं, तत्त्वसारांत इतरत्र सुत, पुत्र, तात, अर्शी संबोधनें आहेत तीं पाहून ठेवणेंही उपयुक्त होईल :—

"तव गुरूमूर्ति म्हणे पुत्रा । येथे तुजचि आईता ।
हे आणिकासी सर्वथा । सांधो नये ॥ ८३६ ॥

आइक पुत्रा—॥ ६३७ ॥

शिष्यु म्हणे ताता ॥ ८६५ ॥

तव शिष्यु म्हणे ताता ॥ ९६४ ॥

येथें गुरू व शिष्य परस्परांचें पिता–पुत्राचें नातेंही दर्शवितात' पुत्र, वत्स, तात, सुत असें संबोधन शिष्यगुरू परस्पर अधिक जवळिक किंवा निकटता दाखविण्याकरितां करीत नाहींत असें नव्हे. अशीं उदाहरणें मराठी साहित्यांत इतरत्र अमूप सांपडतात. परंतु तेवढ्यानेंच त्यांच्या वास्तविक पितापुत्राच्या असलेल्या संबंधाला बाध येण्याचेंही कारण नसावें. वटेश्वर वस्तुतः अवधूतच (दिगंबर) होते (पहाः सोपान समाधि अ. ८५४). संसाराची किंवा त्यांचे वास्तविक अपत्य असण्याची शक्यता कमीच नव्हे; तर मुळांतच नाहीं. परंतु पुत्र म्हणजे प्रत्यक्षच असला पाहिजे असें नव्हे. दत्तक, मानलेला हे प्रकार आहेत, तसाच "वेदसंतान" हा प्रकारही होताच. "वेदसंतान" मानण्याच्या प्रथेचा प्रकार पुढें नाथपरंपरेंतील गुप्तनाथ शिष्य उद्बोधनाथ यांच्याबद्दल असल्याचें शिवदिननाथ यांच्या "ज्ञानप्रदीप" या ग्रंथावरून (ओ. ९७१) कळतेंच. उद्बोधनाथाचे "वेदसंतान" म्हणून "मल्हारी" यांचा उल्लेख आहे. शिवाय "वटेश्वराचा सुतु" असा स्पष्ट उल्लेख तत्त्वसाराप्रमाणेंच स्वतः चांगदेवांच्या अभंगांत तर जागजागीं सांपडतोच पण ज्ञानेश्वरांच्या "चांगदेव पासष्टी "तही आहे.

"वटेश्वरसुत चांगा अवधूत ॥—अभंग ७ चांग. अभंग पृ. १३०
आवटे गाथा

"मुक्ताई म्हणे नांव पै ठेवीन । सुता बोलवीन वटेश्वरा ॥ ९ ॥

"वटेश्वरसुता बोले मुक्ताई ॥ १० ॥

"वटेश्वरसुताते बोले मुक्ताई ॥ १६ ॥

"वटेश्वरसुता म्हणे मुक्ताई अवधारी ॥ १९ ॥

"चांगदेवपासष्टींत" ज्ञानेश्वरांनीं "तया पुत्र तू वटेश्वराचा" (चां. पा. ३७) असाच उल्लेख केला आहे, व त्याला पत्र लिहितांना "स्वस्ति श्री वटेशु" असें संबोधून वटेश्वराशीं संबंध दर्शविला आहे. "वंदू प्राकृत कवीश्वर । निवृत्ति प्रमुख ज्ञानेश्वर । नामदेव चांगदेव वटेश्वर ॥ (एकनाथी भागवत) असा चांगदेवाहून भिन्न वटेश्वरांचा उल्लेख एकनाथांनीं केला आहे.

यावरून चांगदेवांना वटेश्वरांचे "वेदसंतान" मानायला प्रत्यवाय नसावा.

चांगदेव हे वटेश्वरांचे शिष्य. पण मुक्ताई त्यांची गुरु असें सर्वज्ञात आहे. मग ह्याची–या दोन गुरूंची संगति कशी लावावयाची ? डॉ. दिवेकर तर म्हणतात, "चांगदेवांनी दोन गुरु करण्यावर सणसणीत कोरडे ओढले आहेत. (ओ. ९३०–९५६) तेव्हां स्वतः चांगदेवांनीं दोन गुरु केले असतील असें म्हणवत नाहीं." हें म्हणणें खरें असलें तरी **विशिष्ट प्रसंगोपात्त** तसें करावयाला **प्रत्यवाय**

नसावा असेंही त्यानींच लगेच म्हटलेलें आहे हें विसरून कसें चालेल? (ओ. ९४० व पुढें). अगोदरच गुरू नीट पारखून करावा.

"आधी घडफुडें विचारिजें। मग गुरू कीजे।
जेवि कुळकन्या वरिजे। जाणौनिया॥ ९४२॥

मग केलेया वरि ऐसी। हे चिखिमिखी काइसी।
परि आणि कु परियेसि। उपाओ असे॥ ९४३॥

तरि जयाचा अनुग्रहो आधि। तयातें पुसावें त्रिशुद्धि।
तै आणिकी ठाई बुद्धि। करू लाहे॥ ९४४॥

कां आधिला गुरूचेनि अभावें। आणिका गुरूतें भजावे।
तैं दोषाते न पवे। साधकु तो॥ ९४५॥

गुरू देवंगत होती। कां दिपांतरी जाती।
तेयावाचुनु आणिके ठाइ संगती। करूंचि नये॥ ९४६॥

जो योगु पहिलेये ठाइं सांघती। तोचि संवादु आणिकी देखती।
तरि आधील गुरू मानिजती। त्रिशुद्धि गा॥ ९४७॥

यांतील ओ. ९४५ व ९४७ लक्षणीय ठरतात. पहिल्या गुरूनें जें सांगितलें, तेंच पण अधिक उत्तम प्रकारानें इतरत्र मिळत असलें तर ते घेणें दोषार्ह न मानतां त्रिशुद्धच मानावयास हवें. त्यांत दोष नाहीं. याच आधारावर वटेश्वर व मुक्ताई हे दोघेही चांगाचे गुरू म्हटले तर ते दोषास्पद ठरण्याचें कारण राहात नाहीं. मुक्ताईची परंपरा पाहतां ती मुक्ताई–वटेश्वर–चक्रपाणी–विमलानंद अशी शिव-कल्याण देतात. तत्त्वसाराच्या प्रस्तावनेंत नित्यानंदैकदीपिकेंत शिवकल्याणांनीं दिलेली ही परंपरा मुक्ताई–चांगा वटेश्वर–चक्रपाणि अशी, मुळांत "चांगा" हा वटेश्वराबरोबर नसलेला शब्द जोडून दिलेली आहे. (तो तैसाचि रस वोसंडला। तव मुक्ताबाई प्रकाशला। प्राशुनि तैसाचि उरला। श्रीवटेश्वरा दिधला तो॥ वटेश्वराहुनी चक्रपाणी। लाधले हे अमृतसंजीवनी। विमलानंदी तेथुनी। लाधते झाले॥" परंतु त्यावरील टिपणांत (पृ. ३०–टिपणें) मात्र "गोरक्षनाथा पासूनचा दुसरा प्रवाह मुक्ताबाई, वटेश्वर, **चांगदेव** या मार्गाने आला" असें म्हटलें आहे. या परस्परविरोधाचा काय अर्थ? अर्थ हाच कीं त्यांनाही वस्तुतः वटेश्वराचा शिष्य चांगदेवच, असें अभिप्रेत असून तेंच म्हणावयाचें आहे हें स्पष्ट दिसतें. नाहीं तरी चक्रपाणि व चांगा हीं नांवें एकार्चींच हें स्पष्ट होतें. चांगा, चक्रपाणि ही एकार्चींच नांवें असें मानलें तर कांहीच अडचण राहात नाहीं. असें केवळ "मनःपूतं समाचरेत्" म्हणून नव्हे. असे समानार्थक

उल्लेख–निर्देश चांगदेवपासष्टींतही आहेतच. चक्रपाणि (चां. पा. ४०; ६२); चांगदेव (६१); चांगया (३७; ४५; ६०). तत्त्वसारांतील ओ ८६९ तील मुक्ता-देवी प्रसादानें ज्ञानसिद्ध झालेल्या चक्रपाणीचा निर्देश लक्षांत असावा. सोपानाच्या समाधीच्या अभंगांतही "चक्रपाणी" असेंच म्हटलें आहे (तुळपुळे–म. सार. पृ. ९११) यावरून चांगा, चांगया, चांगदेव, चक्रपाणी ही एकाच व्यक्तींचीं नांवें असल्याचें मानतात. (ढेरे गुरूगोरक्षनाथ–पृ.–१६१) निळोबा पिंपळनेरकर चांगदेवांचीं अनेक नांवें असल्याचें व त्यांत चक्रपाणि हें असल्याचें म्हणतात असें श्री. तुळपुळे (पृ. ९११) सांगतात. स्वतः चांगदेवानें समाधीपूर्वी नमन केलें, त्यांत पहिलें नमन आपलें उपास्य "ॐ नमो अनादि चक्रपाणी" असेंच, केलें आहे.

याशिवाय चांगदेवांच्या अभंगांत मुक्ताई व वटेश्वर हे स्वतंत्रपणें गुरू म्हणून निर्देशिले आहेत व तेहि एकच अभंगांत एकाच जागीं :—

"मुक्ताई म्हणे चांगया चेई । स्वयंभू चेइला वटेश्वरीं ॥ १५ ॥
बोलणे अबोलणे वटेश्वरी गूज । मुक्ताई म्हणे चांगया बूझ ॥ २१ ॥
मुक्ताई म्हणे धोंगडे सांडा । वटेश्वरीं ठाण मांडी आतां ॥ २३ ॥
चांगया सोय धरी ज्ञानवटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारी बोध करी ॥ २५ ॥
मुक्ताई सांगडी वटेश्वर तारू । चांगा पैल पारू उत्तरला ॥ ३९ ॥
चांगा म्हणे मुक्ताईची आण । सांगीतली खूण वटेश्वरी ॥ ६३ ॥

चांगदेवांच्या आरतींतील पुढील ओळीही लक्षणीय आहेत :—

"वटेश्वरू देवो तारकु माझा...
तेथ मुक्ताई तारू : चांगया पोहोतारू :
गेळा पैळ थडीये केळा पै उतारू : वटेश्वरी गर्जता :
नाही आपपरूः सोपा आळंगीः वीसोबा षेचरू
चांगा म्हणे अवधा जाळा वटेश्वरू

(भा. इ. सं. मंडळ, षाण्मासिक वृत्त, शके १८३४ आश्विन–फाल्गुन–पृ. २६०.)

"वीनवी चांगाः वटेश्वरा ळीळींगा ॥" (पृ. २५०)

"चांगा म्हणे ते नामः आपण ध्यान करणे : आपण वटेश्वरीः भेदु नाहीः (पृ. २४९)

चांगदेव मुक्ताईः वटेश्वरूः अवघयां आवघाः साक्षात्कारूः

(परिसा भागवताची आरती–भा. इ. सं. मं. पा. वृ., श. १८३४ पृ. २६०–६१)

चांगा वटेश्वर मुक्ता निवृत्तिश्वर । सांवता कुंभार ऐहिक ते ।
एके ठायीं मिळाले परब्रह्म । वटेश्वर सोपान मध्यभागी
(सो. स. अभंग ८५७)

एकाच वेळीं दोघांच्या गुरुत्वाचे किंवा कृपेचे–अनुग्रहाचे हे उल्लेख काय सूचित करतात ?

वस्तुतः वटेश्वर हे देखील परंपरेनुसार मुक्ताईचेच अनुग्रहीत होते.

वटेश्वरा लागुनि ज्ञानदाती । मुक्तेश्वरी ते स्मर एकचित्तीं ॥

(संतमालाश्लोक–श्रीधर–श्रीधरचरित्र–जोशी पृ. १८०) त्यांनीं जें ग्रहण केलें तें, प्रसंगानें मुक्ताईशीं संबंध आल्यानें (ज्ञान–चांग–भेट) तिचें शिष्यत्व पत्करून किंवा तिच्यापासून अधिक मिळविलें, हें प्रथम गुरूपदेशानुसारच (ओ. ९४७ तत्त्व.) ठरत नाहीं काय ? किंबहुना वटेश्वराचें शिष्यत्व अमान्य करून नव्हे तर, विचित्र पराजितावस्थेंत अकल्पनीयपणेंच, मुक्ताईचें गुरूपद मान्य करणें–स्वीकारणे भागच झालें. ज्ञानेश्वरांनीं तसाच तिनेंही चांगदेवाचा गर्व क्षणांत जिरविला होता "कोऱ्या" चांगदेवाला "पासष्टीचा" अर्थ समजून सांगितला तसाच त्याच्यांतील चौदाशें वर्षांच्या योगसामर्थ्यानंतरही "देहभाव" नाहींसा झाला नव्हता, तोहि घालविला होता. अशा वेळीं तिला शरण जाऊन गुरू म्हणून स्वीकार करणें, न करणें ही विचार करण्याची स्थितीच राहिलेली नव्हती. झालें तें अकस्मात् व तात्काळ, तडकाफडकीच झालें. विद्युल्लतेचा तडाका नाहीं तरी क्षणांतच आत्मसात करीत असतो. अर्थात् तेथेंच चांगदेवाला वटेश्वर व मुक्ताई या गुरूशिष्यांच्या योग्यतेंतील अंतर प्रत्ययास आलें असणार, तेव्हां गुरूच्या गुरूलाच गुरू मानून, स्वीकारून ज्ञान मिळविलें तर कोणता प्रत्यवाय ? यामुळेंच चांगानें वटेश्वराला जसें स्वतंत्रपणें गुरू म्हटलें व नमन केलें आहे, तितक्याच आदरानें मुक्ताबाईलाही गुरू म्हणून सादर नमन केलें आहे :...

"नमो सोपान, संजीवनी । मुक्ताबाई ॥ (चांगदेवाचे समाधी पूर्वीचे नमन—आवटे गाथा)

"नमो सद्गुरू मुक्ताबाई ।—(उपर्युक्त)

"नमो मुक्ताईच्या उपदेशा ।—(")

हा गुरू–शिष्य संबंध तर असोच, मुक्ताबाईच्या व चांगदेवाच्या अभंगांत त्यांचे माता–पुत्रवत् जिव्हाळ्याचे संबंधही व्यक्तविलेले जागजागीं दिसतात.

" चांगा बाळ वटेश्वरी खेळत । मुक्ताबाई कवळ असे देत ।
(अभंग ८–पृ. ३१३, ज्ञानेश्वरांची प्रभावळ–श्री. पांगारकर)

सारांश, दोन गुरु केले हें असंभवनीय तसेंच चांगदेवाच्या बाबतींत निंदनीय अथवा दोषार्ह ठरत नाहीं हें स्पष्ट होतें, आणि म्हणूनच तत्त्वसारांतही मुक्तादेवी व मुक्ताई या एकाच मानल्या तर त्यांनाही वटेश्वराप्रमाणेंच नमन केलें आहे. (ओ. ८६९) परंपरेनुसार ही चक्रपाणि–चांगदेव हा वटेश्वराचा शिष्य व मुक्ताबाईचा प्रशिष्यच ठरतो.

" वटेश्वराचा योगमार्गाशीं संबंध चांगदेवांनी दर्शविलेला नाही." हा आक्षेपही असाच आहे. वटेश्वराचा " योगेश्वर " म्हणून उल्लेख नामदेवांनीं सोपान समाधी प्रकरणांत केला आहे. शिवाय योगेश्वर–चांगदेवाचे तर ते प्रत्यक्ष गुरूच- हें अमान्य करून कसें चालणार ? फरक एवढाच कीं योगिनी मुक्ताई त्यांच्याहून वरचढ, सरस. नामदेव म्हणतात :—

कळवळिले संत वैष्णवांचे भार । आणिक योगेश्वर स्फुंदताती ॥ ८६२ ॥

जयजयकारध्वनि होताती अपार । जाती योगेश्वर समाधीसी ॥८६३॥

समाधि पताकांची पडली सावली । उतरले खाली योगीराज॥८६४॥

याशिवाय वटेश्वरानें नमन करतांना " नमो **योगी** दिगंतरा । " असेंच म्हटलें आहे. ते कोणाला उद्देशून ? ते स्वतः दिगंबरच होते. " योगी दिगंबर समागमे " असें सोपान वटेश्वराचें वर्णन आहे. सोपानासाठीं समाधीचीं वस्त्रें आणलीं पण वटेश्वरासाठीं आणलेलीं नाहींत. पुढें चांगदेवानें समाधि घेतांना अवधूत दिगंबराला शोभेल अशा केवळ कौपीन धारण केल्याचें म्हटलें आहे, तशीच पीतांबर कौपीन त्यांनीही धारण केली. हें सर्व वटेश्वराचा योगमार्गाशीं संबंध दर्शवावयाला पुरेसें नाहीं का ? चांगदेवाच्या अभंगांतही त्यांना योगाशीं संबद्ध केलेलें दिसतें.

" **शिवगोत्री चांगा म्हणे अवाच्य नित्य ।**
तें वटेश्वरीं सत्य सांगितले ॥ ५० ॥

असा आपला आदिनाथ शिवप्रणीत योगाशीं संबंध दर्शवून तें ज्ञान व सत्य वटेश्वरानेंच दिल्याचें, सांगितल्याचें सुचविलें आहे. " कथिले **वटेश्वर प्रसादे** । **योगरहस्य** हे " (तत्त्व. १०३५) असें स्वतः चांगदेवच म्हणतात. या बरोबरच चांगदेवाचे अनेक अभंग योगमार्गीय विवेचनपर आहेत व ते ज्ञानगुरूच्या (वटेश्वराच्या) कृपेनें मिळाल्याचें म्हटलें आहे.

अशा प्रकारें प्रमुख अडचणीचें निराकरण करतां येतें. पुढील एक दोन बाबी लक्षणीय आहेत त्यांचा विचार करूं.

(१) चांगदेव यांनीं ज्ञानेश्वर-सोपान यांच्या तात्काळ नंतर म्हणजे शके १२१८ मध्यें माघमासांत समाधि घेतली, असे उल्लेख अनेक संतमंडळीनीं केले. परंतु याच लेखकांचे जर "तत्त्वसार" म्हणावयाचें तर तें पोथींतील दिलेल्या चालीप्रमाणें लिहिलें गेलें "शके चौतिसे बारा" मध्यें. मग या दोहोंची संगति, मेळ कसा बसावयाचा ? शिवाय श्री. पांगारकर, श्री. चित्राव, श्री. ढेरे त्यांची समाधि श. १२४७ तील मानतात, तर श्री. आजगांवकर व श्री. रा. द. रानडे (व त्यामुळेंच श्री. तुळपुळे हेही) ती शके १२२७ तील मानतात. श्री. ढेरे म्हणतात, "समाधीच्या अभंगांत दिले ते बरोबर नाही." (गुरु गोरक्षनाथ) पण असें वाटण्याचें सयुक्तिक कारण मात्र त्यांनीं दिलें नाहीं. तत्त्वसारांतील शक जमावा म्हणून ? मग सगळेच समाधीचे अभंग अविश्वसनीय कां मानूं नये ? उलट सार्थ ज्ञानेश्वरीकार श्री. शं. वा. दांडेकर तर नामदेवाच्या आदि, तीर्थावळी, समाधीआदींचाच ज्ञानेश्वरचरित्राकरितां उपयोग करितात. निरंजनमाधवानेंही नामदेवाच्याच सामग्रीचा विश्वसनीय म्हणून उपयोग करून आपला "ज्ञानेश्वरविजय" ग्रंथ सजविला आहे (निरंजन माधवाची कविता-श्री. पांगारकर आ. २-३). सोपानाच्या समाधीच्या-वेळीं "नामा स्वपुत्रासह सन्निध नित्य काळीं । राहे समीप हरिच्या । ", तेव्हां त्यानें प्रत्यक्ष पाहिलें, अनुभविलें त्याच आधारावर मीही रचित आहे. "श्री नामदेवकृत मुख्य प्रबंध होता । तैसाचि म्या विरचिला सुखबोध दाता । मी बोललो पदरिची तरि एक वाणी । नाहीच, साक्ष हरि विठ्ठल चक्रपाणी ॥." तात्पर्य, नामदेवांच्या या कृती प्रत्यक्षदर्शी अतएव विश्वासार्हच ठरतात. श्री. पांगारकर, श्री. चित्राव काय किंवा श्री. रा. द. रानडे, आजगांवकर, तुळपुळे देखील काय, त्यांनीं शके १२४७ किंवा १२२७ मानावें यासाठीं कारणमीमांसा दिलेली नाहीं. प्रमाणावाचून त्यांना तरी स्वीकार्य कसें मानावयाचें ? उलट "ज्ञानेश्वरांची प्रभावळ" यांत "कालानुक्रम" (समाधींचा) श्री. पांगारकर पुढीलप्रमाणें देतात :—

श. १२१९—वैशाख वद्य १२; एदलाबादेहून ३ कोसांवर व चांगदेव गांवापासून २ मैलावर महद्ग्राम ऊर्फ मेहूण येथें मुक्ताबाईची समाधि.

श. १२२०—तापीतीरीं **चांगदेव** येथें चांगदेवाची समाधि.

म्हणजे नामदेवांनीं म्हटला तो शक १२१८, माघ महिना; पुणतांबें गांव व तेथील स्तंभ; मुक्ताबाईची त्या प्रसंगीची उपस्थिति; त्यानंतर तिनें घेतलेली

समाधि इत्यादि गोष्टी तर दूरच राहिल्या पण शकही मागेंपुढें झाला. मुक्ताईनें चांगाच्या आधीं समाधि घेतली! अशा स्थितींत त्यांच्या स्वतःच दिलेल्या शके. १२४७ चा तरी आधार सबळ असा काय मानावा?

श्री रानडे मराठी संतवाङ्मयांतील परमार्थमार्ग या ग्रंथांत (पृ.८२) "श्री. ज्ञानेश्वरांच्या मरणानंतर आज माझे दहा वर्षांनीं चांगदेव गोदातटाकीं शके १२२७ (इ.स.१३०५) सालीं **वारले**" असें लिहितात. वारले, मरणानंतर इ शब्द लक्षांत घेण्यासारखे आहेत. "श्री ज्ञानेश्वरादि भावंडांबरोबर कांही दिवस घालविल्यावर यानें गोदावरीच्या तीरीं (पुणतांबें) येथे शके १२२७ मधें क्रोधन संवत्सरीं जेष्ठ शु. ७ स समाधि घेतली" असे श्री. आजगांवकर श्री. वि. ल. भावे यांच्या महा. सा० वरून म्हणतात (प्राचीन मराठी संतकवि० पृ. १८०). याला तरी सबळ प्रमाण काय? तेव्हां तत्त्वसाराचा लेखनकाल (श. १२३४) व चांगदेवांचा समाधि-काल (श. १२४७ वा १२२७) यांचे ऐतिहासिक आधारावर सुसंगत, सयुक्तिक व सप्रमाण निराकरण व्हावयास हवें. सध्यां तरी तशी सामग्री उपलब्ध आहे असें दिसत नाहीं. हें जितकें खरें तितकेंच ही कालनिश्चिती होणें-ठरणें अनेक समस्यांच्या निराकरणाच्या दृष्टीनें इष्ट व आवश्यक आहे. तर्काधिष्ठित आधारावर हा कालनिश्चितीचा प्रयत्न असाः हस्तलिखितांत होणाऱ्या अनेकं चुका प्रत्यहीं प्रत्ययास येतात. लेखनवाटिकेंत किंचिन्मात्र बदल झाला किंवा वाचतांना थोडीही चूक झाली की अर्थाचा अनर्थ होतो. नामदेवाच्या जन्मतिथीचा संवत्सर विभव कीं विप्लव? यावरच रणें माजूं शकतात. सारांश, सोयीस्कर म्हणून म्हणावी किंवा सुसंगत म्हणावी, असें वाटतें कीं नकलकार वोप पाठकानें पोथी लिहित असतां चूक वाचलें, चूक लिहिलें. किंवा मुळांतच चूक असल्यानें असो, दुर्लक्ष्य म्हणून असो किंवा इतर कांही कारणानें असो, पण "चौतिसे बारा" यातील "ती" चा "दा" शी घोटाळा केला असणें असंभवनीय नाही. लेखनाचें वळण दोहोचें (ती व दा) फारसें वेगळें नाहीं. मूळ पोथी मोडींत असली तरी तोच प्रकार. यामुळें मात्र घोटाळा पुष्कळच नाहींसा होतो व सर्व प्रकरण सुसंगत जमतें. ज्ञान-चांगदेव भेट श. १२१८ पूर्वी कधीं तरी झाली, कारण श. १२०८ मधें भिंत चालविली असे उद्धोधनाथ यांच्या ज्ञानेश्वरचरित्रांतील "चालवी भिंतीला वसुमाजी" या (वसु = आठ) उल्लेखावरून कळतें (भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३४ चैत्र भाद्र. पृ. २५). त्यापूर्वीच केव्हां तरी ग्रंथ लिहिला गेला असणें सुसंगत व योग्य ठरतें, कारण ज्यांचा प्रभाव चांगदेवावर पडून तो त्यांचा शिष्य झाला त्या निवृत्ति-ज्ञानेश्वर-मुक्ताई यांपैकी कोणाचा उल्लेख नाहीं. उपलब्ध भागावरून वस्तुतः त्यांचा उल्लेख असणें अपरिहार्य ठरतें. म्हणूनच "चौतीसे बारा" याच्या जागीं "**चौदासें बारा**" (चौदा-सें-बारा असे चौदा-शंभर बारा असा.) हा पाठच

मूळचा असावा असें वाटतें. एकदां हा मान्य झाला कीं ज्ञान–चांगभेट; तत्पूर्वीचें वटेश्वराचें गुरूत्व; मुक्ताईचें गुरूत्व, चांगदेवाची समाधि वगैरे सगळ्या बाबी जमतात. अर्थात् त्या जमतात म्हणूनच केवळ शके १२१४ लेखनकाल मानण्याचें कारण नाहीं. एक तर्क विचारार्थ समोर ठेविला आहे.

(२) तत्त्वसाराचा लेखनकाल व चांगदेवाची समाधि–तिथि या प्रश्नाचा ऊहापोह वर झाला. दुसरी समस्या स्वतः वटेश्वरासंबंधींची.

वटेश्वर ही स्वतंत्र व्यक्ति तर होतीच, ती योगमार्गी, चांगदेवाची गुरू व मान्य असेल तर चांगदेव तिचे "वेदसंतान" वटेश्वर हे त्यांचे अगोदरचे गुरू व मुक्ताबाई ही त्यांची नंतरची गुरू. ही गोष्ट श्री. पांगारकरहि आपल्या चांगदेवावरील लेखांत (म. वा. इति–एक. तुका–काल) मानतात. "चांगदेव प्रथम हठयोगी पण त्यानें आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं म्हणून परमार्थमार्गाकडे तो वळला" हें श्री रा. द. रानडे यांचें वाक्यही हेंच सूचित करतें. (म. सं. प. मार्ग पृ. ८१) मात्र तेच पुढें इतरत्र म्हणतात तसें वटेश्वरांना चांगाचें उपास्य दैवत मानण्याचें कारण राहत नाहीं. "वटेश्वर नांवाचा कोणी संत आढळत नाहीं." ही त्यांची शंकाही निराधार ठरते. मुक्ताईचा उपदेश मिळूनहि तो स्वतःचा "चांगा वटेश्वर" च उल्लेख करतो, त्याअर्थी वटेश्वर हें त्यांचें दैवतच असणार, तो त्याचा गुरू नव्हे" असा निष्कर्ष श्री. रानडे व त्यानुसार श्री. तुळपुळे यांनीं काढला. पण हीं विधानें आतां अपूर्ण व अपुष्ट ठरतात. दोन गुरूंच्या संबंधीं चर्चा इतरत्र केली आहेच. सारांश, तत्त्वसाराचे संपादक म्हणतात तसे चांगदेव, चांगा वटेश्वर व वटेश्वर या तिन्ही नांवानें एकच व्यक्ति ओळखणें योग्य ठरणार नाहीं.

हें खरें, पण सोपानाबरोबर समाधि घेतलेली ही व्यक्ति नेमकी कोण? मुक्ताईच्या परंपरेंत वटेश्वर शिष्य म्हणून आहेतच. पण ते शिष्य तरी नेमके कोण? त्यांच्याबद्दलची अधिक माहिती हवी. सोपानसमाधींत ही व्यक्ति संवत्सर-ग्रामीं येते. संवत्सर व सासवड ही गांवें जवळजवळचींच म्हणजे एकच. सासवडला सोपानांनीं समाधी घेतली. सासवड हा शब्द सहस्रवट या शब्दांतून उत्पन्न होतो. तेव्हां सहस्रशाखांचा हा वट म्हणजे वटेश्वर हें आमचें आदि व अनादि स्थळ असें म्हणणारी व्यक्ति स्वतःला वटेश्वरच म्हणविते हें सुसंगतच. पण तिचें मूळचे नांव काय? व तिनें सोपानाबरोबर समाधि कां घ्यावी? पुढें गुरू मुक्ताई किंवा शिष्य चांगा यांच्याबरोबरही घेतां आली असती, नव्हे तें उचितही ठरलें असतें. सारांश, वटेश्वर हे नांव कळलें, व्यक्ति कळली; पण तिच्याबद्दलची अधिक विश्वसनीय, साधार, विस्तृत माहिती मात्र अद्याप उपलब्ध नाहीं.

(३) सिद्धपंथांत वटेश्वराचा नामनिर्देश नाहीं ही तिसरी अडचण. एकतर ही यादी आगें मागें पूर्ण उपलब्ध नाहीं. प्रारंभीं नमनाचा तसाच शेवटीं सिद्धपुरुषांच्या यादीचा भाग अजून अनुपलब्ध. तेव्हां या अपूर्ण यादीवरून निर्धारक निर्णय घेणें योग्य नव्हे. कारण कदाचित् तसा उल्लेख असेलही वा नसेलही. असंभवनीय नाहीं. मात्र सिद्धपंथाशीं वटेश्वर व चांगा यांचा संबंध वरवरचा नसावा. सोपान-समाधि-वर्णनप्रसंगीं संवत्सरग्रामाचें वर्णन करीत असतां—

" या वटेश्वरी सगुण सुलभे । समारंभ प्रतिवर्षी ।
महा सिद्धसाधकांचे स्थळ । तो हा वटेश्वर सानुकूळ ।

असें म्हटलें आहे. वटेश्वर यांचे आदि, अनादि, पूर्वस्थळ असे हे वटेश्वर ऊर्फ सहस्रवट=सासवड ग्राम, सिद्ध **आणि साधकांचे स्थळ** होतें, हें लक्षणीय आहे. वटेश्वर तेथीलच व चांगदेव ज्ञानेशांना भेटावयास आले ते सासवड म्हणजे सिद्धग्रामहूनच असा समज आहे. तत्त्वसारांत सिद्धांची नांवनिशी मुद्दाम देण्याचें कारण झालें तरी या गुरूशिष्यांचा "सिद्ध" व "सिद्धमार्गाशीं" असलेला संबंधच होय. ह्या सिद्धपंथाशींच ज्ञानेश्वर परिचयपूर्व त्यांचा संबंध होता.

" माझे नमन असावें त्या सिद्ध नित्य चांगदेवाते "

(सन्मणिमाला-मोरोपंत) हेंच सूचित करते. शिवाय वाघावर बसून हातांत सर्प घेऊन येणें ही योगसिद्धीचीच स्थिती नव्हे काय ? खानदेशांतील तापी-पयोष्णी संगमावरील शिवमंदिरांत त्यानें योगसाधना करून योगसिद्धि प्राप्त केल्याची माहिती सर्वज्ञात आहेच. केवळ शिष्यानें कांहींतरी प्रश्न केला व गुरूनें उत्तर दिलें एवढेंच या प्रश्नोत्तराचें स्वरूप मानणें उचित होणार नाहीं. प्रश्न सोद्देश व सहेतुकच आहे. आपल्या पूर्वपरंपरेचा निर्देश करण्याची, परंपराक्रम सांगण्याची त्या वेळीं परंपराच होती. स्वतः ज्ञानेश्वरांनीं परंपराक्रम दिला असून मुकुंदराजांनीही व इतर पूर्ववर्ति व पश्चात्वर्ति व्यक्तीनीं तेंच केलें आहे. तेंच चांगदेवांनीं केलें यांत अस्वाभाविक असे कांहीं नाहीं. आपल्या ग्रंथाचें वर्णन चांगदेव " आतां मनाचे कसण मोडिजैल । मन हा दोषु फेडिजैल । मऱ्हाठिया बोलिजैल । **सिद्धयोगु** ॥ (ओ. ६७१) असेंच करतात. " **योगरहस्य** " सांगतो (ओ. १०२५) " योग निर्वाण समाप्ति " झाली (१०३४) असें म्हणतात, आणि " **ही मातु सिद्धसंकेते** प्रगट केली " (ओ. १०२५) असेंही हा अवधूत चांगदेव स्पष्ट म्हणतो. मागे सुचविल्यानुसार ग्रंथ श. १२१४ त म्हणजे ज्ञानेश्वरादींच्या भेटीपूर्वीच्या काळांतला असल्याचें मानल्यास ज्ञानमार्गीय किंवा भक्तिमार्गीय मित्र-परिचितांचा कुंठेही दुरून उल्लेख नसणें अस्वाभाविक नाहीं. ही

मूळचा असावा असें वाटतें. एकदां हा मान्य झाला कीं ज्ञान–चांगभेट; तत्पूर्वीचें वटेश्वराचें गुरूत्व; मुक्ताईचें गुरूत्व, चांगदेवाची समाधि वगैरे सगळ्या बाबी जमतात. अर्थात् त्या जमतात म्हणूनच केवळ शके १२१४ लेखनकाल मानण्याचें कारण नाहीं. एक तर्क विचारार्थ समोर ठेविला आहे.

(२) तत्त्वसाराचा लेखनकाल व चांगदेवाची समाधि–तिथि या प्रश्नाचा ऊहापोह वर झाला. दुसरी समस्या स्वतः वटेश्वरासंबंधींची.

वटेश्वर ही स्वतंत्र व्यक्ति तर होतीच, ती योगमार्गी, चांगदेवाची गुरू व मान्य असेल तर चांगदेव तिचे "वेदसंतान" वटेश्वर हे त्यांचे अगोदरचे गुरू व मुक्ताबाई ही त्यांची नंतरची गुरू. ही गोष्ट श्री. पांगारकरहि आपल्या चांगदेवावरील लेखांत (म. वा. इति–एक. तुका–काल) मानतात. "चांगदेव प्रथम हठयोगी पण त्यानें आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं म्हणून परमार्थमार्गाकडे तो वळला" हें श्री रा. द. रानडे यांचें वाक्यही हेंच सूचित करतें. (म. सं. प. मार्ग पृ. ८१) मात्र तेच पुढें इतरत्र म्हणतात तसें वटेश्वरांना चांगाचें उपास्य दैवत मानण्याचें कारण राहत नाहीं. "वटेश्वर नांवाचा कोणी संत आढळत नाहीं." ही त्यांची शंकाही निराधार ठरते. मुक्ताईचा उपदेश मिळूनहि तो स्वतःचा "चांगा वटेश्वर" च उल्लेख करतो, त्याअर्थीं वटेश्वर हें त्यांचें दैवतच असणार, तो त्याचा गुरू नव्हे" असा निष्कर्ष श्री. रानडे व त्यानुसार श्री. तुळपुळे यांनीं काढला. पण हीं विधानें आतां अपूर्ण व अपुष्ट ठरतात. दोन गुरूंच्या संबंधीं चर्चा इतरत्र केली आहेच. सारांश, तत्त्वसाराचे संपादक म्हणतात तसे चांगदेव, चांगा वटेश्वर व वटेश्वर या तिन्ही नांवानें एकच व्यक्ति ओळखणें योग्य ठरणार नाहीं.

हें खरें, पण सोपानाबरोबर समाधि घेतलेली ही व्यक्ति नेमकी कोण? मुक्ताईच्या परंपरेंत वटेश्वर शिष्य म्हणून आहेतच. पण ते शिष्य तरी नेमके कोण? त्यांच्याबद्दलची अधिक माहिती हवी. सोपानसमाधींत ही व्यक्ति संवत्सर-ग्रामीं येते. संवत्सर व सासवड ही गांवें जवळजवळचींच म्हणजे एकच. सासवडला सोपानांनीं समाधी घेतली. सासवड हा शब्द सहस्रवट या शब्दांतून उत्पन्न होतो. तेव्हां सहस्रशाखांचा हा वट म्हणजे वटेश्वर हें आमचें आदि व अनादि स्थळ असें म्हणणारी व्यक्ति स्वतःला वटेश्वरच म्हणविते हें सुसंगतच. पण तिचें मूळचे नांव काय? व तिनें सोपानाबरोबर समाधि कां घ्यावी? पुढें गुरू मुक्ताई किंवा शिष्य चांगा यांच्याबरोबरही घेतां आली असती, नव्हे तें उचितही ठरलें असतें. सारांश, वटेश्वर हे नांव कळलें, व्यक्ति कळली; पण तिच्याबद्दलची अधिक विश्वसनीय, साधार, विस्तृत माहिती मात्र अद्याप उपलब्ध नाहीं.

(३) सिद्धपंथांत वटेश्वराचा नामनिर्देश नाहीं ही तिसरी अडचण. एकतर ही यादी आगें मागें पूर्ण उपलब्ध नाहीं. प्रारंभीं नमनाचा तसाच शेवटीं सिद्धपुरुषांच्या यादीचा भाग अजून अनुपलब्ध. तेव्हां या अपूर्ण यादीवरून निर्धारक निर्णय घेणें योग्य नव्हे. कारण कदाचित् तसा उल्लेख असेलही वा नसेलही. असंभवनीय नाहीं. मात्र सिद्धपंथाशीं वटेश्वर व चांगा यांचा संबंध वरवरचा नसावा. सोपान-समाधि-वर्णनप्रसंगीं संवत्सरग्रामाचें वर्णन करीत असतां—

"या वटेश्वरी सगुण सुलभे। समारंभ प्रतिवर्षी।
महा सिद्धसाधकांचे स्थळ। तो हा वटेश्वर सानुकूळ।

असें म्हटलें आहे. वटेश्वर यांचे आदि, अनादि, पूर्वस्थळ असे हे वटेश्वर ऊर्फ सहस्रवट=सासवड ग्राम, सिद्ध **आणि साधकांचे स्थळ** होतें, हें लक्षणीय आहे. वटेश्वर तेथीलच व चांगदेव ज्ञानेशांना भेटावयास आले ते सासवड म्हणजे सिद्धग्रामहूनच असा समज आहे. तत्त्वसारांत सिद्धांची नांवनिशी मुद्दाम देण्याचें कारण झालें तरी या गुरूशिष्यांचा "सिद्ध" व "सिद्धमार्गाशीं" असलेला संबंधच होय. ह्या सिद्धपंथाशींच ज्ञानेश्वर परिचयपूर्व त्यांचा संबंध होता.

"माझे नमन असावें त्या सिद्ध नित्य चांगदेवाते"

(सन्मणिमाला-मोरोपंत) हेंच सूचित करते. शिवाय वाघावर बसून हातांत सर्प घेऊन येणें ही योगसिद्धीचीच स्थिती नव्हे काय? खानदेशांतील तापी-पयोष्णी संगमावरील शिवमंदिरांत त्यानें योगसाधना करून योगसिद्धि प्राप्त केल्याची माहिती सर्वज्ञात आहेच. केवळ शिष्यानें कांहींतरी प्रश्न केला व गुरूनें उत्तर दिलें एवढेंच या प्रश्नोत्तराचें स्वरूप मानणें उचित होणार नाहीं. प्रश्न सोद्देश व सहेतुकच आहे. आपल्या पूर्वपरंपरेचा निर्देश करण्याची, परंपराक्रम सांगण्याची त्या वेळीं परंपराच होती. स्वतः ज्ञानेश्वरांनीं परंपराक्रम दिला असून मुकुंदराजांनीही व इतर पूर्ववर्ति व पश्चात्वर्ति व्यक्तीनीं तेंच केलें आहे. तेंच चांगदेवांनीं केलें यांत अस्वाभाविक असे कांहीं नाहीं. आपल्या ग्रंथाचें वर्णन चांगदेव "आतां मनाचे कसण मोडिजैल। मन हा दोषु फेडिजैल। मन्हाठिया बोलिजैल। **सिद्धयोगु**॥ (ओ. ६७१) असेंच करतात. "**योगरहस्य**" सांगतो (ओ. १०३५) "योग निर्वाण समाप्ति" झाली (१०३४) असें म्हणतात, आणि "**ही मातु सिद्धसंकेते** प्रगट केली" (ओ. १०२५) असेंही हा अवधूत चांगदेव स्पष्ट म्हणतो. मागे सुचविल्यानुसार ग्रंथ श. १२१४ त म्हणजे ज्ञानेश्वरादींच्या भेटीपूर्वीच्या काळांतला असल्याचें मानल्यास ज्ञानमार्गीय किंवा भक्तिमार्गीय मित्र-परिचितांचा कुठेंही दुरून उल्लेख नसणें अस्वाभाविक नाहीं. ही

सिद्धनामावली सांगण्याची पूर्वभूमिकाही लक्षणीय व चांगदेव व वटेश्वर यांचे सिद्धमार्गाशीं संबंध स्पष्ट करणारी आहे. वटेश्वर गुरूनें त्याला जें काय सांगितलें त्यामुळें "एऱ्हवी ज्ञानें जो सरिसा। तयासि विघ्नलेशु काइसा। हे **साधकाची दशा** सांधितली॥ ८५९. ही प्रसादप्राप्ति झाल्यानेंच शिष्य चांगा परम संतोषला, गुरूपुढें तो आनंदानें डोलूं नाचूं लागला; गुरूचरणीं त्यानें मस्तक ठेवलें, गुरूनें त्याला प्रेमानें पोटाशीं धरिलें; शिष्यानें "प्रसादासी हात पसरिला;" गुरूनीं मुखींचा "उगळू" दिधला; व महाप्रसाद तो "येरें घेतला." हें साधन प्राप्त झाल्याचा, साधकदशा प्राप्त झाल्याचा आनंद, सुख तो अनुभवीत होता. साहजिकच ह्या आनंदाचा उपभोग घेण्याचें सद्भाग्य कोणाला लाभलें; ह्या अनंत सिद्ध वस्तूचा लाभ कोणा कोणाला मिळाला व कोण तृप्त झाले तें त्यानें गुरूस जिज्ञासाबुद्धीनें विचारिलें, व गुरूनें तितक्याच आनंदानेंच नव्हे तर अतिशय विस्तारपूर्वक सांगितलें. सिद्धपंथीयांची, सिद्धांची नामावली सविस्तर देण्याचें कारण हें असें आहें. त्याला स्वतःला साधकदशा प्राप्त झाली होती ती गुरुपासून. गुरूही अर्थात सिद्धच होते. सिद्धमार्ग व सिद्धिक्रम त्यांना चांगलाच विदित होता (तत्त्वसार ८६४ आगें मागें). सिद्धांची यादी इतरत्र आहे तिच्यापेक्षां कितीतरी विस्तृत आहे ती कां? हेंही पुनः विशेष लक्षणीय आहे.

जसें या यादींत वटेश्वराचें नांव नाहीं तसें वस्तुतः योगिनी मुक्ताबाईंचेंही नाहीं. मुक्तादेवी योगिनीचें आहे खरें. पण नांवाचा जर कांहीं क्रम असेल असें मानलें तर गोरखनाथानंतर इतर अनेकांना सोडून या योगिनीचाच निर्देश सुसंगत वाटत नाहीं. मात्र यांऐवजीं ही मुक्ताई म्हणजे महानुभवपंथातील असावी, हें अधिक सुसंगत वाटतें. नाहीं तरी त्यानंतरच गुंडम राऊळाचा उल्लेखही आहेच, गोरक्षनाथाच्या संभवतः सहवासांत आलेली व भर्तृहरि-शिष्या मुक्तादेवी योगिनी चक्रधरांना एकांककालांत सालबर्डीच्या डोंगरावर भेटल्याचें जें वर्णन लीलाचरित्रांत (एकांक-लिळा ९) आहे व जिचें स्वागत श्री चक्रधरानें केलें तीच ही सिद्ध योगिनी असावी असें वाटणें सुसंगतच ठरावें. चक्रपाणि हे महानुभावांच्या पंचकृष्णापैकीं तिसरे कृष्ण होत. ते मुळचे फलटणचे एण पुढें द्वारकेस जाऊन स्थायिक झाले (चक्रपाणि चरित्र-य. खु. देशपांडे. (पृ. १-३.). यानींच चक्रधराच्या शरीरांत प्रवेश केला ही आख्यायिका सर्व ज्ञात आहेच. यांचेंच अन्य नांव "चांगदेव राऊळ" आहे हेंही लक्षांत असावें. श्रीगोरखनाथांची ज्ञानेश्वर भावंडांशीं प्रत्यक्ष भेट झाली होती व मुक्ताईला गोरखांचा प्रत्यक्ष अनुग्रह झाला होता हें श्री. पांगारकरांचें मत बहुधा मुक्ताई व मुक्तादेवी यांच्या विषयींच्या गल्लतीमुळें झालेलें असावें. शिवाय मुक्ताईचें नांव आहे असें मानलें तर मग गहिनीनाथ, निवृत्तिनाथ किंवा ज्ञाननाथ

यांचीं नांवे, आहे तेवढ्या तत्त्वसाराच्या भागांतदेखील असावयाला काय प्रत्यवाय होता ? सारांश, वटेश्वरांचें नांव सिद्धांच्या यादींत न येण्याचें कारण केवळ ग्रंथाची यादीची त्रुटितता एवढेंच म्हणतां येणार नाही. कदाचित् ही नांवें पुढें असतीलही अशी अपेक्षा करावयाची. तीच अपेक्षा गैनी–निवृत्ति ज्ञान यांच्या नांथाबद्दलही करावयाची. पण साकल्यानें मुक्ताईसकट या कोणाचीच नसावींत. त्याच प्रमुख व सयुक्तिक कारण असें वाटतें कीं हा तत्त्वसार ग्रंथ शालिवाहन शके १२३४ तला असें म्हटलें असलें तरी मागें चर्चा केल्याप्रमाणें तो ज्ञानेश्वर–मुक्ताईशीं संबंध येण्यापूर्वीचा; ज्या काळांत केवळ वटेश्वराशींच संबंध होता, तेच एकटे गुरू होते तेव्हांचा. त्या वेळपर्यंत ज्ञानेश्वर–मुक्ताईचा व त्यामुळेंच त्या पूर्वपरंपरेतील श्रेष्ठी निवृत्ति व गहिनी यांचीही माहिती किंवा नांव चांगदेवापर्यंत आलेलें नव्हतें. पुढें त्यांची कीर्ति व कर्तृत्व ऐकल्या–कळल्यावरच ते त्यांच्या भेटीस गेले वगैरे कथा ज्ञात आहेच. ज्ञानेश्वर–चांगदेव भेटीचा काळ रेडा बोलविण्याच्या चमत्कार केल्यानंतरचा म्हणजे उद्बोध म्हणतात,

भानुशत भानू रची ज्ञानेश्वरी । विकृत संवत्सरीं ज्ञानरूप
याच शकीं रिपू म्हैसा बोलविला । चालवी भिंतीला वसुमाजी

यांत ज्ञानेश्वरीविषयीं १२१२ विकृत संवत्सर म्हटलें आहे. परंतु संवत्सर विकृत न येतां विक्रम येतो. म्हैसा १२१२ त बोलविला हें एकंदर जीवनाशीं जमत. नाही. पैठणलाच ही घटना घडली व त्यानंतर ज्ञानेश्वरी प्रवचन झालें हा समज. ज्ञानेश्वरीपूर्वी तसेंच म्हैसाप्रकरणापूर्वी भिंत चालविली असें ज्ञात नाहीं. उलट म्हैसा बोलविणें, ज्ञानेश्वरी वगैरे कार्य चांगदेवाच्या कानावर कीर्तीच्या रूपानें पोंचलें व तो भेटीस आला होता. तेव्हां 'वसुमाजी' म्हणजे १२०८ मध्यें भिंत चालविली म्हणजे चांग–ज्ञान भेट झाली, हें थोडें पटत नाहीं. वसु म्हणजे संवत्सर विश्वावसु धरला तरी जमत नाहीं कारण तो १२२७ मध्यें येतो ! उद्बोधाच्या ज्ञानेश्वरचरित्रांत संवत्सराचा मेळ बसत नाहीं. शिवाय त्यांत अमृतानुभव, योगवासिष्ठसार इ.चा उल्लेख नाहीं. भेटीचा काळ रेड्याच्या चमत्कारानंतर सामान्यतः शके १२१५ ते शके १२१८ च्या मधला कधीं तरी असावा. अर्थात् तत्त्वसार त्यापूर्वीचा म्हणजे शके. १२१४ चा हेंच वरील व्यक्तीचीं नांवे नसण्याचें सुसंगत कारण वाटतें. एरवीं हीं नांवे सिद्धांच्या ज्या याद्या ज्ञात आहेत त्यांतही दिसत नाहीत. नाथसिद्ध, जैनसिद्ध, सहजयानीसिद्ध, कौलसिद्ध निरंजन सिद्ध, वज्रयानी सिद्ध किंवा इतर सिद्ध असोत; पण वर्णरत्नाकर, हठयोग-प्रदीपिका, महार्णवतंत्र, योगि संप्रदायाविष्कृति गोरक्षसिद्धांतसंग्रह इत्यादि पूर्ववर्ति ग्रंथांतील याद्यांतून तर असोच परंतु महाराष्ट्रीयच नव्हे तर ज्ञानेश्वरांच्याच

परंपरेतील नाथपंथी संत शिवदिननाथ यांच्या मठांतील यादींतही हीं नांवें नाहींत. तीच स्थिति अर्थात् तत्त्वसारांतील यादीची. नाहीं म्हणावयाला श्री. पांगारकर यांनीं मात्र आपल्या ज्ञानेश्वरचरित्रांत गैनी, निवृत्ति व ज्ञाननाथ यांचीं नांवें सिद्धांच्या नामावलींत जोडलीं आहेत. मुक्ताईचें नांव तेथेंही नाही.

तात्पर्य, ह्या सुसंगत निराकरणानंतर आतां उपस्थित प्रश्न शेष राहण्याचें कारण नसावें.

"वटेश्वर" या प्राचीन मराठी साहित्यांत व धार्मिक-आध्यात्मिक जीवनांत प्रामुख्यानें वावरणाऱ्या नांवाची यथाशक्य छाननी-तपासणी आतांपर्यंत केलेली आहे. यापेक्षां अधिक सविस्तर माहिती सप्रमाण-साधिकृत रीतीनें पुढें येईल तो सुदिन.

वटेश्वरशिष्य चांगा किंवा चांगदेव-चक्रपाणी सोडले तर चांगा मुधेश व चांगा केशवदास हीं दोन नांवें मराठी साहित्यांत निदर्शनास येतात. चांगदेव वटेश्वरानें चौदाशें वर्षांच्या आपल्या आयुष्यकालांत (चौदाशे किंवा चतुर्दश शत याचा विग्रह किंवा उकल १४०० असा करून दीर्घायुष्याची असंभाव्यता दर्शविण्यापेक्षां सरळ साधा असा चौदा + शे. = ११४ किंवा चतुर्दश + शत = ४ + १० + १०० असा पूर्वापार, अंकानां वामतो गति प्रमाणें मानून दीर्घायुष्याची संभाव्यता व्यक्तविणें अधिक सयुक्तिक वाटतें. असल्या संभाव्य दीर्घायुष्याचीं अनेक उदाहरणें ज्ञात आहेत. चांगदेवांनीं प्रत्येक शंभराव्या वर्षीं एक असे चौदा देह धारण केले असें म्हणतात. पुढें चांगा मुधेशाचा जन्म चांगदेवाच्याच मुधोपंतावर झालेल्या अनुग्रहप्रसादानें श. १५०५ मध्यें झाला असें म्हणतात. (श्री. चित्राव, म. चरित्रकोश). चौदाशें वर्षें देह धारण करण्यांतील अलौकिकत्वाचा भाग सोडला तर नाथपंथीय सत्यामळनाथशिष्य गैबीनाथाबद्दल असेंच दिसतें. सामान्यतः ज्ञानेश्वरशिष्य सत्यामळनाथापासून सोहिरोबानाथ आंबिये यांच्यापर्यंत अनेक वेळां हे गैबीनाथ समोर आलेले आहेत, आणि तेही "अवधूत रूपें जनीविजनी, निरंजनी विचरत" असत. चांगा केशवदास यानें विष्णुदास नामाचा संबंध—

"तोचि नामा तोचि देवो। ऐसे म्हणतां न धरा संदेहो।
म्हणा विष्णुदास नामा। तो नेईल मुक्तिग्रामा।
केशवदासी चांगा निरूता जाण। पंढरीनाथे सांगितली खूण॥
॥ अ. ४, पृ. ३६९ ॥

तसाच—

"...हेचि जीवीं मनीं ध्यातु असे चांगा। विष्णुदास नामा उद्धरील ॥
॥ अ. ५ पृ. ३६९ ॥

दर्शविला आहे (ज्ञानेश्वरांची प्रभावळ–पांगारकर–पृ. ३६९). याचा अर्थ चांगा केशवदास हा फार नंतरचा. मुक्ताबाई–वटेश्वर–चक्रपाणि–चांगा–विमलानंद–चांगा केशवदास–जनकराज–नृसिंह इत्यादि परंपरा. चांगा एवढेंच नाम–सादृश्य; परंतु तरीही श्री. चित्राव म्हणतातः—

" चांगा वटेश्वर, चांगा केशवदास, आणि चांगा मरूद्रण हीं सर्व नांवें **एकाच व्यक्तीचीं आहेत**. चांगा वटेश्वर हें गुरूच्या नांवाशीं संबद्ध आहे. चांगा केशवदास वैष्णव झाल्यानंतरचें दिसतें. केशवराजाचें यानें स्थापन केलेलें देऊळ अद्यापि पुणतांबें येथें आहे. चांगा मरूद्रण हें नांव पौराणिक कथेशीं संबद्ध असल्याचें महिपतीनें भक्तविजयांत दाखविलें आहे. चांगदेवाचे पुणतांब्याचे वंशज मरूद्रण हें आडनांव लावतात..... " चांगा भला " असा ग्रामदेवतेच्या उत्सवप्रसंगीं जयजयकार करतात. त्यांतील " चांगा " शब्द यांनांच उद्देशून व भला हा शब्द, सरस्वतीदेवीच्या त्याच्यावर झालेल्या अनुग्रहाचा निदर्शक आहे असें तत्त्वसारांतील शारदास्तवनावरून वाटतें. "

वटेश्वर व त्यानिमितानें चांगदेव यांच्याबद्दलची उपलब्ध सामग्री व त्यावरून निघणारे निष्कर्ष व सुचणाऱ्या कल्पना-विचार समोर मांडलेले आहेत. यांतून यथायोग्य मंथनानंतर इष्ट तें नवनीत उपलब्ध होवो हीच या लेखाची अपेक्षा.

मराठेशाहींतील एक पद्यमय अर्ज—

सरकारास विनंति (लावणी)

डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, नागपूर.

'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथांतील 'गद्य सारस्वत' या प्रकरणाला जोडलेल्या पुरवणींत डॉ. शं. गो. तुळपुळे हे लिहितात, "मराठेशाहींतील ऐतिहासिक पत्रव्यवहार हाहि खरोखर प्राचीन गद्याचा एक उत्कृष्ट मासला असून तो उपलब्ध करून देण्याचे कामीं आजवर मातबर संशोधकांचे जीवितश्रम खर्चीं पडले आहेत. हीं पत्रें म्हणजे खरोखर त्या त्या लेखकांचें अंतश्चरित्रच होय इतकीं ह्यांतील कांहीं साहित्यदृष्ट्या सरस आहेत." (वि. ल. भावे, **महाराष्ट्र-सारस्वत**, आवृत्ति पांचवी, इ. स. १९६३, पृ. ९८०).

डॉ. तुळपुळे यांनीं उल्लेखिलेलीं हीं सगळीं पत्रें अर्थातच गद्यांतलीं आहेत. पण, याच कालखंडामध्यें पद्यांतूनही अर्ज-विनंत्या लिहिण्याची पद्धत कांहीं प्रमाणांत तरी रूढ असावी, असें दिसतें. प्रस्तुत 'सरकारास विनंति' हा याच स्वरूपाचा एक पद्यमय अर्ज आहे.

श्रीमंत नानासाहेबांकडे इमानेंइतबारें चाकरी करणाऱ्या दिनाजी कोयाळ नांवाच्या एका नोकरानें पद्यांत लिहिलेला हा एक रजेचा अर्ज आहे. प्रस्तुत अर्जांत पंढरपूरच्या यात्रेला जाण्यासाठीं म्हणून कोयाळ यांनीं तीन महिन्यांची रजा मागितलेली आहे. सरकाराविषयींची आदराची भावना, पंढरपूरच्या विठोबावरची निष्ठा आणि अर्जदाराची आर्थिक ओढगस्ती, हे प्रस्तुत अर्जांतील विशेष आपलें लक्ष वेधून घेतात. भाषेच्या दृष्टीनें, संस्कृत शब्दांच्या जोडीनेंच रोजमोरा, कर्जदारि, बिदा करणें, या अरबी व फारशी शब्दांचा प्रयोगही लक्षणीय वाटतो. पेशवाईंतील पद्धतीप्रमाणें, अर्जाच्या अखेरीला 'लेखनसिमा' ही आली आहे. या अर्जांत निर्देशिलेले 'राजरूषि श्रीमंत नानासाहेब' म्हणजे नानासाहेब पेशवे असावेत असें वाटतें.

दिनाजी कोयाळ या व्यक्तीविषयीं मात्र विशेष कांहींच माहिती उपलब्ध होऊं शकली नाहीं. पुण्याचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक य. न. केळकर यांच्याकडेही मी विचारणा केली. ते मला पाठविलेल्या ता. १५-७-१९६६ च्या पत्रांत लिहितात, "आपण विचारतां त्या दिनाजी कोयाळ कवीविषयीं कांहीं माहिती माझ्या पाहाण्यांत आलेली नाहीं. नानासाहेब पेशव्यांच्या स्तुतिपर दोन कवनें भा. इ. सं. इतिवृत्त १८३७ पृ. १४६ ले. ७५ पेशव्यांच्या स्तुतिपर काव्य व दुसरें इ. वृ. शके १८३५, लेखांक ५४ गाणपत्यांची एक यादी त्यांत नानासाहेबांचा उल्लेख आहे. पण दोन्ही काव्यांचे कर्ते निराळेच आहेत. दिनाजी कोयाळ नाहीं. हा नवीनच कवि आपणांस उपलब्ध झालेला दिसतो."

दिनाजी कोयाळ यांचें प्रस्तुत काव्य [सरकारास विनंति (लावणी)] मला नागपूर विद्यापीठाच्या हस्तलिखितविभागांत उपलब्ध झालें. १३$\frac{1}{2}$" × ५$\frac{1}{2}$"

या आकाराच्या एका कागदावर काळ्या शाईत हे कवन लिहिण्यांत आलें असून मुख्य मजकुराच्या दोहों बाजूंना लाल शाईतील दुहेरी रेघांची चौकट आहे. शिरोभागीं लाल शाईतील मेहेराप आणि "श्रीगणपतय नमहः" असें लिहिलेलें आढळतें. मात्र लेखनकालाचा निर्देश कोठेंही आढळत नाहीं. कागद घडी करून व्यवस्थित ठेवलेला असून त्याच्या पाठीमागच्या बाजूवर काळ्या शाईत पुढील मजकूर आढळतोः—'ॐ नमः सिद्दं' 'श्रीगणेशाय नमः'

ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तुत हस्तलिखिताचें महत्त्व जें काय असेल तें असो. पण मराठी भाषेच्या अभ्यासकांना मात्र, पेशवेकालीन पद्यमय अर्जाचा एक नमुना म्हणून प्रस्तुत कवनाचें वैशिष्टय जाणवल्याशिवाय राहणार नाहीं.

विनंति सरकारास कोयाळ[1] दिनाजि[1] लिहितो ।
सत समागम[2] सरकारसेवा[2] ईच्छित[3] फळ देतो ॥ १ ॥
राजरूषि[4] श्रीमंत नानासाहेब[5] प्रतापि ॥
कांसि[6] जगन्नाथ यात्रा जालि[7] तेव्हा सांपि ॥ २ ॥
तारुण्य अवघे खर्च जाले सरकारसेवेत ॥
वृधाप्य[8] अवस्था आलि आता पढरित[9] हेत ॥ ३ ॥
अल्प रोजमोरा[10] तेन्हे[11] कर्जदारि[12] जालि ॥
त्याचे निवारण होउन यात्रा पाहिजे घडलि ॥ ४ ॥
पाव शत देने[13] आहे साप्रत[14] मज आता ॥
विटलाचि[15] लये[16] लागलि बिदा[17] करा[17] हाता ॥ ५ ॥
पढरपुरचे[18] जमाखर्च लिहुन सिध[19] जाले ॥
नेउन स्वामिचे चरणि अर्पन[20] पाहिजे केले ॥ ६ ॥
येथिल कागदपत्र भाड समजाउन[21] देतो ॥
चरनावरि[22] मस्तक टेउन[23] पढरिस[24] जातो ॥ ७ ॥
ति[25] महिन्याचि रजा द्यावि रथयात्रेस येतो[26] ॥
सरकारास अभिष्ट चिंतन[27] हे विटल[28] देतो ॥ ८ ॥
जालि लेखनसिमा[29] विनति भावयुक्त लिहिलि ॥
निस्चयाचा[30] वृक्ष त्याला गोड फळे आली ॥ ९ ॥

---

१. दिनाजी कोयाळ हें अर्जदाराचें नांव. २. सत्समागम; सरकारसेवा हाच सत्समागम ? ३. [इच्छित]. ४. [राजऋषि]. ५. नानासाहेब पेशवे ? ६. [काशी]. ७. झाली. ८. वृद्धपण. ९. [पंढरींत]. १०. [रोजमुरा] दिवसाचें वेतन, पगार. ११. [तेणें]. १२. (फा.) ऋणकोपणा. १३. [देणें] १४. [सांप्रत]. १५. [विठ्ठलाची] १६. [लय] एकतानता, तद्रूपता; (क्रि. लय लागणें). १७. बिदा करणें = निरोप देणें, रवानगी करणें (अर. बिदाअ). १८. [पंढरपूरचे]. १९. [सिद्ध] २० [अर्पण]. २१. समजावून. २२. [चरणावरी]. २३. [ठेवून]. २४. [पंढरीस]. २५. तीन २६ [येतों]. २७. [चिंतन]. २८. [विठ्ठल]. २९. अर्जाचा शेवट; पेशवाईत हा एक शिक्का होता. ३०. [निश्चयाचा].

भाषेचें स्वरूप : कांही नवे दृष्टिकोन

प्रा. दिनेश द. माहुलकर, बडोदें

भाषेचा उपयोग आपण व्यवहारांत साधन म्हणून इतका सर्रासपणें करीत असतों कीं खुद्द भाषेविषयीं विचार करण्याची आपणाला जरूर वाटत नाहीं. भाषा ही जरी मनुष्याला हवा, पाणी किंवा अन्न यांच्याइतकी जरूरीची गोष्ट नसली तरी तिच्यावाचून त्याचा दैनंदिन सामाजिक व्यवहार अडून राहील यांत शंका नाहीं. म्हटलं तर भाषा ही अगदीं साधी सोपी गोष्ट आहे. लहान मुलं वयाच्या तिसऱ्या चवथ्या वर्षांत आपल्या कुटुंबाची भाषा चांगलीच आत्मसात् करतात, आणि एकदां आत्मसात् केली की हव्या त्या परिस्थितींत हवें तें वाक्य विचार न करतां तीं बोलूं शकतात. पण नंतरच्या वयांत हीच भाषा परकीय भाषा म्हणून शिकायची असली तर आपणाला ती किती कठिण वाटेल. रशियन समाजांत जन्मलेलें मूल किती लहान वयांत रशियन भाषा सहजगत्या बोलूं लागतें; पण वयाच्या तिसाव्या वर्षीं आपण रशियन भाषा शिकायची म्हटली तर ती किती अवघड गोष्ट आहे हें अनुभवून पाहावें.

भाषेसंबंधींची ही चमत्कारिक समस्या अलीकडेच आपल्या नजरेस येऊं लागली आहे, आणि जसजसा यासंबंधींचा विचार अधिकाधिक होऊं लागला आहे तसतसें सामान्य माणसालाही एक तत्त्व पटूं लागलें आहे कीं, भाषा ही जरी वापरायला सोपी गोष्ट असली तरी तिचा विचार करायला लागलों कीं ती कठीण गोष्ट वाटूं लागते. भाषेसंबंधींचा विचार फार पूर्वीपासून होत आला आहे. तत्त्वज्ञान, साहित्य, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र इत्यादि विविध क्षेत्रांत भाषेच्या स्वरूपासंबंधीं थोडाफार विचार होत आला आहे; परंतु हा विचार बहुतांशीं मुख्य विषयाच्या अनुषंगानें झालेला आहे. परंतु अलीकडच्या काळांत स्वतंत्रपणें भाषा याच विषयाला वाहिलेलें नवें शास्त्र-भाषाशास्त्र-निर्माण झालें आहे आणि या शास्त्रानें भाषेसंबंधी अनेक 'सुरस आणि चमत्कारिक' गोष्ट प्रकाशांत आणल्या आहेत.

भाषाशास्त्र आपल्या देशांत उगम पावलें ही आपणाला अभिमान वाटावी अशी गोष्ट आहे. २ फेब्रुवारी १७८६ रोजीं सर विल्यम जोन्झनें कलकत्त्याला बंगाल ॲशिआटिक सोसायटीपुढें जें भाषण दिलें त्या भाषणानें या शास्त्राच्या अभ्यासाचा श्रीगणेशा केला असें म्हणायला हरकत नाही. ग्रीक, लॅटिन, जेर्मानिक वगैरे भाषांतील शब्दांचें संस्कृत भाषेतील शब्दांशीं साम्य आढळतें यावरून या भाषा एकमेकींच्या नात्याच्या आहेत इतकेंच नाहीं तर त्यांचें नातें शास्त्रशुद्धपणें

निश्चित करतां आलें तर त्या आधारें या भाषा ज्या एका भाषेपासून उद्भवल्या असतील तिचा वेध घेतां येईल असें भाकित विल्यम जोन्झनें केलें. लगेच या प्रकारचा अभ्यास युरोपांत सुरू झाला. हा अभ्यास चालू असतांना युरोपीय पंडितांचें लक्ष प्राचीन संस्कृत व्याकरणाकडे गेलें व पाणिनीच्या बुद्धिमत्तेचें महत्त्व त्यांना पटलें. पाणिनीच्या "अष्टाध्यायी" नांवाच्या व्याकरणानें युरोपीय पंडितांपुढें भाषेच्या वर्णनात्मक अभ्यासाचा हवा तो आदर्श उभा केला. युक्लिडच्या भूमितीला गणितशास्त्रांत जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें आज पाणिनीच्या "अष्टाध्यायी" ला भाषाशास्त्रीय अभ्यासांत मिळालें आहे.

भाषेच्या अभ्यासाला सुरुवात करावी लागते ती प्रथम ध्वनिशास्त्राच्या अभ्यासानें भाषेचें आदि स्वरूप तिच्या उक्तींत प्रगट होतें; तिचें लिखित स्वरूप नंतरचें याविषयीं आतां वाद राहिलेला नाहीं. सर्व मानव समाजांत बोललेल्या स्वरूपांतील भाषा आढळून येते, पण लिखित केवळ सुधारलेल्या समाजांतच आढळते. यामुळेंच भाषाशास्त्रज्ञ मुख्यत्वें भाषेच्या उक्त स्वरूपाचा विचार करतात. आपल्याकडील प्राचीन व्याकरणकारांना ही गोष्ट अडीच हजार वर्षांपूर्वी सुचली होती व पाणिनीच्या पूर्वी रचलेल्या 'शिक्षा' नांवाच्या ग्रंथांतून ध्वनिशास्त्राचा फार शास्त्रशुद्ध अभ्यास केलेला आढळतो. या शिक्षा ग्रंथांची ओळख युरोपीय पंडितांना झाली तेव्हां भाषेच्या व्यवहारासाठीं आपण जे 'क', 'प', 'इ' वगैरे ध्वनि बोलतों त्यांच्या उच्चारक्रियेच्या व त्यांच्या वर्गीकरणाच्या तत्त्वांची माहिती झाली. म्हणूनच आधुनिक भाषाशास्त्र भारतीय परंपरेंतून जन्म पावलें, असा निर्वाळा अनेक पंडितांनीं दिला आहे.

मागें उल्लेख केल्याप्रमाणें सर विल्यम जोन्झच्या भाषणानें भाषांच्या ऐतिहासिक व तुलनात्मक अभ्यासाची सुरुवात होऊन १८१८ सालीं रास्क व ग्रिम यांचें महत्त्वाचें संशोधन प्रगट झालें. एकामागून एक अनेक पंडितांनीं या संशोधनांत भर घातली. हें काम चालू असतानांच कांहीं पंडितांना असें वाटलें कीं कोणत्याही दोन भाषांची तुलना करण्यापूर्वी त्यांतील प्रत्येक भाषेच्या ध्वनिरचनेची आणि व्याकरणाची माहिती आवश्यक आहे. अमुक एका भाषेंत, उदाहरणार्थ जुन्या इंग्रजींत दंत्योष्ठसंघर्षी [f] आणि [v] असे ध्वनि आढळतात. त्यांची इतर संबंधित भाषांतील ध्वनींशीं तुलना करण्यापूर्वी मूळ जुन्या इंग्रजी भाषेंत ते ध्वनि वेगवेगळे वर्ण होते कीं एकाच वर्णाचे दोन वेगळे उच्चारप्रकार होते याचें ज्ञान अवश्य आहे. असा अभ्यास झाला तरच ऐतिहासिक–तुलनात्मक अभ्यास शास्त्रीय ठरेल, आणि तसा अभ्यास जोंपर्यंत झाला नाहीं तोंपर्यंत ऐतिहासिक–तुलनात्मक भाषाशास्त्राचा अभ्यास "आधीं कळस मग पाया रे" या धर्तीचा होईल.

भाषाशास्त्राचा हा मूलगामी स्वरूपाचा, म्हणजे भाषेच्या व्यवस्थेचा अभ्यास साधारणतः १८८० च्या सुमारास सुरू झाला व या अभ्यासानें भाषेच्या स्वरूपासंबंधीं अनेक नवनव्या गोष्टी उजेडांत आणल्या. व्यवहारांत सर्रासपणें वापरल्या जाणाऱ्या व बालसुलभ वाटणाऱ्या या साध्या गोष्टींत किती मोठा आशय आहे तें आतां जाणत्या लोकांना पटूं लागलें आहे इतकेंच नाहीं तर या अभ्यासाचें महत्त्व राष्ट्रीय व सामाजिक जीवनांत फार मोठें आहे याचीही त्यांना खात्री पटली आहे. गेल्या महायुद्धांतील कांही घटनांनीं अमेरिकेंत या विषयाच्या अभ्यासाला वेग आला व आजमितीस या शास्त्राच्या प्रगतीस अमेरिकेंतील संशोधन मुख्यत्वें कारणीभूत झालें आहे. ज्या मूळ गोष्टीमुळें या अभ्यासाला अमेरिकेंत महत्त्व प्राप्त झालें तिचा विचार करायला हवा. गेल्या महायुद्धांत पॅसिफिक महासागरांतील अनेक बेटांवर अमेरिकन सैन्य उतरविणें ही महत्त्वाची कामगिरी अमेरिकन सेनाधिकाऱ्यांवर सोंपविण्यांत आली. या बेटांवर सैन्य उतरविणें ही जरी सोपी गोष्ट होती तरी त्या बेटांवर राहणाऱ्या असंस्कृत मानल्या जाणाऱ्या लोकांची भाषा अवगत केल्याशिवाय शिपायांना आपला दैनंदिन व्यवहार व सैन्याची व्यूहरचना करणें अशक्य होतें. त्यांना दिले जाणारे संदेश गुप्त भाषेंत राखावे लागणार होते व ही गुप्त भाषा शत्रूला कळूं नये याची खबरदारी घ्यावी लागणार होती. या व असल्या इतर कांहीं प्रश्नांमुळें भाषाशास्त्राला एकदम अमेरिकेंतील उच्च राष्ट्ररक्षणखात्यांत फार महत्त्वाचें स्थान मिळालें व त्यासाठीं भाषाशास्त्रज्ञांना पाचारण करण्यांत आलें. " कॉलेजांतील अंधाऱ्या अभ्यासिकेंतली आरामखुर्ची सोडून उघड्या मैदानांतील सूर्यप्रकाश आणि मोकळी हवा जेव्हां आम्हांला मिळाली तेव्हां आम्हांला भाषाशास्त्रांतले नवे विचार स्फुरले " असे उद्गार एका अमेरिकन विद्वानानें काढले आहेत.

अमेरिकेच्या व्यवहारवादी तत्त्वज्ञानाचा हा विजय होता. भाषा लौकर शिकायची असली, शिकवायची असली, गुप्त राखायची असली तर तिच्या मूलगामी स्वरूपाचें ज्ञान पाहिजे इतकेंच नाहीं तर हें ज्ञान नुसतें पुस्तकांत जतन करून न ठेवतां त्याचा व्यवहारांत उपयोग करण्यासाठीं तशी शिक्षणपद्धत, तसलीं पाठ्यपुस्तकें, त्यावर आधारलेलीं भाषायंत्रें इत्यादि सर्व नव्यानें घडवायचें होतें. अलंकारांनीं नटलेल्या साहित्यसरस्वतीच्या सेवेंत युगानुयुगें दासी म्हणून राबत आलेल्या सामान्य भाषेला स्वतःचें स्वत्त्व पटवून देऊन तिला मानाचें स्थान देण्याला हे शास्त्रज्ञ पुढें सरसावले होते.

गेल्या तीस-पस्तीस वर्षांत भाषाशास्त्रानें जी प्रगति साधली आहे तिचा सर्वांगीण परिचय थोडक्यांत करून देणें कठीण आहे. एकाच महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार या लेखांत करायचा आहे, तो असा कीं, या सर्व संशोधनानें भाषेच्या

स्वरूपासंबंधीं आपणाला पूर्वी अवगत नसलेले कोणते नवे दृष्टिकोन निर्माण केले आहेत ? आजतागायत भाषेचा भाषा म्हणून अभ्यास करणारें शास्त्र म्हणजे व्याकरण हें होतें. हें व्याकरण अनेक रूढ कल्पनांच्या शृंखलांनीं बांधलें गेलें होतें, इतकेंच नाहीं तर तें अगतिक बनलें होतें. दादोबांनीं सांगायचें, मास्तराने तें मान्य करायचें व छडीच्या भीतीनें विद्यार्थ्यांनीं तें जसेंच्या तसें घोकायचें ही आपली व्याकरणशिक्षणाची परंपरा आजपावेतों शाळेंत दृढमूल होऊन बसली आहे, भाषेचा यथार्थ विचार करण्याची शक्ति जें शास्त्र हिरावून घेतें त्याचें नांव व्याकरण, अशी व्याकरणाची व्याख्या करावी का असा विचार अनेकांच्या मनांत वारंवार येतो. या व्याकरणाची परंपरा पाळामुळांसह उखडून टाकण्याची मोठी कामगिरी भाषाशास्त्रानें करून भाषेचा विचार नव्यानें, मोकळ्या मनानें, स्पष्टपणें करण्यास आपणाला प्रवृत्त केलें आहे. व्याकरणपरंपरा चुकीची नव्हती हें कोण मान्य करणार नाही ? भाषा म्हटली कीं आपल्यापुढें लिखित भाषा उभी राहते. ती व्याकरणाच्या चुकीच्या कल्पनेमुळें. 'क' म्हटला कीं लिहिलें जाणारें अक्षर आपल्या दृष्टीपुढें तरळतें, बोलला जाणारा ध्वनि आपल्या कानांवर येत नाहीं. आणि म्हणून 'काम' मधला क वेगळा आणि 'केर' मधला क वेगळा असें ध्वनिशास्त्रानें सांगितलें तर तें आमच्या बुद्धींत शिरत नाहीं. 'नाम म्हणजे एकाद्या वस्तूचें, व्यक्तीचें अथवा स्थळाचें नांव' अशी व्याकरणानें नामाची व्याख्या करावी व मास्तरानें ती मुलांकडून घोकून घेऊन 'जसें, पाटी, राम, मुंबई, इत्यादि' अशीं उदाहरणें देऊन त्यांचीं तोंडें सीलबंद करावीं हें ठीक. पण एकाद्या चलाख पोरानें 'मास्तर, 'झोंप' हें कोणत्या वस्तूचें नांव ?' असा प्रश्न विचारला तर मास्तरांची तर राहो पण दादोबांची झोंप तरी उडायला हवी !

व्याकरणानें जरी भाषेचें विश्लेषण करण्याचा प्रयत्न गेल्या कित्येक शतकांपासून केला असला तरी अनेक रूढ समजुतींमुळें हें कार्य नीट साधलें नाहीं हें स्पष्ट आहे. या परंपरेंतून बाहेर पडण्यासाठीं भाषाशास्त्रानें जो मार्ग काढला तो शास्त्रशुद्ध होता. त्याचें म्हणणें, भाषेचा विचार करतांना ती कशी लिहिली जाते याचा विचार करूं नका, सर्वसामान्य लोक ती कशी बोलतात याचा विचार करा; तिचें व्याकरण ठरवितांना तत्त्वज्ञान किंवा तर्कशास्त्र यांचे निकष स्वीकारूं नका, भाषेचे स्वतःचे निकष आहेत ते शोधा. हे दृष्टिकोन अगदीं वेगळे आहेत. ते स्वीकारले तर भाषेचें जें स्वरूप आपल्या प्रत्ययाला येतें तें अगदीं निराळें, उदाहरणार्थ, इंग्रजी भाषा शिकतांना आपण रूढ व्याकरणाचा नियम शिकलों कीं, इंग्रजींत cat किंवा dog या शब्दांचें बहुवचन करायचें असलें तर त्या शब्दांना s हा प्रत्यय लावावा, जसें cats, dogs. आतां भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनांतून याच गोष्टीकडे पाहिलें तर असें आढळतें कीं, हा जो s प्रत्यय लागला तो दिसण्यांत

(म्हणजे लिहिण्यांत) जरी s दिसला तरी बोलण्यांत मात्र केवळ 'स' नाहीं. cat हा शब्द बहुवचनांत 'कॅट्स' असा उच्चारला जातो परंतु dog हा शब्द 'डॉग्स' असा न उच्चारतां आपण तो 'डॉग्झ' असा उच्चारतो. मग इथें प्रत्यय s असला तरी त्याचा उच्चार एक ठिकाणीं 'स' व दुसरीकडे 'झ' असा वेगळा कां ? कीं हे दोन वेगळे प्रत्यय मानायचे ? रूढ व्याकरणांत या प्रश्नांना उत्तर नाहीं. इंग्रज माणसाला स्वतःच्या भाषेंत काय लिहायचें व त्याचा उच्चार कसा करायचा यांत विसंगति असली तरी तिचें त्याला कधीं वावडें वाटलें नाही. पण इंग्रजी भाषा परकीय भाषा म्हणून शिकणें ज्यांना आवश्यक आहे अशा लोकांसाठीं या गोष्टींचे नियम हवेत. भाषाशास्त्राच्या दृष्टीनें भाषेकडे पाहिल्याशिवाय या प्रश्नांचें उत्तर देणें शक्य नाहीं. संस्कृत भाषेला पाणिनीसारखा श्रेष्ठ व्याकरणकार लाभला म्हणून संस्कृतमध्यें 'सत् + कृत्यम्' इथें त् चा त् कां राहतो व 'सत् + गतिः' इथें त् चा द् कां होतो याचें ज्ञान त्यानें किती शतकांपूर्वी बालसुलभ करून ठेवलें. हाच नियम इंग्रजींत आहे हें कळायला इंग्रज माणसाला किती शतकें थांबावें लागलें !

भाषाशास्त्रानें जसें भाषेच्या उच्चारांबाबत तसेच भाषेच्या व्याकरणाच्या बाबतींतही आमूलाग्र क्रांति घडवून आणली आहे. रूढ व्याकरणानें भाषेंतील शब्दांची वर्गवारी नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, इ० अशी करून त्यांच्या स्वरूपांत घडणाऱ्या फरकांच्या अभ्यासाला रूपविचार असें नांव दिलें. बहुतांशीं हा अभ्यास संस्कृत भाषेच्या व्याकरणाची नक्कल म्हणूनच देशी भाषांच्या बाबतींत झाला. परंतु पाणिनीनें रचलेल्या संस्कृत व्याकरणांत केवळ भाषाशास्त्रीय तत्त्वांवरच शब्दांची विभागणी केली असल्यामुळें त्यांत नाम, क्रियापद इत्यादींच्या तात्त्वज्ञानिक व्याख्यांचा घोटाळा नव्हता. 'श्वानं युवानं मघवानं' यांना पाणिनीनें एकाच सूत्रांत ओविलें तें भाषाशास्त्राच्या तत्त्वाधारें. 'झोंप' हा शब्द मराठींत नाम आहे, कारण–? तो शब्द कोणत्याहि पदार्थाचें नांव नाहीं. तो शब्द भाषेंत विशिष्ट रचनेंत वापरला जातो एवढें कारण पुरेसें आहे. 'त्याची डबी पडली' व 'त्याची झोंप उडाली' हीं समांतर वाक्यें आहेत आणि म्हणून 'डबी' हें जसें नाम आहे तसें 'झोंप' हें नाम आहे. भाषेंत शब्दांची वर्गवारी व त्यांचें कार्य ठरवायला भाषा शास्त्रीय तत्त्वेंच वापरली पाहिजेत, इतर कोणत्याही शास्त्राचीं नकोत हा भाषाशास्त्रज्ञांचा आग्रह आज नव्यानें सर्वमान्य झाला आहे. पाणिनीचें व्याकरण माहित असणारांना तो नवा वाटायला नको. दुर्दैवानें पाणिनीच्या व्याकरणाला आधारभूत झालेलीं हीं तत्त्वें पाश्चात्यांनीं नव्यानें हुडकून काढीपर्यंत तीं आम्हांला स्पष्ट झालीं नाहींत. तीं प्रथमपासून तशीं स्पष्टपणें आमच्यापुढें असतीं तर आमची व्याकरणपरंपरा तशीच थोर, उज्ज्वल राहिली असती. कदाचित् आमचें व्याकरणशास्त्र केवळ भाषेच्या सपाटीपुरतें मर्यादित न राहतां भाषेच्या खोल अंतरंगांत शिरलें असतें.

पाणिनीनें आपल्या व्याकरणांत संस्कृत भाषेतील वाक्यरचनेचा विचार केलेला नाहीं. याचें कारण असें देतात कीं संस्कृत भाषेंत वाक्यांतील शब्दरचना हवी तशी करतां येते; संस्कृत भाषेंत वाक्यरचना मुळीं नाहींच. 'रामः रावणं अहनत्' या वाक्यांत शब्दांची रचना कशीही बदलली तरी वाक्याचा अर्थ तोच राहतो, बदलत नाहीं. उलट Rama killed Ravana या इंग्रजी वाक्यांतील शब्दांची फेरबदल केली तर उलट अर्थाचें वाक्य होईल. पाणिनीनें वरील दृष्टीनें वाक्यरचनेचा विचार केलेला नाहीं हें म्हणणें फारसें योग्य नाहीं, कारण संस्कृतांत कित्येक शब्द असे आहेत कीं ते विशिष्ट स्थळींच वापरतां येतात. (उदा० 'मा' हें 'माम्' चें वैकल्पिक रूप वाक्यारंभीं येत नाहीं, इ०) शोधक दृष्टीनें बघितल्यास संस्कृत भाषेंत वाक्यरचनेचे नियम आहेत. परंतु पाणिनीनें या विषयाला हात लावला नाहीं याचें कारण असें असावें कीं ज्या तत्त्वानुसार त्यानें रूपविचार केला त्यापेक्षां वेगळ्या तत्त्वांचा आधार घेऊन त्याला वाक्यरचनेचा विचार करावा लागला असता. कदाचित् त्याचें व्याकरण ग्रांथिक रचित भाषेचें स्वरूप समजविणारें होतें, बोलल्या जाणाऱ्या भाषेंत वाक्यरचना कशी घडते हें सांगणारें नव्हतें. पाणिनीच्या व्याकरणाचें हें मूलगामी स्वरूप ध्यानांत घेतलें तर मराठीसारख्या आज बोलल्या जाणाऱ्या व विकास पावणाऱ्या जिवंत भाषांचें व्याकरण लिहिणें हें किती जबाबदारीचें काम आहे हें लक्षांत येईल.

मराठीचा विचार केला तर 'खाणें,' 'बसणें', 'झोपणें', 'देणें' हीं सारीं क्रियापदें आहेत, परंतु या क्रियापदांचे भाषेंतले प्रयोग तपासले तर त्यांच्यांत पुढील फरक आढळून येईल.

तो खातो – त्यानें खाल्ला	तो बसतो – तो बसला
तो देतो – त्यानें दिला	तो झोपतो – तो झोपला

यावरून वरील क्रियापदांचीं केवळ वर्तमानकाळाचीं रूपें घेतलीं तर तीं सर्वच क्रियापदें सारखींच आहेत असें वाटतें, परंतु भूतकाळाचीं रूपें घेतलीं तर त्यांच्यांतला सुप्त फरक प्रगट होतो. 'खाणें', 'देणें' यांचें भूतकाळांचें रूप 'त्यानें' या रूपाबरोबर येतें, उलट 'बसणें' 'झोपणें' यांचें रूप 'तो' बरोबर येतें. रूढ व्याकरणांत क्रियापदांचें सकर्मक व अकर्मक असें वर्गीकरण 'कर्म' या तत्त्वाधारें करण्यापेक्षां वाक्यरचनेच्या आधारें करायला हवें. 'तो कापतो' असें वाक्य घेतल्यास त्यांतलें क्रियापद सकर्मक आहे कीं अकर्मक आहे हें सांगणें कठीण. या वाक्याचे भूतकाळांत दोन प्रयोग शक्य आहेत. 'तो कापला' व 'त्यानें कापला' हे प्रयोग झाल्यानंतरच आपण सकर्मक क्रियापद कोणतें व अकर्मक कोणतें हें सांगूं शकतों इतकेंच नाहीं तर त्यांची अर्थनिश्चिति करूं शकतों.

भाषेंतल्या सुप्त व्याकरणाचें ज्ञान व त्या अनुषंगानें होणारी अर्थनिश्चिति यांच्यासाठीं भाषेंतल्या वाक्यप्रयोगांची शास्त्रीय छाननी करणें आवश्यक आहे. 'ते काळे आहेत' असें वाक्य घेतलें तर त्यांत दोन अर्थ आहेत असें आपण रूढ-

पणें म्हणूं. परंतु येथें मराठी भाषेंतल्या दोन वेगळ्या वाक्यरचना समव्याप्त बनल्या आहेत व त्यामुळें भाषेंत द्व्यर्थता निर्माण होते असें म्हणायला हवें. 'तो रोज एक आंबा खातो' आणि 'तो रोज एक मैल चालतो' अशीं दोन वाक्यें एकाद्या परकीय माणसाला दिलीं व कर्ता, कर्म, क्रियापद या रूढ व्याकरणी वर्गीकरणाचा मानदंड त्याच्यापुढें ठेवला तर तो 'आंबा' हें जसें 'खातो' चें कर्म आहे असें म्हणेल तसें 'मैल' हें 'चालतो' चें कर्म आहे असें म्हणेल. त्यानें केलेली चूक मराठींत व्याकरणकार त्याला कशी पटवून देईल ?

मराठींतील पुढील वाक्यें पहा—

१. तो खात आहे. २. तो उंच आहे. ३. तो शिक्षक आहे.

या वाक्यांतील 'आहे'चा अर्थ कसा ठरवावा ? 'आहे'चा एकच अर्थ वरील तीन वाक्यांवरून निश्चित करायचा म्हटला तर तें शक्य नाहीं. पण अर्थनिश्चित केल्याशिवाय आपणाला पुढें पाऊल टाकता येणार नाहीं असें तर्कशास्त्रज्ञ म्हणतात. भाषेंतल्या असल्या घोटाळ्यांनीं चिडून जाऊन रसेलसारखा थोर तर्कज्ञ इंग्रजींतील is संबंधीं असें म्हणतो कीं, "सामान्य भाषेंत एकाच शब्दानें तीन वेगवेगळे अर्थ व्यक्त केले जातात ही केवढी नामुष्कीची गोष्ट आहे !" (Introduction to mathematical Philosophy, p. 172) या ठिकाणीं रसेलचा तोल सुटलेला आहे असें भाषाशास्त्रज्ञाला वाटतें, कारण भाषेंत जें स्वाभाविकपणें घडलेलें आहे ती गोष्ट नामुष्कीची कशी ठरेल ? उकिरड्यावर उगवलेली कुत्र्याची छत्री ही वनस्पतिशास्त्रज्ञाच्या दृष्टीनें नामुष्कीची गोष्ट नाहीं. अभ्यासाचा विषय आहे. 'आहे'ला भाषेंत एकच अर्थ असावा हा तर्कशास्त्रज्ञाचा हट्ट चुकीचा आहे. त्याला पाहिजे तर त्यानें तर्कशास्त्रांत एकच विशिष्ट अर्थ मान्य करावा. पण भाषेंत असें नसावें हें ठरविणारा तो कोण ? भाषा ही सामान्य जनतेच्या जिभेवरची सरस्वती आहे. ती हव्या त्या तालावर नाचेल.

तर्कशास्त्रज्ञाला भाषा कशी चकवूं शकते हें दाखवायला रसेलच्या वाचनींत घडलेली एक गोष्ट या संबंधांत समर्पक ठरेल. रसेलनें आपल्या एका ग्रंथांत अर्थहीन वाक्याचें उदाहरण म्हणून Quadruplicity drinks Procrastination असें वाक्य उद्धृत केलें आहे. गेल्या महायुद्धाच्या एका आणीबाणीच्या प्रसंगीं युद्ध चालूं ठेवावें कीं युद्धविराम जाहीर करावा हें ठरविण्यासाठीं चार बलवान् राष्ट्रांचे पुढारी एकत्र आले व त्यांनीं दिवसभराच्या विवेचनानंतर हा विचार लांबणीवर टाकावा असें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं एका वर्तमानपत्रांत ही बातमी आली व हातांत दारूचे पेले घेतलेल्या त्या चौघा पुढाऱ्यांचा फोटो आला. फोटोखालीं लिहिलें होतें : Quadruplicity drinks Procrastination. अर्थहीन म्हटलें गेलेलें वाक्य केवढें अर्थपूर्ण बनलें !

आजचे लेखक व कवि भाषेला नव्या नव्या वळणानें हिंडवीत-फिरवीत आहेत. पुष्कळांना त्यांचें हें करणें अर्थशून्य वाटतें. पण त्यांच्या कार्याचें भाषाशास्त्रीय समालोचन होणें अगत्याचें आहे.

उखाहरनाचा काळ

देवीसिंग व्यंकटसिंग चौहान, मुंबई.

कविनंदन नामक कवीचें उखाहरन–कथा नांवाचें ९७३ ओव्यांचें एक जुनें मराठी काव्य डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांनीं संपादिलें व तें मुंबईच्या मराठी संशोधनमंडळानें शक १८८७ मध्यें प्रसिद्ध केलें आहे. एकनाथपूर्वकालीन जुन्या मराठीचें एक काव्य मराठी वाचकांना डॉ. प्रभुदेसाईंनीं उपलब्ध करून दिलें याबद्दल त्यांचे आभार. हें काव्य केव्हां लिहिलें गेलें याचा उल्लेख कोठेंच उपलब्ध झालेला नाहीं. प्रतलेखनाचा काल देखील अंधुकसाच उपलब्ध आहे. या काव्याच्या काल-निर्णयाबद्दल डॉ. प्रभुदेसाई यांनीं एवढेंच म्हटलें आहे कीं,—"मात्र हा कवि नरेन्द्र आणि चोंभा यांच्यानंतर काळांतला आहे, हें यावरून स्पष्ट होतें." कै. राजवाडे यांनीं उषाहरणकर्त्या चोंभा कवीचा काळ "शक १३०० पासून शक १४०० पर्यंतच्या काळांत, हा केव्हांतरी" असा अनुमानिला आहे. डॉ. प्रभुदेसाईंना चोंभाकवीचा हा काळ मान्य आहे, हें योग्यच होय.

कविनंदनाच्या उखाहरनाच्या मूळ प्रतीचा कागद पाहून तो कागद साधारणतः तीनशें वर्षांचा असावा असें तज्ज्ञांचे मत सम्पादकानें नोंदविलें आहे. प्रतीवर "झाडीमंडळ देसः चद्रपुर नगर" असा लिपिलेखनस्थलाचा आणि "क्रोध नाम संछरः जेष्ट मांस सुध संष्ठी" असा लेखनकालाचा उल्लेख केलेला आहे. शक १८८६ या वर्षी क्रोध संवत्सर होता. तीनशें वर्षांपूर्वी शक १५८६ वर्षी क्रोध संवत्सर होता. प्रतलेखकाच्या वरील माहितीवरून निदान प्रतिलेखनाचें वर्ष निश्चित होण्यास कांहीं अडचण असूं नये.

आतां या कविनंदनकृत उखाहरन–कथेच्या लेखनकालाचा ऊहापोह करावयाचा म्हणजे अंतःपुरावा हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. जुनी मराठी वा जिला महानुभावीय मराठी म्हणतात त्या मराठीभाषाविभागाचा काल शक १३५० पर्यंत मानावयास हरकत नाहीं. हा काल श्री. शं. गो. तुळपुळे मानतात त्याप्रमाणें इ. स. १३५० म्हणजे शक १२७२ पर्यंतच संपतो असें नाहीं. एकनाथपूर्वकालीन उपलब्ध भाषेवर जुन्या मराठीचे संस्कार प्रमाणतया अधिक सांपडतात. बदललेल्या नवीन भाषेच्या खुणा एकनाथांत सांपडतात. एकनाथांचा स्वर्गवास शक १५२१ तील. म्हणजे शक १४०० ते १५०० हा जुन्या मराठीच्या वेशान्तराचा काल म्हणतां येईल. चोंभाकृत उषाहरण हे राजवाड्यांच्या मताप्रमाण शक १४०० च्या पूर्वीचें मानलें, तर शक १४०० पर्यंत सर्वत्र महानुभावीय भाषा-विशेषांचाच अंमल चालू होता असें दिसून येत. म्हणजे महानुभावीय भाषाकालाची

मर्यादा शक १४०० च्या पुढें जाते. अलीकडे श्री. ज. शा. देशपांडे यांनीं कांहीं प्राचीन कविता, वास्तविक जुनी मराठी कविता प्रसिद्ध केली आहे. श्री. देशपांडे यांच्या ग्रंथांत संपादन दृष्ट्या फारसें विवेचन नाहीं असें म्हणावयास हरकत नसावी. परंतु त्यांनीं जुनी मराठी कविता मराठीजनांस उपलब्ध करून दिली, याचें श्रेय त्यांना दिलें पाहिजे. त्यांच्या चतुर्थ खंडांतील जुनी कविता पाहिली तरी देखील जुन्या मराठीची कालमर्यादा शक १४०० च्या पुढें डोकावत असल्याचें दिसून येतें.

जुनी मराठी भाषा कोणती यार्ची कांही गमकें कै. राजवाडे यांनीं चोंभा कवीच्या उषाहरणांत प्रस्तावनेंत दिलीं आहेत. तीं गमकें अशीं :—

(१) एकनाथी भाषेंत जया, तया, कासया वगैरे एकारविरहित रूपें फार. जुन्या मराठींत जेया, तेया, कासेया, अवचितेया इत्यादि शेंकडों रूपें आढळतात.

(२) एकनाथ व तदुत्तर कवींत कमीअधिक फार्सी शब्दांचा वापर आढळतो.

(३) नामांची, धातूंची व अव्ययांची उनुप्रत्ययान्त रूपें जुन्या मराठींत सर्वत्र आढळतात. एकनाथापासून या उनुप्रत्ययांचा लोप झालेला आहे.

(४) चतुर्थीचा थें प्रत्यय (तें शिवाय): ज्ञानेश्वरी, चोंभाकृत उषाहरण, नरेन्द्रकृत रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध इत्यादि जुन्या मराठी ग्रंथांत सांपडतो. नंतरच्या मराठींत मात्र 'थें' प्रत्ययाचा वापर लुप्त झाला. फक्त 'तें' प्रत्यय शेष राहिला.

वरील चार विशेष गमकांव्यतिरिक्त खालील व्यवच्छेदक गमकें जुन्या मराठींत अप्राप्य, पण एकनाथी व तदुत्तर भाषेंत पहावयास मिळतात.

(५) सध्या चतुर्थीसाठीं प्रयुक्त होत असलेला ला प्रत्यय जुन्या महानुभावीय मराठींत अनुद्गत आहे. एकनाथी भाषेंत तो सांपडतो. हा ला प्रत्यय फार्सी रा प्रत्ययापासून आला असें राजवाडे म्हणतात. पण तें खरें नव्हे. या व अन्य मुद्यांची चर्चा मी अन्यत्र केलेली आहे. हा ला प्रत्यय चोंभाकृत उषाहरणांत अप्राप्य व कविनंदनकृत उखाहरन कथेंत प्रयुक्त असलेला दिसून येतो.

(६) तृतीया प्रत्ययाची, नि, चेनि, केवळ न अशीं रूपें जुन्या मराठींत प्रयुक्त होतात. तेथें सरळ सरळ तृतीयेचा नें–प्रत्यय वापरांत नव्हता. तो एकनाथी भाषेंत रूढ झाला. कविनंदनकृत उखाहरनकथेंत तो सांपडतो.

(७) तृतीयेच्या अनेकवचनाला आज प्रयुक्त होत असलेला 'नीं' प्रत्यय महानुभावीय मराठींत नाहीं. तो एकनाथोत्तरकालांत प्रादुर्भूत झाला. तो कविनंदनांतहि प्रयुक्त नाहीं.

(८) चतुर्थीच्या अनेकवचनीं प्रयुक्त होणारा 'ना' प्रत्यय जुन्या मराठींत अनुद्गत आहे. त्याचा उद्गम व प्रयोग एकनाथोत्तरकालांत झाला.

हीं जुन्या मराठीचीं प्रमुख व्यवच्छेदक गमकें होत. याव्यतिरिक्त अनेक किरकोळ गमकें आहेत. त्याच्या विस्तारांत शिरण्याचें येथें प्रयोजन नाहीं.

वरील सर्व गमकांचा विचार करतां हा कविनन्दन चोंभा कवीच्या नंतरचा आहे असें दिसून येतें. डॉ. प्रभुदेसाई यांनीं हा कवि चोंभानंतर झाल्याचें सांगितलें आहे. पण कविनन्दनाच्या कालाची उत्तरमर्यादा कोणती, यांसंबंधीं डॉ प्रभुदेसाई यांनीं कोणतीही सूचना केलेली नाहीं. वरील गमकांचा व एकनाथीं भाषेचा विचार केल्यावर असें वाटतें कीं हा कवि एकनाथाच्या अगोदर होऊन गेला. वरील सर्व गमकें एकनाथी भाषेंत बहुधा लुप्त झालेलीं आहेत. त्यांची भाषा महानुभावीय भाषेपेक्षां अगदीं वेगळी वाटते. कविनन्दन हा कवि महानुभावी व एकनाथी भाषांच्या संधिकालांतील कवि होय, हें बारकाईने पाहिल्यास दिसून येईल. महानुभावीय भाषागमकांचा कविनन्दनाच्या भाषेंत ऱ्हास किंवा झिजणूक सुरू झालेली असली तरी ही प्रक्रिया त्याच्या भाषेंत चालू असल्याचें दिसून येतें. म्हणून त्यांची भाषा एकनाथापेक्षां चोंभाकवीलाच अधिक जवळची वाटते. कविनंदनांत तृतीया अनेकवचनी 'नी' व चतुर्थी अनेकवचनी 'ना' प्रत्यय यांचा उद्गम झालेला नाहीं. फक्त चतुर्थीच्या 'ला' प्रत्ययाचा वापर कविनंदनांत दिसून येतो. प्रत्ययरूपानें स्थिरावलेला हा प्रत्यय या काव्यांत बाहुल्यानें दिसून येतो. या काव्यांत कलम (ओवी १४६, १६६), दुकान (७८८), जिरेटोप (४३५) मधील जिरा शब्द, बेमुध (३०८) मधील बे (वि, विना) हा उपसर्ग, आणि चीज करणे (८२६) व वज करणे (३४२) असे एकूण सहा शब्द व वाक्प्रचार फार्सीतून आलेले वापरण्यांत आले आहेत. बीद शब्द (ओ ९६६) हा अरबी विदाअ शब्दापासून निघाला असें सम्पादकांनीं सांगितलें आहे. पण तें खरें नव्हे. बीद या शब्दाचा विदाशीं संबंध नाहीं. बीद, बीदी हा मराठी शब्द सर्वत्र जुन्या मराठींत प्रयुक्त होत आलेला आहे. पाहा ज्ञानेश्वरी ६-३९८, ७-१०३ व १८-१२४६, शिशुपालवध ९७, आणि रुक्मिणीस्वयंवर ८५. हा शब्द वीथिका, वीथि शब्दापासून आल्याचें भावे यांनीं सांगितलें आहेच. शक १२४२ मध्यें मुसलमान जेत्यांनीं महाराष्ट्र ओलांडून विजापूर येथें मशीद बांधल्याचा मराठी शिलालेख मराठी वाचकांच्या नजरेंत आहेच. कविनंदनाच्या कालापर्यंत

या संपर्काला २०० वर्षें लोटून गेलीं होतीं. वरील शब्द फार्सींतील नित्योपयोगी शब्द आहेत. फार्सीव्यतिरिक्त महाराष्ट्रांत, मुसलमानांच्या तोंडांत व त्यांच्याशीं संबद्ध असलेल्या हिंदूच्याहि कानांवर, खडीबोली किंवा दक्खिनी हिंदी म्हणजे आजच्या राष्ट्रभाषा हिंदीची पूर्ववर्ती भाषा मुसलमानांच्या आगमनापासून दक्षिणेंत वावरत होती. त्या दक्खिनी हिंदींत हे शब्द नित्यप्रयुक्त आहेत. म्हणून त्यांचा प्रवेश मराठींतहि झाला. एकनाथाच्या ग्रंथांतही असे कांहीं शब्द शिरलेले आहेत. प्रयुक्त साज शब्दहि फार्सी नव्हे. तो सज्जपासून निघालेला आर्यभारतीय शब्दच आहे.

एकनाथापेक्षां अधिक जुनेपणाची आणखी एक साक्ष उभी करतां येण्यासारखी आहे. महानुभावकालीन व अलीकडील साहित्यिकांच्या कृति पाहिल्या तर असें दिसून येते कीं, उत्तरकालीनांत तद्भव शब्दांचा वापर पूर्वकालीनांपेक्षां उत्तरोत्तर कमी कमी होत गेलेला आहे. व्याकरणविशेष बाजूस ठेवले, तरी तद्भव शब्दांच्या वापराचा मुद्दाही महत्त्वाचा व कदाचित् निर्णायक बनूं शकेल. एकनाथी भाषेपेक्षां आजच्या मराठींत तद्भव शब्दांचा वापर कमी आहे. तसेंच एकनाथी भाषेंत महानुभावीय भाषेंत–त्यापेक्षां तद्भवांचा वापर फारच कमी आहे. एकनाथ व कविनंदन यांच्या लिखाणाकडे या दृष्टीनें पाहिलें तर एकनाथ हे निश्चितपणें नंतरचे असल्याचें प्रत्ययास येतें. अनियाळ (५६१, ७६५); आश्रनी (३५९, ७८२), उमट (३७१, ४३०), खान (७८७), खाणे (४८४), दादुला (प्रतिस्पर्धी ४१, ३८९), बीद (९६६), भगणे (भग्न, पराभूत होणे, ४७०), बैजार (वाणिज्यकार ७९१), साहानीया (शृंगनादिका ५६२, ७६४), सिंतरणें (फसविणे ३७१), इत्यादि शब्द वरील विधानाची साक्ष देतील. हीच प्रवृत्ति मराठी भाषेंत गेल्या ७०० वर्षांपासून दिसून येते. ती केवळ मराठीचीच प्रवृत्ति आहे असें नव्हे. सर्व आर्यभारतीय भाषाकुलांत, व द्राविडकुलांतसुद्धां, तत्सम संस्कृत शब्दांचा वापर उत्तरोत्तर अधिक होत आलेला आहे. आजदेखील ही प्रवृत्ति दिसून येते.

सन्धिकालाचीं जुनीं व नवीं पावलें या उखाहरनकर्थेत एकत्र दिसून येतात. जरी तृतीयेच्या अनेकवचनी 'नीं'–प्रत्ययाचा उद्गम झालेला नसला तरी एकवचनासाठीं 'ने' प्रत्यय अनेकवेळां प्रयुक्त झालेला आहे हें अवस्तेनं (३२३), तीन्हें (तिन्हें, तिनें, १४४) इत्यादि रूपांवरून कळून येतें. त्याचबरोबर ज्ञानेश्वरीभाषेंतील आगळेनी घाये (४२७), खांड्याचेनी बळ-बळें (२३) इत्यादि जुनी तृतीयादेखील त्याच्या काळीं चालू होती, हें दिसून येते. वन्ही या तृतीयेच्या जुन्या मराठींतील प्रत्ययाचा वापरही या काव्यांत दिसून येतो. पाहा- अनोर्ध सा मासवन्ही : होता उखेचीये मंदीरी (३६६).

वरील सर्व गमकांचा विचार करतां असें दिसून येते कीं, कविनन्दनाची ही उखाहरन-कथा शक १४९० च्या आगेमागें लिहिली गेली असावी. हें काव्य महानुभावीय कालांतील जुनी मराठी व एकनाथी भाषा यांच्या संधिकालाचें प्रतीक आहे. म्हणून वरील वर्ष हें या काव्याचा लेखनकाल मानावयास साधारणपणें अडचण नसावी.

कविनंदनाची ही उखाहरनकथा जुन्या मराठीच्या परंपरेंतील आहे याचा आणखी एक पुरावा म्हणजे त्यानें मोजलेली अखंड ओवीगणना. या काव्यांत एकूण ९७३ ओव्या आहेत. ती संख्या त्यानें अखंडित मागल्याच्या पुढें मोजलेली आहे. ही महानुभावीय विद्वानांची पद्धति होय. शिशुपालवध काव्य अनेकप्रसंगी असूनही भास्करभट्टानें आपली ओवीसंख्या मागल्याच्या पुढें एकसारखी मोजलेली आहे. तसेंच नरेन्द्रकृत रुक्मिणीस्वयंवर, रवळोबासकृत सह्याद्रिवर्णन, उद्धवगीता, वळाहरण इत्यादि काव्यग्रथांत ओवीगणना अखंडच आहे. हीच जुनी पद्धति चोंभा कवीनें आपल्या उषाहरण काव्यांत अवलम्बिलेली आहे. कविनन्दनानें चोंभाकवीचें काव्य पाहिलेलें होतें याचा सुगावा डॉ. प्रभुदेसाई यानीं घेतलेला आहेच. या जुन्या पद्धतीच्या अनुरोधानें कविनन्दनानें आपल्या काव्याची ओवीगणति अखंडित अशी मागल्याच्या पुढें मोजून केलेली आहे. परंतु डॉ. प्रभुदेसाई यांनीं सन्दर्भ उद्धृत करतांना विनाकारण घोटाळा करून टाकलेला आहे. ओवीगणना अखंड असतांना त्यांनीं निष्कारण पृष्ठाचा अंक संदर्भात घालून टाकला आणि ओवी-गणनेंतील शतकाच्या अंकाला अर्धचंद्र दिला. त्यामुळें वाचकांची व अभ्यासकांची विनाकारणच गैरसोय झाली. तसें करण्याचें कारण नव्हतें. सरळ एकसंख्य ओवीचा संदर्भ देतां आला असता. तसा देतां येतो.

चोंभा व कविनन्दन या दोघांनीं आपापल्या काव्यांत प्रसंगाची योजना केलेली आहे. ही कल्पना त्यांना ज्ञानेश्वरीवरून सुचली असावी. या कल्पनेचा त्यांनीं स्वीकार केला तरी जुनी पद्धति त्यांनीं सोडली नाहीं. ओवीगणति त्यांनीं अखंडच ठेविली.

व्युत्पत्ति व अर्थ

जुन्या मराठी ग्रन्थांतील काव्य महत्त्वाचें नसून त्याची भाषा महत्त्वाची आहे हें विद्वन्मान्य आहे. जुन्या मराठी ग्रन्थांतील शब्दांची व्युत्पत्ति शोधणें अत्यन्त महत्त्वाचें, किम्बहुना एक प्रमुख अंग आहे असें म्हणणें योग्य होईल. वस्तुतः चोंभा-कृत उषाहरणाच्या सम्पादनानें कै. राजवाडे यांनीं हें ढळढळीत स्पष्ट केलें आहे. परंतु त्या गोष्टीचा स्वीकार अद्यापि पूर्णांशानें झालेला नाहीं हें खेदानें म्हणावें लागतें. कवीची माहिती देणें, प्रतीचा इतिहास देणें, किरकोळ तेच तेच व्याकरण-

विशेष देणें इत्यादीवरच ग्रन्थसम्पादन सम्पतें. जुन्या मराठीबद्दलची ही सम्पादन-पद्धति अत्यंत असमाधानकारक आहे. या सम्पादनाचा आत्मा भाषा व भाषाशास्त्र आहे. या दृष्टीनें चोंभाकृत उषाहरणाचेदेखील सम्पादन होणें आवश्यक आहे असें माझें मत आहे.

अशा ग्रन्थसम्पादनांत डॉ. मु. ग. पानसे यांच्या मराठी आद्यग्रन्थ श्रीपति-भट्टकृत ज्योतिषरत्नमाला या ग्रन्थाचे सम्पादन चांगलें म्हणावें लागेल. अशा सम्पादनाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे शक्यतो सर्वशब्दसूची देणें. जितका ग्रन्थ जुना, प्राचीन तितकी या सर्व शब्दाची व्याप्ति अधिक. श्री. पानसे यांनीं सर्वशब्द-संग्रह केलेला आहे. परंतु कविनन्दनकृत उखाहरनांत, सर्वशब्दांची आवश्यकता नसली, तरी दिलेले शब्द अगदीं अपुरे आहेत असें कोणीही अभ्यासक मान्य करील. नमुन्यादाखल खान (ओवी ७८७–दरवडा), खातां (४८४, दरवडा घालतां, लुटतां) या शब्दांचा अर्थ दिलेला नाहीं. खान–जेवणें व खान–खाण, खनि या अर्थाबरोबर दरवडा अर्थ सहसा विसरण्यांत येतो. वरील अर्थ देण्यांत यावयास हवे होते. दाटून (ओ. ८४०–मुद्दाम, हेतुपुरःसर) हा शब्द आजदेखील याच अर्थानें मराठींत रूढ आहे हे सांगावयास पाहिजे होतें. धवळार (ओ. ७८८–माडी असलेले, चुनेगच्ची असलेले घर, प्रासाद) याच्या अर्थाचा वा व्युत्पत्तीचा उल्लेख योग्य ठरला असता. राज्य करणे (ओ. ३५३) वाक्प्रयोगाचा एक अर्थ सरळ असला तरी मराठी कथावाङ्मयांत केवळ नांदणे हा अर्थ रूढ आहे हें सांगितलें असतें तर बरें झालें असतें. हाच अर्थ वरील ओवींत आहे. वचणे (ओ. ४८९) याचा अर्थ जाणें अनुल्लिखित आहे. वैजार (ओ. ७९१) शब्दाची व्युत्पत्ति, वणिज्य अधिक कार, वइजकार, वइजआर वैजार अशी देउन व्यापारी, असा अर्थ दिला असता तर स्पष्टता आली असती.

जुन्या मराठींतील शब्दांची व्युत्पत्ति पाहिलीच पाहिजे असें अजून अभ्यासकांना पुरेसें पटलेलें आहे असें दिसत नाहीं. याबद्दल मराठी साहित्य-पत्रिकेंतील एका लेखांत मी चर्चा केलेली आहे. प्रस्तुत काव्यांत दादुला शब्द (४१,३८०) जसा वापरलेला आहे, तसा तो ज्ञानेश्वरी (१.१३५), रुक्मिणीस्वयंवर (८४३) इत्यादि ग्रन्थांत आलेला आहे. परंतु या शब्दाच्या खऱ्या अर्थाची छाननी कोठेंच केलेली आढळून येत नाहीं. डॉ. प्रभुदेसाई यांनींहि लक्ष दिलेलें नाहीं. जुने दिलेले अर्थच त्यांनीं आपल्या शब्दकोशांत घातले आहेत. कोशांत शूर, वीर पुरुष असा अर्थ त्यांनीं दिलेला आहे. परंतु हा अर्थ मूळ, खरा व योग्य नाहीं हें सहज दिसून येईल. ती ओवी अशी :

मग बानासुर बोलीलाः मजसी संग्रामी भीडे असा नाहीं **दादुलाः**

सहश्रभुजाचें वोझ मजलाः बहुत जाल असे ॥ ४१ ॥

येथें बाणासुराचा आपल्या बाहुबलाचा आत्मविश्वास स्पष्ट दिसत आहे. तो सहस्रभुज असून शक्तिशाली, शूर आहे. म्हणून तो म्हणतो कीं त्याच्याशीं दोन हात करील असा दादुला अद्यापि होणें आहे. येथें दादुला शब्दाचा केवळ 'शूर' असा अर्थ घेणें अयोग्य होय. येथें दादुला शब्दाची व्युत्पत्ति अत्यंत आवश्यक व अपरिहार्य आहे. दादुला शब्द द्वंद्व आणि ल स्वार्थे यांचा सामासिक तद्भव शब्द आहे. दादुला म्हणजे बरोबरीच्या शौर्यधैर्यानें लढूं शकणारा जोडीदार, प्रतिस्पर्धी असा अर्थ आहे. जुन्या मराठींतील दंदी, दंदिया शब्ददेखील याच अर्थानें आहे. दादुला शब्द नवरा, नोवरा या अर्थानेंही वापरला जातो. एकनाथांचे 'दादला नको ग बाई ऽ ऽ' हें भारूड प्रसिद्ध आहेच. येथें दादला, दादुला शब्दाचा अर्थही जोडीदारच आहे. पतिपत्नी हे जन्माचे जोडीदार असतात म्हणून सकस जोडीदार तो दादला असा यौगिक अर्थ या शब्दाला प्राप्त झाला. हे यौगिक अर्थ येथें उपयोगी पडत नाहींत. शूर, वीर अशा प्रतिद्वंद्वाला हा शब्दाला लागतो. म्हणून त्याला शूर असा रूढार्थ प्राप्त झाला. परंतु मूळ अर्थ वरीलप्रमाणें असून तोच सुयोग्य आहे. एकनाथांना भवसागरांतील द्वंद्व, जोडीदारी तोडावयाची होती हें दिसून येईल.

उमठ (३७१, ४३०) शब्दाचा अर्थ स्पष्ट, आवेशयुक्त असा दिलेला आहे. व्युत्पत्तीचा निर्देश नाहीं. हा शब्द उन्मथ या शब्दापासून निघालेला आहे. या उमठ शब्दाचा अर्थ उर्मटपणा, उद्धटपणा असा घेणें युक्त होईल. म्हणून सम्पादकानीं दिलेले अर्थ योग्य दिसत नाहींत. पाउठी (३५७) शब्दाचा पायरी म्हणून दिलेला अर्थहि योग्य नव्हे. हा शब्द पाद अधिक वट्ट या शब्दापासून बनलेला आहे. पाय आणि वट्ट यापासून पाऊट हा शब्द वाट, मार्ग अथवा पाऊलवाट या अर्थी निष्पन्न झाला. त्यापासून पाउठी हा कर्तृवाचक शब्द बनलेला आहे. त्याचा अर्थ प्रवासी, वाटसरू.

आनी पंडूचा रमताची प्रान गेलाः आनी स्वर्गीची पाउठी जालाः ३५७


या वाक्यांत पंडु स्वर्गाची पायरी झाला म्हणजे काय ? तो स्वर्गीचा वाटसरू झाला असें म्हटल्यानें अर्थप्राप्ति चांगली होते. येथें स्त्रीलिंगाची अडचण येते. कदाचित् मागील शब्द स्वर्गींचा असा असूं शकेल. स्त्रीलिंगी पाठच योग्य मानल्यास पाउठी शब्दाचा अर्थ पाऊलवाट होईल. व्युत्पत्तींत बाध येत नाही.

अव्रळीती (७२०) या शब्दाचा अर्थ आक्रोश करणें असा दिलेला आहे. संदर्भावरून तो योग्य दिसतो. या शब्दाचें मूळ संस्कृत ब्रू, ब्रवीति हा धातु

असावा. त्याला आ हा उपसर्ग लागलेला आहे. मी धाराशीव (जि. उस्मानाबाद) भागांतील आहे. तिकडे खेडेगांवांतून आजही आब्राळणें, आबराळणें हें क्रियापद वापरलें जातें. परंतु अर्थामध्यें भिन्नता आहे. आमच्या भागांत या शब्दाचा अर्थ, एकाएकीं आलेल्या संकटानें गांगरून जाणें, गर्भगळित होणें असा होतो. झाडींतून जात असतां वाघरूं धावून अंगावर आल्यास कोणीही आबराळून जातो. अशा संदर्भात हा शब्दार्थ तिकडे रूढ आहे. अशा गर्भगळित अवस्थेंतील बोलणें म्हणजे आब्राळणें. परंतु या क्रियेंत बोलण्यापेक्षां भयकम्पित होण्याचा भावच अधिकतम आहे. अनिरुद्धाची अशी वातावरण झालेली पाहून आईबाप गांगरून जाणें, भयकम्पित होणें, साहजिक आहे. बीद (९६६) शब्दाचा उल्लेख वर आलेलाच आहे. खान (७८७) शब्दाचा अर्थ सम्पादकांनी तळटीपेंत तलवार असा दिलेला आहे. तो योग्य नव्हे हें वरती आलेलें आहे. भगला (४७०) शब्दाचा अर्थ सम्पादकांनीं भागला अर्थात थकला, श्रमित झाला असा दिला आहे हें योग्य नव्हे. भगला म्हणजे भंगला, भग्न झाला, पराजित–पराभूत झाला असा अर्थ आहे, हें सहज ध्यानीं येतें. हें क्रियापद ' भग्न ' शब्दापासून बनलेलें आहे.

' वज करणे ' या फार्सीतून आलेल्या वाक्प्रचाराचा अर्थ केवळ व्यवस्था करणें असा नाहीं. असलेल्या ऐपतींत नीटनेटकेपणानें राहाणें, कोंड्याचा मांडा करणें असा या वाक्प्रचाराचा उपयोग आजदेखील माझ्या प्रदेशांत वापरांत आहे. वजेनें भाकरी खाणें म्हणजे व्यवस्थित, खाऊनपिऊन चांगलें असणें, सुखी असणें, असा प्रयोग खेड्यांतून अजूनहि होत आहे. फार्सीत जिरह म्हणजे लोखंडी, जाळीदार शिरस्त्राण. तोच अर्थ टोप शब्दाचा आहे. एक फार्सी व एक मराठी वा तद्भव अशा दोन समानार्थक शब्दांचा हा सामासिक शब्द. अर्थ तोच. चीज करणे याचा अर्थ रूढावलेला असल्यानें बहुधा दिलेला नाहीं. या वाक्प्रचाराचा अर्थ सार्थक करणें असा आहे. चीज करणें व वज करणें हे दोन्ही वाक्प्रचार दक्खिनी हिंदीच्या चिरसाहचर्यानें मराठींत आलेले आहेत. ते प्रत्यक्ष रीतीनें फार्सीतून आलेले नव्हेत. फार्सी व मराठीच्या दरम्यान् महाराष्ट्रांत दक्खिनी हिंदी या बोलभाषेचें माध्यम शक १२५० पासून शक १६१० पर्यंत अव्याहतपणें उपलब्ध होतें, ही गोष्ट फार्सीच्या मराठीवरील प्रभावाचा विचार करतांना ध्यानांत घेतली पाहिजे. मात्र या गोष्टीकडे मराठी अभ्यासूंचें जावें तसें लक्ष गेलेलें नाहीं.

२ जून १८८६ रोजीं जोतीराव फुले यांनीं मामा परमानंदांना लिहिलेलें पत्र



'शेतकऱ्याच्या असूडा'चा शोध

स. गं. मालशे

कै. जोतीराव गोविंदराव फुले यांनीं २ जून १८८६ रोजीं मामा परमानंद यांना लिहिलेल्या पत्राचें छायाचित्र या अंकांत छापलेलें आहे. महाराष्ट्राच्या या आद्य कर्त्या सुधारकाच्या हस्ताक्षराचा दुर्मिळ नमुना म्हणून या पत्राला महत्त्व आहेच, पण 'शेतकऱ्याचा आसूड' या फुल्यांच्या पुस्तकाची अचूक माहिती कळण्याच्या दृष्टीनें हें स्वदस्तुराचें पत्र विशेष महत्त्वाचें आहे.

कै. फुल्यांविषयीं चरित्रात्मक लेखन करणारांनीं 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकासंबंधीं भिन्न भिन्न मजकूर लिहून ठेवलेला आहे. तो असा :

१. पाटीलकृत चरित्र :

(अ) "या वेळीं [सन १८७७ च्या सुमारास] जोतीरावांनींहि शेतकऱ्यांच्या बिकट परिस्थितीवर 'शेतकऱ्याचा आसूड' या नांवाचे चाळीस चाळीस पानांचे तीन निबंध ताबडतोब छापून ते सरकारी अधिकाऱ्यांना नजर केले; त्याचवेळीं हे दोनहि निबंध दीनबंधू पत्रांतून प्रसिद्ध झाले."[१]

(ब) "समाजाचा झेंडासमारंभ [स. १८८५] आटोपल्यानंतर जोतिरावांचें लक्ष थोडें निरनिराळ्या विषयांवर लहान लहान निबंध लिहिण्याकडे लागलें. '**आसूड**' निबंधाचे तीन भाग त्यांनीं या पूर्वीच लिहिले होते. त्याचा चौथा भाग त्यांनीं या वेळीं लिहिला. पण तो भाग कुरूळ (माळ्याचें) येथील रा० **कोंडाजी रावजी पाटील** यांनीं वाचावयास घेतला, तो त्यांनीं परत दिला नाहीं. त्यामुळें जोतिरावांना त्यावेळीं तो प्रसिद्ध करतां आला नाहीं."[२]

(क) (ब) मध्यें दिलेल्या परिच्छेदावरील पदटीपेंत चरित्रकारांनीं आश्वासन दिलें आहे :—

"आसूडाचा तिसरा भागहि त्यावेळीं प्रसिद्ध झाला नाहीं. त्याची हस्तलिखित प्रत अजून असून लौकरच तो भाग प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत लेखकाचा विचार आहे."[३]

२. मानकरकृत चरित्र:

(अ) "त्यांनीं गुलामगिरी...शेतकऱ्याचा आसूड भाग ४...इत्यादि लहान मोठे ग्रंथ लिहिले"[४]

---

१. पं. सि. पाटील, **महात्मा जोतिराव फुले यांचें चरित्र**, चिखली, १९२७, पृ. ९२–९३. २. **तत्रैव**, पृ. ११७. ३. **तत्रैव**, पृ. ११७. ४. आ. अ. मानकर, **महात्मा फुले**, प. आ., पुणें, १९४०, पृ. ४०.

(ब) "१८६९ सालीं महात्मा फुले यांनीं आठ भागांचा 'शिवाजीचा पोवाडा' प्रसिद्ध केला. नंतरचा चार भागांचा 'शेतकऱ्यांचा आसूड' आणि ब्राह्मण्याचें कसब' हीं त्यांचीं पुस्तकेंदेखील त्याच वर्षांतील आहेत."[५]

३. दरेकरकृत निबंध : "१८६९ सालीं त्यांनीं मुंबईस 'शिवाजीचा पवाडा' प्रसिद्ध केला. याचे ८ भाग आहेत. त्याच वर्षी पुण्यास 'शेतकऱ्यांचा आसूड' प्रसिद्ध केला. त्यांत ४० पानांचे दोन निबंध आहेत. या विषयावर आणखीही दोन निबंध त्यानीं लिहिलेले आहेत."[६]

४. घोरपडेकृत चरित्र : "'शेतकऱ्याचा आसूड' हें पुस्तक १८६९ सालीं पुण्यास प्रसिद्ध झालें. यांत चाळीस पानांचे दोन निबंध आहेत. याच विषयावर आणखीहि त्यांनीं लेखन केलें."[७]

५. खानोलकरकृत निबंध : "अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक" मध्यें वाङ्मय या सदरात सदर पुस्तकाचें नांव दिलेलें नाहीं.[८]

६. सरदारकृत निबंध : 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' मधील निबंधांत ग्रंथांच्या यादींत या पुस्तकाची नोंद पुढीलप्रमाणें आढळते :[९]

"४ शेतकऱ्याचा आसूड भाग १–४ पुणे (?). तसेंच याच निबंधांत अन्यत्र म्हटलें आहे.

"इ. स. १८७७ सालीं महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडला, त्यावेळीं शेतकऱ्यांची अन्नान्न दशा होऊन गेली, तेव्हां जोतीरावांनीं 'शेतकऱ्याचा आसूड' या नांवाचे चाळीस चाळीस पानी दोन निबंध लिहिले, आणि ते ताबडतोब छापून घेऊन सरकारी अधिकाऱ्यांकडे रवाना केलें. त्यांत त्यांनी शेतकऱ्यांच्या केविलवाण्या स्थितीचें यथार्थ चित्र रेखाटून त्यांना सर्वतोपरी सहाय करणें सरकारचें आद्य कर्तव्य आहे असें दाखवून दिलें होतें. कांहीं वर्षांनंतर याच विषयावर त्यांनीं आणखी दोन निबंध लिहिले, परंतु ते प्रसिद्ध झाले नाहीत. या निबंधांत ते एके ठिकाणीं म्हणतात, "ब्राह्मणेतर लोकांच्या धर्मासंबंधीं व सामाजिक स्थितीसंबंधीं मी जों जों विचार करितों तों तों मला एखाद्या महासागराकडे दृष्टि फेंकल्यासारखें

---

५. तत्रैव, दु. आ., पुणें, १९४९, पृ. ६६. ६. द. स. दरेकर, "कै. महात्मा जोतिराव फुले", **बहुजनसमाजांतील कर्मवीर**, पुणें. १९४४, पृ. ७. ७. ए. के. घोरपडे, **महात्मा फुले चरित्र व कार्य**, पुणें, १९५३ पृ. ४५ ८. गं. दे. खानोलकर, **अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, तृ. खं.**, मुंबई, १९४९, पृ. १३८. ९. गं. बा. सरदार, **महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी**, दु. आ., पुणें, १९५१, पृ. १३६–१३७.

होतें. " गोरगरिबांच्या सुखदुःखाशीं जोतिराव किती समरस झाले होते त्याचे दाखले त्यांच्या चरित्रांत ह्याप्रमाणें जागोजाग आढळतात."[१०]

७. मंगुडकरकृत प्रबंध : " महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ " या प्रबंधाच्या शेवटीं असलेल्या संदर्भसूचींत पुढील नोंद आढळते :—

" शेतकऱ्याचा आसूड—ज्योतिबा फुले "[११]

८. पिंपळेकृत चरित्र : " आजतागायत त्यांनीं आपल्या जीवनांत 'शिवाजी राजाच्या', 'मंगलाष्टकें व धार्मिक विधी,' 'इषारा,' " शेतकऱ्याचा आसूड " भाग, 'सत्यपाल अभंग,' 'ब्राह्मणी धर्मावरील पांच अंकी नाटक, 'तृतीय रत्न नाटक,' 'अस्पृश्यांची कैफियत' कविता व अभंग आदि साहित्य लिहिलें."[१२]

९. समग्र ग्रंथ : अधिकारी प्रकाशनानें प्रसिद्ध केलेल्या तथाकथित 'समग्र ग्रंथा'च्या प्रस्तावनेंत म्हटलेलें आहे.

" शेतकऱ्याचा आसूड हे **चार पांच पानांचें पत्रक** [illegible] आम्हांस प्राप्त करूनहि उपलब्ध झालें नाहीं."[१३]

आतां या नोंदींची थोडक्यांत छाननी करूं या. शात असलेली माहिती निवेदन करणें एवढाच क्र. १ मध्यें रोख दिसतो. बाकीच्यांनीं प्रायः याच माहितीच्या आधारानें काही कमी जास्त पदरची भर घालून उल्लेख केलेले दिसतात. क्रमांक १ च्या नोंदीवर कांहीं शंका उत्पन्न होतात : (१) सरकारला जे निबंध नजर केले ते मुद्रित होते काय ? (२) दीनबंधूंत 'दोनही' निबंध प्रसिद्ध झाले कीं 'तीनही' झाले ? (३) 'आसूड' निबंधाचा चौथा भाग सरकारकडे पाठविलेला होता कीं नाही ?

'सेवक'कार खानोलकर आणि 'मानकरी'कार सरदार यांनीं अनुक्रमें अनुल्लेख आणि प्रश्नचिन्हांकित उल्लेख करून एक प्रकारें प्रामाणिक नोंद केली आहे, असें म्हटलें पाहिजे.

मराठी संशोधनमंडळाला या ग्रंथाची मायक्रोफिल्म फुल्यांचे इंग्रजी चरित्रकार श्री. धनंजय कीर यांनीं उपलब्ध करून दिली आहे. तीवरून या ग्रंथाची एकूण पृष्ठसंख्या ९७ असून प्रकरणें पांच आहेत. या पांच प्रकरणांची पृष्ठसंख्या ८९ असून 'खासा मराठा म्हणविणारा' आणि 'कबीरपंथी शूद्र साधू' या शेवटीं जोडलेल्या दोन परिशिष्टांसाठीं ९० ते ९७ ही पृष्ठें खर्च झालेलीं आहेत.

---

१०. **तत्रैव**, पृ० १५५. ११. मा. प. मंगुडकर, **महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ**, पुणें, १९५४, पृ. ६१. १२. श्री. पु. पिंपळे, **युगप्रवर्तक महात्मा फुले**, अकोला, १९६१, पृ. १२०. १३. **जोतीराव फुले समग्रग्रंथ**, " प्रस्तावना ", पुणें (अधिकारी प्रकाशन), १९६३.

वरील क्र. ३ मध्यें उल्लेखिलेल्या दरेकरांच्या लेखावरून 'शिवाजीच्या पवाड्या'-प्रमाणें 'आसूड' हाहि एक पवाडाच असावा, असा बोध होतो. पण तो चुकीचा आहे, हें उघडच दिसतें. हा समग्र ग्रंथ गद्य आहे. हा ग्रंथ मुद्रित स्वरूपांत प्रसिद्ध झाल्याचा बोध कांहीं चरित्रांवरून होतो, तो वस्तुस्थितीला धरून नाहीं. यांतलीं कांहीं प्रकरणें 'निबंध' स्वरूपांत 'दीनबंधू' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालीं असणे शक्य आहे. तसेंच या ग्रंथांतील प्रकरणें सलगपणें लिहिली गेलीं नसावींत. कारण वर ज्या दोन परिशिष्टांचा उल्लेख केला, त्यांचे प्रारंभ पाहिल्यास हें उघड होतें. पहिल्या म्हणजे 'खासा मराठा म्हणविणारा' या परिशिष्टाची सुरुवात अशी आहेः

'आसुडाचा दुसरा भाग संपून दुसरें काम हातांत घेतों आहे इतक्यांत, एक ब्राह्मण चक्रीदार पागोटें घातलेला गृहस्थ माझ्यापुढें येऊन लोडाशीं टेकून बसल्यानंतर...'

तसेंच 'कबीरपंथी शूद्र साधू' या परिशिष्टाचा प्रारंभ असा आहेः—

"आसूडाचा तिसरा भाग लिहून तयार केल्यानंतर दुसरे दिवशीं तिसऱ्या प्रहरीं... एक शूद्र जातीचा कबीर पंथी...साधू घराचे अंगणांत येऊन चाकावर बसला..."

ग्रंथ संपवितांना ८९ पृष्ठावर शेवटीं फुल्यांचें समग्र नांव असून 'तारीख १८ बुधवार माहे जुलई सन ई. १८८३ पुणें पेठ जुनागंज' असा मजकूर आहे. पहिल्या परिशिष्टानंतर 'तारीख २ नोहेंबर सन १८८२ इ. पुणे,' तर दुसऱ्या परिशिष्टानंतर 'पुणे, तारीख ६ एप्रिल सन १८८३ ईसवी' असे उल्लेख आहेत. यावरून परिशिष्टें लिहून झाल्यावर त्यांनीं पुस्तक पुरें केलें, हें स्पष्ट दिसतें.

यावरून असें वाटतें कीं, हा ग्रंथ सुटा सुटा लिहिला गेला आणि नंतर सरकारला सादर करण्यासाठीं त्याचें निवेदनात्मक संकलन करण्यांत आलें. या हस्तलिखितावरील इंग्रजी नोंद पुढील प्रमाणें आहे :—

Marathi Manuscript
Shetkaryacha asud or
Cultivator's Whip-cord
by
Jyotiba Govindrao Phule
for the defence of shudras presented to H.E.Rt. Hon'ble Sir Frederick Temple Hamilton Temple, Earl of Dufferin Viceroy.
Signed by the author (P.89) Poona, 18th July 1883.
VII, 97 p. 33 cm.

ग्रंथकारानें पुस्तकाचा कांहीं हस्तलिखित भाग किंवा समग्र ग्रंथ अनेकांना ऐकविलेला होता, असें दिसतें. कारण सयाजीराव महाराजांनीं तो ऐकला असल्याचा तसेंच पुणें, मुंबई, ठाणें, जुन्नर, ओतूर, हाडपसर, वंगणी, माळ्याचें कुरूल वगैरे गांवच्या शूद्र गृहस्थांनीं कित्येक वेळां ऐकला असल्याचा उल्लेख उपोद्घातांत केलेला आहे.

हा ग्रंथ मुद्रित होऊन प्रसिद्ध झाल्याचा जो सूर चरित्रात्मक लेखनांमधून दिसतो तो निखालस चुकीचा आहे. फुल्यांच्या स्वदस्तुराच्या पत्राच्या या अंकांत दिलेल्या छायाचित्रावरून हें स्पष्ट होण्यासारखें आहे. हें समग्र पत्र मामा परमानंदांच्या चरित्रांत बालबोध लिपींत छापलें आहे, त्यांत शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणें दिलेला आहे :—

"आठ वर्षांपूर्वी जेव्हां मी मुंबईंत आपले घरीं भेटावयास आलों होतों तेव्हां पांचगणीचे राम पाटील यांसमक्ष आपल्यास शूद्र शेतकऱ्याचे दैन्यवाण्या स्थितीचा कांहीं देखावा जगापुढें आणणार म्हणून कबूल केलें होतें. त्याप्रमाणें त्या देखाव्याचें 'आसूड' या नांवाचें तीन वर्षांपूर्वी एक पुस्तक तयार केलें व त्याची एकेक प्रत आपले कलकत्त्याचे गव्हर्नर जनरल, मुंबईचे गव्हर्नर सा. व श्रीमान महाराज बडोद्याचे गायकवाड सरकारास पाठविल्या आहेत. आम्हा शूद्रांत भेकड × × छापखानेवाले असल्यामुळें तें पुस्तक छापून काढण्याचें काम तूर्त एक बाजूस ठेविलें आहे. आसूडाची प्रत आपल्यास पहाण्याकरितां पाहिजे असल्यास त्याप्रमाणें लिहून आल्याबरोबर त्याचो नक्कल करावयास लेखक बसवितों. नकल होण्यास सुमारें एकदोन महिने लागतील असा अदमास आहे. कळावें, लोभ असावा हे विनंति.

आपलाच,

जोतिराव गोविंदराव फुले."[१४]

ज्या "दीनबंधू" साप्ताहिकांत प्रस्तुत पुस्तकाचीं एकदोन प्रकरणें प्रसिद्ध झालेलीं असणें शक्य आहे, तें साप्ताहिक स. १८७७ मध्यें निघालेलें आहे.[१५] तेव्हां सन १८६९ हा कांहीं चरित्रांतून दिलेला या पुस्तकाचा प्रसिद्धिकाल चुकीचा ठरतो. वर ज्यांतला उतारा उद्धृत केला आहे, तें फुल्यांचें मामा परमानंदांना पाठविलेलें पत्र २ जून १८८६ चें आहे. पुस्तक पूर्ण होऊन त्याच्या प्रती गवरनर जनरल व बडोद्याचे महाराज यांना पाठविल्या असूनहि तें प्रसिद्ध न होतां तसेंच पडून कां राहिलें आहे याचा खुलासा त्यांत आहे; तसेंच त्याची प्रत हवी असल्यास नकलकार बसवावा लागेल असेंहि म्हटलें आहे. याचा उघड अर्थ असा आहे कीं, १८८६ च्या जून पर्यंत तें हस्तलिखित स्वरूपांतच होतें. पाटीलकृत चरित्रांतील एक पदटीप

१४. पु. बा. कुळकर्णी, **मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड**, मुंबई, १९६३, पृ. २६३. १५. धनंजय कीर, **महात्मा जोतिराव फुले** (इंग्रजी), मुंबई, १९६४, पृ. १४४.

मागें दिली आहे. पाटील यांचें फुलेचरित्र स. १९२७ सालीं प्रसिद्ध झालेलें आहे. पदटीपेवरून या पुस्तकांतले दोनतीन निबंध 'दीनबंधू'त प्रसिद्ध झालेले असले तरी १९२७ पर्यंत संपूर्ण पुस्तक प्रसिद्ध झालेलें नव्हतें, हें उघड होतें. फुल्यांसंबंधीं लिहिलें गेलेलें बरेचसें लेखन गतानुगतिक कसें आहे, हें यावरून सिद्ध होतें.

एक किरकोळ गोष्ट येथें स्पष्ट केली पाहिजे. वर दिलेल्या फुल्यांच्या पत्राचें मामा परमानंद यांच्या चरित्रांतील वाचन प्रामादिक आहे. त्यामुळें फुल्यांनीं पुस्तकाच्या प्रती कोणाकोणाला पाठविल्या तें ठरविण्याच्या दृष्टीनें घोटाळा होतो. मूळ मोडी पत्रांतील या संदर्भांतलें वाक्य "...त्याची येकेक प्रत आपले कलकत्याचे हरभास व आष्टपैलू गवरनर जनरल [साहेब व] श्रीमान महाराज बडोद्याचे गायकवाड सरकारास पाठविल्या आहेत." "हरभास" या शब्दाचा महाराष्ट्र शब्दकोशांत पृ. ३१७३ वर "फार हुशार; अष्टपैलु; सर्व गोष्टींत निपुण; बहुगुणी" असा दिलेला आहे. हा शब्द नीटसा ध्यानांत न आल्यानें तो 'गवरनर' किंवा 'मुंबईचे गव्हर्नर' असा अजमासघपक्यानें घरला गेला असावा. 'हरभास' हें पुढच्या 'आष्टपैलू' प्रमाणेंच 'गवरनर जनरल' चें विशेषण दिसतें. तात्पर्य फुल्यांनीं गव्हर्नर जनरल आणि बडोद्याचे महाराज या दोघांनाच पुस्तकाच्या प्रती रवाना केलेल्या होत्या, हें स्पष्ट होईल.

या मोडी पत्राच्या प्रमादशील वाचनांतून आणखीहि एक दुय्यम प्रश्न उद्भवतो : या पुस्तकाचें नांव "शेतकऱ्याचा आसूड" कीं "शेतकऱ्याचा असूड"? कारण मामा परमानंद चरित्रांत शीर्षकाचा उच्चार बालबोधींत 'आसूड' असा केलेला असला, तरी मूळ मोडी शब्द 'असूड' असाच आहे. या मोडी पत्रांत, तसेंच हस्तलिखिताच्या मुखपृष्ठांपैकीं आंतल्या पृष्ठावर "शेतकऱ्याचा असूड" असाच उल्लेख आहे. या बाबतींत विरुद्ध जाणारी गोष्ट अशी आहे कीं, पुस्तकांतर्गत मजकुरांत मात्र तीनचार स्थळीं या पुस्तकाच्या संदर्भात "आसूड" असें म्हटलेलें आढळतें. म्हणजे रूढ असलेल्या पुस्तकनामाच्या बाजूतें हा सबळ पुरावा मिळतो. तरीपण ही हस्तलिखित प्रत फुले यांनीं खास करवून घेतलेली दिसते. फुल्यांच्या हस्ताक्षरांतली दिसत नाहीं. शुद्धाशुद्धतेचा प्रश्न येथें उपस्थित होत नाहीं. 'आसूड' आणि 'असूड' या बोलण्याच्या लकबी आहेत. एकोणिसाव्या शतकांतील मराठी गद्यांत आद्य आ चा अ करण्याची लकब जारी होती. या पुस्तकांतहि तशीं उदाहरणें पुष्कळ मिळतात. उदा०– अभार (आभार), अदा (आदा), अटोकाट (आटोकाट), अदले (आदले), अर्जव (आर्जव), अशिर्वाद (आशीर्वाद), अबालवृद्ध (आबालवृद्ध) इ०. शिवाय स्वदस्तुराच्या पत्रांतील उल्लेख ध्यानांत घेतला, तर फुल्यांना 'असूड' असाच उच्चार अभिप्रेत असावा, असें वाटतें. तेव्हां या पुस्तकाचें नांव 'शेतकऱ्याचा असूड' असेंच ठरविण्याकडे कल होतो.

'कल्याणकीर्ती'चें नामरहस्य

रामचंद्र चिंतामण ढेरे.

महानुभावीय महाकवि नरेंद्र यानें आपल्या 'रुक्मिणीस्वयंवर' काव्यांत जीं अनेक नवीं गौण पात्रें कल्पिलीं आहेत, त्यांत कल्याणकीर्ति नामक भाट आणि त्याचा सहकारी किन्नर हीं दोन पात्रें अभ्यासकांच्या विशेष चर्चेचा विषय झालीं आहेत.[1] या पात्रांच्या निर्मितीला अवसर देणारा भागवतांतील मूळ श्लोक असा आहे —

सोपश्रुत्य मुकुंदस्य रूपवीर्यगुणश्रियः ।
गृहागतैर्गीयमानास्तं मेने सदृशं पतिम् ॥ १०. ५२. २३

भीमकानें 'घरीं आलेल्यांकडून' ('गृहागतैः') श्रीकृष्णाच्या रूपगुणादींची कीर्ति ऐकली, एवढाच भागवतकारांचा आशय आहे. भीमकाच्या राजसभेंत येऊन श्रीकृष्णाचीं गौरवगीतें गाणारे हे कोण, याविषयीं भागवतकारांनीं अथवा भागवताच्या टीकाकारांनीं कसलाहि तपशील दिलेला नाहीं. त्याचमुळें भागवतांतील रुक्मिणीस्वयंवरकथेचा आश्रय करून नवी काव्यरचना करणाऱ्या कवींना या स्थानीं कल्पनाविलास दाखवायला अवसर मिळाला. नरेंद्रानें या स्थानीं जीं दोन पात्रें कल्पिलेलीं आहेत, त्यांपैकीं किन्नराचें मूळ शोधण्याचा प्रयत्न विजापूरचे सुप्रसिद्ध वाङ्मयसंशोधक श्री. ना. ब. जोशी यांनीं यशस्वीपणें केलेला आहे.[2] आतां उरला कल्याणकीर्ति नामक भाट. नरेंद्रानें त्याच्या आगमनाचें वर्णन केलें आहे, तें असें :—

ऐसें रावो प्रधानेंसीं बोले । तंव अवस्वरियें जुहारिलें ।
हात जोडुनि विनविलें । वैदर्भेश्वरातें ॥ १२७ ॥
" देवा ! माझे होते वाहीरी । तेहीं निशाण आइकिलें दुरी ।
ऐसें बोलिजताए नगराभीतरी । जें नागारी येकु येताये " ॥ १२८ ॥
तंव भीमकु म्हणतु आहे । हें आम्हीं आधींचि आइकिलें आहे ।
हा काशीश्वराचा भाटु भेटों येताये । कल्याणकीर्ति ॥ १२९ ॥
रावो म्हणे, "आम्हां आति कीर्तीचा पांगु । हा महादानी मागधु चांगु ।
यातें आणावेया करा वेगु । नेया सोळासें चौदंता " ॥ १३० ॥

---

१. पहा : 'नरेंद्रकवि-कृत रुक्मिणीस्वयंवर'-संपादक डॉ. वि. भि. कोलते. (द्वितीयावृत्ति, १९४९), प्रस्तावना, पृ. १९-२७; 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका', अंक ११७, पृ. २३-२५, तसेंच अंक १४१, पृ. १८-२५.

२. 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका', अंक १४१, पृ. १८-२५.

रायाधाकुटा नरपुरंधरु। सरादीसंगीतसुद्धाकरू।
हे दोघै साउमे धाडिले आदरु। करूनियां॥ १३१॥
चक्रवर्ति मानें बहुतें। भेटों आणिल भाटातें।
तया कीर्तिमळयानिळातें। रायांचेया॥ १३२॥
कल्याणकीर्ति येताये अस्थानीं। तेणें भीमकु देखिला सिंहासनीं।
जैसा नक्षेत्रांमाजी गगनीं। पूर्णचंद्र॥ १३३॥
बंदीजनु देखिला भीमकें। साउमां बोलाविला जवळिके।
मग पवळेयाचें सिंहासन कवतिकें। घातलें बैसावेया॥ १३४॥

नरेंद्रानें या वर्णनांत भाटाचे पर्याय म्हणून नागारी, मागध आणि बंदीजन हे शब्द वापरले असून, भाटाचें 'कल्याणकीर्ति' हें नांव योजिलें आहे. राजपुरुषांचीं स्तुतिस्तोत्रें गाणारे भाट एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे जात असत, या वस्तुस्थितीवरून नरेंद्रानें 'हा काशीश्वराचा भाट भेटों येताये,' अशी कल्पना केलेली दिसते.

येथें कल्याणकीर्तीच्या भाटपणाचा प्रश्न नाहीं. कारण घरीं येऊन–विशेषतः भीमकासारख्या राजाच्या घरीं येऊन रुक्मिणीला अनुरूप अशा तरुण राजपुरुषांचीं वा खास श्रीकृष्णाचीं स्तुतिस्तोत्रें गाणारी व्यक्ति भाटाच्या स्वरूपांत चितारणें अगदीं स्वाभाविक आहे. महानुभवीय कवयित्री महदंबा हिनेंहि आपल्या धवळ्यांमध्यें—

द्वारकेहूनि कौंडण्या आले नागारी।
तिहीं सर्वेश्वरु वाखाणिले नाना परी॥ (पू. ३)

अशी नागारींची म्हणजे भाटांची कल्पना या स्थानीं केली आहे. महानुभावेतर कवींपैकीं सामराजानें प्रस्तुत संदर्भांत म्हटलें आहे कीं—

स्तवार्थ बंदीजन नित्य येती।
तेहीं प्रसंगें वर वर्णिजेती॥ (रु. स्व. २-५९)

एकनाथ आणि मोरोपंत यांनीं येथें श्रीकृष्णगुणानुरक्त अशा ब्राह्मणाची योजना केली आहे, तर विठ्ठलानें या व्यक्तीला 'नटश्रेष्ठ' म्हटलें आहे. ज्यानें त्यानें आपल्या प्रकृतीनुसार वा कल्पनाशक्तीनुसार वेगवेगळी कल्पना केली असली, तरी भाटाची कल्पना प्रस्तुत संदर्भांत अधिक सुसंगत आहे, हें रसिकांना सहज पटूं शकेल.

आतां प्रश्न आहे, तो या भाटाच्या 'कल्याणकीर्ति' या नांवाचा. नरेंद्रानंतर हें नांव अनेक कवींनीं वापरलें आहे—

मागा वेदघोका श्रापु घडला । तो कीनरु वर्नी जाला ।
कल्याणकीर्तिन देखिला । तो आला कौंडन्यपुर ॥

(पं. दामोदरकृत 'पद्मपुराण', २२६९)[३]

तंव बोलिला भीमचक्रवर्ती । म्हणे हें आम्हीं आइकिलें असे श्रुतीं ।
जो भाटु येताये कल्याणकीर्ति । भेटी आमच्चिये ॥

(संतोषमुनि कृष्णदास–कृत 'रुक्मिणीस्वयंवर', २-९८)

राजा म्हणे श्रुत असे नृप काशियेचा ।
कल्याणकीर्ती वरमागध हा तयाचा ॥

(कृष्णमुनि डिंभकृत 'रुक्मिणीस्वयंवर', १·६१)

याचप्रमाणें नृसिंह, लक्षधीर, इत्यादि अन्य कांहीं महानुभावीय कवींनींहि भाटाचें नांव 'कल्याणकीर्ति' हेंच योजिलें आहे[४]. नरेंद्र हा महानुभावीय कविकुळाचा गुरु असल्यामुळें त्याच्यानंतर रुक्मिणीस्वयंवरकथेवर काव्य रचणाऱ्या बहुतेक महानुभावीय कवींनीं सर्वच बाबतींत त्याचें अनुकरण केलें आहे. परंतु महानुभावीय काव्यें पंथीयेतरांना उपलब्ध नसतांना महानुभावेतर कवींनींहि या प्रसंगांतील पात्राचें नांव 'कल्याणकीर्ति' या नांवाशीं साम्य राखणारें असें योजलेलें पाहून मात्र आश्चर्य वाटतें. एकनाथांनीं त्याला '**कीर्तिनामा** ब्राह्मण' (१·१८) म्हटलें आहे, तर विठ्ठलानें '**कीर्ति**नामा नटश्रेष्ठ' म्हणून उल्लेखिलें आहे (१·११). महानुभावीय कवींनीं ज्याला 'कल्याणकीर्ति' म्हटलें आहे, त्याला महानुभावेतर कवि केवळ 'कीर्ति' या नांवानें उल्लेखितात. महानुभावेतर कवींपैकीं कृष्णदास मुद्गल यानें 'कल्याणकीर्ति' याच नांवाचा उपयोग केला आहे ('कथाकल्पतरु', ४·८·८१–८३). 'कल्याणकीर्ति आणि 'कीर्ती' या दोन नांवांत अर्धसाम्य आहे. तर मग हें नांव नरेंद्रादि महानुभावीय कवि आणि एकनाथादि महानुभावेतर कवि यांना कुठून सुचलें ? नरेंद्राचा प्रभव केवळ महानुभवीय कवींपुरता मानतां येईल. ज्या अर्थीं महानुभावेतर

---

३. 'नरेंद्रकवि–कृत रुक्मिणीस्वयंवर'–संपादक प्रस्तावना, पृ. २४ वर उद्धृत.

४. लक्षधीराच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'चें हस्तलिखित मी भा. इ. सं. मंडळाच्या पोथीशाळेंत (क्र. २१, ३४). साद्यन्त पाहिलें आहे; परंतु त्यांत ओवी क्रमांकांचा गोंधळ असल्यामुळें मूळ संदर्भ उद्धृत केला नाहीं. आणखी एक महानुभावीय कवि यल्लमसुत चक्रपाणि याचा 'रुक्मिणीस्वयंवर तिस्सा' (हिंदी) माझ्या संग्रहांतील एका बाडांत अपूर्ण अवस्थेंत आहे, त्यांत 'कल्यान नाम दास' असा उल्लेख आहे.

कवींनींहि तत्सदृश नांव वापरलें आहे, त्या अर्थी या सर्वच कवीं[illegible] या उभय परंपरांतील आदिकवींच्या–कल्पनेला कांहीं समान आधार असला पाहिजे' असें अनुमान संभवतें.

या अनुमानाच्या मनःस्थितींत 'कल्याणकीर्ति' या नांवाचा विचार करूं जातां प्रारंभींच एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. ती ही कीं, कल्याणकीर्ति हा भाट असल्यामुळें त्याचा कीर्ति गाण्याशीं संबंध आहेच. नरेंद्रानें त्याला 'रायांचा किर्तिमळयानिळ' (राजपुरुषांची कीर्ति सुदूर वाहून नेणारा मलयवायु) म्हटलें आहे आणि भीमकाला 'कीर्तीचा पांगु' (कीर्ति ऐकण्याची इच्छा) असल्यामुळें कल्याणकीर्तीच्या आगमनाचा विशेष आनंद झाला, असें सूचित केलें आहे. संतोषमुनि कृष्णदासानें कल्याणकीर्तीला 'कीर्तिपात्र' असें विशेषण लावलें आहे (२·९८). 'कीर्तिपात्र' म्हणजे कीर्ति गाणारा कलावंत. म्हणजे 'कल्याणकीर्ति' या नांवांतील 'कीर्ति' या उत्तरपदाचा भाटाच्या वृत्तीशीं साक्षात् संबंध आहे, हें उघड दिसतें. आतां उरलें फक्त 'कल्याण' हें पूर्वपद. 'कल्याण' म्हणजे कीर्ति-गीतें गाणारा भाटांचा एक वर्ग, हें अगोदरच येथें सांगून टाकतों आणि त्याच्या पुष्टीसाठीं पुढें पुरावे देतों.

एकनाथपंचायतनांतील प्रख्यात संतकवि जनीजनार्दन यांच्या 'जानकी-स्वयंवर'[५] नामक काव्यांत 'कीर्ति' गाणाऱ्या 'कल्याणां'चे उल्लेख भाटांच्या अन्य वर्गांबरोबर अनेकवार आले आहेत, ते असे—

येक त्याग देति नृत्यपात्रां । भाटां नागरियां कीर्तिपात्रां ।
येक विद्यावंतां ठाकुरां । येक सुपात्रां द्विजवृंदां ॥ ९–३९ ॥

तान मान गर्जती गाण । टीप टाकिती टीपगाण ।
वंशावळी वरकल्याण । पढती चारण ब्रीदावळी ॥ १४–१०

कलापात्रें नाना आन । पहाटगाण पानगाण ।
पढती सुकीर्तिकल्याण । रामनामाविण आन पैं वचन
न बोलती ॥ १८–५४

ब्रीदें पढती नागारी । कल्याण कीर्ती नाना परी ।
रघुवंशावळी अपारी । वर उत्तरीं ठाकुर ॥ १८–८३

आनंदेशिक ठाकुर । मागध चारण विद्याधर ।
कल्याण भाट नागार । आन बैकार वर भृंगी ॥ २१–२२

---

५. 'जनी जनार्दन–कृत जानकी सैंवर'–संपादक द. रा. भट, राजवाडे संशोधन-मंडळ, धुळें, १९६४.

भृंगी ठाकुर कल्याण । रावणहस्ती पहाटगाण ।
गोपाळ चौंडके नाचण । पानगाण दिवटिये ॥ २७–५२

कीर्तिकार बंदीजन । ठाकुरवर पानगाण ।
धवळ म्हणती पाठक जाण । वेदोच्चारण द्विजवर ॥ २९–६०

धवळगाण धवळ गाती । कीर्ती कल्याण पढती ।
ठाकुर पवाडे वर्णिती । उच्चारिती वंशावळी ॥ २९–१४३

ठाकुर कल्याण नागारी । नट नटवे वेषधारी ।
नृत्यक नाचणी अपारी । वस्त्रीं अळंकारीं तोषविलीं ॥ ३०–६४

जयजयकारीं भक्तजन । स्वसामर्थ्यें करिती स्तवन ।
कीर्ती वर्णिती कल्याण । ब्रीदें पठण ठाकुर ॥ ३२–४७

वीररसशब्द ठाकुरांचे । कीर्तिवंत कल्याणांचे ।
वांठिवेचे त्या वांठीचे । पैं ब्रीदाचे ब्रीदावळी ॥ ३४–२८

जनीजनार्दनांनीं कल्याणांचा उल्लेख भाट, चारण, नागारी, बंदीजन, ठाकुर यांच्याबरोबर केला आहे; त्यांना 'कीर्तिपात्र' आणि 'कीर्तिकार' म्हटलें आहे; त्यांचे शब्द 'कीर्तिवंत' असतात असें सांगितलें आहे आणि कीर्ति गाणें हें त्यांचें कार्य असल्याचें निःसंदिग्ध शब्दांत व्यक्त केलें आहे. यावरून हें अगदीं निरपवादपणें सिद्ध होतें कीं, **नरेंद्रानें आणि तदुत्तर कवींनीं वापरलेलें 'कल्याणकीर्ति' हें भाटाचें नांव 'कीर्ति गाण्याचा व्यवसाय करणाऱ्या कल्याणां'वरूनच साधलेलें आहे.** हेमचंद्राच्या 'छन्दोऽनुशासनां'त धवलगीतांचे जे अनेक प्रकार दिलेले आहेत, त्यांत एका प्रकाराचें नांव 'कीर्तिधवल' असें आहे.[६] त्या कीर्तिधवलगीतांचा आणि कल्याणांच्या कीर्तिगानांचा कांहीं संबंध असेल काय, याचाहि जाणत्यांनीं शोध घेण्यासारखा आहे. तूर्त, कल्याणकीर्ति म्हणजे कीर्ति गाणारा कल्याण, हें सत्य आपल्या हातीं आलें आहे, एवढ्यावरच थांबूं या.

६. 'कलिकालसर्वज्ञ–आचार्य–हेमचन्द्रसूरि–विरचित छन्दोऽनुशासनम्', संपादक प्रा. ह. दा. वेलणकर, प्रकाशक सिंघी जैनशास्त्र शिक्षापीठ, भारतीय विद्याभवन, मुंबई ७, १९६१ (पञ्चमोऽध्यायः, श्लो. ३५).

जोतीराव फुले यांचें पहिल्या ग्रंथकार-सभेस पत्र

संकलक—**धनंजय कीर.**

[पहिल्या मराठी साहित्यसंमेलनास किंवा ग्रंथकारसभेस महात्मा जोतीराव फुल्यांनीं पाठविलेलें पत्र म. म. द. वा. पोतदारकृत महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या इतिहासांतहि दिलेलें नाहीं, (पृ. ४) तें 'ज्ञानोदय'वरून येथें देत आहों.]

गेल्या महिन्यांत पुण्यांत वसंतोत्सवाच्या संबंधानें व पत्रकार यांची जी सभा झाली तिला येण्याचें आमंत्रण इतर ग्रंथकर्त्यांप्रमाणें रा. रा. जोतिराव गोविंदराव फुले यांसहि गेलें होतें. त्याचें उत्तर त्यांनीं रा. ब. रानडे यांस पाठविलें तें छापून प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून तेथील कोणी ब्राह्मण पत्रकारांनीं फार संतापून लिहिलें आहे, हें पाहून कित्येक लोकांस तें पत्र आपल्या अवलोकनांत यावें अशी जिज्ञासा उत्पन्न झाली आहे, तशी आम्हांस झाली. यास्तव आम्ही तें पत्र उतरून घेतों. वाचकांस दिसून येईल कीं, त्यांत ब्राह्मण लोकांस त्वेष वाटण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत खऱ्या, तरी त्या विचार करण्यासारख्या आहेत. तें पत्र येणेंप्रमाणें—

वि. वि. आपलें ता. १३ माहे मजकूरचें कृपापत्रासोबतचें विनंतिपत्र पावलें. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयीं वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्यानें खुषीनें व उघडपणें देववत नाहींत, व चालू वर्तनावरून अनुमान केलें असतां पुढेंही देववणार नाहींत, तसल्या लोकांनीं उपस्थित केलेल्या सभांनीं व त्यांनीं केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशीं आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाहीं. कारण त्यांच्या पूर्वजांनीं आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्यानें, आम्हांस दास केल्याचें प्रकर्ण त्यांनीं आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमानें दडपलें. याविषयीं त्यांच्यांतील जुनाट खळड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ति व त्रास सोसावे लागतात हें त्यांच्यांतील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकरांस व मोठमोठ्या सभास्थानीं आगांतूक भाषण करणारांस कोठून कळणार? हें सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्कें माहीत होतें, तरी त्यांनीं फक्त त्यांच्या व आपल्या मुलांबाळांच्या क्षणिक हिताकरितां डोळ्यावर कातडें ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळतांच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोंवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानूं लागला; व आपल्या पेनशनदात्या सरकारनें बनविलेल्या कागदाच्या नोटीसमुद्धां सोंवळ्यानें बोट

लावण्याचा विटाळ मानूं लागला ! अशीच कां शेवटीं ते सर्व आर्यब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नति करणार ! असो, आतां यापुढें आम्ही शूद्र लोक, आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहींत. सारांश, त्यांच्यांत मिसळल्यानें आम्हा शूद्रादि अतिशूद्रांचा कांहीं एक फायदा होणें नाहीं, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणें असेल तर त्यांनीं एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधुप्रीति काय केल्यानें वाढेल, त्याचें बीज शोधून काढावें व तें पुस्तकद्वारें प्रसिद्ध करावें, अशा वेळीं डोळे झांकणें उपयोगाचें नाहीं. या उपर त्यासर्वांची मर्जी. हें माझें अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरितां तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुद्धेका येह पहिला सलाम लेव.

आपला दोस्त,

जोतिराव गो. फुले.

(**ज्ञानोदय**, दि. ११ जून १८८५ वरून.)

—७—

माणकोजी बोधले यांचा निर्याणकाल

गं. ना. मोरजे.

[भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें या संस्थेच्या चौपन्नाव्या वार्षिक संमेलनांत दि. २८।५।६७ रोजीं वाचलेला निबंध.]

माणकोजी बोधले हा बालेघाटांतील 'धामणगांव'चा संतकवि. त्याचें चरित्र महिपतीनें 'भक्तविजय' व 'संतलीलामृत' या दोन ग्रंथांत वर्णिलेलें आहे. तसेंच माणकोजीचा सत्शिष्य ज्योतीराम यानें लिहिलेलें "बोधाख्यान" हें अकरा अध्यायाचें चरित्र व 'बोधकीर्ति' नांवाचे बोधले-चरित्रपर प्रकरण हस्तलिखितस्वरूपांत भा. इ. सं. मंडळांत बाड क्रमांक २८३ मध्यें आहे.

महाराष्ट्र सारस्वतकारांनीं 'सोळाव्या शतकांतील आणखी कांहीं कवि' या प्रकरणांत कालदृष्ट्या या कवीचा समावेश केलेला आहे'[1]

फलटणचे श्री. अ. ना. पंडित यांनीं इतर संतकवींच्या उक्तींच्या आधारें व हनुमन्तस्वामीच्या बखरींतील संतमेळाव्याच्या उल्लेखाधारें माणकोजी व तुकाराम हे समकालीन असल्याचें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.[2] पण कुठलाहि निश्चित कालनिर्णय ते ठरवूं शकले नाहींत. सारस्वतकारांनींहि याची नोंद घेतलेली आहे.

---

१. वि. ल. भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, आ. ५, पृ. ८०५. २. **विविध-ज्ञानविस्तार आणि महाराष्ट्र साहित्यपत्रिका**, पु. ५०, अं ६, पृ. ८९.

जस्टीन. इ. ॲबट यांनी "शिवकालांतील संतकवी" या आपल्या लेखांत माणकोजी बोधला शूद्र जातीचा होता. त्याचा काळ नेमका माहीत नाहीं. पण तो शिवकालीन असावा."[३] असें म्हटलें आहे.

ॲबट यांचा प्रमुख आधार महिपतीबाबा आहे असें दिसतें. कारण 'भक्तविजया'च्या त्रेपन्नाव्या अध्यायांत माणकोजीचें जें चरित्र आलेलें आहे त्यांत—

"प्रेमळ भक्त माणकोजी बोधला ॥
शूद्रयातींत उपनाम त्याला ॥
जगताप ऐसे म्हणती ॥ १३ ॥"

असा उल्लेख आलेला आहे. (माणकोजी जातीनें शूद्र नव्हता. मराठा होता, पण त्या काळांत ब्राह्मण सोडून इतरांना शूद्र म्हणण्याचा प्रघात दिसतो.)

'भक्तविजय' ग्रंथ इ. स. १७६२ सालीं लिहिला गेला आहे. त्यांत माणकोजी बोधले याची पंढरपूरयात्रा, त्याचा दानधर्म, यात्रेकरूंकडून कणसें लुटण्याचा प्रसंग वगैरे बोधल्याच्या जीवनांतील घटना दिलेल्या आहेत. भक्तविजयांतील घटनांची पुनरुक्ति 'संतलीलामृतां'त होत नाहीं. 'संतलीलामृत' ग्रंथ इ. स. १७७४ सालीं लिहिला गेला. त्यांत माणकोजीच्या तीन मुलांची माहिती, अविंधानें माणकोजीस मांस खाऊं घालणें व माणकोजीच्या दैविक शक्तीनें त्यांचीं फुलें होणें, फकीराच्या वेशांनें विठ्ठलानें येणें व माणकोजीची सून भागीरथी हिला नेणें, या घटना येतात. माणकोजीबद्दलची ही अधिक माहिती महिपतींना 'भक्तविजया'च्या नंतर मिळालेली दिसते. 'संतलीलामृता'च्या एकावन्नाव्या अध्यायांत महिपतीबाबा एक महत्त्वाची माहिती देतात. तिचा गद्य आशय असा :—

"भगवंतबाबाचा पुत्र भोजबाबा (भानजी) सध्यां (इ. स. १७७४) धामणगावांत आहे." इ. स. १७७४ सालीं माणकोजीचा पणतू 'भोज' हा धामणगांवांत माणकोजीची परंपरा चालवीत होता, तोच येथें अभिप्रेत दिसतो.

महिपती तिथीवार घटना देऊन चरित्र सांगत नाहींत हें खरें असलें, तरी ते ऐतिहासिक कालानुक्रम पाळतांना दिसतात. बोधल्याच्या चरित्राच्या बाबतींत तें कितपत खरें ठरतें, तें आपण पाहूं.

माणकोजी बोधल्याचें 'धामणगांव' बार्शी–सोलापूर रस्त्यावर आहे. बार्शीपासून चौदा मैलांवर आहे. बार्शीवरून सोलापूरास जातांना राळेरास स्थानकावर उतरावें लागतें. राळेरासपासून दोन मैलांवर धामणगांव आहे. राळेरासवरून माणकोजीच्या समाधीचा घुमट दिसतो. माणकोजीच्या चरित्रांत

३. The Poet saints of Maharashtra during the life time of Shiwaji", शिवाजी निबंधावली, खंड पहिला, पुणें, १९३०.

येणारें शंकराचें देऊळ, विहीर, शेत अजूनहि या गावांत आहेत. तसेंच माणकोजीची पत्नी ममताई, मुलगा धर्मदास ऊर्फ यमाजी यांच्या समाध्याहि तिथें आहेत. माणकोजीचे सध्यांचे वंशज श्री. भाऊसाहेब बोधले हे आहेत. त्यांची शेती धामणगांवांत असून ते माढा तालुक्यांतील "वाकाव" या गांवीं राहतात. माणकोजीची धामणगांवाला जी समाधीची जागा आहे त्या जागेच्या खोलींत कांहीं हस्तलिखितें होतीं. तीं त्यांच्या वंशजाकडून मला मिळालीं. त्यांत एक जुनें बाड सांपडलें. या बाडांत निरनिराळ्या हस्ताक्षरांत ज्ञानेश्वर, नामदेव, शेखमहंमद, त्रिंबक, मुकुंद, तुकाराम आदि कवींच्या रचना लिहून ठेवलेल्या आहेत. आज त्या बाडाचीं २७८ पृष्ठें उपलब्ध आहेत. बाडाचा कागद जुना देशी आहे. बाडच्या कडा व कोंपरे झिजून गेले आहेत. बाडाच्या एक पृष्ठावर पुढील नोंदी केलेल्या आढळल्या.

"सके १६१६ भावानाम सवत्सरे जेष्ट मास वदेय पक्षी त्रितिया गुरुवारी ते दिनी बोधराज समाप्त ॥

[खरे जंत्रीप्रमाणें हा काळ गुरुवार, दि. ३१ मे १६९४ असा येतो.]

सके १६४५ सुभानुनाम संवत्सरे श्रावणमासी वदे पक्षी द्वितीया सोमवारी ते दिनी यमाजीबाबा समाप्त ॥

[शके १६४५ या वर्षीं 'सुभानु' संवत्सर येत नाहीं; 'शोभन' संवत्सर येतो. 'शोभन' संवत्सराची श्रावण वद्य द्वितीया, सोमवार दि. १९ जुलाई १७०३ (शके १६२५) रोजीं येते. संवत्सराच्या नांवाच्या चुकीमुळें २० वर्षांचा फरक पडलेला आहे.]

सके १६९१ सौम्य नाम संवत्सरे भाद्रपद वदे १० रविवारीं भगवंतबाबा समाप्त ॥

[इथें 'सौम्य' संवत्सराऐवजीं 'विरोधी' संवत्सर पाहिजे. रविवार दि. २४ सप्टेंबर १७६९ रोजीं भाद्रपद वद्य नवमी आहे; पण ती आठ घटका असल्यामुळें त्या दिवशीं दशमी म्हटल्यास चूक ठरणार नाहीं.]

इ. स. १७७४ सालीं लिहिल्या गेलेल्या 'संतलीलामृतां'त "भोजा"चा उल्लेख "सध्याचा वारस" म्हणून तो येतो, तो कालदृष्ट्या अगदीं बरोबर आहे, हें आपणास मान्य करावें लागेल.

माणकोजी बोधल्यांच्या सध्यांच्या वंशजांकडून मला 'बोधलीलांबरी' नांवाचें माणकोजीचें हस्तलिखित-चरित्र मिळालें आहे. तें पंचवीस अध्यायांचें असून त्याची ओवीसंख्या ५२४६ इतकी आहे. त्याचा लेखक 'शिवरामात्मज' असून शके १७७३ सालीं तें लिहिलेलें आहे. त्यांत माणकोजी शंभर वर्षें जगले व शके १६१६ च्या जेष्ठांत समाधिस्थ झाले, असें तो म्हणतो. बोधल्यांच्या वंशजांत हा ग्रंथ प्रमाण मानला जातो. यावरून माणकोजीचा निर्याणकाल ३१ मे १६९४ व जन्मकाळ इ. स. १५९४ मानण्यास कांहींच हरकत नसावी.

ज्ञानदेवांच्या योगदुर्गांतील 'कटक'

रामचंद्र चिंतामण ढेरे.

'सत्यकथे'च्या जानेवारी १९६२ च्या अंकांत प्रा. म. वा. धोंड यांचा 'ज्ञानेश्वरींतील योगदुर्ग' हा रहस्योद्‌ग्राही लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखांत त्यांनीं हें साधार आणि सविवरण सिद्ध केलें आहे कीं, "ज्ञानदेवांनीं गीतेंतील (१२·४) 'सन्नियम्येन्द्रियग्रामं...' या श्लोकावर भाष्य करतांना जें योगदुर्गाचें रूपक उभारलें आहे (ज्ञा. १२·४६–५८), त्या रूपकांतील दुर्ग हा कोणताहि सर्वसाधारण दुर्ग नसून, ज्ञानेश्वरांच्या संचारकक्षेंत असलेला आणि ज्ञानेश्वरीच्या रचनाभूमीपासून अगदीं निकट असलेला देवगिरि हा विशिष्ट दुर्ग होय." प्रा. धोंडांनीं केलेल्या या रहस्योद्‌घाटनामुळें ज्ञानेश्वरींतील या भागांतल्या पाठांची ओढाताण नाहींशी होऊन, मूल पाठांना सार्थता लाभली आहे.

योगदुर्गाचें रूपक उलगडतांना प्रा. धोंड यांनीं 'कटक' (ज्ञा. १२·४६) या शब्दाच्या अर्थाची बरीच चर्चा केली आहे. 'कटक' या शब्दाचे अर्थ पुढीलप्रमाणें आहेत : (१) सैन्य, (२) डोंगराची बाजू अथवा दरी. (३) राजधानी. हे तीनहि अर्थ त्यांनीं नोंदविले आहेत आणि प्रस्तुत संदर्भात ज्ञानदेवांना 'सैन्य' हा अर्थ अभिप्रेत नसून, 'डोंगराची बाजू अथवा दरी' हा अर्थ अभिप्रेत आहे, असें दाखविलें आहे.

इथें प्रा. धोंड ज्ञानदेवांच्या अभिप्रायाच्या निकट आले आहेत, परंतु त्यांना थेट मुळापर्यंत पोचतां आलेलें नाहीं. या रूपकांत ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेला दुर्ग देवगिरी हा आहे, हें महत्त्वाचें सत्य हातीं आल्यानंतर या रूपकांतील 'कटक' या शब्दाचा अर्थ 'देवगिरी'च्या केवळ भौगोलिकच नव्हे, तर ऐतिहासिक पाहणींतून शोधणें शक्य होतें. त्यांनीं 'कटक' या शब्दाचा 'राजधानी' हा अर्थ दाखवितांना ज्ञानेश्वरींतील 'रावो तेथ कटक' (१८·१६१४) हा आणि नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरांतील पुढील उल्लेख नोंदविला आहे—

तेथ मुखांचा आंकणा चंद्र। त्यागें जिंतिला क्षीरसमुद्र।
तें कटक वानिताये कवि नरिंद्र। यादवरायाचें॥ ८७९॥

या ओवींतील 'यादवरायाचें कटक' म्हणजे श्रीकृष्णाची राजधानी द्वारका होय. कदाचित् या ओवींत 'यादवरायाचें कटक' हे शब्द नरेंद्रानें श्लिष्टार्थानें वापरले असल्याचा संभव आहे. यादवराय = (१) यादवाधिपति श्रीकृष्ण, (२) यादवाधिपति रामदेवराव. कटक = (१) राजधानी द्वारका, (२) कटक अथवा कटकदेवगिरि या नांवानें प्राचीन काळांत ओळखली जाणारी रामदेवराव यादवाची राजधानी. नरेंद्र हा रामदेवराव यादवाचा सभाकवि होता आणि त्यानें आपलें काव्य राजसभेंत वाचून दाखविण्यासाठीं रचिलें होतें, ही पार्श्वभूमि ध्यानीं घेतां या श्लिष्टार्थाची संभवनीयता समजूं शकेल, या संभवनीयतेला–नव्हे, 'कटक' हें देवगिरि नगराचें अथवा त्या नगरींतील विशिष्ट भागाचें प्राचीन नांव होतें,

या सत्याच्या निर्धारणाला ज्ञानेश्वर-समकालीन आणि तदुत्तरकालीन वाङ्मयांत अनेक पुरावे उपलब्ध आहेत–

[१] चक्रधरस्वामींचे गुरु गोविंदप्रभु यांना एकदां 'कापुराची प्रवृत्ति' झाली असतां, 'उदयभास्कर' जातीचा कापूर आणण्यासाठीं नागदेवाचार्य आणि म्हाइंभट हे कटक-देवगिरीस गेल्याचा उल्लेख गोविंदप्रभुचरित्रांत (ली. २९३) आलेला आहे : "एकु दी गोसांवियांसि कापुराची प्रवृत्ति जाली : तो देसी कापुरु तुटला होता : मग गोसांवीं म्हणितलें : 'आवो मेला जाय : **कटक-देवगिरीसी** जाय ना म्हणे : आवो, तेथ केसवनायक वेव्हारा असे : तयाचिय घरीं भुयरीं अमुकीय मांदुसे असे : अमुकीय पेटीं असे : उदयभास्करु असे : तो आणावा म्हणे : आवो, आणावाचि म्हणे : ' मग भट म्हाइंभट **कटक-देवगिरीसी** गेले..."

[२] महादेवराव यादवाची पत्नी वैजाई राणी हिनें देवगिरीमध्यें आपल्या नांवानें एक शिवमंदिर (वैजनाथमंदिर) उभारलें आणि त्यानिमित्तानें सत्पात्र ब्राह्मणांना वृत्ति नेमून दिल्या. वैजाई राणीनें निवडलेला एक सत्पात्र ब्राह्मण चक्रधरस्वामींचा शिष्य सारंगपंडित हा होता. तो वृत्तीच्या स्वीकारासाठीं कटकास म्हणजे देवगिरीस गेल्याचा उल्लेख लीळाचरित्रांत (नेने आवृत्तिपूर्वार्ध १, पृ. ७) आहे : "वैजाए राणीयां वैजनाथाचें देऊळ करविलें : ब्राह्मणा वृत्ती दीधलिया : सारंगपंडितातें बोलाऊं धाडिलें : सारंग पंडित **कटका** गेले : वृत्ति जाली : काळाक्षरीं (शिलालिखिताक्षरीं) नांव घातलें : "

[३] महादेवराव यादवाच्या राजसभेंतील अनेक अधिकारी आणि सेवक चक्रधरस्वामींचे अनुयायी बनले होते. स्वामींचा मुक्काम वेरूळ येथें असतांना तर निकटतेमुळें राजसभेंतील अनेक जण नित्य वेरुळास जाऊन स्वामींचें दर्शन घेत असत. "राजके (राजपरिवारांतील लोक) अवधेचि **कटकौनि** (कटकाहून–देवगिरीहून) गोसावीयाचेया दरिसना एति" असा या संदर्भांतील उल्लेख लीळाचरित्रांत (नेने आवृत्ति पूर्वार्ध (१, पृ. ४६) आहे.

[४] चक्रधरस्वामींनीं वेरुळ सोडून आपला मुक्काम पश्चिमेकडे पांच मैल अंतरावर असलेल्या मातखेड (सध्यांचें माटेगांव) या गांवीं हलविला. तेथें बाइसा पाणवठ्यावर पाणी आणण्यासाठीं गेली असतां तिला कटकास दूध विकायला गेलेल्या मातखेडच्या गौळणी लौकर परतलेल्या दिसल्या. लौकर परतण्याचें कारण असें कीं, स्वामी मातखेडीं आल्यानंतर (त्यांचा मुक्काम वेरुळांतच आहे, अशा समजुतीनें) महादेवराव त्यांच्या दर्शनासाठीं वेरूळ येथें आला होता; त्यामुळें मातखेडच्या गौळणींनीं कटक-देवगिरीला न जातां आपलें दूध वेरुळांतच विकलें. यासंबंधींच्या लीळेचा (नेने आवृत्ति–पूर्वार्ध १, पृ. ४७) आवश्यक तेवढा भाग असा : "मातखेडा वसति :.....गोसावी आसनीं बैसले असति : बाइसे उदकपात्र भरुं गेली : तवं पाणिवथाचिया बाइया गोष्टी करूं लागलिया : 'हा वो : आजी लवकरीचि

मराठी ग्रंथ संग्रहालय संग्रह दा. क्र. ९५२०३

आलीयाति : तें काइ : ना दीसवडी **कटका** जातां उसीरु लागे :' तेहीं म्हणितलें : 'रावो येळापुरा पुरुलाचिया दरिसना आला : ते दहीदुध तेथेंचि विकले : म्हणोनि लवकरी आलों :..."

[५] चक्रधरशिष्य लुखदेव याला एकदां कटक येथें तीन आसू व चार दाम प्राप्त झाले. या प्राप्तींतून स्वामींसाठीं एक वस्त्र घ्यावें, अशी इच्छा त्यानें नागदेवाचार्यांजवळ व्यक्त केली : " एकु दीसीं लुखदेवायें भटोबासातें पुसिलें : ' गोसावियांकारणें वस्त्र घेवों : ' भटीं म्हणितलें : ' तुतें काइ असे : ' ' ना : मी **कटका** गेलां होतां : तेथ मज तीन आसू आणि चारी दाम आले : ' (नेन आवृत्ति पूर्वार्ध २, पृ. १११).

[६] महानुभावीय ' गुरुकुळां'तील देमाइसा ही कटक देवगिरीची. त्यामुळें सारें ' गुरुकुळ ' तिला ' कटककार ' म्हणजे ती (कटककर-देवगिरीकर) या विशेषणानें ओळखीत असे. (कटकर उपनामक घराणीं आजहि आढळतात.) देमाइसेच्या संदर्भांत ' कटक ', ' कटक-देवगिरी ' असे स्थाननिर्देश स्मृतिस्थळांत (स्मृ. १३२-१३४) अनेकवार आलेले आहेत.

आद्य महानुभावीय चरित्रवाङ्मयांत देवगिरीचे उल्लेख कटक अथवा कटक-देवगिरी या नांवानें अनेकवार आलेले आहेत. त्या सर्व उल्लेखांची सूक्ष्मपणें पाहणी केल्यावर असें दिसून येतें कीं, स्थूलपणें जरी देवगिरीला कटक असें पर्याय-नाम असलें, तरी कटक हा देवगिरिनगराचा एक महत्त्वाचा भाग होता. या भागांतच व्यापारी पेठा आणि नागरी वस्ती होती. कटकदेवगिरी हें नांव लष्कर-ग्वाल्हेर या नांवासारखें जोडनांव आहे. परंतु अनेकवार कटक हा देवगिरीचा पर्याय म्हणूनहि वापरीत असत.

आद्य महानुभावीय वाङ्मयांत आलेल्या उल्लेखांवरून कटकासंबंधीं जें अनुमान आपल्या हातीं येतें, त्याला इब्न बतूताच्या देवगिरिवर्णनानें पुष्टि मिळते आणि या अनुमानाला ऐतिहासिक सत्याचें स्वरूप येतें. देवगिरीच्या मधल्या कोटांत जो भाग समाविष्ट होत असे, त्याला महाकोट असें नांव होतें. इब्न बतूतानें या भागालाच कटक असें नांव दिलें आहे. या भागांतच सध्यां चांदमिनार आणि भारतमातामंदिर (प्राचीन कालिकामंदिर) या वास्तु आहेत. प्राचीनकाळीं (यादवकाळीं) हाच भाग देवगिरिनगराचा गाभा असल्यामुळें देवगिरि आणि कटक हे परस्परांचे पर्याय बनणें शक्य आहे.

—आतां, ' कटकें ' जाळल्यानंतर होरपळणारीं जनावरें कीं माणसें, अशी नवी समस्या निर्माण होते. या समस्येचा उलगडा कटकाच्या वरील निश्चितीच्या बैठकीवरच करायला हवा, हें मात्र निःसंशय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्वाधीन
क्रमांक ७५९८५० दि: १९/८/८१
दाखल २९३६ दि: २१/८/८१

संशोधन मंडळाचीं आगामी प्रकाशनें

शेतकऱ्याचा असूड– म. जोतीराव फुले

: संपादक :
डॉ. स. गं. मालशे
श्री. धनंजय कीर



गो. ना. माडगांवकरांचे संकलित वाङ्मय

खंड १ ते ३

: संपादक :
प्रा. अ. का. प्रियोळकर
डॉ. स. गं. मालशे

मराठी संशोधनमंडळाचें संशोधन व प्रकाशन

मुक्तेश्वरकृत महाभारत–आदिपर्व (खंड १ ते ४) प्रत्येक खंडाची किं. रु. ५=००
महाराष्ट्र–भाषेचें व्याकरण (दादोबांच्याही पूर्वीचें १८२४) किं. रु. ४=००
अमृतानंदविरचित योगराज–टिळक (दत्तसांप्रदायिक ग्रंथ) किं. रु. १=५०
मराठी दोलामुद्रितें (संपा–प्रा. सु. आ. गावस्कर) किं. रु. ५=००
सांतु आंतोनिची जीवित्वकथा (क्रिस्ती ओवीबद्ध भक्तविजय) किं. रु. २=००
मुद्रित तुकाराम–वाङ्मय किं. रु. १=००
श्रीचक्रधरनिरूपित श्रीकृष्णचरित्र (महानुभावीय ग्रंथ) किं. रु. २=००
ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार (प्रा. रा. ना. वेलिंगकर) किं. रु. १५=००
आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति (डॉ. कृ. भि. कुळकर्णी) किं. रु. १५=००
युरोपियनांचा मराठीचा अभ्यास व सेवा (डॉ. श्री. म. पिंगे) किं. रु. १५=००
The Printing Press in India (भारतीय मुद्रणाचा इतिहास किं. रु. २०=००
प्रो. केरूनाना छत्रे यांची टिपणवही किं. रु. ०=७५
क्रिस्ताचें यातनागीत किं. रु. १=००
हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण (डॉ. के. वा. आपटे) किं. रु. २=५०
मोरोपंतकृत स्फुट काव्यें खंड १ ला व २ रा प्रत्येकीं किं. रु. ५=००
खंड ३ रा किं. रु. ८=००
म्हैसूरचा कृष्णराव व त्याचा मराठी ग्रंथ संख्यारत्नकोश (अ. का. प्रियोळकर) किं. रु. १=५०
श्रीज्ञानेश्वरांच्या वाङ्मयासाचें दिग्दर्शन (बाळाचार्य खुपेरकर) किं. रु. १=२०
गोष्टीशतक (संपा.–अ. का. प्रियोळकर) किं. रु. १=००
सांतु आंतोनिचीं अचर्या (गोमंतकी बोलींतील ग्रंथ) किं. रु. ६=००
सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली (डॉ. वि. बा. प्रभु देसाई) किं. रु. ७=५०
फ्रेंच कवीनें लिहिलेलें मराठीं पुराण (प्रा. प्रियोळकर) किं. रु. १=००
मुसलमानांची जुनी मराठी कविता (,,) किं. रु. १=००
महानुभाव : इतिहासप्रकर्ण (सं. प्रा. प्रियोळकर) किं. रु. १=००
गोविंद नारायण साडगांवकर (ले. प्रा. प्रियोळकर) किं. रु. १=००
उपाहरन-कथा (सं. डॉ. वि. बा. प्रभु देसाई) किं. रु. २=००
फा. स्टीफन्स आणि त्याचें क्रिस्तपुराण (डॉ. स. गं. मालशे) किं. रु. १=२०
मराठी संशोधन खं. २ (अ. का. प्रियोळकर) किं. रु. २=५०
मस्तक : शाणोपणाची पद्धति (डॉ. स. गं. मालशे) किं. रु. १=००
केशवसुतांच्या कवितांचें हस्तलिखित (,,) किं. रु. १=५०

मुद्रक व प्रकाशक : स. गं. मालशे, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४. मुद्रणस्थळ–मुंबई वैभव प्रेस, ४१७।४२१ सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई नं. ४.